

आत्मोद्धार.



ना. वा. गुणाजी.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव-मुंबई.

आत्मोद्धार.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगांव–मुंबई.

मंडळीनें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें.

पुस्तक.	नांव.	किंमत.
१ लें,	धाकट्या सूनबाई.	०–८–०
२ रें,	संसारांतल्या गोष्टी.	०–६–०
३ रें,	गुणसुंदरी.*	
४ थें,	नवयुग.	०-१२-०
५ वें,	सरस्वती.	०-१०-०
६ वें.	द्रोणसंकोप.	०–६–०
७ वें,	भोळा बाळू.	०–८–०
८ वें,	सुंदरमाधव.	०-१०-०
९ वें,	रावबहादुर पर्वत्या.	०–६–०
१० वें,	कुसुमगुच्छ.	०–४–०
११ वें,	मृणालिनी.	०–८–०
१२ वें,	दुःखाअंतीं सुख.	१–४–०
१३ वें,	माणिकबाग.	१–४–०
१४ वें,	चतुर विनोदी स्त्रिया.	०–६–०
१५ वें,	राजातोडरमल.	०-१२-०
१६ वें,	प्रियंवदा.	०–८–०
१७ वें,	संसाररंजन.	१–०–०
१८ वें,	वंगजागृति.*	
१९ वें,	श्रीकृष्णचरित्र.*	
२० वें,	भयंकर ग्रहदशा.	०–६–०
२१ वें,	संशयी जिजाबाई.*	
२२ वें,	सुधारणेचा मध्यकाल.*	
२३ वें,	मुद्राराक्षस.	०–८–०
२४ वें,	मालतीमाधव.	०–८–०
२५ वें,	उपदेशपाठ.	०–४–०
२६ वें,	परिणामीं हेंच.	०–८–०
२७ वें,	मूर्तिमंत देशाभिमान.	०–८–०
२८ वें,	ऐतिहासिक स्त्रिया.	०–८–०
२९ वें,	प्रेमकहाणी.	०–४–०
३० वें,	वेड्यांचें इस्पितळ.	०–३–०
३१ वें,	नवकुसुममाला.*	
३२ वें,	दोनघटका मनोरंजन.	१–४–०
३३ वें,	रामाची अयोध्या.	१–०–०
३४ वें,	गौप्यगोपन.	०–८–०
३५ वें,	भयंकर सूड.	०–४–०
३६ वें,	नीलांबरी.	०–३–०
३७ वें,	संग्रामसिंह.	०–८–०
३८ वें,	जीवनसंध्या.	०-१२-०
३९ वें,	अमृतपुलिन.	६–०–०
४० वें,	दोनघटका मनोरंजन.	१–४–०
४१ वें,	सुशिक्षित स्त्री.	०-१०-०
४२ वें,	लीला.	०-१२-०
४३ वें,	मुरारराव.	०–४–०
४४ वें,	रमामाधव.	०–४–०
४५ वें,	नशिबाची परीक्षा.	१–४–०
४६ वें,	विवेकानंदांचीं पत्रें.	०–४–०
४७ वें,	प्रेमविजय.*	
४८ वें,	भद्रंभद्र.	०-१०-०

* हीं पुस्तकें संपली आहेत. विकत मिळणार नाहींत.

Printed and published at the Manoranjan press,
1 Charni Rd, Girgaon, Bombay, by K. R. Mitra.

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळीची पुस्तकमाला.

पुस्तक ६६ वें.

आत्मोद्धार.

(डॉ. बुकर टी. वॉशिंग्टन यांचें आत्मचरित्र.)

" दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ! "

—वेणीसंहार.

लेखक

श्रीयुत नागेश वासुदेव गुणाजी,

बी. ए., एल्एल्. बी.

बेळगांव.

[प्रथमावृत्ति.]

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी,

गिरगांव-मुंबई.

किंमत १-०-०. सर्व हक्क स्वाधीन. सन १९१३.

" बायका, मुलें आणि शूद्र लोक हीं राष्ट्रवृक्षाची मुळे आहेत. या सर्वांचे शिक्षण आणि संगोपन यांकडे हिंदुस्तानांत कोणीच पहात नाहीं ! उच्च म्हटले जाणारे वर्ग फार तर या राष्ट्रवृक्षाची फळे ह्मणतां येतील.

फळे वृक्षावर राहण्याकरितां आह्मी आमचा सर्व वेळ दवडतां कामा नये. मुळांकडे लक्ष्य द्या. त्यांनां योग्य खत व पाणी यांचा पुरवठा करा.

गरीब लोक, स्त्रिया व मुले यांच्याच हातून सत्याची प्रगति होणार आहे. खरा राष्ट्रोद्धार राष्ट्राच्या गरीब मुळांपासून होत असतो."

[२]

“ सर्व दानांत विद्यादान हें श्रेष्ठ आहे. एकाद्याला तुह्मीं एक दिवस जेवू घातलें तरी त्याला दुसऱ्या दिवशीं भूक ही लागणारच ! पण, तीच त्याला एकादी कला शिकवा, ह्मणजे तुह्मीं त्याच्या जन्माच्या पोटापाण्याची सोय लाविली, असें होईल. आणि ती विद्या, धंदा अगर कला अशी असावी, कीं, तीमुळे त्याच्या जन्माचे सार्थक व्हावें. संभावित भिकारी राहण्यापेक्षां जोडे करण्यासारखाहि एकादा उपयुक्त धंदा करणें अधिक श्रेयस्कर आहे! "

[३]

"जेथे उद्योगाची अप्रतिष्ठा होते, तेथें अवनति आणि नाश हीं ठेवलेलीच ! आणि कलासुद्धां एक प्रकारचे जोखड काम होऊन बसतें. पण, उद्योगाची जेथें मानमान्यता होते, तेथे जीवंतपणा (चैतन्य) आणि ज्ञान वास करितात व कौशल्य वाढतें.

देशांतील उपासमार काढणाऱ्या नारायणांची व काबाडकष्ट करणाऱ्या विष्णूंची पूजा करा ! गरीब हिंदी विद्यार्थ्यांनां उपयुक्त धंदे शिकण्याकरितां अमेरिकेस पाठवा, ह्मणजे ते शिकून परत हिंदुस्तानांत आल्यावर लोकांनां आपल्या पायांवर उभे राहण्यास शिकवितील, व तेणेकरून शेंकडों, नव्हे हजारों उपाशी लोकांचे प्राण वांचतील. "

[४]

" आपल्या गांवांतील महारणीभंगिणींनां शिकविण्याची तुह्मांला लाज किंवा भीति वाटते काय ? वाटत असेल, तर धिक्कार असो तुमच्या रीती-भातींनां आणि नीतिमत्तेला ! "

- स्वामी रामतीर्थ.

भारतवर्षांतील परमात्मस्वरूप अशा

गरीब विद्यार्थ्यांनां

आणि

निराश्रित स्त्रीपुरुषांनां,

त्यांनांच नव्हे, तर सर्वांनां आदर्शभूत,

असें हें सच्चरित्र

अत्यंत प्रेमादरपूर्वक अर्पण केलें आहे.

प्रकाशकांचे दोन शब्द.

"God helps those, who help themselves,"

अंतःकरणाच्या तळमळीनें, दृढनिश्वयानें, अविरतपरिश्रमानें, आणि आपल्या प्रयत्नांत व कर्तव्यांत यत्किंचिहि कसूर न करितां आत्मविश्वासानें लोकसेवेचें एकादें कार्य करण्यास प्रवृत्त होणाराच्या प्रयत्नांला परमेश्वर यश देतोच देतो, हें तत्त्व, आपल्या सांप्रतच्या परिस्थितींत, आमच्या लोकांच्या मनावर बिंबविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. केवळ तात्त्विक विवेचनानें, अथवा कल्पितकथावर्णनानें, या तत्त्वाचा जसा परिणाम होईल, त्यापेक्षां तो प्रत्यक्ष उदाहरणानें अधिक होऊं शकेल हें उघड आहे. आणि याचसाठीं 'आत्मबला'च्या अकुंठित प्रभावाचा मूर्तिमंत आदर्श, बुकर टी. वॉशिंग्टन यांचें हें अत्यंत हृदयंगम आत्मवृत्त त्यांच्याच शब्दांनीं आज आह्मी महाराष्ट्रास आदरानें अर्पण करीत आहों.

दीर्घ प्रयत्न, अविरत श्रम, ध्यानीं मनीं स्वप्नीं एकच ध्येय ठेवून आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवरहि जय मिळवून इच्छितपदाची प्राप्ति करून घेण्याची कर्तबगारी, या दृष्टीनेंच केवळ या चरित्राचें महत्त्व आहे, असें नाहीं. अमेरिकेतील गुलामगिरीचें आमच्यांतील एका सामाजिक संस्थेशीं फार सादृश्य आहे. हिंदुस्तानांतील सहा कोटींवर अस्पृश्य लोक आज गुलामगिरीपेक्षांहि अत्यंत हीन स्थितींत खितपत पडले आहेत. नीग्रोलोकांशी अमेरिकनांचा कसलाच संबंध तरी नव्हता; पण, हिंदुस्तानांतील या दुर्दैवी लोकांनां त्यांच्याच धर्मबंधूंनी महारोग्यांप्रमाणे केवळ अस्पृश्य ठरवून त्यांनां कसलेहि अधिकार ठेविलेले नाहींत. हें चरित्र वाचून, वरिष्ठ जातीचे सामाजिक अत्याचार, आपली उन्नति करण्यासाठीं हीनजातीनें केलेली धडपड, आणि शेवटीं त्यांचा झालेला उत्कर्ष, हीं पाहून आमच्या मागसलेल्या बंधूनां 'आत्मोद्धार' करण्याचा मोठा हुरूप येईल. त्याचप्रमाणें वरिष्ठजातीनेंहि या चरित्रापासून पुष्कळच बोध घेण्यासारखा आहे. नीग्रोंच्या बाबतींत अमेरिकेंत झालेल्या सामाजिक क्रांतीसारखी क्रांति आज हिंदुस्तानांतहि होऊं पहात आहे, आणि अस्पृश्यवर्ग लवकरच सर्व मानवी गुणांनीं आणि नागरिक हक्कांनीं युक्त झाल्यावांचून रहाणार नाहीं ! उद्यांच्या इतिहासांतील आपल्या नांवावरील हा कलंक पुसण्याची वरिष्ठ जातीची इच्छा असेल, तर त्यांनीं तसा आजच प्रयत्न केला पाहिजे.

या उत्कृष्ट, बहुमोल आणि स्फूर्तिकर पुस्तकाबद्दल खुद्द मनोरंजन आणि मनोरंजन छापखाना सदैव ऋणी राहील ! या आत्मोद्धार पुस्तकानेंच मनोरंजन —

आत्मोद्धार.

—छापखान्याची स्थापना करून दिली आहे, हें येथे कळवितांना आह्माला अत्यंत समाधान वाटत आहे. जो हें पुस्तक लक्ष्यपूर्वक वाचील, त्याला स्फूर्ति, मानसिक बल आणि आत्मविश्वास यांचा थोडाबहुत तरी लाभ होईलच होईल, अशी आमची खात्री आहे. आत्मोद्धाराचें हें पहिलें फल- मनोरंजन छापखान्या-मधून प्रसिद्ध होणारें हें पहिलें पुस्तक - मनोरंजनाच्या प्रिय वाचकांनां आज अर्पण करितांना आह्याला जसें समाधान आणि आनंद वाटत आहे, तसेंच समाधान आणि आनंद या पुस्तकाच्या वाचनानें आमच्या प्रिय वाचकांनांहि लाभेल, असा आह्याला भरवसा आहे.

या पुस्तकाचें भाषांतर करणारे आमचे मित्र श्रीयुत ना. वा. गुणाजी, हे महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे असून त्यांनी लिहिलेलीं रामतीर्थ, रामकृष्ण, रामकृष्णांचीं बोधवचनें प्रभृति पुस्तकें वाचकांच्या आदराला पात्र झाली आहेत. हें पुस्तकहि तसेंच, किंबहुना त्याहूनहि अधिक आदराला पात्र होईल, असा आह्माला भरंवसा आहे. स्वतंत्र पुस्तकें लिहून, अगर परभाषांतील उत्कृष्ट पुस्तकांचें रूपांतर अथवा भाषांतर करून, आपल्या मातृभाषेची तळमळीनें सेवा करणारे गुणाजी यांच्यासारख्या प्रेमळ मित्रांच्या साहाय्याची आह्मी अपेक्षा करितों. मनोरंजन छापखान्याचा जन्म महाराष्ट्रसारस्वताची एकनिष्ठपणे सेवा करण्यासाठींच झाला आहे. सुंदर छपाई करून आणि स्वल्प किंमत ठेवून, दरसाल शक्य तितकी जास्त उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. मनोरंजन छापखाना सध्यां अगदींच बाल्यावस्थेत आहे. मनोरंजन छापखान्यांत प्रसिद्ध होणाऱ्या या पहिल्या पुस्तकाची छपाई, आह्माला सध्या उपलब्ध झालेल्या अगदीं अपूर्ण अशा साधनसामुग्रीचा उपयोग करून शक्य तितकी सुबक करण्याचा आह्मीं प्रयत्न केला आहे; तथापि क्रमाक्रमानें मनोरंजनाची छपाई महाराष्ट्रांत आदर्शवत् करण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करण्यांत येईल, एवढेच सध्यां सांगून, हे मनोरंजन छापखान्यांत छापलेलें पहिलें पुस्तक आज महाराष्ट्रास अत्यंत आदरानें अर्पण करीत आहों. त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार होईल, अशी आशा आहे.

गिरगांव-मुंबई, ता. १५ जुलै, १९१३.

}

काशीनाथ रघुनाथ मित्र, व्यवस्थापक-म. ग्रं. प्र. मंडळी.

प्रस्तावना.

इसवी सन १९११ सालीं शिक्षणाला वाहून घेतलेल्या अशा कांहीं सज्जन मित्रांचा निकट परिचय व सहवास आह्माला घडला. या सत्समागमाचा लाभ घेत असतां 'न भूतो न भविष्यति' अशा एका अत्यद्भुत चमत्काराची बातमी आह्माला लागली. तो चमत्कार असाः-

१७ व्या शतकाच्या आरंभीं आफ्रिकेतील नीग्रो लोकांनां पकडून त्यांनां अमेरिकेंत गुलाम ह्मणून विकण्याचा क्रम सुरू झाला, आणि तो एकदोन शतकें अव्याहत चालला. दोनशेंअडीचशें वर्षे गुलामगिरींत काढिल्यामुळे त्या लोकांची स्थिति किती निकृष्ट आणि भयंकर झाली असेल, याची कल्पना कोणालाहि सहज करितां येईल. इसवी सन १८६२l६३ च्या सुमाराला अमेरिकेंत गुलामांची संख्या एकंदर ४०,००,००० होती! इतक्या गुलामांनां स्वतंत्रता दिल्यास आपली शेतीभाती व इतर कामें बंद पडतील, आणि आपल्या उदरनिर्वाहाची पंचाईत पडेल; एवढेच नव्हे, तर स्वतंत्र झालेले गुलाम उद्दाम होऊन बंडें करितील, अशी अमेरिकेतील दक्षिणेकडील संस्थानांतील लोकांनां भीति वाटत होती. अशी परिस्थिति असतांना, अमेरिकन सरकारनें इसवी सन १८६३ साली दास्य-विमोचनाचा जाहिरनामा प्रसिद्ध करून सर्व गुलामांनां स्वतंत्रता दिली !

स्वतंत्र झालेल्या गुलामांपैकीं खाणीत काम करीत असलेल्या बुकर टी. वॉशिंग्टन नांवाच्या एका मुलानें, व्हर्जीनिया संस्थानांत हाम्पटन येथे नीग्रो लोकांकरितां एक शाळा स्थापन झालेली आहे असें ऐकिलें, आणि आपल्या आईच्या व बंधूच्या मदतीनें व अनुमोदनानें तो तिकडे जाण्यास तयार झाला. वाटेंत अनेक त्रास आणि हालअपेष्टा सोसून त्यानें अखेरीला हाम्पटन गांठलें, आणि तेथील शाळेत आपला प्रवेश करून घेतला. कांहीं वर्षांनीं तो त्या शाळेतून ग्रॅजुएट झाला. पुढे अलाबामा संस्थानांतील टस्केजी गांवांत नीग्रो लोकांची एक शाळा निघण्याचें घाटत होतें, व या कामाबद्दल बुकर टी. वॉशिंग्टन याला आमंत्रण आलें, आणि त्यानें तें आनंदानें स्वीकारिलें. नंतर ता. ४ जुलै सन १८८१ रोजीं टस्केजीची शाळा सुरू झाली. सुरुवातीपासून तो तहत आजपर्यंत तिची एकसारखी भरभराट होत आहे. या संस्थेतून ७,००० तरुण स्त्रीपुरुष उत्तम तर्‍हेनें तयार होऊन बाहेर पडले असून त्यांनी —---

आत्मोद्धार.

–अनेक ठिकाणी बऱ्याच लहानलहान शाळा टस्केजी संस्थेच्या शाखा-काढिल्या आहेत.

हा सर्व चमत्कार कसा घडून आला? गुलामगिरी बंद झाली आणि गुलामगिरीतून मुक्त झालेल्या एका छोट्या मुलाला स्वतः शिक्षण संपादून आपण आपल्या ज्ञातीची खरीखुरी सेवा करावी अशी प्रेरणा झाली, त्यामुळे हें सर्व घडून आले.

"जर एकाद्यानें फार चांगला ग्रंथ लिहिला, अथवा जगाला फार मार्मिक उपदेश केला, अगर त्यानें आपल्या शेजाऱ्यापेक्षां अधिक उत्तम टोपली बनविली, अथवा अप्रतिम कामगिरी बजाविली, आणि अरण्यांत जाऊन जर तो आश्रम बांधून राहिला, तर या अरण्यामध्ये त्याच्या आश्रमाच्या द्वारापर्यंत जगांतील लोक उत्तम सडक तयार करितील," अशा अर्थाचे इमर्सनचे उद्गार किती तरी सत्य आहेत !

अलाबामा संस्थानांतील डॉ. वॉशिंग्टन यांचीं टस्केजी संस्था पाहण्यास आजपर्यंत पुष्कळ लोक गेलेले आहेत. खुद्द अमेरिकेचे प्रेसिडेंटहि गेलेले आहेत.

इ. स. १९११ च्या फेब्रुवारी महिन्यांत अलाबामांतील मोबील (Mobile) शहरी नॅशनल एज्युकेशनल असोसिएशनच्या सुपरिंटेंडन्स खात्याची एक सभा भरली होती; आणि या सभेला शाळेतील शिक्षक, कॉलेजांतील प्रोफेसर, शिक्षणखात्यांतील इन्स्पेक्टर व सुपरिंटेंडंट इत्यादि शेंकडों लोक हजर होते. सभेचे काम आटोपल्यावर ही सर्व मंडळी तेथून नजीक असलेली टस्केजी संस्था पाहण्यास गेली. या संस्थेतील शिक्षणाची आणि काम करण्याची पद्धत, टापटीप आणि व्यवस्था, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि तरतरी, हे सर्व पाहून ते सर्व गोरे अधिकारी फार खूप झाले, आणि "टस्केजी संस्था आदर्शरूप असून आह्मीहि पुष्कळ गोष्टी या संस्थेपासून शिकल्या पाहिजेत; ज्या कांही सुधारणा शिक्षणखात्यांत कराव्या असें आह्मी इच्छितों, पण ज्यांची अंमलबजावणी आमच्या हातून अद्यापि झालेली नाहीं, त्या सर्व सुधारणा टस्केजी संस्थेत सुरेख घडवून आणिल्या आहेत," असें त्यांनी प्रांजलपणें कबूल केले. इतकेच नव्हे, "तर आह्मी जी ही तीर्थयात्रा केली आणि जो कांही येथील प्रकार पाहिला, त्यायोगे आह्मी धन्य झालों !" असे त्यांनीं टस्केजी संस्थेसंबंधीं उद्गार काढले.

अशा या हाम्पटन किंवा टस्केजी येथील संस्थेत कांहीं दिवस राहून अध्ययन करावें, किंवा हीं दोन तीर्थे पाहून नेत्रांचे पारणे फेडावें, अशी प्रबल इच्छा आमच्या मनांत उत्पन्न झाली; पण कांही कारणांमुळे, विशेषतः द्रव्याच्या अभावामुळे,----

प्रस्तावना-

–आह्माला आमची इच्छा सफल करून घेतां येईना. तथापि निराश न होतां, देहानें नाहीं तर नाहीं, निदान मनानें तरी ती क्षेत्रे पहावी, असा आम्हीं संकल्प केला, आणि त्या पवित्र क्षेत्रांविषयीं-विद्यापीठांविषयीं समग्र माहिती आणवून आह्मी ती मोठ्या प्रेमानें वाचू लागलों. या अध्ययनापासून झालेला आनंद आमच्या इतर बंधुभगिनींनां आमचे वांटेकरी केल्याशिवाय आह्माला चैन पडूं देईना. अध्ययनाच्या या आनंदामुळेच या ग्रंथाविषयीं श्रम करण्यांत आह्मी यत्किंचिहि कसूर केलेली नाहीं. महाराष्ट्र वाचकवृंदाला एका थोर पुरुषाची ओळख करून देण्याला आह्मी कारण झालों, याबद्दल आह्माला संतोष वाटत आहे.

हाम्पटनसंस्थेचे ग्रॅजुएट आणि टस्केजीसंस्थेचे प्रिन्सिपाल, डॉ. बुकर टी. बॉशिंग्टन यांनीं आपल्या आयुष्यांतील कांहीं अनुभव 'औटलुक' नामक मासिकांत प्रसिद्ध केले होते; तथापि त्यांनी आपलें सबंध चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याची कृपा करावी, अशी त्यांच्या बऱ्याच लहानथोर इष्टमित्रांनी त्यांनां पत्रद्वारें वारंवार विनंति केली होती; परंतु या त्यांच्या विनंतीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. कारण, "आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध करण्यासारखें आपण जगाचें काय मोठें कल्याण केले आहे?" असें मोठ्या विनयानें ह्मणून डॉ. वॉशिंग्टननीं आत्मचरित्र लिहिण्याची टाळाटाळी केली. तथापि जेव्हां त्यांच्या पोर्शिया नामक कन्येनें त्यांनां एकसारखी टुमणी लाविली आणि ह्यटलें "बाबा, तुह्मी आपली पूर्वाश्रमींची विशेष माहिती मला सांगितली नाहींत ! मला आणि माझ्या भावंडांनां ती ऐकण्याची अतिशय इच्छा आहे," तेव्हां मात्र, दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं नसलें तरी आपल्या स्वतःच्या कुटुंबासाठीं तरी आपलें चरित्र आपण लिहावें, असें त्यांनां वाटूं लागलें, आणि नंतर त्यांनीं "Up From Slavery' नांवाचें आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध केलें.

"Up From Slavery" या आत्मचरित्राचें मराठींत नांव काय ठेवावें, याचा आह्माला बराच विचार करावा लागला. 'दास्यविमोचन,' 'आत्मोन्नति,' 'दास्योद्धार,' 'गुलामाचा निजाम,' 'दासाचे खासे' इत्यादि बरींच नांवें कांहीं मित्रांनी सुचविलीं. शेवटीं कांहीं कविमित्रांनी सुचविलेलें 'आत्मोद्धार' हेंच नांव आह्याला पसंत पडलें. कारण, 'आत्मा' याचा अर्थ आपण किंवा 'समष्टि-

---

इदं ब्रह्म, इदं क्षेत्रं, श्मे लोकाः, इमे देवाः, इमानि भूतानि, श्दं सर्व यदयमात्मा."

- बृहदारण्यकोपनिषत्, अध्याय२, ब्राह्मण४.

रूप सर्व लोक' असा आहे. ज्या बहाद्दराने आपल्या कर्तबगारीने शिक्षण संपादन केले आणि आपला व आपल्या ज्ञातीचा लोकांचा उद्धार केला, त्याच्या चरित्राला ‘आत्मोद्धारा’शिवाय दुसरे कोणते यथार्थ नांव मिळणार ?

ज्या हाम्पटन संस्थेने डॉ. बुकर टी. वॉशिग्टन यांच्यासारखा अद्वितीय
कर्तबगारीचा मनुष्य तयार केला, त्या संस्थेची, त्याचप्रमाणे बुकर डी. बॉशिग्टन यांनी चालविलेल्या टस्केजी संस्थेचीहि प्रारंभापासून आजपर्यंतची माहिती याच पुस्तकात परिशिष्टरूपाने देण्याचा आमचा मानस होता; परंतु पुस्तक आधीच बरेच वाढले असल्यामुळे, आयत्यावेळी तो विचार तहकूब करणे भाग पडले. तथापि हाम्पटन संस्थेचे जनक जनरल आर्मस्ट्रांग याच्या मृत्युपत्राचे टाचण शेवटी परिशिष्टरुपाने दिले आहे, ते प्रत्येकानें अवश्य वाचाचे.

आमचे चरित्रनायक डॉ. वॉशिंग्टआणि हाम्पटनसंस्थेचे बिझिनेस मॅनेजर वुईल्यम ए एरी या उभयतांनी आमच्या विनंतीवरून आपापल्या संस्थेच्या माहितीची पुस्तके आणि 'आत्मोद्वार' पुस्तकांत घालण्यास कांहों फोटो पाठवेले, याबद्दल आह्मी ला उभयतांचे फार आभारी आहो. 'आत्मोद्वार’ पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याविषयी आली आमच्या एका सन्मान्य परमपूज्य स्नेह्यांनी विनंति केली होती, ती त्यांनी मोठ्या प्रेमाने आनंदाने कर्तव्य असे समजून मान्य केली, आणि पुढें थोड्या दिवसांत विषयानुरुप बरीच विस्तृत असा एक सुंदर प्रस्तावना लिहून तयार केली. या प्रस्तावनेचे आम्ही इंग्रजी लहानसे पुस्तक प्रसिद्ध करणार आहों. इंग्रजी प्रस्तावनेचा बहुतेक सर्व भाग आधी मराठीत भूमिकेत आणलेला आहे. मित्रवर्य वासुदेव हरि करंदीकर यांनी भाषांतर करण्याच्या, लिहिण्याच्या व तपासण्याच्या कामी आह्माला अनेक प्रकारें साहाय्य केले आहे. मित्रवर्य रामचंद्र कृष्ण कामत यांनी भाषांतर तपासले आहे. माझे प्रिय बंधु यशवंत वासुदेव गुणाजी यांचेहि मला वेळेनुसार साहाय्य मिळाले आहे. मित्रवर्य काशीनाथ रघुनाथ मित्र यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ग्रंथाचे बहिरंग अंतरंगाला साजेसे सुरेख करून त्यांनी हा मोठ्या प्रेमाने मनोरंजनाच्या वर्गणीदारांनां बक्षीस देऊन महाराष्ट्रात घरोघर या उत्कृष्ट ग्रंथाचा प्रवेश करून दिला आहे. या सर्व मित्रांचे आह्मी मनापासून आभार मानितो.

प्रस्तावना

–हा ग्रंथ वाचून वाचकवर्गापैकी श्रीमंतांनां कांहीं देणगी, गरीबांनां 'फूल नाहीं फुलाची पाकळी' हाम्पटन किंवा टस्केजीसारख्या परोपकारी व लोकोपयुक्त संस्थांनां द्यावी अशी स्फूर्ति होईल, तर ईश्वर बुद्धि देईल त्याप्रमाणें त्यांनी हाम्पटन आणि टस्केजी संस्थेचे प्रिन्सिपाल किंवा ट्रेझरर (खजिनदार) यांच्या नांवें रक्कम पाठवून त्या संस्थांनां यथाशक्ति मदत करावी, अशी सर्वांनां आमची आग्रहाची विनंति आहे. अशा सत्कार्यी पैसा खर्च करणें ह्मणजे परमेश्वराला राजी करणें, एवढेच नव्हे, तर त्याला आपला ऋणी करणें होय, हें ध्यानांत ठेवावें. स्वतः रक्कम पाठविणें जर कोणाला जुळणार नाहीं, तर त्यांनीं ती रक्कम आमच्याकडे पाठविल्यास आह्मी ती त्या संस्थांनां पाठवून देऊं, आणि त्या रकमेची पोंच त्या संस्थांकडून आणवून देऊ. तसेंच या संस्थांविषयीं आम्हाला अवगत असलेली माहिती जिज्ञासूंनां मोठ्या आनंदानें आह्मी देऊ.

शेवटीं वाचकांनी हंसक्षीरन्यायानें या ग्रंथांतील गुणांचें ग्रहण करावें, आणि दोष आमच्या पदरीं टाकावेत, अशी त्यांनां विनंति करून, आणि जिच्या कृपा बलनें या ग्रंथाचें काम तडीला गेले त्या जगन्माऊलीचे स्मरण करून आणि अधिकाधिक लोकसेवा करण्याची पात्रता अंगीं यावी ह्मणून तिचें साहाय्य मागून ही प्रस्तावना पुरी करितों.

बेळगांव,
वर्षप्रतिपदा, १८३५,
ता० ७।४।१३.

ना. वा. गुणाजी.

भूमिका

‘ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ‘

- गीता.

साह जगांत ज्ञानासारखें पवित्र दुसरें कांहीं नाहीं ! ज्या देशांत ज्ञान किंवा शिक्षण उत्तम तऱ्हेनें आणि परमार्थबुद्धीनें लोकांनां दिले जातें, त्या देशाच्या भाग्याला कधींहि वाण पडणार नाहीं, असें अनुभवानें ठरलेलें आहे. प्राचीन कालीं हिंदुस्तान देशांत शिक्षणाचें अथवा ज्ञानदानाचे काम फार चांगलें बजाविले जात असे. अध्ययन आणि अध्यापन हें ब्राह्मणवर्गाचें-द्विजांचें मुख्य कर्तव्यकर्म असे, आणि या पवित्र कर्तव्यकर्माला ब्राह्मणांनीं आपणांला पूर्णपणे वाहून घेतलेलें होतें. विद्यार्थी आपल्या गुरूच्या गृहीं किंवा आश्रमी एक तपभर राहून विद्यार्जन करीत असत, आणि गुरुहि त्यांनां मोफत आणि मनापासून पढवीत असत. हे गुरु मोठमोठे मुनि असून त्यांनां 'कुलपति' अशी संज्ञा असे. गुरूंच्या कुटुंबांचा आणि विद्यार्थ्यांचा सर्व खर्च, राजेरजवाडे आणि श्रीमंत लोक यांनी वेळोवेळां दिलेल्या देणग्यांच्या योगें भागत असे. मोठमोठ्या मुनींचे आश्रम ह्मणजे त्यावेळच्या युनिव्हर्सिट्या किंवा विद्यापीठेंच होत. उदाहरणार्थ, जनकराजाचे गुरु सुप्रसिद्ध याज्ञवल्क्य यांचे एक जंगी विद्यापीठ होतें, आणि ते पुष्कळ विद्यार्थी पढवीत असत, असें यजुर्वेद शतपथ-ब्राह्मण आणि त्यांतील बृहदारण्यकोपनिषद् यांवरून दिसून येतें. अध्ययन व अध्यापन यांचें पवित्र कर्तव्यकर्म उत्तम रीतीनें बजाविणारे याज्ञवल्क्यां-सारखे ज्ञानी पुरुष या पृथ्वीवर केव्हां केव्हां अवतीर्ण होतात, हें तिचे भाग्य होय. हल्लीं नूतन खंडांत-अमेरिकेत-ज्ञानार्जनाच्या व ज्ञानदानाच्या कामीं याज्ञवल्क्यां-सारखा किंवा त्याहून कांकणभर चढच, असा एक नरपुंगव हयात आहे, आणि त्याचें नांव डॉक्टर बुकर टी. वॉशिंग्टन असें आहे.

वॉशिंग्टन ! वॉशिंग्टनचें नांव ऐकतांच किती तरी उदात्त कल्पना आमच्या मनांत उभ्या राहतात ! बालपणापासून सत्यनिष्ठा, स्वदेशप्रीति, स्वार्थत्याग, साधेपणा इत्यादि गुणांनीं युक्त असलेला, आणि अमेरिकाखंडाला स्वातंत्र्य देणारा (जॉर्ज) वॉशिंग्टन तो हाच काय, किंवा त्याचा या वॉशिंग्टनशी कांहीं संबंध आहे काय, अशी पृच्छा कांहीं वाचक करतील. आणि त्या वॉशिंग्टनशीं या वॉशिंग्टनचा कांहीं संबंध नाहीं, इतकेंच नव्हे, तर हा वॉशिंग्टन त्याच्या जातीचाहि नसून तो सिद्दी किंवा हबशी आहे, असें त्यांनां कळून—

आत्मोद्धार.

—आल्यावर कदाचित् ते नाक मुरडतील. अशा वाचकांनां आह्मी असा इषारा देतों, की, त्यांनी असे उतावीळ होऊं नये. या वॉशिंग्टनचे आत्मचरित्र आधी नीट वाचून पहावें, ह्मणजे तें त्या वॉशिंग्टनसारखेच किंवा त्याहून अधिक मनोरंजक, सात्त्विक आणि बोधप्रद आहे, असें त्यांना आढळून येईल.

आत्मचरित्राचें महत्व**.**

आत्मचरित्राचे महत्त्व कांहीं अंशी चरित्रविषयीभूत व्यक्तीवर, आणि कांहीं अंशी त्या व्यक्तीने केलेल्या कामगिरीवर, अवलंबून असतें.वॉशिंग्टनच्या आत्मचरित्रांत हें एक विशेष आहे, की, ही दोन्हीं अंगे-व्यक्ति आणि कामगिरी-अगदीं व्यस्तप्रमाणांत आहेत, आणि त्यामुळे हें आत्मचरित्र अत्युत्तम आणि सर्वांनां अनुकरणीय असे झालें आहे. वॉशिंग्टन हा यःकश्चित् गुलाम होता, पण आपल्या करणीनें तो रंकाचा राव नराचा नारायण बनला आहे ! इतकी आत्मोन्नति त्यानें कशी साधली, हा वृत्तान्त फारच बोधप्रद आहे.

हे आत्मचरित्र काय शिकवितें **?**

डॉ. वॉशिंग्टनच्या आयुष्याचा वृत्तान्त अनेक रीतीनी अद्वितीय आहे. गुलामगिरीत त्याचा जन्म झाला. त्याला आपल्या बापाविषयी किंवा आज्याविषयीं कांही विशेष माहिती नाही.अशा स्थितीमधून वर वर येत शेवटीं तो आपल्या ज्ञातीचा पुरस्कर्ता व नेता, आणि मानवजातीचा कल्याणकर्ता झाला आहे ! त्याचें पौरुष, त्याची सत्यनिष्ठा, साधी राहणी, आपल्या ज्ञातीची व देशाची सेवा करण्याविषयीची त्याची कळकळ, अमेरिकेतील नीग्रोलोकांची आधिभौतिक आणि नैतिक स्थिति सुधारण्याकरितां त्यानें केलेले अविश्रांत प्रयत्न, त्याचा स्वार्थत्याग, त्याचा सुखभाव, इत्यादि सर्व गोष्टींचें हृदयंगम वर्णन या आत्मचरित्रांत आलेलें आहे. हें आत्मचरित्र सर्वांनां, विशेषतः भारतवासीयांनां फारच उपयुक्त आहे. कारण, प्रतिकूल परिस्थितीत आपल्या समाजाचे आणि देशाचें हित कसें साधावें, हें हें चरित्र शिकवितें.

वॉशिंग्टनचे संक्षिप्त चरित्र**.**

वॉशिंग्टनच्या आयुष्याचा वृत्तान्त, आणि त्याच्या आयुष्यांतील मुख्य कामगिरी, यांचे थोडक्यांत वर्णन करितां येईल. त्याचें बालपण दास्यांत गेलें. गुलामांनां स्वातंत्र्य मिळालें तेव्हां तो लहान होता. लहान वयांतहि आपल्या कुटुंबाच्या निर्वाहार्थ त्याला एकसारखें खपावे लागे. त्याच्या सावत्र बापाचे त्याच्यावर प्रेम नव्हते. कुटुंबांत मोलमजुरी मिळविणारा हा मुलगा असल्यामुळे—-

–त्याचा वेळ शिक्षण देण्यांत फुकट दवडूं नये, असें त्याच्या बापाला वाटत होतें. शिक्षण मिळविण्याच्या कामी त्याची आई आणि त्याचा सावत्र बंधु यांची मात्र त्याला पूर्ण सहानुभूति होती. शिक्षणाच्या पायी त्याला फार त्रास व संकटें सोसावी लागली. त्याचें खरें शिक्षण, नीग्रो जातीचे चांगले पुढारी तयार करण्याकरितां स्थापन झालेल्या हाम्पटन संस्थेंत झालें. हाम्पटन येथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर त्यानें दोनतीन वर्षे इकडेतिकडे शिकविण्यांत काढिली, आणि नंतर टस्केजी येथे एक नवीन शाळा काढण्याविषयीं त्याला आमंत्रण आलें. तें स्वीकारून त्यानें आपल्या जीवितांतील मुख्य कार्याचा आरंभ केला. टस्केजीची शाळा सुरू झाल्यापासून ह्मणजे सन १८८१ सालापासून तिची एकसारखी भरभराट होत आहे. वॉशिंग्टन हे अद्याप त्या शाळेचे मुख्य प्रिन्सिपाल आहेत. नीग्रो शेतकऱ्यांची परिषद् आणि नीग्रो राष्ट्रीय उद्यमसंघ या संस्थाहि वॉशिंग्टननें स्थापन केल्या आहेत. या सर्व संस्थांच्या उत्तम स्थितीमुळे दक्षिण अमेरिकेतील नीग्रो लोकांची स्थिति झपाट्यानें सुधारत चालली आहे.

हाम्पटनसंस्था

वॉशिंग्टनच्या जीवितक्रमाचें खरें तत्त्व समजण्यासाठीं हाम्पटन संस्थेविषयीं थोडीशी माहिती येथे सांगणें अवश्य आहे. कारण वॉशिंग्टन हा त्या संस्थेचा एक विद्यार्थी होता, व त्या संस्थेचे संस्थापक जनरल आर्मस्ट्रांग यांचा त्यानें कित्ता
उचलला. सिव्हिलवॉर (१८६० ते १८६५) संपल्यावर काळ्या व गोऱ्या लोकांमध्यें मध्यस्थी करण्यास युनायटेड स्टेट्सच्या सरकारनें जनरल आर्मस्ट्रांग यांनां पाठविलें होतें. त्यावेळीं ह्मणजे सन १८६८ सालीं त्यांनी ही संस्था स्थापन केली. अनाथ, गरीब, कोणतीहि कला अवगत नसल्यामुळे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ, आणि दिवसेंदिवस खालावत जाणारे असे हजारों नीग्रो आर्मस्ट्रांगला आढळले. स्वतंत्रतेमुळे उत्पन्न झालेल्या नवीन परिस्थितीला त्यांनां तोंड देतां येईना. त्यांच्या पूर्वीच्या मळ्यांतील झोंपड्या नाहींशा झाल्या, मळे ओसाड पडले, आणि दुसरें कसलेंहि क्षुल्लक काम करणें त्यांनां अशक्य झालें. आपली मीठभाकर मिळविण्यास असमर्थ असलेली नीग्रो जात नामशेष होऊं नये, नूतन परिस्थितीशीं टक्कर देऊन तिनें आपलें डोके वर काढावें, हें महत्कृत्य करण्याचा आर्मस्ट्रांग यांनीं संकल्प केला, आणि अमेरिकन मिशनरी संस्थेच्या साहाय्यानें एक औद्योगिक शाळा हाम्पटन येथे उघडिली. प्रथम दोन असिस्टंट आणि पंधरा विद्यार्थी इतकीच मंडळी होती. आतां—

(१९१२) त्या संस्थेत १६०० वर विद्यार्थी, २०० शिक्षक, व इतर ऑफिसर आहेत. संस्थेच्या १४० इमारती आहेत, आणि संस्थेची ११०० एकर मालकीची जमीन आहे. संस्थेच्या कामगिरीविषयीं जे. डब्ल्यू. चर्च नांवाचा गृहस्थ असें लिहितो, कीं, हाम्पटन कोणतेंहि काम अर्धेमुर्धे करीत नाहीं. जेव्हां तरुण नीग्रो विद्यार्थी संस्थेत दाखल होतात, तेव्हां एकसारखें चार वर्षे आपणाला सतत खपावें लागणार हे त्यांनां माहीत असतें. मनुष्याच्या मनाला सुचतील त्या सर्व उपायांनी या श्रमाचें ओझें होतां होईल तो हलकें वाटावें, म्हणून शक्य तितका प्रयत्न केला जातो, आणि श्रमाची व पवित्र आचरणाची महती विद्यार्थ्यांच्या मनांत ठसावी अशी संस्थेची रहाटी असते; पण सतत श्रम केल्यावांचून सुटका नाहीं, हें सर्वांनां पक्के ठाऊक असतें. आळस आणि अज्ञान हे दोन मोठे दुर्गुण नीग्रो लोकांच्या अंगीं पिढ्यान्पिढ्या खिळलेले होते. त्यांचें उच्चाटन करण्याचा हाम्पटननें मोठा प्रयत्न केला, आणि त्या कामीं यश मिळविलें.

पद्धति व तत्त्वें.

या कामी हाम्पटननें कोणत्या पद्धति, कोणतीं तत्त्वें यांचा आश्रय केला, हें सांगत बसण्याची जरूरी नाहीं. कारण, वॉशिंग्टननें त्याच पद्धतींचा आणि तत्त्वांचा आश्रय केला आहे; आणि त्यांचें वर्णन पुढे येणार आहे. येथे इतकें सांगितलें असतां पुरे, कीं, मागसलेल्या जातीच्या-नीग्रोंच्या तरुण मुलांच्या मनांत नवीन गुणांचे बीजारोपण करतांना सामाजिक संस्थांचीं मूलभूत तत्त्वें आणि अत्यंत स्वाभाविक उपाय यांचाच अवलंब केला होता.

वॉशिंग्टन पुढील प्रश्न

टस्केजी येथें एक नवीन नमुनेदार शाळा स्थापन करण्याकरितां गेल्यावेळीं वॉशिंग्टनच्या समोर जो प्रश्न उभा राहिला, त्याचा आपण विचार करूं. शाळेची इमारत तर मुळीं नव्हती; पण, शिक्षणाकरितां हपापलेले असे शेंकडों तरुण व वृद्ध नीग्रो विद्यार्थी वॉशिंग्टनला आढळले. टस्केजी येथे गोऱ्या लोकांच्या शिक्षणासाठीं अनेक सोयी होत्या; पण त्यांचा काळ्या लोकांनां कांहीं उपयोग नव्हता. पण समाधानांची गोष्ट इतकीच, कीं, तेथें गोऱ्या आणि काळ्या लोकांचा संबंध चांगला होता, आणि संस्थानच्या राज्यनियामक सभेनें नीग्रो शाळेकरितां दरवर्षी दोन हजार डालर देऊं केले होते. पण, ही रकम, जमीन, इमारत किंवा उपकरणें यांत खर्च करावयाची नसून शिक्षकांच्या पगाराकडेच लावावी, असा निर्बंध होता. काळ्या लोकांत उत्साह अपूर्व दिसत होता, आणि वॉशिंग्टननें त्याचा पूर्ण उपयोग केला.

भूमिका

त्यावेळची नीग्रोंची परिस्थिती

परिस्थितीचे पूर्ण ज्ञान मिळविणे यांतच यशाची गुरुकिल्ली आहे. आपल्याला कोणत्या लोकांत काम करावें लागणार, आपले भावि विद्यार्थी कसे असणार, याची माहिती स्वतः मिळवावी ह्मणून वॉशिंग्टनने प्रथमतःच आपल्या चळवळीचे सर्व क्षेत्र तपासून पाहिलें. आजूबाजूच्या खेड्यापाड्यांत लोक पूर्वीच्या एका खोलीच्या झोपडींत राहत असत. त्यांच्यांत स्वच्छता बिलकूल नसे. लोक अमंगळ असून ते आपले दांत देखील नित्य घांसीत नसत. स्नान केव्हांतरी पुष्कळ दिवसांनी एकदां करीत. त्या लोकांचे आपल्या आवश्यक गरजांकडे लक्ष्य नसून, पियानो व घड्याळे यांसारखे चैनीचे पदार्थ ते विकत घेत. आणि आश्चर्य हें, कीं, त्यांनां या वस्तूंचा नीट उपयोगहि करितां येत नसे ! सर्व प्रकारचें धान्य पैदा होणारी जमीन आजूबाजूला मुबलक असूनहि ते फक्त कापसाची लागवड करून त्यावरच आपला उदरनिर्वाह कसातरी भिकारपणानें करति. शेतकीच्या सुधारलेल्या तऱ्हा त्यांनां माहीत नव्हत्या. गृहव्यवस्थेचे नांवहि त्यांनी ऐकिलें नव्हतें. थोडेबहुत शिक्षण मिळालेले लोक मोठमोठ्या नोकऱ्या मिळविण्याचा प्रयत्न करीत. आळशी आणि दुर्गुणी लोक आपणाला ईश्वराकडून प्रेरणा झाली आहे, असें मानून स्वतः नालायक असतांहि, उपदेशकांचा आणि मिशनऱ्यांचा धंदा, सुरू करीत.

प्रारंभ

अशावेळीं लोकांची कींव येऊन वॉशिंग्टननें प्रथम नीग्रोंच्या एका जुन्या व लहानशा मेथाडिस्ट देवालयानजीक असलेल्या एक झोंपडीत शाळा सुरू केली. यांत वॉशिंग्टन हे काय ते एकटेच शिक्षक असून पंधरा मुलें व पंधरा मुली मिळून तीस विद्यार्थी होते. गणिताचे सिद्धांत व व्याकरणाचे नियम त्यांनां तोंडपाठ येत; पण त्यांचा उपयोग कसा करावा हें त्यांनां माहीत नव्हते. श्रमाची-अंगमेहनतीचीं कामें करणें त्यांनां बिलकूल आवडत नसे. उलट, असलीं कामें करणें हें आपल्या दर्ज्याला योग्य नाहीं, असें ते समजत असत.

वॉशिंग्टनच्या पत्न्या-त्याचे मदतनीस

शाळा सुरू झाल्यापासून दीड महिन्याच्या आंत वॉशिंग्टनला एक उत्तम भागीदार येऊन मिळाला. त्याचें नांव मिस डेव्हिडसन. ही, वॉशिंग्टनची पहिली बायको वारल्यावर त्याची पत्नी झाली. एकंदरीत वॉशिंग्टनचे लग्न तीनदां झालें, आणि त्याच्या तीन्ही पत्न्यांनी आपला हातभार लावून शाळेची उत्तम सुधारणा करण्यास त्याला साहाय्य केले. सुधारणेत अत्यंत मागसलेल्या—--

—-अशा नीग्रोंनां आपल्या ज्ञातीची उन्नति करण्याच्या कामीं, एकेकाळीं सुधारणेत आह्मी अग्रगण्य होतों अशी बढाई मारणाऱ्या आमच्या हिंदी लोकांपेक्षां अधिक सोयी आहेत, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. कारण, सामाजिक आणि शिक्षणविषयक बाबतींत, त्यांनी हाती घेतलेल्या सुधारणेच्या सर्व कामांत त्यांनां त्यांच्या स्त्रियांचे साहाय्य मिळतें. आह्मांला हल्ली तसें साहाय्य मिळत नाहीं. वॉशिंग्टनला पुढें बरेच चांगले लोक येऊन मिळाले आणि त्याची शाळा नीग्रो अध्यापक व अध्यापिका यांनींच चालविली आहे.

शिक्षण कोणत्या तत्वांवर दिले **?**

दक्षिणेतील संस्थानांत शेतकीवर अवलंबून असणाऱ्या नीग्रो लोकांचे प्रमाण शेंकडा ८५ होतें. आणि यासाठीं शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे शेतकीवर प्रेम कमी होऊं नये, हैं मुख्य धोरण वॉशिंग्टननें ठेविलें. दुसरें तत्त्व असें होतें, कीं, प्रत्येक विद्यार्थ्यानें कांहीं तरी धंदा शिकून तयार झालें पाहिजे, आणि त्याच्या मनांत धंदा, काटकसर आणि व्यवस्था यांविषयीं प्रेम उत्पन्न व्हावें, ह्मणजे शाळा सोडून गेल्यावर विद्यार्थ्याला चांगल्या रीतीनें आपला उदरनिर्वाह करितां यावा. तिसरें तत्त्व असें होतें, कीं, विद्यार्थ्यांनां असें शिक्षण द्यावयाचें, कीं, शेतकीमध्ये त्यांनी नवीन जोम, नवीन विचार यांची भर घालून, ज्या लोकांमध्यें आपले आयुष्य घालवावें लागेल त्यांची बौद्धिक, नैतिक आणि धार्मिक सुधारणा त्यांनां करतां यावी.

सुरुवात कशी केली**?**

एकादें ध्येय ठरविणें हें वेगळे, आणि तें आचरणांत आणणें हें त्याहून अगदीं निराळे. प्रारंभीं, ध्येय अंमलांत आणण्याचीं कांहींच साधनें वॉशिंग्टनपाशीं नव्हतीं. जमीनीचा एक तुकडाहि त्याच्या ताब्यांत नव्हता. पण परमेश्वरानें त्याला एक संधि दिली. तिचा त्यानें मोठ्या तत्परतेनें उपयोग केला. टस्केजी गांवापासून एक मैल दूर असलेला एक जुना आणि ओस पडलेला मळा विक्रीला काढण्यांत आला, आणि हाम्पटन संस्थेच्या खजिनदारानें तो मळा विकत घेण्यासाठीं अर्धी रक्कम (२५० डालर) वॉशिंग्टनला कर्जाऊ दिली. त्या मळ्यांतील एक खोली, खुराडें, आणि तबेला यांत शाळेचे वर्ग सुरू करण्यांत आले. तेथील दुरुस्तीचें काम विद्यार्थ्यांनी मोठ्या नाखुषीनें केलें. पेरणीसाठीं एक जागा तयार करण्याच्यावेळीहि विद्यार्थ्यांनी तक्रार केली. कारण, अंगमेहनत (श्रम) करण्यासंबंधी त्यांची वेडी समजूत अद्याप कायमच होती. पण, जेव्हां आमचे—-

भूमिका

चरित्रनायक खतः खोरे हातांत घेऊन काम करूं लागले, तेव्हां विद्यार्थीहि उत्साहानें मदतीला आले. एका वर्गाची खोली उत्तम रीतीनें झाडूनलोटून,स्वच्छ करून वॉशिंग्टननें हाम्पटनसंस्थेत आपला प्रवेश करून घेतला, हें त्या विद्यार्थ्यांनां माहीत नसावें, ह्मणूनच श्रमाच्या महतीचा धडा त्यांनां लवकरच त्यांच्या हाताखालीं शिकावा लागला.

हिंदूंचे अगतिकत्व

आह्मांला हा अमोलिक धडा (श्रमाचे महत्त्व) अद्याप शिकावयाचा आहे. श्रम करणें हें कमी प्रतीचें आहे, अशी आम्हीं आमची वेडगळ समजूत करून घेतली आहे, आणि त्यामुळे आम्ही अनेक तऱ्हांनीं अगदीं अगतिक होऊन गेलो आहों.नोकरांवांचून आमचे कांहीं चालत नाहीं, आणि एकाद्या वेळेला नोकर मिळाले नाहींत, ह्मणजे आह्मांला अरण्यांत नेऊन सोडल्यासारखें होऊन आमची पुरी फजिती होते. विद्यार्थ्यांनां स्वावलंबी करावें हाच मुख्य हेतु असलेल्या एका शाळेत, धोतरें धुण्यासाठीं एक धोबी ठेविला होता! मुलें नदीवर स्नानाला जात, आणि स्नान करून धोतरें न धुतां तशींच परत घेऊन येत. चौकशी अंतीं असें समजलें, कीं, शाळेत असतांना आपल्या मुलांनीं कांहीं काम स्वतः करूं नये अशी त्यांच्या वडिलांची व पालकांची इच्छा असल्यामुळे हा अगतिक प्रकार घडून आला. आपलीं डोकीं तेवढीं ज्ञानानें भरावी पण इतर अवयवांनां काम देऊन त्यांनां सुदृढ करू नये, अशीच त्यांची इच्छा होती! सुदृढ अवयवांवांचून-योग्य मदतगारांवांचून एकटे डोके विचारें काय करणार ?

आमची जुनी शिक्षणपद्धति

प्राचीनकाळी आमची शिक्षणाची पद्धत अशी खास नव्हती. गुरुगृहीं शिकावयाला जातांना विद्यार्थी हातांत समिधा घेऊन जात; ह्मणजे, गुरूकरितां आपण सर्व प्रकारचें काम करण्यास तयार आहों, असें ते दाखवीत. अशा प्रकारच्या नम्र भावानें राजपुत्रसुद्धां श्रीकृष्णपरमात्माहि-गुरुगृहीं विद्याभ्यास करण्याकरितां जात असत. छांदोग्य उपनिषदांतील सत्यकाम जाबालाच्या गोष्टींत गुरूनें त्याला कांहीं गाई देऊन त्यांच्या हजार गाई होईपर्यंत परत येऊं नको असें सांगून त्याला अरण्यांत पाठविलें होतें. सत्यकाम बरीच वर्षे अरण्यांत राहिला, आणि निसर्गमातेपासून पुष्कळ गोष्टी शिकला. गाईची संख्या हजारांवर गेल्यावर वायु ऋषभरूपाने आला आणि आतां गुरुगृहीं

चलावें असें सांगू लागला. घरी येतांच गुरु त्याला म्हणाला "बेटा, तूं ब्रह्मवेत्ता झाल्यासारखा दिसतोस, तुला हें ज्ञान कोणीं शिकविले?" सत्यकामानें उत्तर दिलें, की, "मनुष्याहून इतर प्राण्यांनी मला शिकविलें. पण, महाराज, आपण माझ्यावर अनुग्रह करा आणि मला शिकवून पूर्ण तयार करा." नंतर गुरूने त्याच्यावर अनुग्रह करून त्याला पूर्ण ज्ञान देऊन तयार केले. श्रमाची महती आणि निसर्गाचा अभ्यास हीं खऱ्या शिक्षणाची दोन प्रमुख अंगे आहेत. खऱ्या शिक्षणाची ही पद्धत इंग्लंडांतहि अशीच आहे. तेथे मोठमोठ्या सरदारांच्या आणि अमीरउमरावांच्या मुलांनां शाळेत आपल्याकरितांच नव्हे, तर इतर प्रौढ मुलांकरितांहि काम करावें लागतें. त्यांच्या घरीं पुष्कळ नोकर चाकर असतात, पण, शाळेत त्यांनां एकटेंच जावें लागतें, आणि समभावाने वसतिगृहांत राहावे लागतें. अमेरिकेंतील पद्धत तर याहून अधिक चांगली आहे. तेथें गरीब मुलांनांहि श्रीमंतांच्या मुलांसारखी शिकण्याची संधि मिळते. गरीब मुलांनां आपला शिक्षणखर्च व भोजनखर्च भागवितां यावा म्हणून लहानसहान कामें त्यांनां देण्याची व्यवस्था केलेली असते. कामाबद्दल मिळालेल्या मोबदल्यामधून त्यांनां आपला सर्व खर्च भागवितां येतो. पण, आम्ही मुद्याची गोष्ट सोडून भलतीकडे वहात चाललों आहों. पांढरपेशांच्या मुलांमध्यें शारीरिक श्रमाची आणि रयतांच्या मुलामध्ये कृषिकर्माच्या श्रमाची नावड आम्ही उत्पन्न केली आहे, आणि श्रम करण्यास आम्ही त्यांनां नालायक केलेलें आहे. खऱ्या शिक्षणाचा योग्य खल करण्याची आणि आमच्या संततीला कर्तृत्ववान् नरनारी बनविण्याचा प्रयत्न करण्याची वेळ आतां आलेली आहे. वॉशिंग्टननें प्रथम प्रयत्न सुरु केल्या वेळी सुशिक्षित नीग्रोंत आढळून येणारे दोष आज आमच्या सुशिक्षित हिंदी लोकांत आढळून येत आहेत, आणि त्यांच्याप्रमाणें आम्हींहि ते दोष आमच्यामधून काढून टाकावे. या दृष्टीनें पाहतां वॉशिंग्टनचें चरित्र आम्हांला फारच उपयोगी आहे.

या कार्यामध्ये अध्यात्मिक मदत

वॉशिंग्टनला जमीन तर मिळालीच. त्यानंतर त्याचें दुसरें काम म्हटले म्हणजे कर्ज फेडणें हें होय. स्वतः वर्गणी जमविण्या करितां हिंडून आणि जत्रा भरवून रक्कम उभारण्याचा त्यानें प्रयत्न केला; आणि जरी त्याला दगदगीचे दिवस
आणि निद्रारहित रात्री काढाव्या लागल्या, तरी शेवटीं त्याला यश मिळाले ! यामध्येहि वॉशिंग्टनला आणि त्याच्या मदतनीस

—मंडळीला परमेश्वरानें कांहीं अध्यात्मिक तत्त्वें शिकवून त्यांच्या भावि कार्याला त्यांनां योग्य केलें. कोणत्याहि उच्च व पवित्र कार्यात संकटें ही ठेवलेलींच. श्रद्धा, सहनशीलता, सततोद्योग यांच्या दिव्यांतून, सत्कार्ये अंगीकृत केलेल्या सज्जनांनी पार पडावें ह्मणूनच परमेश्वर त्यांच्या मार्गात संकटें घालितो. जितकीं संकटें अधिक, तितकें ध्येयसिद्धीला अधिक चांगलें. कारण, संकटांमधून सज्जन तावूनसुलाखून शुद्ध सुवर्णाप्रमाणें बाहेर पडतात, आणि अधिक कार्यक्षम होतात. संकटांशी झुंजतांनां कांहीं लोक दबले गेले, तरी त्याची पर्वा नाहीं. कारण, अशक्त लोक ईश्वराचें मिशन -पवित्र कार्य साधण्यास योग्य नसतात. सहनशीलता आणि सततोद्योग यांच्या अभ्यासानें पूर्ण श्रद्धावान् लोकच तें कार्य करण्यास समर्थ होतात. हें तत्त्व वॉशिंग्टनच्या चरित्रांत चांगलें नजरेला येतें. दगदगीचे दिवस आणि निद्रारहित रात्री यांनींच त्याला यश मिळवून दिलें आहे. स्वतःपेक्षां परमेश्वरावरच अधिक श्रद्धा ठेवण्यास तो शिकला. परिणामाकडे-कर्मफलाकडे दृष्टि न देतां मनुष्यानें आपलें कर्तव्य कर्म करीत असावें.

' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।'

- भगवद्गीता.

हें तत्त्व त्यानें आचरणांत आणिलें. दुसरें एक मोठें तत्त्व, मानवजातीवर, आपल्या शत्रूवरहि मित्राप्रमाणें प्रेम करावें हें तो शिकला. कोणाविषयीं द्वेषबुद्धि बाळगणें ह्मणजे आपली स्वतःची अवनति करून घेणें होय; आणि आपली उन्नति व्हावी अशी इच्छा करणारानें कोणाविषयींहि द्वेषबुद्धि आपल्या मनांत बाळगू नये, असें त्याला अनुभवानें कळून आलें. आपलीं कर्तव्यकर्मे करीत असतां हीं सर्व तत्त्वें त्याच्या अनुभवाला आलीं. या खऱ्या कर्मयोगामुळे मानवजातीचें कल्याण करण्याकरितां झटणाऱ्या आणि या उच्च ध्येयामध्ये आपलें स्वतःचें व्यक्तित्वहि विसरून जाणाऱ्या श्रेष्ठ कर्मयोग्यामध्यें वॉशिंग्टनला अग्रस्थान प्राप्त झालें.

शाळेची सुधारणा.

नांतांळच्या वेळीं धर्माचीं तत्त्वें आचरणांत कशीं आणावीं, ईश्वर प्रीत्यर्थ ह्मणजे गोरगरिबांच्या सुखाकरितां कसें काम करावें, हें विद्यार्थ्यांनां शिकविण्यांत आले. सर्वांत प्रथम शाळेत कृषिकर्म सुरू करण्यांत आलें. कारण, शाळा ही एक लवकरच लहानशी वसाहत बनली, व 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें सर्वांनां खावयाला—----

—-कांहीतरी अन्न पाहिजे होतें आणि ही गरज प्रथम भागविली पाहिजे होती. वस्तुतः टस्केजी येथील सर्व उद्योगधंदे योग्य आणि स्वाभाविक क्रमानें स्थापन झाले आहेत. पुष्कळ गरीब विद्यार्थ्यानां शाळेत शिकत असतांना आपला शिक्षणखर्च आणि भोजनखर्च भागवितां यावा, ह्मणून कांहीं धंदे सुरू करण्यांत आले. नंतर एक मोठी इमारत बांधावयाचे ठरलें. नेहमीप्रमाणें दक्षिणेतील एका गोऱ्या व्यापाऱ्यानें वाशिंग्टनच्या वचनावर विश्वास ठेवून इमारतीचें सर्व लांकूडसामान पुरविण्याचें कबूल केलें. कांहीं रक्कम जमल्याशिवाय त्या व्यापाऱ्याचें ह्मणणे वाशिंग्टनला मान्य करवेना, ह्मणून पुनः वर्गणी जमविण्याची खटपट सुरू झाली, आणि मिस डेव्हिडसननें उत्तरेकडे सफर केली. पैसा मिळण्याची अगदी निराशा झाली असतां व सर्व उपाय थकले असतां अगदी ऐनवेळीं मदत आल्याचे उदाहरण वॉशिंग्टननें येथे दिले आहे. अशी बरीच उदाहरणें त्याला देतां येतील. या सर्वांमध्यें परमेश्वराची योजना दिसून येते. बोस्टनच्या दोन उदार बाया त्याला कित्येक वर्षे एकसारख्या मदत करीत होत्या. इमारतीविषयी ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट ह्यटली ह्मणजे, पाया खोदण्याचे सर्व काम विद्यार्थ्यांनीच केलें. आपण शिकावयाला आलो आहों, काम करण्यास आलों नाहीं, ही विद्यार्थ्यांची कल्पना अद्याप गेली नव्हती; पण वॉशिंग्टननें त्यांची तक्रार
बिलकूल ऐकिली नाहीं. अशा रीतीनें ते स्वावलंबनाचां धडा दुसऱ्यांदा शिकले.

हिंदूंनीं घेण्याचा बोध**;** श्रमाची महती व श्रमा वरील प्रेम**.**

कामाकरितां-श्रमाकरितांच श्रमावर प्रेम करणे हा धडा आह्मी केव्हां शिकू कोण जाणे ! प्रस्तुत आमच्या समाजांत मनुष्यप्राणी इतका कांहीं स्वार्थी झाला आहे, कीं, योग्य देखरेखीवांचून त्याच्या हातून चांगलें काम होत नाहीं! यामुळे अर्थदृष्टथा हिंदी मजुराची किंमत यूरोपियन किंवा अमेरिकन मजुरापेक्षां कमी झालेली आहे. त्या देशांपेक्षां येथें मजुरी व्यक्तिशः स्वस्त असली तरी वरील दुर्गुणामुळे ती एकंदरींत आह्यांला बरीच महाग पडते. ह्मणूनच हिंदी संस्थानिक यूरोपियन नोकर, आणि हिंदी व्यापारी यूरोपियन मॅनेजर ठेवितात. शिक्षणानें आमचा हा दोष आह्मांला कळतो; पण, तो दोष कसा नाहींसा करावा, हे आमच्या शिक्षणानें आह्मांला शिकविलें नाहीं. श्रमाचे महत्त्व व सौंदर्य आणि श्रमावर प्रेम इत्यादि गोष्टी शिकविण्यास हाम्पटन किंवा टस्केजी यांसारख्या संस्था आमच्यांत नाहींत, हेंच त्याचें कारण आहे !

भूमिका

निसर्गाचें अनु-करण करण्याचा वॉशिंगटनचा निश्चय

वॉशिंग्टनची योजना बऱ्याचजणांनां पसंत नव्हती. पण, कोणाचेंहि न ऐकतां त्यानें निसर्गाचें अनुकरण करण्याचें योजिलें.
प्रथम चुका होतील हें त्याला माहीत होतें; पण, या चुका पुढें पुष्कळ शहाणपण शिकवितील, हेंहि तो जाणून होता. उदाहरणार्थ टस्केजी येथील विटा करण्याचे प्रथमचे प्रयत्न पहा. विटा करण्याच्या बाबतींत त्याला प्रथम कांहीं अनुभव किंवा ज्ञान नव्हते. तीन खेपा त्याला यश आलें नाहीं, आणि पुढे प्रयोग करून पाहण्याला त्याच्याजवळ पैसा नव्हता ! शेवटीं त्यानें आपलें घड्याळ गहाण टाकून पुनः प्रयोग करून पाहिला, आणि या खेपेला त्याला यश आलें. त्याचें या कामांत घड्याळ गेलें खरें, पण, त्याला यापासून किती उत्तम धडा मिळाला बरें ! टस्केजी येथे विटा करण्याचा धंदा आतां इतका नांवारूपाला आलेला आहे, कीं, एका वर्षी मोसमांत विद्यार्थ्यांनीं कोठच्याहि बाजारांत खपून पार होण्याजोग्या उत्कृष्ट तहेच्या बारा लाख विटा तयार केल्या ! ही गोष्ट मराठी क्रमिक पुस्तकांत 'फिरून यत्न करून पहा' या सदराखाली घालण्याजोगी आहे. टस्केजी येथे सन १९०१ सालीं चाळीस इमारती होत्या, त्यांपैकी छत्तीस इमारती विद्यार्थ्यांनी बांधल्या होत्या. इमारतींच्या बांधकामांत कुशल व शिल्पशास्त्रांत प्रावीण्य मिळविलेले बरेच विद्यार्थी सर्व दक्षिणेत (दक्षिण अमेरिकेतील संस्थानांत) पसरलेले आहेत. विद्यार्थ्यांनीं आपल्या इमारती स्वतः बांधाव्या याविषयीं वॉशिंग्टननें काढलेले उद्गार फारच मार्मिक आणि नेहमीं ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. वॉशिंग्टन ह्मणतोः-"याप्रमाणें विद्यार्थ्यांच्या एका कंपूपासून दुसऱ्या कंपूला ज्ञान आणि चातुर्य हीं परंपरेनें दिली जात आहेत, आणि त्याचा परिणाम आतां असा झाला आहे. कीं, दुसऱ्या कोणाहि एका मजुराची मदत घेण्यासाठी बाहेर न जातां इमारतीचा नकाशा काढण्यापासून तों बिजलीचे दिवे बसविण्यापर्यंत, पाहिजे त्या प्रकाराची किंवा आकाराची इमारत आमचे शिक्षक आणि विद्यार्थी तयार करू शकतात. त्याप्रमाणें शाळेला आणि शेतकीखात्याला लागणाऱ्या गाड्या, खटारे, बग्या आणि शाळेला व विद्यार्थ्यांनां लागणारें सामान खुर्चा, चटया, टेबलें, पलंग इत्यादि सर्व कांहीं-विद्यार्थीच तयार करितात, आणि विद्यार्थ्यांनी तयार केलेले कांहीं जिन्नस बाजारांत विक्रीकरितां पाठविण्यांत येतात." याप्रमाणें संस्थेची वाढ सावकाश आणि क्रमाक्रमाने होत गेली आहे. सध्यां या संस्थेत चाळीस प्रकारचे उद्योगधंदे शिकविले जातात.

पैसा कसा जमविला **?**

सर्व तऱ्हांच्या संस्था, विशेषतः शिक्षणविषयक संस्था चालवितांना मुख्त प्रश्न पैशाचा असतो. पैसा जमविण्यासाठीं वॉशिंग्टनने कोणते उपाय अमलांत आणिले, आणि त्यांत त्याला किती यश आलें, हें पाहणें फार मनोरंजक व बोधप्रद आहे. सर्व बाजूंनी निराशा झाली असतां ऐनवेळीं अनपेक्षित मदत वॉशिंग्टनला मिळाल्याविषयींचा उल्लेख वर आलेला आहे. जनरल आर्मस्ट्रांग हे हाम्पटन संस्था चालवीत होते आणि त्यांनां पैशाची नड होतीच तरी पण त्यांनीं वॉशिंग्टनला उत्तरेकडे नेलें आणि तेथे मोठमोठ्या लोकांच ओळख करून देऊन टस्केजी संस्थेकरितां पैसे जमविण्याला मदत केली. अशा प्रकारचें साहाय्य आमच्यायेथे एका संस्थेपासून दुसऱ्या संस्थेला मिळतें काय? व अशा स्वावलंबी संस्था येथे आहेत काय ? दुसरी एक लक्ष्यांत ठेवण्याजोग गोष्ट ही, कीं, पित्यानें (हाम्पटन संस्थेनें किंवा आर्मस्ट्रांगनें) मुलाला (टस्केजी संस्थेला-वॉशिंग्टनला) मार्गाला लावण्याइतकें, जरूरीपुरतेंच साहाय्य केले पुढचा मार्ग मुलाला स्वतः आक्रमावा लागला आणि स्वतःच्या प्रयत्नानें आपली उन्नति करून घ्यावी लागली. स्वावलंबी पुरुषांनां किंवा संस्थांनां अशा प्रकारच्या मदतीची अपेक्षा असते, आणि तेवढीच मदत त्यांनां देण्यांत यावी. भगवद्गीतेत सांगितलेल्या तीन प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारचें ह्मणजे सात्त्विक दान अमेरिकन दाते बहुतकरून करीत असतात. केव्हांकेव्हां देणग्या गुप्तपणें देण्यांत येतात आणि दात्यांची नांवें प्रगट झाली, तरी आधीं पूर्ण चौकशी करून नंतरच ते (गुप्त व प्रगट दाते) आपल्या देणग्या देतात; जणूं काय ते आपलें भांडवल किफायतशीर आणि सुरक्षित धंद्यांत गुंतवीत आहेत ! आणि ही त्यांची पद्धत वाजवी दिसते. आमच्या प्रपंचांतील (आधिभौतिक) व्यवहारांविषयीं आह्मी किती तरी दक्ष असतों. मग त्याहून अधिक टिकाऊ आणि अधिक फलदाय अशा अध्यात्मिक व्यवहारांविषयी आह्मीं निष्काळजी कां बरें असावें ? अशा प्रकारचे समंजस व सात्त्विक दाते मिळाल्यामुळे वॉशिंग्टनला पैसा जमवितांन फारसे प्रयास पडले नाहींत. खाली दिलेलीं तत्त्वें त्यांनीं अनुभवानें सांगितल आहेत.

(१) व्यक्तींनां किंवा संस्थांनां तुमच्या कामगिरीची सर्व माहिती या आणि ती माहिती गौरवानें' सांगा. तुमच्या कार्याविषयीं जें कांहीं सांगावयाचें तें संकलित, पण स्पष्ट असे सांगा.

(२) परिणामाविषयीं बेफिकीर असा.

(३) संस्थेचें अंतरंग जितकें स्वच्छ, पवित्र व उपयुक्त ठेवावें, तितका तिला अधिक लोकाश्रय मिळणार, या सिद्धांतावर विश्वास ठेवा.

(४) श्रीमंताकडे, तसेंच गरिबांकडेहि मदतीकरितां जा. खरी कळकळ आणि सहानुभूति दर्शविणाऱ्या शेंकडों दात्यांच्या लहानसहान देणग्यां-वरच मोठमोठीं परोपकाराचीं कृत्यें-संस्था अवलंबून असतात.

(५) पैसा गोळा करीत असतां दातृवृंदाकडून त्यांची सहानुभूति, त्यांचें साहाय्य आणि त्यांचा उपदेश मिळविण्याचा प्रयत्न करा.

ही तत्त्वे सिद्ध करून दाखविणारी बरीच उदाहरणें वॉशिंग्टननें आपल्या पुस्तकांतील बाराव्या प्रकरणांत दिलेली आहेत. तीं सर्व वाचकांनीं मनन करावीं. कारण, परोपकराच्या कामाला वाहून घेतलेल्या वाचकांनां त्यापासून बराच फायदा होण्याचा संभव आहे.

नीग्रोंच्या राजकीय स्थितीविषयीं विचार न करण्याचे कारण.

आपल्या ज्ञातींच्या राजकीय स्थितीविषयीं वॉशिंग्टननें कांहीं शहाणपणाचे आणि धूर्तपणाचे उद्गार काढलेले आहेत; पण, ज्याअर्थी वॉशिंग्टननें आपल्या ज्ञातीच्या शिक्षणविषयक आणि औद्योगिक उन्नतीला वाहून घेतलें आहे, त्याअर्थी राजकीय बाबींचा विचार करण्याचें सोडून आपण पुनः शाळेकडे वळू.

शाळेची प्रगती

टस्केजी संस्थेचे प्रारंभींचे आणि हल्लींचें आंकडे घेऊन तुलना करून पाहणे बोधप्रद आहे. सन १८८१ साली सुरुवातीच्या वेळी संस्थेची शंभर एकर जमीन आणि तीन इमारती, एक शिक्षक आणि तीस विद्यार्थी, इतकीच कायती सामग्री होती.

आतां (१९१२) संस्थेच्या १०६ इमारती, २३५० एकर जमीन, १५०० गुरेढोरें; शिवाय गाड्या, खटारे आणि शेतकीचीं आउतें व इतर सामान १२,९५,२१३.७५ डालर किंमतीचे आहे. शाळेच्या सर्व जिंदगीची किंमत, कायम फंडाची रक्कम धरून ३४,१६,८६१.२८ डालर आहे. शाळेतील शिक्षकांची आणि इतर कामगारांची संख्या १८० वर गेली आहे, आणि पटावर १६४५ विद्यार्थी (१०६७मुलगे व ५७८ मुली) आहेत. हे विद्यार्थी ३४ संस्थानांतून व प्रांतांतून आणि १९ परदेशच्या प्रांतांतून आले आहेत.
२३५० एकर जमीनीपैकी १००० एकरांची–

— लागवड केलेली आहे. संस्थेच्या १२०० गुराढोरांनां लागणांरा सर्व गवतचारा संस्थेच्या शेतकीखात्याकडून उत्पन्न करण्यांत येतो. या खात्यांतील विद्यार्थ्यांनां शेतकीचीं सुधारलेलीं आउतें आणि शेतकीच्या उत्तम पद्धति, यांचे, आणि साधारण कृषिकर्माचें चांगलें ज्ञान मिळतें.

बौद्धिक आणि वाङ्मयाच्या शिक्षणाबरोबर ४० धंद्यांचे शिक्षण, उपपत्ति आणि कृति यांसहित दिले जातें. शेतकी आणि शेतकीच्या इतर शाखा यांवर विशेष जोर दिला जातो. प्रत्येक धंदा असा शिकविला जातो, कीं, विद्यार्थ्यांनी शाळा सोडिली, कीं, त्यांनां काम मिळण्यास कांहीं पंचाईत पडत नाहीं. वाङ्मयविषयांत आणि उद्योगधंद्यांत लोकांचे चांगले शिक्षक होतां येईल इतकी विद्यार्थ्यांची तयारी करण्यांत येते. ज्यांनां बौद्धिकशिक्षण घेण्याचें सामर्थ्य नसतें, त्यांनां रात्रीच्या शाळांत शिकविले जातें. ते दिवसा उद्योगधंद्यांत काम करून पुढें शिक्षणासाठीं पैसा जमवून ठेवितात. मुलांची आणि मुलींचींहि सोय सारखीच केलेली आहे.

शाळा - एक समाज किंवा संस्था

हाम्पटन संस्थेच्या रिपोर्टामधले खालीं दिलेले उद्गार टस्केजी संस्थेलाहि लागू पडतात. "शाळा ह्मणजे एक मोठा समाज किंवा संस्था आहे. ती आपल्या सर्व गरजा स्वतः भागविते, आणि तिच्या अनेक औद्योगिक व शेतकीसंबंधीं चळवळींमुळे इतर लोकांशी तिचा परिचय घडतो. विद्यार्थ्यांचें वसतिगृह, शयनागार, भजनालय, कोठीगृह, कारखाना, प्रयोगशाळा, शेतें, शाळेच्या इमारती (क्लास) या सर्वांच्या योगें शाळा ह्मणजे एक मोठी संस्था दिसते, आणि येथें विद्यार्थी अनेक जिन्नस तयार करितात, नांगरतात, स्वयंपाक करितात, प्रार्थना करितात, खेळतात व विश्रांति घेतात. येथें सर्व खात्यांत काम करीत असतां विद्यार्थ्यांनां कामाबरोबर शिक्षण कसें द्यावें आणि त्यांच्या रोजच्या दिनचर्येमुळे व कामामुळे त्यांची मानसिक आणि नैतिक उन्नति कशी साधावी, हाच प्रश्न संस्थेच्या चालकांसमोर नेहमीं असतो."

संस्था -एक मूस-एक कसोटी

कोणत्याहि उद्योगधंद्यांत किंवा शेतकीच्या कामांत तयार होण्याकरितां मुलें पाठशाळेतहि अभ्यास करितात. पाठशाळेत दोन प्रकारचे विद्यार्थी असतातः - (१) धंदेशिक्षणांत दाखल होण्याकरितां तयारी करणारे(२) धंदेशिक्षणाचा कोर्स संपवून वाङ्मयाचा अभ्यास करणारे. गरीब विद्यार्थ्यांनां
दिवसा धंदेशिक्षणाकरितां काम करावें लागतें, आणि रात्री वाङ्मयाचा अभ्यास

करावा लागतो. या व्यवस्थेच्या योगानें त्यांनां धंदेशिक्षणाकरितां अधिक वेळ मिळतो. या दोन्ही तऱ्हांच्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचे नैतिक गुण वाढून ते स्वभावानें अधिक करारी आणि अधिक कार्यक्षम होतात. शिक्षणाचे ध्येय असें असतेंः (१) जगाला ज्या वस्तु पाहिजेत त्या विद्यार्थ्याला (मुलाला अगर मुलीला) तयार करण्यास शिकविणे. (२) योग्य कसब, ज्ञान आणि नीतिमत्ता इत्यादि गुणांनी संस्थेच्या ग्रॅजुएटला असा योग्य करावयाचा, कीं, पुढे त्याला जगांत आपला उदरनिर्वाह सुखानें करितां यावा. (३) श्रमाचें सौंदर्य आणि महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबवून द्यावयाचें, आणि श्रम टाळण्याऐवजी श्रमावर प्रेम करण्यास त्यांनां शिकवावयाचे; आणि (४) शेवटी, आपल्या समाजाची कांहींतरी सेवा आपल्या हातून घडावी अशी उत्कट इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न करावयाची. या रीतीनें ही संस्था म्हणजे एक मूस आहे. तींतून कच्चा विद्यार्थी, सुसंस्कृत गृहस्थ होऊन बाहेर पडतो.

श्रमांचे महत्व व श्रमांवरील प्रेम ; संस्थेची परंपरागत आख्यायिका

श्रमाची महती समजून विद्यार्थ्यांनीं श्रमावर प्रेम करावें ह्मणून प्रथम कसे प्रयत्न करण्यांत आले, याविषयीं वर उल्लेख आलेला आहे. आतां "श्रमाचें महत्त्व आणि श्रमावर प्रेम" ही परंपरेनें चालत आलेली संस्थेची आख्यायिकाच-Tradition-झाली आहे. अशा आख्यायिका ह्मणजे एकाद्या व्यापाऱ्यानें आपल्या वार्षिक नफ्यांतून शिल्लक टाकलेल्या भांडवला-प्रमाणें होत. दरवर्षी संस्थेत दाखल होणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांनां संस्थेत एक ते चार वर्षे श्रमाची दीक्षा घेतलेले असे तिप्पट चौपट जुने विद्यार्थी भेटतात. तरुणांचें तरुणांवर सहज आणि चांगलें वजन, न कळत पडत असतें. यामुळे नवीन आलेले विद्यार्थी जुन्या विद्यार्थ्यांकडून आपोआप वळविले जातात. याचा सुपरिणाम पुढे समजांत दृष्टीला पडूं लागतो, आणि. त्यायोगें ज्ञातीची उन्नति होण्यास फार चांगली मदत होते.

संस्थेतील विशिष्ठ कामे

(अ) धंदेशिक्षण आणि शेतकीचे शिक्षण यांबरोबर व्यापारी पद्धत-व्यवहारदक्षताहि शिकविण्यांत येते. संस्थेत उद्योगधंद्याच्या अनेक शाखा असल्यामुळे हें शिक्षण देण्याच्या पुष्कळ सोयी आयत्या उपलब्ध होतात .

(ब) संस्थेंत चांगले शिक्षक तयार करण्याचें कामहि हाती घेतले जातें. याकरितां मुद्दाम पुष्कळ लहान मुलांचा एक मोठा वर्ग ठेवण्यांत आला आहे.

(क) बाहेरील लोकांनांहि या संस्थेमधील काम करण्याच्या पद्धति शिकतां याव्या, ह्मणून सुटींतहि वर्ग घेतले जातात. शेकडों शिक्षक आणि प्रौढ विद्यार्थी या सुटींतील वर्गाचा फायदा घेतात.

परिणाम

या शिक्षणाचा मोठा महत्त्वाचा आणि टिकाऊ परिणाम या संस्थांमधून ग्रॅजुएट होणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या गृहव्यवस्थेत दिसून येतो. या ग्रॅजुएटांच्या स्वच्छ, सुव्यवस्थित आणि उद्यमप्रिय अशा राहणीच्या गृहव्यवस्थेच्या उदाहरणांमुळे पुष्कळ समाज अधिक सुखी आणि आनंदी झालेले आहेत. उत्तरेकडील संस्थानांतील सुखाच्या आणि भरपूर पगाराच्या नोकऱ्या सोडून देऊन आपल्या समाजाच्या कांहीतरी उपयोगी पडतां येईल, अशा दुसऱ्या ठिकाणीं हे ग्रॅजुएट (स्त्रिया आणि पुरुष) हलक्या जाग्यांवर जातात; यावरून त्यांचा स्वार्थत्याग उघड दिसतो.

आत्मप्रत्ययाचे एक नामी उदाहरण

या संस्थांमध्ये आत्मविश्वास कसा वाढविला जातो, हें तरुण बेकर* वॉशिग्टननें, आपले वडील युरोपास गेल्यावेळी त्यांनां लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होतें. त्या मुलानें लिहिलें, कीं, "प्रिय बाबा! आपण घराहून निघण्यापूर्वी अर्धा दिवस मी माझ्या उदाहरण. धंद्यांत काम करावें असें सांगितले होते; पण, माझा धंदा मला इतका आवडतो, कीं, मीं सारा दिवस काम करावे असें मला वाटतें. मी दुसऱ्या शाळेत गेलों, ह्मणजे तेथे माझा खर्च भागवितां यावा ह्मणून मी आतां माझ्या हातून होईल तितका पैसा मिळविणार."

स्वतःच्या कर्तबगारीनें पुढे आलेल्या आईबापांच्या मुलानें स्वतः कमावलेल्या पैशानें विद्यार्जनाचा प्रयत्न करावा, यांत कांहीं नवल नाही! आमच्या गरीब आणि श्रीमंत लोकांच्या मुलांमध्यें असा तेजस्वीपणा किंवा उत्साह आह्माला—

---

* बेकर हा आलिव्हिया डेव्हिडसन इच्या पोटचा बुकर टी. वॉशिंग्टनचा पुत्र होय.

—-उत्पन्न करितां येईल काय? सर्व हिंदी विद्यार्थ्यांनों बेकरचें उदाहरण आपल्यासमोर ठेवण्यासारखें आहे.

रचना व व्यवस्था.

आतां आपण संस्थेची व्यवस्था व रचना पाहूं. संस्थेचा उत्कर्ष व्हावा हमणून ज्यांनीं खरी आस्था दाखविली आहे, आणि जे सर्वज्ञातींचे प्रतिनिधि आहेत, अशा पंचांमार्फत संस्थेच्या
सर्व मिळकतीची व्यवस्था होते. संस्थेतील सर्व शाखांच्या मुख्यांचें एक एक्झिक्युटिव्ह कौंसिल असतें, आणि याच्या सभा आठवड्यांतून दोनदां भरत असतात. संस्थेचें सर्व विधायक काम या कौंसिलच्या मार्फत होतें. पैशांची व्यवस्था पहाणारी सहाजणांची एक कमिटी आठवड्यांतून एकदां भरते, आणि ती आठवड्याचा खर्च मंजूर करिते. याशिवाय महिन्यांतून एकदां, किंवा केव्हांकेव्हां अनेकदांहि, सर्व शिक्षकांची साधारण सभा होते. या सभांत आपणांला आलेले अनुभव आणि अडचणी शिक्षक परस्परांनां निवेदन करितात. मालाच्या विनिमयाप्रमाणें विचारांच्या या विनिमयापासून प्रगति होते. या सभांमुळे जरूर असलेले फेरफार करण्यांत येतात, आणि कांहीं महत्त्वाचीं तत्त्वें उदयाला येतात. याशिवाय संस्थेच्या निरनिराळ्या शाखेत, उदाहरणार्थ कृषिकर्म-खातें आणि बायबलशिक्षणखातें इत्यादिकांत, शिक्षकांच्या लहानसहान सभा नेहमीं होत असतात.

वॉशिंग्टनच्या कामाची पद्धत.

तथापि टस्केजी संस्थेचा मुख्य प्राण हमटला हमणजे वॉशिंग्टनच होय ! त्याला शाळेत काम करावें लागतें, आणि संस्थेकरितां मदत मिळविण्यासाठीं बाहेरहि जावें लागतें.वॉशिंग्टन कोठेंहि बाहेर असला तरी संस्थेत रोज काय चालले आहे याची त्याला सर्व माहिती असते. त्याचा हुषार सेक्रेटरी आणि इतर ऑफिसर हे त्याला या कामी उत्तम साहाय्य करितात. वॉशिंग्टनची पत्नी शाळेच्या कामांत आपल्या पतीला मदत करिते. संस्थेच्या चुका किंवा दोष शोधून काढण्यास वॉशिंग्टन नेहमीं फार उत्सुक असतो. तो नेहमीं विद्यार्थ्यांबरोबर खासगी संभाषण करितो, आणि त्यांच्या पोटांत शिरून संस्थेचे दोष त्यांच्या दृष्टीनें कोणते आहेत हें त्यांच्याकडून वदवितो. पूर्ण आणि निरोगी वाढीला ही पद्धत फार आवश्यक आहे. दोषांचे ज्ञान झालें, हमणजे त्यांविषयीं सावध राहून त्यांचा कांहींतरी बंदोबस्त करितां येतो. दोषांचें ज्ञान मुळींच नसलें तर —-

संस्था केव्हां ढांसळून पडेल, याचा नेम नाहीं. ज्या समाजांत विद्यार्थ्यांचा जन्म झाला आहे त्याची कांहींतरी सेवा त्यांच्या हातून व्हावी, आणि शक्य असल्यास त्यांनी समाजाची उन्नतिहि करावी, असे उद्देश असलेल्या शिक्षणक्रमांत समाजाच्या निकडीच्या गरजांनुरूप फेरबदल अवश्य करावे लागणार, व असे फेरबदल करणें ह्मणजेच खरें शिक्षण देणें होय, आणि अशा शिक्षणाच्यायोगें प्रपंच व परमार्थ साधितां येतात, आपल्या वांट्यांचे कर्तव्यकर्म आपल्याला नीट समजतें, व ज्या समाजांत आपण आहो त्याची आपल्या हातून होईल तितकी उत्तम सेवा करितां येते. शिक्षक आणि विद्यार्थी हे उभयतां टस्केजी संस्था आपली आहे असें समजतात, व या संस्थेनें आपलें धार्मिक व परोपकारी काम सारखें चालू ठेवावें ह्मणून फार दक्ष राहून वॉशिंग्टनला तनमनधनेंकरून मदत करितात. आपलें सर्वस्व ज्यानें संस्थेला वाहिलेले आहे अशा वॉशिंग्टनसारख्या मनुष्याला खेळा करितां किंवा करमणुकरितां वेळ मिळत नाहीं ! वॉशिंग्टन प्रथम आपली नित्यकर्मे संपवितो, आणि दुसरें एकादें नवीन पुढचें काम हातीं घेतो. कामाला डोईजड करून न घेतां तो तें आपल्या ताब्यांत ठेवितो. आपलें काम पूर्णपणे आपल्या कह्यांत आहे अशी आपली खात्री झाली, ह्मणजे त्यापासून आधिभौतिक, मानसिक आणि आध्यात्मिक आनंद होतो. शरीराचा तकवा, मनाचा उत्साह आणि आध्यात्मिक बल हीं सर्व कर्मयोगाच्या या पद्धतीपासून प्राप्त होतात. कृत्रिम उद्दीपकांची कांहीं जरूर भासत नाहीं. अंतरात्म्यापासून सर्व कांहीं मिळतें.

दुसरें सामाजिक काम

टस्केजी संस्थेला जोडूनच दुसऱ्या दोन संस्था (१) नीग्रो शेतकऱ्यांची परिषद् आणि (२) नीग्रो राष्ट्रीय उद्यमसंघ या आहेत. आपल्या ज्ञातीची औद्योगिक, मानसिक आणि नैतिक स्थिति सुधारावी, हाच या संस्थांचा उद्देश आहे. या दोन संस्थांमधून दुसऱ्या लहानसहान स्थानिक परिषदा आणि संघ उत्पन्न झाले आहेत, व त्यांच्यायोगें उद्योगधंदे आणि कृषि-कर्म यांची एकसारखी वाढ होत आहे. वॉशिंग्टनचें तत्त्व असें आहे, कीं, हंल्लीच्या समाजाला उत्तम वस्तु पाहिजेत. त्या वस्तु पैदा करणारे लोक काळे आहेत किंवा गोरे आहेत याकडे समाज लक्ष्य देत नाहीं. सर्व साधारण पिकांपेक्षां चौपटीनें अधिक पीक उत्पन्न करणाऱ्या मनुष्याला जगांत कोठेंहि मान—---

–मिळेल, यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणे उत्तम चिताऱ्याचा कोठेंहि गौरव होईल. ह्मणून या जीवनार्थकलहांत प्रत्येक ज्ञातीच्या व्यक्तींनीं होतां होईल तेवढे समाजाला अधिक उपयुक्त व्हावें, ह्मणजे समाजाकडून त्यांची योग्य चहा होईल. मागसलेल्या जातीला शिक्षण मिळालें, तिची आधिभौतिक आणि नैतिक प्रगति झाली, ह्मणजे राजकीय हक्क न मागतां आपोआप त्या ज्ञातीला मिळू लागतील. सामाजिक समतेविषयी विचार करण्याचें वॉशिंग्टननें दूरदर्शीपणानें टाळिलें आहे. कारण, हा प्रश्न व्यावहारिक राजनीतीच्या बाहेरील आहे. शिवाय, आपल्या ज्ञातीचे अत्यंत निकडीचे आणि महत्वाचे प्रश्न सोडविण्याच्या कामाला त्यानें स्वतःला वाहून घेतलें आहे व त्याचें हें करणें अगदीं योग्य आहे. आपल्यामधील व्यक्ति, इतर श्रेष्ठ ज्ञातींमधील व्यक्तिइतक्या सुधारल्याशिवाय कोणत्याहि मागसलेल्या ज्ञातीला इतर ज्ञातीशीं टक्कर मारितां येणार नाहीं, हैं उघड आहे.

वॉशिंग्टनच्या पद्धतीवरील हिंदूंचे आक्षेप

वॉशिंग्टन आणि त्याची कामगिरी यांविषयीं येथपर्यंत वर्णन झालें. आतां वॉशिंग्टनच्या पद्धति सांप्रतच्या आमच्या समाजांत चालू करितां येतील किंवा नाहीं, याचा आपण विचार करूं. कांहीं लोक असे आक्षेप घेतात, कीं, "फार प्राचीन कालापासून सुधारणा झालेले आपले राष्ट्र आहे; परंतु नीग्रो लोक हे नुकतेच अज्ञानांधकारांतून बाहेर पडलेले असून त्यांनां उद्योगधंदे व कला यांतील पहिले धडे शिकावयाचे आहेत. आमची स्थिति त्यांच्या स्थितीहून भिन्न आहे. वॉशिंग्टन आणि त्यासारखे हाम्पटन मतवादी शिक्षणपुरस्कर्ते, औद्योगिक उन्नतीला फार महत्त्व देतात; परंतु हें शिक्षण अचाट बुद्धिवान् पुरुष ज्या ज्ञातींत निर्माण होऊं शकतात अशा ज्ञातीला कसें लागू पडेल? येथें बौद्धिक शिक्षणच विशेषतः दिलें पाहिजे. "

आक्षेपांचा विचार.

या आक्षेपांत कांहीं थोडेसें तथ्य वरवर दिसतें; पण, त्यांत पूर्ण सत्य नाहीं. पूर्वी एकेकाली आमची सुधारणेत बरीच प्रगति झाली होती, हें खरें आहे;

पण, पुष्कळ कारणांमुळे आमची वाढ खुंटून गेली आहे, आणि जर पुनः आह्मांला वर यावयाचे असेल, तर सुधारणेच्या मूलभूत तत्वांचा आह्मांला विचार केला पाहिजे.नीग्रोसारख्या मागसलेल्या ज्ञातीनों हीं मूलभूत तत्त्वें अमलांत आणण्याचा प्रयत्न चालविला आहे, असे दिसून आले, तर तीं आह्मीहि

–अमलात का आणू नयेत ? हें सत्य कोठून का येईना, तें सत्यशोधकांनां सदा मान्य असलेच पाहिजे. नीग्रो लोक काय करीत आहेत, याचा आपण प्रथम विचार करू. आपल्या संततीत चांगले स्त्रीपुरुष निपजावे अशी त्यांची खटपट आहे. आयुष्यांतील प्रत्येक गोष्ट धर्मानें-ईश्वरभक्तीनें प्रेरित व्हावी, आपल्या मुलांबाळांनी उच्च नीतितत्त्वें शिकून तयार व्हावें, आणि त्या तत्त्वाबरहुकूम त्यांचे आचरण व्हावें, त्यांनी आपला चरितार्थ हुषारीनें आणि प्रामाणिकपणानें चालवावा, स्वतःवर विश्वास ठेवून त्यांनीं आपल्या समाजाचें हित साधावें, आपल्या आईबापांचे व कायद्यानें प्रस्थापित असलेल्या सरकारचें त्यांनी आज्ञाधारक बनावें, त्यांनी तरतरीत व चलाख असावें, आत्मसंयमन, सहनशीलता, श्रमाचे महत्त्व आणि श्रमावरील प्रेम वगैरे गुण त्यांनी शिकावे, हमणून त्यांचे एकसारखे प्रयत्न चालले आहेत. हे गुण कोणत्या समाजाला नको आहेत ? हा गुणसमुदाय हमणजे सनातन सत्य आहे, आणि त्यांचा सर्वत्र गौरव झाला पाहिजे. हे गुण अंगी बाणण्याकरितां वॉशिंग्टन सारख्या लोकांनी कोणत्या पद्धतीचें अवलंबन केलें ? त्यांनीं निसर्गाचाच कित्ता गिरविला. त्यांनी शाळा हमणजे आपल्या सर्व गरजा भागविणारा असा एक समाज किंवा संस्थाच केली. अग्रेसरांनां प्रारंभी फार प्रयास पडले आणि त्रास झाले; पण आतां सर्व कांहीं घड्याळाप्रमाणें सुरेख चाललें आहे. या शाळेमुळे समाजाचें पुष्कळ हित झालें आहे. हिंदुस्तानच्या शाळेतील एकाद्या मुलाला अरण्यांत नेऊन सोडिलें तर तो तेथें तहानेनें किंवा क्षुधेनें राम हमणेल पण, त्याच ठिकाणीं टस्केजीचा किंवा हाम्पटनचा विद्यार्थी राबिन्सन क्रुसोप्रमाणे एक नवीन वसाहत करू शकेल! आपल्याकडे मानसिक शिक्षणावरच सर्व जोर दिला जातो; पण, हस्तपादादि कर्मेंद्रियें आणि इतर ज्ञानेंद्रियें यांच्या साहाय्यावांचून एकटें मन बिचारें काय करणार? सर्व अवयवांची सारखी वाढ झाली पाहिजे. हें तत्व नुकतें कोठें आमच्या लोकांच्या लक्ष्यांत येऊं लागलें आहे, व कांहीं शाळांत हस्तकामाचे (Manual Training) वर्ग सुरू करण्यांत येत आहेत पण, खरें शिक्षण क्लासांत न मिळतां निसर्गातच मिळतें. यास्तव जीं मुलें शिकत असतांना इमारतीचे बांधकाम करितात, किंवा शेतांतील काम करितात ती हस्तकामाच्या किंवा धंदेशिक्षणाच्या वर्गात शिकलेल्या मुलांपेक्षां कितीतरी पटीनें चांगली असतात. हिंदुस्तानांत एकंदर लोकसंख्येच्या मानानें बुद्धिमान किंवा शिकलेल्या लोकांची संख्या फारच अल्प आहे. शेतकरी आणि कारागीर —---

यांची संख्या सुमारें शेकडा ९० या प्रमाणांत आहे. या लोकांच्या शिक्षणाकरितां बुद्धिमान् लोकांनी काय केले आहे? त्यांनां स्वतःला कसले शिक्षण मिळालेलें आहे ? कारकुनी पेशाचे. या शिक्षणानें सर्व राष्ट्राचे कल्याण कसें होणार ? आम्हांला तर असे वाटतें, कीं, हाम्पटन किंवा टस्केजी यांसारख्या संस्था देशांत ठिकठिकाणीं स्थापन झाल्या पाहिजेत, आणि या संस्थांमध्यें उच्च बौद्धिक शिक्षणाचीहि तरतूद केली पाहिजे. खेडेगांवांत राहून रयतांची स्थिति सुधारणारे उत्साही व स्वार्थत्यागी ग्रॅजुएट येथे कोठे आहेत? समजा, उत्साही व स्वार्थत्यागी ग्रॅजुएट मिळाले, तर शेतकऱ्यांची सुधारणा करण्याचे काम हातीं घेण्याइतकी आज या ग्रॅजुएटांच्या अंगीं योग्यता आहे काय ? आमचे मुख्य काम तर खेडेगांवांत आणि शहरांतील कारागीर लोकांच्या वसतीमध्येच आहे. या गरीब लोकांच्या मुलांनां शिकविण्यास आमचे ग्रॅजुएट अयोग्य आहेत. आमची खरी अडचण जी आहे ती ही आहे. उच्च शिक्षणाविषयी विचार करण्याचे येथे प्रयोजन नाहीं. कारण, अधिकारी लोक त्यांत बरीच सुधारणा करीत आहेत; पण, प्राथमिक शिक्षणांत-हायस्कूलांत आम्हांला इष्ट असे कांहीं फेरफार झाले नाहींत. शिक्षणाची खरी कसोटी, समाजाला काय हवें आहे यांत आहे. हल्लीचे शिक्षण आमच्या समाजाच्या गरजा भागवीत आहे काय ? या प्रश्नाचा पूर्ण खल करणे येथे शक्य नाहीं. फक्त हल्लीच्या प्राथमिक शिक्षणक्रमांत कोणत्याहि धंदेशिक्षणाकडे लक्ष्य दिलेलें नाहीं, एवढे सांगितलें असतां बस्स आहे. आम्हांला उत्तम शिक्षक, उपदेशक, कारागीर आणि शेतकरी हवे आहेत काय ? जर ते आह्मांला हवे असतील आणि ते नकोत असें बहुधा कोणी ह्मणणार नाहीं- तर मुलांनां ते धंदे योग्य रीतीनें शिकविले जातील अशा शाळाहि असल्या पाहिजेत. या सर्व विवेचनावरून हाम्पटन व टस्केजी संस्थेच्या पद्धति येथे सुरू करणें किती इष्ट आहे, हें सिद्ध होते. हिंदी तरुणांच्या शिक्षणाबद्दल जबाबदार असणाऱ्या स्त्रीपुरुषांनी, हाम्पटन व टस्केजी या संस्थांच्या पद्धति व तत्त्वें- ध्येयें, इकडच्या परिस्थितीप्रमाणे त्यांत योग्य फेरबदल करून नेहमी आपल्यासमोर ठेवावीं, ह्मणजे त्यापासून देशाचे व समाजाचे खरें हित होईल.

अचाट बुद्धिमत्तेचीं मनुष्ये नेहमी फारच थोडी असतात, आणि आपले मन सुसंस्कृत करण्याचे उपाय तीं स्वतः शोधून काढितात. हर्बर्ट स्पेन्सर यांनां विश्वविद्यालयाचे शिक्षण मिळालेलें नव्हतें. उच्चशिक्षण विद्यार्थ्यांनां देऊं नये, असें—--

–कोणाचेहि ह्मणणे नाही. त्यांत जे योग्य असतील त्यांनीच तें काम हाती घ्यावे. पण, हल्लीप्रमाणे अयोग्य अशा अधिक जणांनी सरसकट तें काम हाती घेण्याचा प्रयत्न करू नये.

आम्हीं काय करावें ?

हाम्पटन किंवा टस्केजी यांसारख्या संस्था हिंदुस्तानांत स्थापन करणे हे फार कठिण आहे काय? आरंभी अडचणी या नेहमी येणारच. स्वतः वाशिंग्टनला आणि त्याचे गुरु जनरल आर्मस्ट्रांग यांनांहि अडचणीशी झुंजावें लागले. दृढनिष्चयी मनुष्याच्या प्रयत्नांसमोर सर्व अडचणी पार मावळून जातात ! हिंदुस्तानांत दयालु इंग्रजसरकारच्या कृपाछत्राखालीं शिक्षणप्रसाराला आपणांला अनेक सवलती मिळू शकतील. विद्यादान करण्यासाठी सरकारचेही अनेक प्रयन चालले आहेत; पण आमचे विद्वान् लोक जर या मार्गात अधिक लक्ष्य घालतील, तर शिक्षण विशेष सुकर होणार आहे. मात्र त्या लोकांनी स्वतःचा शिक्षणालाच पूर्णपणे वाहून घेतलेले असावें. टस्केजीसंस्थेप्रमाणे प्रथम सुरुवात करावी, आणि औद्योगिक व बौद्धिक शिक्षण देण्याची शाळा त्याला जोडावी. प्रथमचे प्रयत्न लहान प्रमाणावर व्हावे. मोठा कायमचा फंड मिळाला आणि चांगले लोक तुमच्याबरोबर काम करण्यास मिळाले तर ती गोष्ट निराळी. शेतकी-बरोबर थोडेसें सुताराचे आणि लोहाराचेहि काम शिकविण्यांत यावें. कारखाना हळुहळू वाढवावा. विणकाम, शिवणकाम आणि त्यांसारखे लहानसहान धंदे सुरू करण्यास हरकत नाहीं. विटा तयार करण्याचा आणि शक्य असल्यास गवंड्याचा धंदाहि सुरू करावा. कामाची दिशा एकदम नक्की ठरावतां येणार नाही. परिस्थितीवर सर्व कांहीं अवलंबून राहील. कृषिकर्म सर्व ठिकाणी सुरू करितां येण्याजोगे आहे. कृषिकर्मामध्यें हि प्रत्येक ठिकाणी कांहीं विशेष गोष्टी करून दाखवितां येतील. शिक्षणखर्च व भोजनखर्च यांविषयीची व्यवस्था हाम्पटन संस्थेप्रमाणे असावी. संस्थेच्या निर्वाहासाठी प्रथम आसपास आणि नंतर बाहेर प्रांती वर्गणी जमविण्याची व्यवस्थेशीर मोहीम सुरू करावी. खरी अडचण ह्मणजे प्रारंभी योग्य शिक्षक मिळण्याची पंचाईत होय. पण, ही अडचण दुस्तर आहे, असे नाही. संस्थेच्या पुरस्कर्त्यांनां निरनिराळ्या शाखा स्वतः चालवितां आल्या नाहीत, तरी त्या कशा चालवाव्या, त्यांचे धोरण कसें असावें, इतके जरी समजले तरी पुरे आहे.

भूमिका

अशा शिक्षणाचा परिणाम

अशा धर्तीवर शिक्षण देत गेल्यास खरोखर त्याचा समाजावर चांगला परिणाम होईल. अशा संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी, लोकांनां कसे वळवावें किंवा त्यांच्यामागें कसें जावें हें न समजणारे नुसते पढीक पंडित न होतां, लोकांचे खरे नेते होतील.

स्त्रीशिक्षण

स्त्रीशिक्षणाचा प्रश्न आह्मांला निराळ्याच रीतीनें सोडवावा लागेल. आमची परिस्थिति त्यांच्याहून भिन्न आहे. स्त्रियांकरितां आह्मांला निराळ्या संस्था काढाव्या लागतील. आणि आदर्शरूप
माता तयार होतील असें शिक्षण आमच्या मुलींनां यावें लागेल. हाम्पटन आणि टस्केजी संस्थेप्रमाणें, गृहव्यवस्था, पाकशास्त्र, शिशुसंगोपन इत्यादिकांचे शिक्षण त्यांनां दिले पाहिजे. पुरुषांइतकें धंदेशिक्षण आमच्या स्त्रियांनां नको आहे. आजन्म कुमारिका असलेल्या किंवा विधवा झालेल्या स्त्रियांनां मात्र कांहीं धंदेशिक्षण दिलें पाहिजे, आणि तूर्त आमच्या परिस्थितीचे मान पाहतां त्यांनां अध्यापिका आणि दाई यांचे धंदे शिकविल्यास आमच्या सांप्रतच्या गरजा भागण्याजोगे आहे.

धार्मिक शिक्षण

आमच्या मुलांमुलींनां धार्मिक शिक्षण देणें फार अगत्याचें आहे, हें सांगणें नलगे. पण, धार्मिक शिक्षण नुसतें औपचारिक न होतां त्याचा सर्वांच्या वर्तनावर सुपरिणाम झाला पाहिजे. धार्मिक शिक्षणानें ज्ञातीची आधिभौतिक, नैतिक, मानसिक
आणि बौद्धिक उन्नति झाली पाहिजे. बाह्य उपचार किंवा आचार यांविषयीं फारसा हेका असू नये. संस्थेचे चालक जे कांहीं आचार ठरवितील ते सर्वांनी, संस्थेतील सभासदांनीं मान्य करावेत. कारण, सर्व आचार एकच तत्वाकडे नेतात. मुख्य गोष्ट ही आहे, कीं, धर्म-खरा धर्म शिक्षकांनी आचरणांत आणिला पाहिजे. परमताविषयीं सहिष्णुता असली पाहिजे. संस्थेत निरनिराळ्या धर्माचे-पंथांचे लोक असतील, तर औपचारिक गोष्टींमध्ये त्यांनी आपापल्या धर्माचे आचार पाळावे; पण सर्व धर्मानां मान्य असलेल्या मुख्य तत्वांविषयीं सर्वांची एकवाक्यता असावी, आणि त्याप्रमाणें सर्वांकडून बिनचूक वर्तन व्हावें. ऐहिक शिक्षणाच्या तालमींत तयार झालेल्या लोकांनां वाटतो तितका हा प्रश्न कठिण नाहीं. तो कठिण वाटतो याचें कारण, या दिशेने अद्याप प्रयत्न झालेला तो नाहीं. पोहण्याची कलाहि भित्र्या नवशिक्याला प्रथम असाध्य वाटते; पण, " असाध्य तें साध्य, करितां सायास । कारण अभ्यास तुका ह्मणे ॥"

आत्मोद्धार.

विनंती आणि समाप्ती

शिक्षणाच्या द्वारे आपल्या समाजाची सेवा करण्याचा ज्यांनी निश्चय केला आहे, अशा लोकांच्या मनांत ज्या मानानें वर सांगितलेली हीं ध्येयें आणि तत्त्वें रुजतील, त्या मानानें डॉक्टर बुकर टी. वॉशिंग्टन यांचें चरित्र आणि कामगिरी यांचा महाराष्ट्रवाचकांनां परिचय करून देण्याचा हा प्रयत्न सफल होईल. आमच्या देशांत बहुजनसमाज अशिक्षित आहे, आणि त्यांनां शिक्षण देणे तर इष्ट आहे. स्वतःच्या मुक्तीविषयी विचार करणारे ब्रह्मचारी आणि संन्यासी यांनीं, या अज्ञानी लोकसमूहाविषयीं-आपल्या अज्ञानी बांधवां विषयों विचार करावा, अशी आह्मी त्यांची प्रार्थना करितों. प्राचीन ऋषींप्रमाणे ते या प्रश्नाचा विचार करतील काय ? आणि पुनः या देशांत शिक्षण व ज्ञान यांचा फैलाव सर्वत्र करतील काय ? पूर्वीप्रमाणें किंवा त्याहून अधिक आधी हिंदुस्तानची सुधारणा करणार किंवा दिवसेंदिवस त्याला अधिकाधिक खालावत जाऊं देणार ? प्राचीन आख्यायिका फार उत्तम असतील; पण त्यांपासून जर आपल्या समाजाचे हित साधण्याला नेटानें प्रयत्न करण्याची स्फूर्ति आह्मांला होत नाहीं, तर त्यांचा काय उपयोग ? हिंदुस्तानांत आध्यात्मिक स्वार्थत्यागाचा बराच सांठा आहे, आणि जर तो कर्मयोगाच्या उद्यममार्गानें वाहूं लागला, तर हिंदुस्तानाच्या भविष्यकालाबद्दल कोणालाहि निराश होण्याचें कारण नाही. प्रयत्न किंवा काम लवकर सुरू झालें पाहिजे, आणि तें सुरू झालें आहे अशी चिन्हेंहि दिसत आहेत. हिंदु आणि मुसलमान विश्वविद्यालयांची रचना घाटत आहे. बनारस आणि अल्लिगड येथील कॉलेजांच्या महत्त्वाकांक्षा फार मोठ्या आहेत. हें चाललें आहे तें सर्व ठीक आहे; पण, लहानलहान प्रमाणावर आम्हीं प्रयत्न केले पाहिजेत. ठिकठिकाणीं ज्ञानाच्या लहानलहान ज्योति प्रज्वलित करून या भावि विश्वविद्यालयांकडून मिळणाऱ्या ज्ञानतेजानें तेजस्वी होण्यासाठीं लोकांनां समर्थ केलें पाहिजे. ह्मणून खेडेगांवांमध्ये आणि लहानलहान शहरांमध्ये शिक्षणाचे नवीन प्रयत्न सुरू करून पुढील पिढ्यांची त्यांच्या भावि श्रेयाविषयीं कल्याणाविषयीं तयारी केली पाहिजे.

शेवटी, अज्ञानदास्यापासून आपल्या संततीला मुक्त करण्याच्या प्रयत्नांत हिंदुस्तानच्या लोकांनां यश मिळो, आणि वॉशिंग्टन, आर्मस्ट्रांग यांसारखीं नररत्नें, वॉशिंगटनची आई, वॉशिंग्टनच्या पत्न्या, मिस मेरी मॅकी, व्हायोला रफनरबाई यांसारखी स्त्रीरत्नें या भरतभूमीत निर्माण होवोत, असें जगन्नियंत्या परमेश्वरापाशीं अनन्यभावें मागून वाचकांची रजा घेतो.

आत्मोद्धार

प्राक्कथन.

गुलामगिरीची संक्षिप्त माहिती.

"If slavery is not wrong, nothing is wrong!"

-Abraham Lincon,

सतराव्या शतकाच्या आरंभी यूरोपियन लोक यूरोपांतील निरनिराळ्या भागांतून येऊन अमेरिकेत वसाहती करूं लागले. त्यावेळीं अमेरिका हा जंगली प्रदेश असल्यामुळे जंगल तोडून साफ करण्यासाठीं व दुसऱ्या कामांसाठीं वसाहतवाल्यांनां मजुरांची फार नड भासू लागली. अमेरिकेत पुष्कळ जमीन मिळाल्यामुळे यूरोपांतून आलेले लोक जमीनदार झाले. मजूर मात्र कोणीच मिळेनात. वसाहतवाल्यांची ही नड दूर करून पैसा मिळविण्यासाठीं पोर्तुगीज लोकांनी आफ्रिकेतील सिद्दी किंवा हबशी लोक जहाजांतून आणून त्यांनां गुलाम ह्मणून विकण्याचें सुरू केलें. पुढें क्रमाक्रमानें हा व्यापार इंग्रज लोकांच्या हातांत आला. हजारों निरपराधी लोक बकऱ्यांमेंढ्यांप्रमाणें दरवर्षी विकले जाऊं लागले ! नूतन खंडांत-अमेरिकेंत भावी विपत्तीचें बीज याचवेळीं पेरण्यांत आलें !

मध्यंतरी इसवी सन १७६५ पासून इंग्रजांचें व अमेरिकन वसाहतवाल्यांचे कांहीं करांच्या बाबतींत पटेनासें झालें, व उभयतांमध्ये लढा पडून भयंकर युद्ध जुंपण्याचा रंग दिसूं लागला. एडमंड बर्क आणि लॉर्ड चॅथॅम (वुइल्यम पिट) या मुत्सद्द्यांनीं हें युद्ध जुंपूं नये ह्मणून

---

* गुलामगिरी जर पाप नाहीं, तर दुसरें कांहीहि पाप नाहीं !
- अॅब्राहाम लिंकन.

–पुष्कळ खटपट केली; तथापि अखेरीला उभयतांचें युद्ध जुंपलेंच. आठ दहा वर्षे भवति न भवति होऊन शेवटीं इ. स. १७७५ सालांत लढाई सुरू झाली. पुढील वर्षात (इ. स. १७७६ मध्यें) फिलाडेल्फियाच्या कांग्रेसनें स्वतंत्रतेचा जाहिरनामा (The Declaration of independence) प्रसिद्ध केला. त्यानंतर सातआठ वर्षे दोन्ही पक्षांचें तुंबळ युद्ध होऊन इ. स. १७८३ सालांत व्हरसेलिसच्या तहानें (Treaty of Versailles) अमेरिकेतील तेरा संस्थानांचें स्वातंत्र्य स्थापित झालें.

याप्रमाणें अनेक आपत्ति सोसून, पैसा व रक्त खर्च करून 'मनुष्यमात्र ईश्वराच्या दृष्टीनें सारखा स्वतंत्र आहे,' हें तत्त्व प्रथम अमेरिकन लोकांनीं सिद्ध करून दिलें, आणि सर्व जगभर मोठी चळवळ उडवून दिली; पण, यासंबंधीं एका बाबतींत मात्र अमेरिकन लोकांची कसुरी राहिली. मनुष्य स्वतंत्र आहे हें तत्त्व फक्त गोऱ्या लोकांपुरतेंच आहे असें ते मानूं लागले ! नीग्रो किंवा हबशी लोकांनां 'मनुष्य' या व्याख्येत ते आणीनात, व त्यांनां स्वतंत्रता देईनात! नीग्रो हे आपली मालमत्ता (Property) आहेत, असें बहुतेक अमेरिकन लोक मानीत असतः आणि मालमत्तेप्रमाणें त्यांचा विनियोगहि करीत असत! अमेरिकेचे पहिले प्रेसिडेंट जॉर्ज वॉशिंग्टन यांचेहि कांहीं गुलाम होते, असें सांगतात.

इंग्रजलोकांच्या मनांत गुलामगिरीचा अन्याय स्पष्ट दिसूं लागला, च त्यांनीं या पापापासून मुक्त होण्याची खटपट चालविली. गुलामांचा व्यापार एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीत सुरू होऊन तो दिवसेंदिवस वाढत जाऊन तिसऱ्या जॉर्ज राजाच्या कारकीर्दीच्या आरंभी बराच वाढला होता. या सुमाराला दरवर्षी ५०,००० हबशी लोक इंग्रजी जहाजांतून गुलाम ह्मणून नेण्यांत येत असत, असें सांगतात. आफ्रिकेंत हबशी लोकांनां कसें पकडीत, व त्यांनां बकऱ्यांमेंढ्यांप्रमाणे जहाजांत कोंडून घालून निर्दयपणे कसें वागवीत, आणि अटलांटिक महासागरावरून वेस्ट इंडीज व अमेरिका येथे नेऊन तेथें त्यांनां करें विकीत, यासंबंधीं भयंकर गोष्टी लोकांच्या कानावर येऊ लागल्या.

गुलामगिरीची संक्षिप्त माहिती

गुलामगिरी बंद व्हावी हमणून वुइल्यम वुइलबरफोर्स नांवाच्या एका इंग्रज सद्गृहस्थानें फार परिश्रम केले. गुलामांचा व्यापार बंद व्हावा हमणून इ. स. १७८८ सालीं त्यानें पार्लमेंटांत एक सूचनाहि आणिली; पण गुलामांचा व्यापार करणाऱ्या गृहस्थांच्या खटपटीमुळे ती सूचना पास झाली नाहीं. तथापि निराश न होतां वुइलबरफोर्स यांनीं आपले प्रयत्न सतत चालू ठेविले. पुढे इ.स. १८०६ सालीं मिस्तर फॉक्स यांच्या सूचनेवरून गुलामांचा व्यापार बंद झाला, तरी ब्रिटिशराज्यांत ८,००,००० गुलाम शिल्लक राहिले. शेवटीं इ. स. १८३३ सालीं गुलामांनां स्वातंत्र्य देण्याचा कायदा पार्लमेंटांत पास झाला, आणि मिस्टर वुइलबरफोर्स यांच्या प्रयत्नांनां शेवटीं यश आलें. या कामीं त्यांनीं एकसारखी सतत पंचेचाळीस वर्षे खटपट केली; आणि अखेरीला गुलामांनां स्वातंत्र्य देण्याचा कायदा पास झाल्यावर, हमणजे आपल्या आयुष्याचे महत्कार्य आटोपल्या-वर तीन दिवसांनीं-आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी-मिस्टर वुइलबरफोर्स हे स्वर्गवासी झाले ! ब्रिटिशराज्यांत गुलामगिरी बंद करण्याचें बहुतेक श्रेय यांनां आहे.

आतां अमेरिकेतील गुलामांच्या इतिहासाकडे आपण वळू. थॉमस पेन नामक उदार महात्म्यानें, प्रथम तारीख ८ मार्च इ. स. १७७५ इसवी रोजीं गुलामगिरीविरुद्ध आपला निबंध प्रसिद्ध केला. त्यानंतर महिना सव्वा महिना, हमणजे तारीख १२ एप्रिल १७७९ इसवी रोजीं, गुलामगिरी बंद व्हावी हमणून यत्न करणारी पहिली संस्था अमेरिकेत स्थापन झाली. थॉमस पेन आणि इतर सद्गृहस्थ यांच्या खटपटीनें तारीख २ नवंबर १७७९ इसवी रोजीं सहा हजार गुलाम असलेल्या पेनसिलव्हानिया संस्थानांत गुलामगिरी बंद करण्याचा कायदा पास झाला. पुढे इ. स. १७८३ सालीं अमेरिकेला स्वातंत्र्य मिळाल्यावर, जार्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन आणि अलेक्झांडर हॅमिल्टन कइत्यादि गृहस्थांनीं अमेरिकेची जी स्वतंत्र अनुशासनपद्धति ठरविली, तींत सर्व मनुष्यें सारखीं आणि स्वतंत्र आहेत, सर्वांचे हक्क समान आहेत, एकाला दुसऱ्याचे हक्क हिरावून घेतां येत नाहींत, इत्यादि तत्त्वें —-

–प्रमुखत्वानें होतीं. तथापि अमेरिकेंत जोंपर्यंत गुलामगिरी होती, तोंपर्यंत या तत्त्वांची अम्मलबजावणी पूर्णपणे झाली नाही. उत्तरेकडील संस्थानांनां गुलामगिरी ह्मणजे अन्याय आहे असे वाटून त्यांनी आपले गुलाम सोडून दिले; पण, दक्षिणेकडील संस्थानें आपले गुलाम सोडून देईनात. शिवाय, आपले गुलाम आपल्याजवळ ठेवू दिले नाहींत, तर आह्मी युनियनमध्यें संयुक्त संस्थानांमध्ये दाखल होत नाहीं, असेहि त्या संस्थानांतील लोक ह्मणूं लागले. वेळ फार आणीबाणीची असल्यामुळे, व देशांत एकी असणें तर अत्यंत इष्ट असल्यामुळे, दक्षिणेकडील संस्थानांनां गुलाम सोडून देण्याचा फारसा आग्रह करितां येईना. कांहीं वर्षानीं गुलामगिरीचा अन्याय दिसून येऊन दक्षिणेंतील संस्थाने गुलामगिरी आपण होऊनच बंद करतील असें उत्तरेकडील संस्थानांनां वाटल्यामुळे त्यांनीं गुलामगिरीविषयीं त्यावेळीं अधिक विचार करण्याचे सोडून दिलें. उत्तरेकडील संस्थानांची हवा फार थंड असल्यानें शेतकीची वगैरे कामें करण्याला त्यांनां गुलामांहून हुषार मजुरांची गरज लागत होती, व त्या कारणामुळे त्यांनां गुलामांची फारशी गरज भासली नाहीं; पण दक्षिणेतील संस्थानांची स्थिति याच्या अगदीं उलट होती. तेथील गरम हवेमुळे गुलामांच्या साहाय्याशिवाय शेतांचीं कामें उत्तम होत नसत. भरउन्हांत गुलाम लोक शेतांत एका ओव्हरसिअरच्या हाताखालीं एकसारखे खपत असत, आणि जमीनदार गोरे लोक स्वस्थ पडून चैन करीत. त्यामुळे, गुलामगिरी बंद करणें त्यांनां इष्ट वाटेना, आणि ती बंद करण्यास ते कबूल होईनात. इ. स. १८०५ सालीं डोमिंगो प्रांतांतील गुलामांनां फारच त्रास झाला. त्यावेळी थॉमस पेननें प्रेसिडेंट जेफरसन यांच्याकडे अर्जवजा कांहीं पत्र पाठविली होतीं; पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. थॉमस पेन हे इ. स. १८०९ साली–

---

* अमेरिकेच्या नकाशावर इलिनॉईस संस्थानच्याखालून एक आडवी रेषा मारून दोन भाग केले असतां, वरच्या ह्मणजे उत्तरेच्या भागांत गुलामगिरी नव्हती, आणि खालील दक्षिणेच्या भागांत ती होती. उत्तरेकडील लोकांचे ह्मणणें गुलामगिरी बंद व्हावी असें होतें, पण दक्षिणेकडील लोकांचे ह्मणणे याविरुद्ध होतें.

—वारले, व त्यांच्या उत्तरक्रियेच्या वेळीं आपल्या ज्ञातीची कृतज्ञता व्यक्त करण्याकरितां दोन नीग्रो हजर होते, असें सांगतात.

" सत्या चिरडुनि टाकिलें धुळींत, पुन्हां उसळत निज बळें " असा ईश्वराच्या घरचा न्याय आहे! सत्याचा शेवटीं जय होणारच ! गुलामगिरी बंद व्हावी ह्मणून खटपट करणारा एक पुरस्कर्ता-थॉमस पेन-वारला, तरी त्याच सालीं गुलामगिरी अजिबात बंद करणारा एक महात्मा-अॅब्राहाम लिंकन जन्माला आला. हा गरीब स्थितींत आणि गरीब आईबापांच्या पोटी जन्मला होता. अॅब्राहाम वयांत आल्यावर त्याची हुषारी, दक्षता आणि शक्ति पाहून ओफट नांवाच्या एका व्यापाऱ्यानें त्याला स्प्रिंगफील्डहून न्यू आर्लीन्स येथे आपल्या दुकानांत मदतनीस नेमावा ह्मणून बोलावून आणिलें. अॅब्राहाम न्यूअर्लिन्स येथे आल्यावर गुलामगिरीचा भयंकर देखावा त्याच्या दृष्टीला पडला. तेथें एक गुलामांचा मोठा बाजार भरत असे. गुलामांच्या झुंडीच्या झुंडीनां बेड्या घालून ओळीनें कशा उभ्या करीत असत, व त्यांच्या पाठींतून रक्ताच्या चिळकांड्या उडेतोंपर्यंत त्यांनां चाबकानें कसें फोडून काढीत असत, हें प्रथम अॅब्राहामनें आपल्या डोळ्यांनीं पाहिलें. इतरांनां हा प्रकार अंगवळणी पडल्यानें त्यांनां त्याचें कांहीं विशेष वाटलें नाहीं; पण अॅब्राहामचें अंतःकरण त्या भयंकर देखाव्यानें तिळतिळ तुटलें. त्यावेळीं आणि तदनंतर तो याविषयीं कोणाकडे कांहीं बोलला नाहीं; पण एकसारखा तो आपल्या मनांत या प्रकाराविषयी विचार करीत राहिला. यावेळीं त्याच्या अंतःकरणाचें पाणीपाणी होऊन गुलामगिरीचें शल्य जें त्याच्या हृदयांत घुसून राहिलें तें गुलामगिरी समूळ नाहींशी होईपर्यंत तेथून निघालें नाहीं. गुलामगिरी बंद करण्याचा त्यानें संकल्प केला, आणि ईशकृपेनें तो सिद्धीलाहि पण गेला !

इ. स. १८३० सालच्या सुमाराला वुइल्यम लॉईड ग्यारिसन नांवाच्या एका मोठ्या गृहस्थानें 'लिबरेटर' (Liberator) नांवाचें एक वर्तमानपत्र सुरू केलें. त्याचा उद्देश गुलामगिरीचे अन्याय लोकांनां कळावे, हा होता. कांहीं दंगेखोर लोकांनीं सेन्टलुईस शहरांत लिबरेटरच्या—

—ऑफिसांत शिरून ग्यारिसन् आणि इतर नोकर लोक यांच्याशीं मारहाण करून कांहींनां तर ठार केलें !

अशा त-हेचे, किंबहुना याहूनहि गुलामगिरीसंबंधीं घडलेले अनेक भयंकर अनन्वित प्रकार मिसेस एच. बी. स्टो नांवाच्या एका अमेरिकन विदुषीनें पाहिले व ऐकले होते, आणि त्यांविषयीं तिच्या मनांत विचार आला, कीं, तिचें अंतःकरण तिळतिळ तुटे. सुधारणा आणि ज्ञान यांचा जसजसा प्रसार होत जाईल तसतसा हा अन्याय बंद होईल, असें तिला वाटून बरीच वर्षे ती स्वस्थ राहिली होती; पण इ. स. १८५० साली, पळून गेलेल्या गुलामांनां पकडून आणण्याविषयीं कायदा पास करण्याची वाटाघाट सुरू झाली, ख्रिस्ती म्हणविणारे व इतर भाविक लोकहि धन्याच्या जाचाला त्रासून पळून गेलेल्या गुलामांनां पकडण्याविषयी मदत करणें हें नागरिकांचें कर्तव्यकर्म आहे असा उपदेश करूं लागले, आणि उत्तरेकडील संस्थानांतील चांगले दयाळु आणि शिष्ट लोकहि गुलामांनां पकडून देण्याविषयीं खिस्ती धर्मशास्त्राचें काय मत आहे याविषयीं सभा भरवून खल करूं लागले, तेव्हां या बाईला फार आश्वर्य वाटलें व खेद झाला. यापुढें तिच्यानें स्वस्थ राहवेना. गुलामगिरीचे खरें स्वरूप लोकांनां कळावें म्हणून तिनें स्वतः पाहिलेल्या व ऐकलेल्या ह माहितीवरून 'Uncle Tom's Cabin' नांवाचा एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिला. या ग्रंथांत, गुलामांनां मळ्यांत सारा दिवस एकसारखें कसें राबावें लागे, कामांत थोडीशी चुकवाचुकव झाल्यास गुलामांवरील ओव्हरसिअर चाबकानें मारमारून पुनः त्यांनां काम करण्यास कसें लावी, आणि हा ओव्हरसियर जर का नीग्रो असला तर 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या न्यायानें तो आपल्या लोकांनां अतोनात दुःख कसें देई, रात्रीं पोटभर खावयाला न देतां एका लहानशा खोपटींत गुलामांनां कसें कोंडून ठेवीत, नवराबायको, भाऊबहिणी, आईमुलें यांनां पैशाच्या लालसेनें निरानराळ्या मालकांनां विकून त्यांची ताटातूट कशी करीत, तरुण नीग्रो स्त्रियांची अनेक तऱ्हांनीं हालअपेष्टा करून त्यांच्या जन्माचें कसें मातेरें करीत, असह्य जाचाला त्रासून कोणी पळून गेल्यास त्यांच्यामागें शिकारी कुत्रे आणि दुष्ट लोक बक्षिसाच्या लालुचीनें कसे लावीत,------

गुलामगिरीची संक्षिप्त माहिती.

—हातापायांत बेड्या घालून गुलामांनां विकण्याकरितां बाजारांत नेऊन त्यांनां कसें झोडपीत, आणि या सर्व अन्यायाचें समर्थन पाद्री लोक बायबलांतील आधार देऊन कसें करीत, वगैरे हृदयद्रावक, अंगावर शहारे उत्पन्न करणारें, जिवाला चटका लावून सोडणारें, अगदीं हुबेहुब व सत्य वर्णन तिनें केलें आहे. या ग्रंथानें अमेरिकन लोकांत बरीच चळवळ उडवून दिली, आणि गुलामगिरीविरुद्ध लोकमत बरेंच तयार केलें. गुलामगिरीचें पाप आणि खरें स्वरूप याविषयीं योग्य माहिती कोणाला हवी असल्यास त्यांनी हा ग्रंथ अवश्य वाचावा !

याप्रमाणें चळवळ उडाल्यावर देशांत लोकांचे प्रबळ असे दोन पक्ष झाले. एकाचें ह्मणणें गुलामांनां स्वतंत्रता द्यावी, व दुसऱ्याचें ह्मणणें त्यांनां स्वतंत्रता देऊं नये, आहे तीच स्थिति त्यांनां योग्य आणि सुखकर आहे, असें होतें. या दोन पक्षांमध्ये बरेच तंटेबखेडे झाले. १८५६ सालानंतर अमेरिकेची स्थिति फार नाजुक होत चालली. यावेळीं देशावर आलेलें संकट दूर करण्यास समर्थ असलेला असा एक महापुरुष प्रेसिडेंटच्या जाग्यावर निवडून आला, व तो ॲब्राहाम लिंकन होय !

अमेरिकन लोकांनां आपल्या पूर्वसंचित पापांचें क्षालन करणें जरूर होतें. १८६० सालीं गुलामांनां स्वतंत्रता देण्याच्या पायीं व इतर कांहीं कारणांमुळे दक्षिणेकडील व उत्तरेकडील संस्थानांमध्यें एक भयंकर यादवी (Civil war) जुंपली, व ती चारपांच वर्षे चालली. युद्धा-शिवाय हें भांडण मिटवावें, व या भांडणामुळे अमेरिकाखंडाचीं दोन शकलें होऊं नयेत, ह्मणून महात्मा लिंकन यानें जीवापाड मेहनत केली; पण युद्धाशिवाय तंट्याचा निकाल होण्याचा रंग दिसेना ! १८६१ सालीं प्रेसिडेंट लिंकननें ५,००,००० स्वयंसेवकांच्या फौजेची मागणी केली. * उलट पक्षाच्या, ह्मणजे दक्षिणेंतील संस्थानांतील लोकांनीं, बंडाचे निशाण उभारिलें. १८६२ सालीं एप्रिल महिन्यांत, गुलामगिरी बंद करण्याचा कायदा पास करण्यांत आला. प्रथम प्रथम बंडवाल्यांनां थोडासा जय—---

---

* अमेरिकेत स्थायिक फौज (Standing army) अशी नाहीं. देशावर कठिण प्रसंग आला असतां प्रेसिडेंट स्वयंसेवकांची मागणी करितो, आणि लढण्यास समर्थ असलेले लोक देशाच्या बावट्याखाली येऊन उभे राहतात.

–+मिळून त्यांची सरशी होत गेली, आणि ते राजधानीवर-वॉशिंग्टन शहरावर चालून येण्याचा विचार करूं लागले. प्रेसिटेंड लिंकननें पुनः अधिक सैन्य बोलाविलें, आणि बंड मोडून टाकण्याचे प्रयत्न केले. युलिसीस एस. ग्रांट नामक एक हषार सेनापति प्रेसिडेंटला मिळाल्यावर युद्धाचें पारडें फिरलें, आणि बंडवाल्यांचा जोर कमी कमी होत चालला. प्रेसिडेंट लिंकननें १८६२ सालच्या सप्टेंबर महिन्यांत "पुढील वर्षाच्या आरंभीं ह्मणजे तारीख १ जानेवारी १८६३ या दिवसापासून गुलामगिरी बंद केली जाईल!" असे जाहीर केलें. तसेंच त्यावर्षी दिसेंबरच्या ३ तारखेला "उलट पक्षाचे जे कोणी हत्यारें खालीं ठेवतील आणि कायद्याप्रमाणें वागून देशाचें संरक्षण करण्याचें वचन देतील, त्यांनां माफी देण्यांत येईल," (The Lincoln Amnesty) असेंहि प्रेसिडेंट लिंकननें जाहीर केलें. दोन्ही पक्षांचें युद्ध चालू असतांना १८६३ सालच्या पहिल्या तारखेला दास्यविमोचनाचा जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आला. यावेळीं बंडवाल्यांचा जोर पुष्कळच कमी झाला होता, तरी लढाई चालली होती. इतक्यांत प्रेसिडेंट लिंकनची मुदत संपली पण सन १८६५ च्या मार्च महिन्यांत लिंकनला पुनः प्रेसिडेंट निवडण्यांत आलें. पुढें लवकरच तारीख ९ एप्रिल या दिवशीं बंडवाल्या सैन्याचे मुख्य जनरल ली हे प्रेसिडेंटला शरण आले, आणि बंड समूळ मोडिलें गेलें. दोन्ही पक्षांच्या लाखों लोकांचा युद्धांत नाश झाला, आणि अनेक अब्ज रुपयांचा चुराडा उडून शेवटीं गुलामगिरी बंद झाली! सुमारें ३०।४० लाख लोकांनां स्वतंत्रता मिळाली. सर्व लोक महात्मा लिंकनचे यश गाऊं लागले. स्वतंत्र झालेले नीग्रो लोक तर लिंकनला ईश्वर मानूं लागले !

देशावर आलेलें संकट निवारून व इतर महत्त्वाची कामगिरी उरकून प्रेसिडेंट लिंकन दोन्ही पक्षांचा समेट करण्याविषयीं प्रयत्न करीत असता एका खुनशी इसमाने वाशिंग्टन येथील फोर्ड थिएटरांत एप्रिलच्या १४ तारखेला त्या महात्म्याच्या डोकींत गोळी घालून त्यांचा खून केला! याप्रमाणें याकामीं महात्मा लिंकनचेंहि बलिदान झालें !



बुकर टी. वॉशिंग्टन.

आत्मोद्धार

प्रकरण पहिलें.

दासानुदास.

माझा जन्म व्हर्जीनिया प्रांतांतील फ्रांकलिन परगण्यांत, एका मळ्यांत, गुलामाच्या कुळांत झाला असावा. आतां तो कोठें आणि कोणत्या दिवशीं झाला, हें मला नक्की सांगतां येत नाहीं. तरी मी कोठेंतरी आणि केव्हांतरी जन्मलों असलों पाहिजे, हें खास. चौकशीवरून मला बहुतेक असें कळलें आहे, कीं, हेल्सफर्ड नांवाच्या आडव्या रस्त्यावर असलेल्या पोस्टऑफिसाजवळ माझा जन्म झाला होता. तें साल १८५८ किंवा १८५९ असावें. महिना किंवा तारीख मला कळलेली नाहीं. माझ्या लहानपणच्या आठवणी, ह्मणजे तो मळा आणि त्यांत काम करणाऱ्या गुलामांच्या खोपट्या-हाहि मळ्याचा एक भागच होय-याच होत.

अत्यंत दुःखी, उद्वेगी आणि निराशाजनक अशा परिस्थितींत माझ्या जीविताला प्रारंभ झाला. याचें कारण माझे धनी अतिशय क्रूर होते, हे नव्हे. दुसऱ्यांशीं तुलना करितां माझे धनी विशेषसे कठोर दिसत नव्हते. एका नमुनेदार, १४-१६ चौरस फूट अशा लहानशा खोपटींत माझा जन्म झाला. या खोलींत माझी आई, बंधु आणि बहीण यांच्यासह सिव्हिल* वारचा निकाल होईपर्यंत मी रहात असें. सिव्हिलवॉरनंतर आह्मां सर्वांनां मुक्त करण्यांत आलें.

---

* गुलामगिरी बंद व्हावी ह्मणून व दुसऱ्या कांहीं कारणांकरितां उत्तर व दक्षिण अमेरिका येथील लोकांत आपसांत चाललेलें युद्ध.

आत्मोद्धार.

माझ्या पूर्वजांविषयीं मला बिलकूल माहिती नाहीं. माझ्या पूर्वजांनां आणि दुसऱ्या शिद्दी लोकांनां आफ्रिकेहून अमेरिकेला जहाजांतून आणतांना त्यांनां वाटेंत जे भयंकर हाल सोसावे लागले, त्याविषयीं खोपट्यांत आणि नंतर इतर ठिकाणीं कांहीं लोक कुजबुजत असतांना मीं ऐकिलेलें होतें. आईहून अधिक अशी माझ्या कुळाविषयी माहिती मला मिळाली नाहीं. आईशिवाय मला एक सावत्रभाऊ आणि एक सावत्रबहीण होती. गुलामगिरीच्या दिवसांत गुलामांच्या कुटुंबांच्या माहितीकडे किंवा कागदपत्रांकडे कोणी विशेष लक्ष्य देत नसत. माझी आई गुलामांचा सौदा करणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या मनांत भरली असावी, असें मला वाटतें. त्यानें तिला विकत घेतलें, व तेव्हांपासून तो तिचा व माझा धनी झाला. नवीन गाय किंवा घोडा खरेदी करण्यासारखाच हाहि सौदा होता. माझ्या आईची मला एवढीच माहिती आहे. माझ्या बापाची माहिती तर मला तितकीसुद्धां नाहीं. मला त्याचें नांवहि ठाऊक नाहीं. माझा बाप गोरा मनुष्य होता, आणि तो जवळच्या एका मळ्यांत रहात असे, असें मीं ऐकिलेलें आहे. तो कोणी कां असेना; मला वाढविण्याविषयीं, किंवा माझ्याविषयीं दुसरी कसलीहि यत्किंचित् काळजी त्यानें घेतल्याचें मीं केव्हांच ऐकिलेलें नाहीं. पण मी त्याला कांहींच दोष देत नाहीं. त्यावेळीं राष्ट्रानें स्वतःवर दुर्दैवानें लादून घेतलेल्या एका संस्थेला-गुलामगिरीला बळी पडलेल्या पुष्कळ अभागी मनुष्यांपैकी तो एक होता.

ही खोपटी आमची राहण्याची जागा होती, इतकेंच नव्हे, तर ती मळ्याचें स्वयंपाकघरहि होती. माझी आई मळ्यांतील स्वयंपाकीण होती. खोपटीला काचेचीं तावदानें नव्हतीं. बाजूंच्या छिद्रांतून उजेड आंत येई, तसेंच त्यांतून हिंवाळ्याची थंडगार हवाहि येई. खोपटीला दरवाज्यासारखें कांहीं होतें. कारण, त्याचीं बिजागरें केव्हां मोडून पडतील, याचा नेम नव्हता. दरवाज्याला मोठ्या चिरा पडलेल्या होत्या आणि—--

---

* वाशिंग्टनच्या आईचें नांव जेन (Jane) असें होतें.

तो अतिशय लहान होता. अशा या खोपटींत राहणें बरेंच त्रासाचें होतें. या सर्व छिद्रांखेरीज, खोपटीच्या उजव्या बाजूच्या खालच्या कोपऱ्याकडे एक ७×८ चौरस इंच असें, रात्रौ मांजराला आंतबाहेर सहज जाण्या-येण्याजोगें मोठें छिद्र होतें. आपसांत लढाई सुरू होण्यापूर्वी व्हर्जीनियांतील प्रत्येक इमारतीला आणि खोपटीला हें मार्जारछिद्र असे. आमच्या खोपटींत या मार्जारछिद्राची आवश्यकता नव्हती. कारण, दुसऱ्या सहासात छिद्रांतून मांजरांनां आंतबाहेर सहज जातां येत असे. खोपटींतील जमीन लांकडाच्या फळ्यांची केलेली नसून, नुसत्या मातीचीच होती. जमिनीच्या मध्यमागीं एक मोठें खोल भुयार असून त्यावर फळ्या घातलेल्या असत. या भुयारांत हिंवाळ्यांमध्यें रताळ्यांचा सांठा ठेवीत असत. रताळ्यांच्या या भुयाराचें चित्र माझ्या स्मृतिपटलावर चांगलें कोरलेलें आहे. रताळीं आंत सांठवून ठेवितांना, किंवा तीं बाहेर काढतांना, त्यांपैकीं मला एक-दोन पुष्कळदां मिळत असत, आणि मी तीं भाजून मोठ्या आनंदानें खात असें, असे मला आठवतें. आमच्या मळ्यांत स्वयंपाकासाठीं स्टोव्ह नसे. गोऱ्या धन्यांचा आणि काळ्या गुलामांचा सर्व स्वयंपाक माझी आई उघड्या चुलीवर लहानमोठ्या भांड्यांत करीत असे. हिंवाळ्यामध्यें खोपटींतील छिद्रांतून येणाऱ्या थंड हवेनें आह्मी कुडकुडून जात असूं; तसेंच उन्हाळ्यांत उघड्या चुलीचा ताप आह्मांला असह्य होई.

त्या लहान खोपटींत काढलेलीं माझ्या आयुष्याचीं पहिलीं वर्षे, दुसऱ्या हजारों गुलामांच्या जीवनक्रमाहून भिन्न नव्हतीं. आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष्य पुरविण्यास माझ्या आईला दिवसा फारच थोडा वेळ मिळे. पहांटेला काम सुरू होण्यापूर्वी, आणि रात्रौ काम संपल्यावर, आमच्याकडे लक्ष्य देण्यास तिला थोडासा अवसर सांपडे. मला लहानपणींची अशी एक आठवण आहे, कीं, माझी आई रात्रीं बऱ्याच उशीरां एकादें कोंबडीचें पिलूं शिजवीत असे, आणि आह्मां मुलांनां जेवू घालण्यासाठीं आह्मांला ती उठवीत असे. तें पिलूं ती कसें व कोठून आणी, हें मला कळत नसे. आमच्या धन्याच्या शेतांतून तें मिळविलें असावें, असें मला वाटतें.

कांहींजण याला चोरी ह्मणतील, व आतां तोच प्रकार घडेल तर मीहि त्याला चोरीच ह्मणेन; पण हा प्रकार घ्नडण्याचा काल आणि कारण पाहतां, माझ्या आईनें चोरी केली, अशी कोणाच्यानेंहि माझी खात्री करवली नसती. ती गुलामगिरीला बळी पडलेली होती. दास्यविमोचनाचा जाहीरनामा लागून आमच्या कुटुंबाची सुटका होईपर्यंत बिछान्यावर निजल्याचें मला आठवत नाहीं. घाणेरड्या जमिनीवर टाकिलेल्या चिंध्यांच्या फाटक्या लतकरांवर मी, माझा वडील बंधु जॉन, आणि बहीण आमन्दा अशीं तिघेजणें निजत असूं

लहानपणीं कोणत्या खेळांत माझा काळ जात असे, असें थोड्या दिवसांपूर्वी मला कोणी विचारलें. माझ्या आयुष्याचा कोणताहि भाग खेळाकडे खर्च झाला नाहीं, याची कल्पना हा प्रश्न विचारीतोपर्यंत मला नव्हती. मला थोडें समजू लागल्या दिवसापासून माझ्या आयुष्यांतील बहुधा प्रत्येक दिवस कोणत्याना कोणत्या तरी श्रमांत गेलेला आहे. मला खेळण्याला वेळ मिळता, तर मी आतां अधिक उपयुक्त मनुष्य झालों असतों, असें मला आतां वाटतें; गुलामगिरींत काढलेल्या अवधींत माझ्या हातून फारसे काम होण्याजोगें नव्हतें. तरी माझा बहुतेक वेळ अंगणें झाडण्यांत, शेतांतील लोकांकरितां पाणी नेण्यांत, आणि आठवड्यांतून एकदां दळण्याकरितां गिरणीला धान्य नेण्यांत जाई. गिरणी मळ्याहून सुमारें तीन मैल होती. या कामाला मी नेहमीं घाबरत असें. धान्यानें भरलेली एक मोठी जड पडशी घोड्याच्या पाठीवर लादून धान्याचा अर्धा अर्धा भाग प्रत्येक बाजूला घालीत असत; पण दुर्दैवानें धान्य कोणत्यातरी एका बाजूला अधिक कलून तोल बिघडून जाई, आणि धान्याच्या पिशवीसह मीहि खालीं पडें. हा प्रकार न चुकतां प्रत्येक खेपेला होई ! घोड्यावर धान्य लादण्याची ताकद माझ्या अंगीं नसल्यामुळे, या संकटांतून सोडविणारा कोणी वाटसरू येऊन माझी सुटका करीपर्यंत बरेच तास मला वाट पहावी लागे, आणि हा मध्यंतरींचा माझा सर्व वेळ नेहमीं रडण्यांत जाई. अशा रीतीनें बराच काळ गेल्यावर गिरणीला पोहोंचण्यास उशीर

—होई, आणि धान्य दळून घेऊन परत घरीं जाईपर्यंत बरीच रात्र होई. रस्ता निर्जन असून दाट जंगलांतून गेलेला होता; यामुळे भयानें माझें धाबें गडबडून जात असे. सैन्यांतून पळून आलेले पुष्कळ सोल्जर येथें छपून रहात असून, एकादा नीग्रो मुलगा एकटाच भेटला ह्मणजे ते प्रथम त्याचे कान कापून घेतात, असें मीं ऐकिलें होतें ! शिवाय, घरीं जाण्यास उशीर झाला, कीं, शिव्यांचा भडिमार होऊन चाबकाचे फटकारे मिळणार, हे मला पक्कें माहीत होतें.

मी गुलाम असतांना शाळेचें कांहींच शिक्षण मला मिळाले नाहीं. तरी माझ्या धन्याच्या मुलीबरोबर तिचीं पुस्तकें घेऊन शाळेच्या दरवाजापर्यंत मी पुष्कळदां गेल्याचें मला आठवतें. बरीचशीं मुले आणि मुली शाळेत अभ्यासांत गुंग झालीं आहेत, या देखाव्यानें माझ्या मनावर फार उत्तम परिणाम झाला; आणि शाळेत जाऊन असा अभ्यास करणें ह्मणजे स्वर्गप्राप्ति होय, असें मला वाटूं लागलें.

मागील गोष्टींची आतां आठवण करून पाहतां मला असें आठवतें,

कीं, आह्मी 'गुलाम' आहों, आणि गुलामांनां मुक्त करावें किंवा नाहीं
याची वाटाघाट चालली आहे, या गोष्टीचें प्रथमज्ञान एकेदिवशीं सकाळीं मला झालें. त्यादिवशीं मोठ्या पहांटेला माझ्या आईनें मला उठविलें, आणि आपल्या सर्व मुलांजवळ गुडघे टेंकून तिनें ईश्वराची अशी प्रार्थना केली, कीं, "ईश्वरा ! लिंकनाला व त्याच्या सैन्याला यश मिळो. एकेदिवशीं मला माझ्या मुलांसहित मुक्त होऊंदे." या विषयासंबंधानें विचार करितां जनसमूह, वर्तमानपत्रे आणि मासिकपुस्तकें यांनां अगदीं पारखे असतांना देखील सर्व दक्षिण अमेरिकेतील गुलामांनां, राष्ट्रांत चाललेल्या चळवळी-बद्दल इत्थंभूत बातमी कशी लागत असे, हें मला समजले नाहीं. ग्यारिसन, लव्हजाय आणि दुसरे कित्येकजण गुलामांनां स्वतंत्रता द्यावी ह्मणून प्रयत्न करू लागलेल्या वेळेपासून दक्षिणेतील सर्व गुलाम, ही चळवळ सिद्धीला कशी जाईल इकडे लक्ष्य देऊं लागले. सिव्हिलवॉरची तयारी चालली असतांना आणि सिव्हिलवॉर सुरू असतांना मी जरी—-

—अगदीं लहान होतों, तरी बऱ्याच रात्रीं माझी आई आणि मळ्यांतील दुसरे गुलाम यांचीं संभाषणे झालेलीं व ऐकिलेली आहेत. या संभाषणांवरून त्यांनां परिस्थितीचें ज्ञान चांगलें होतें, आणि घडलेल्या गोष्टींची माहिती त्यांनां 'ग्रेप व्हाईन-कर्णोपकर्ण' तारेनें लागे, असें दिसून येतें.

लढांई चालू असतांना लिंकन ज्यावेळीं प्रेसिडेंटच्या जागेसाठीं उमेदवार होऊन राहिले, तेव्हां रेल्वेस्टेशन, दैनिकपत्र किंवा मोठें शहर यांपासून बरेच मैल दूर असलेल्या आमच्या मळ्यांतील गुलामांनां वादग्रस्त मुद्दयांची बरोबर माहिती होती. उत्तर व दक्षिण यांमध्ये युद्ध सुरू झाल्यावर आमच्या मळ्यांतील प्रत्येक गुलामाला असे पक्कें कळून चुकलेलें होतें कीं, हें युद्ध सुरू होण्यास जरी दुसरीहि कित्येक वादग्रस्त कारणें होतीं, तरी त्यांमध्ये गुलामगिरीचा प्रश्न प्रमुख होता. उत्तरेकडील सैन्याचा जर जय झाला, तर त्याचा एक परिणाम म्हणजे 'गुलामांची मुक्तता' हा होय, अशी दूरदूरच्या मळ्यांतीत माझ्या अज्ञ जातभाईंचीहि पक्की खात्री झाली होती. उत्तरेकडील संयुक्त (Federal) सैन्याचा प्रत्येक जय, आणि दक्षिणेच्या जुटींत सामील झालेल्या (Confederate) सैन्याचा प्रत्येक पराजय, याकडे सर्वांचे मन सारखें लागून राहिले होतें. मोठमोठ्या लढायांचा निकाल गोऱ्या लोकांनां कळण्यापूर्वीच पुष्कळदां गुलामांनां त्याची माहिती लागे. आपल्या धन्यांचे टपाल नेण्याकरितां पोस्ट ऑफिसांत जाणाऱ्या नीग्रोंकडून ही बातमी नेहमीं त्यांनां कळत असे. आमच्या मळ्या पासून पोस्ट ऑफिस अजमासें तीन मैल होतें, आणि टपाल आठवड्यांतून एकदां किंवा दोनदां मिळत असे. टपाल मिळाल्यानंतर बरेच गोरे लोक पोस्ट ऑफिसांत जमत, आणि तेथे ताज्या बातमीबद्दल खल करीत असत. त्यावेळीं त्यांच्या भाषणाचा मथितार्थ समजून घेण्याकरितां टपाल आणावयाला गेलेला नीग्रो तेथेच उभा राहून त्यांचें भाषण ऐकत असे, आणि आपल्या धन्याच्या घरी परत येत असतां वाटेंत भेटतील त्या गुलामांनां आपण ऐकिलेली बातमी सहज सांगत असे. आणि या रीतीनें धन्याच्या घरीं बातमी पोहोचण्यापूर्वीच गुलामांनां पुष्कळदां ती आधींच मिळत असे.-

–माझ्या लहानपणीं किंवा तरुणपणीं आमच्या कुटुंबांतील सर्व मनुष्यें 'एकत्र जेवावयाला बसली आहेत, आणि आह्मीं सर्वांनीं ईश्वराची प्रार्थना केली आहे, व सर्वांचें भोजन उत्तम रीतीनें उरकलें आहे, असा एकहि प्रसंग मला आठवत नाहीं. व्हर्जीनियांतील मळ्यांत, आणि त्यापुढेंहि, मुक्या जनावरांनां ज्याप्रमाणें अन्न मिळतें तसें आह्मां मुलांनां मिळे! एकाद्या वेळेला एक भाकरीचा तुकडा तर दुसऱ्या वेळेला नुसता मांसाचाच, केव्हां एकदां थोडेंसें दूध तर दुसऱ्यांदां कांहीं बटाटेच आह्मांला खावयाला मिळत.

केव्हांकेव्हां आमच्या कुटुंबांतील कांहींजणांनां भांड्यांत शिलक राहिलेले अन्न मिळे, आणि कांहींनां टिनचें ताट टेबलाऐवजीं गुडघ्यावर ठेवून हातानें खावें लागे. मी मोठा झाल्यावर मला जेवणाच्या वेळीं धन्याच्या घरीं जावें लागे, आणि कागदी पंख्यांनीं टेबलावरील माशांचे निवारण करावें लागे. गोऱ्या लोकांचे संभाषण बहुतकरून युद्ध आणि गुलामांची स्वतंत्रता यांविषयींच असे, आणि मी तें बरेंच ऐकत असें. एकदां माझ्या तरुण धनिणी आणि त्यांचे पाहुणे यांनां अंगणांत जिंजर केक (एक पकान्न) खातांना मी पाहिलें. त्यावेळी मला त्या केक हें एक अतिशय स्वादिष्ट आणि मधुर पक्वान्न आहे, असे वाटलें. तत्क्षणीं माझा असा निश्चय झाला, कीं, स्वतंत्र झाल्यावर जेव्हां मला जिंजरकेक मिळतील, आणि यांच्याप्रमाणें ज्यावेळीं मी त्या खाईन, तेव्हां माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल.

पुढे लढाई जेव्हां लांबणीवर पडली, तेव्हां पुष्कळ गोऱ्या लोकांनां अन्न मिळण्याची पंचाईत पडूं लागली. मला वाटतें, गोऱ्या लोकांपेक्षां गुलामांनां अन्नाची वाण कमी भासली. कारण, त्यांचे नेहमींचे अन्न ह्मटलें ह्मणजे जाडीभरडी धान्याची-बाजरीची भाकर आणि डुकराचें मांस हें असे, आणि हे जिन्नस मळ्यांत सहज पैदा होत. पण गोऱ्यांनां लागणारे जिन्नस ह्मणजे कॉफी, चहा, साखर आणि इतर पदार्थ हे मात्र मळ्यांत पैदा होत नसत, आणि लढाईमुळे हे जिन्नस बाहेरून आणणें बहुतेक अशक्य झालें होतें. गोऱ्या लोकांनां त्यावेळीं बऱ्याच अडचणी सोसाव्या—

—लागल्या. कॉफीऐवजी भाजलेल्या धान्याचा आणि साखरेऐवजी एक त-हेच्या काळ्या काकवीचा ते उपयोग करीत. पुष्कळवेळां चहाकॉफीत घालण्यास गोड पदार्थ त्यांनां मिळत नसे.

मला आठवतें, मीं पहिल्याप्रथम उपयोगांत आणलेले जोडे लांकडी होते. त्यांचा वरचा भाग खरखरीत चामड्याचा असून त्यांचा तळ एक इंच जाड लांकडाचा असे. मी चालूं लागलों ह्मणजे त्यांचा भयंकर आवाज होई. शिवाय ते फार त्रासदायक असत; कारण ते नरम नव्हते. ते वापरणारा मनुष्य चमत्कारिक दिसत असे. लहानपणीं मी गुलाम असतांना तागाचा सदरा घालणें माझ्या फार जीवावर येई. आह्मी रहात असलेल्या व्हर्जीनियाच्या भागांत गुलामांनां तागाचेच कपडे वापरावयाला देत असत. आमच्या कपड्यांचा ताग फार खरखरीत, स्वस्त आणि टाकाऊ असे. अशा तागाचा नवीन सदरा प्रथमतः अंगांत घालणें ह्मणजे दांत उपटून काढण्यासारखें तें दुःखदायक होई, किंवा निवडुंगाच्या दहाबारा फडा अगर शंभर टांचण्या बोंचण्याप्रमाणें होई. अशा त-हेच्या कपड्यां पैकी एकादा अंगावर घेतला असतां जें कांहीं दुःख होत असे, त्याची आतांहि मला बरोबर आठवण होते. माझें शरीर नाजूक आणि मउ असल्यामुळे मला विशेष दुःख होई. घालावा तर तागाचाच सदा, नाहींतर कांहीं नाहीं, अशी माझी अवस्था होती. ते कपडे घालणें न घालणे माझ्या मर्जीवर सोपविलें असतें, तर मी कांहींच घातलें नसते ! जेव्हांजेव्हां मला नवीन सदरा घालण्याची पाळी येई, त्यावेळीं माझ्यापेक्षा बराच वडील असलेला माझा भाऊ जॉन, माझ्याऐवजीं तो सदरा मऊ होईपर्यंत आपण स्वतः वापरीत असे, आणि माझ्यावर मोठा उपकार करीत असे. मी मोठा होईपर्यंत मला हा एकच कपडा वापरावयाला मिळे
मी वर जें कांहीं सांगितले आहे, त्यावरून कोणालाहि सहज कल्पना होईल, की, माझ्या ज्ञातीला गोऱ्या लोकांविषयीं द्वेष होता. त्यांचें कारण, दक्षिणेंतील बहुतेक गोरे लोक लढाईला गेले होते, आणि दक्षिणेकडील—-

–लोकांनां जय मिळाला, तर गुलामांनां दास्यांत कायमचें रहावें लागणार होतें. आमच्या येथील गुलामांविषयीं, तसेंच दक्षिणेंत जेथेंजेथें गुलामांनां चांगल्या रीतीनें वागविलें जात असे, अशा पुष्कळ गुलामांविषयीं हें विधान खरें नव्हतें. लढाई चालली असतांना माझा एक तरुण धनी मारला गेला, आणि त्याच्या घरांतील दुसऱ्या दोघांनां फार दुखापत झाली. माझा धनी मार्सबिली याच्या मरणाची वार्ता जेव्हां आली, तेव्हां गुलामांनां जें कांहीं दुःख झालें, त्याची मला चांगली आठवण आहे. हें दुःख वरपांगी नसून खरें होतें. गुलामांपैकीं कांहींनीं मार्सबिलीची शुश्रूषा केली होती, व दुसरे कांहीं तो लहान असतांना त्याच्याबरोबर खेळलेले होते. कांहींनां ओव्हरसियर किंवा धनी मारीत असतांना त्यांनां न मारण्याविषयीं मार्सबिलीनें विनवणी केली होती. धन्याच्या (मार्सबिलीच्या) घराच्या खालोखाल गुलामांच्या घरीं मार्सबिलीच्या निधनाविषयीं दुःख झालें. जेव्हां जखमी झालेल्या दोघां तरुणांनां घरीं आणिलें, तेव्हां गुलामांनीं आपली सहानुभूति अनेक तऱ्हांनीं दर्शविली, आणि नातलगांप्रमाणेंच त्यांची शुश्रूषा करण्यास ते उत्सुक होते. कांहींजणांनीं आपल्या जखमी झालेल्या धन्यांच्या जवळ बसून रात्रभर सेवा करण्याची परवानगी मागितली. ही त्यांची ममता आणि त्यांची कळकळ त्यांच्या उदार व सरळ स्वभावाचें फळ होय. पुरुषमंडळी लढाईला निघून गेल्यानंतर घरांतील बायकामुलांचें संरक्षण करण्यासाठीं त्यांनीं आपले जीवहि खर्ची घातले असते. पुरुषमंडळी बाहेर गेल्यावेळीं धन्याच्या घरीं निजण्यास ज्याला निवडलें जाई, त्याला हा एक मोठा मान मिळाला असें वाटत असे. रात्री तरुण किंवा वृद्ध बायकांनां त्रास देण्याचें जर कोणाच्या मनांत आलें, तर प्रथम गुलामाला मारल्या-शिवाय त्याला पुढें जातां येत नसे ! गुलामगिरींत असो किंवा स्वतंत्रतेंत असो, माझ्या ज्ञातिबांधवांनीं विश्वासघात केल्याचीं उदाहरणें फार कचित् आढळतील, असें मला वाटतें. दुसऱ्या कोणी या गोष्टीचा पडताळा घेतला आहे किंवा नाहीं, हें कांहीं मला माहीत नाहीं.

आत्मोद्धार.

साधारपणें, माझ्या ज्ञातिबांधवांनीं लढाईच्यापूर्वी आणि लढाई चालली असतांना गोऱ्या लोकांविषयीं द्वेषवृत्ति बाळगलेली नाहीं; इतकेंच नव्हे, तर उलट अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत, कीं, लढाई सुरू झाल्या"पासून कांहीं कारणांमुळे गरीब आणि अनाथ झालेल्या आपल्या पूर्वीच्या धन्यांची आणि धनिणींची त्यांनीं फार काळजी घेतलेली आहे. आपल्या पूर्वीच्या धन्यांनां विपत्तीपासून त्रास होऊं नये, ह्मणून त्यांच्या पूर्वीच्या गुलामांनीं कित्येक वर्षे पैशाचा पुरवठा केला आहे, अशीं कांहीं उदाहरणे मला माहीत आहेत. त्याचप्रमाणें आपल्या पूर्वीच्या धन्यांच्या मुलांबाळांच्या शिक्षणासाठीं त्यांनीं मदत केली आहे, अशींहि कांहीं उदाहरणें मला माहीत आहेत. एक उदाहरण तर असें आहे, कीं, दक्षिणेतील एका मोठ्या मळ्याच्या पूर्वीच्या सावकाराचा मुलगा दारूच्या व्यसनानें अत्यंत बिघडून जाऊन दरिद्री झालेला होता, आणि या मळ्यांतील काळे लोक स्वतः जरी गरीब होते, तरी त्यांनीं कित्येक वर्षे त्याला अन्नवस्त्राची ददात 'पडूं दिली नाहीं. कोणी साखर, कोणी कॉफी, कोणी मांस, कोणी कांही तर कोणी कांहीं, असें त्याला पाठवीत असत. वृद्ध मार्स टॉमची (जुन्या धन्याची) माहिती ज्यालाज्याला प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष होती, असे कोणीहि मळ्यांत असेपर्यंत, त्यांनीं आपल्या जुन्या धन्याच्या मुलाला, आपली हरएक वस्तु त्याच्या उपयोगाला लावून त्याला केव्हांहि व कसलीहि अडचण पडूं दिली नाहीं.

माझ्या ज्ञातिबांधवांपैकी कोणींहि विश्वासघात केला आहे, अशीं उदाहरणें फार कचित् मिळतील ! व्हर्जीनियामधील पूर्वीच्या एका गुलामाच्या उदाहारणावरून हें चांगले स्पष्ट होतें. हा गुलाम मला कांहीं दिवसांपूर्वी ओव्हिओ संस्थानांतील एका लहान शहरांत भेटला होता. त्यानें आपल्या धन्याशीं दास्यविमोचनाच्या पूर्वी दोनतीन वर्षे असा करार केला होता, कीं, दरवर्षी आपल्या देहासाठीं अमुक एक रक्कम देऊन स्वतःला कांहीं वर्षांनंतर मुक्त करून घ्यावयाचे, आणि अशा रीतीनें फेड करीत असतां त्यानें पाहिजे तिकडे आणि वाटेल त्याच्याजवळ जाऊन काम करावें.

दासानुदास

ओव्हिओ संस्थानांत मजुरी चांगली मिळेल, असें वाटून हा गुलाम तिकडे गेला. दास्यविमोचनाचा जाहिरनामा फडकल्यानंतर त्याला आपल्या धन्याचे अद्याप तीनशें डालर देणें होतें. जरी जाहिरनाम्याप्रमाणें त्याला आतां आपल्या धन्याचे कर्ज फेडण्याचे कारण नव्हतें, तरी हा काळा मनुष्य आपण होऊन व्हर्जीनिया येथे आपल्या धन्याकडे चालत गेला, आणि त्यानें त्याचा शेवटचा डालर सव्याज फेडला! याविषयीं माझ्याशीं तो बोलत असतांना ह्मणाला, कीं, "कायद्याने जरी मला हें देणें भाग नव्हतें, तरी मी माझ्या धन्याला वचन दिलेलें आहे, आणि माझें वचन तर मीं केव्हांच मोडलेलें नाहीं!" दिलेलें वचन पाळल्याखेरीज स्वतंत्रतेचा उपभोग घेतां येणार नाहीं असें त्याला वाटलें. *

वर सांगितलेल्या गोष्टींवरून कांहीं गुलामांनां स्वतंत्रता नको होती, असें कोणी अनुमान काढील; पण हें बरोबर नाहीं. स्वतंत्रता नको असणारा, किंवा गुलामगिरीची अपेक्षा करणारा, असा कोणीहि व केव्हांहि मला आढळला नाहीं.

गुलामगिरीच्या जाळ्यांत दुर्दैवानें सांपडली जाणारी व्यक्ति किंवा राष्ट्र याची मला अंतःकरणापासून कींव येते. माझ्या जातीच्या दास्याबद्दल दक्षिणेंतील गोऱ्या लोकांविषयीं द्वेषभाव बाळगण्याचें मीं पुष्कळ दिवसांपासून सोडून दिलें आहे. गुलामगिरी सुरू करण्याची जबाबदारी आमच्या राष्ट्रांतील कोणत्याहि एका विशिष्ट समाजावर नाहीं. शिवाय, सरकारानें ही संस्था बरीच वर्षे मान्य करून तिचें समर्थन केलें होतें. रिपब्लिकच्या सामाजिक आणि सांपत्तिक स्थितीशीं या संस्थेचें जाळे जखडून गेल्यामुळे, ही संस्था एकदम नाहींशी करणें हें काम देशाला कांहीं सोपें नव्हतें. पुनः गैरसमज आणि जातिद्वष यांनां बाजूला ठेवून वस्तुस्थितीकडे पाहतां आह्मांला असें कबूल केलें पाहिजे, कीं, गुलामगिरी ही जरी क्रूर आणि अनीतिकारक आहे, तरी या देशांत राहणारे कोट्यवधि नीग्रो—-

---

मुदतीच्या कायद्याचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या आमच्या लोकांनी हें उदाहरण ध्यानांत ठेवण्याजोगे आहे ! -भाषांतरकर्ते.

(जे स्वतः किंवा ज्यांचे पूर्वज येथे गुलामगिरी अनुभवीत आहेत,) जगाच्या दुसऱ्या कोणत्याहि भागांतील तेवढ्याच संख्येपेक्षां सांपत्तिक, बौद्धिक, नैतिक आणि धार्मिक दृष्टया अधिक चांगले आणि होतकरू आहेत. इतकें खरें आहे, कीं, या देशांत ज्यांनी किंवा ज्यांच्या पूर्वजांनी गुलामगिरी अनुभविलेली आहे, असे नीग्रो लोक आपल्या जन्मभूमींतील लोकांनां ज्ञान देण्याकरितां मिशनरी या नात्याने आफ्रिकेंत नेहमीं परत जात आहेत; पण यावरून गुलामगिरीचे मी समर्थन करितों, असें कोणी समजू नये; तर उलट संस्था या दृष्टीनें मी तिला दोष देतो. उदारबुद्धीने नव्हे, तर केवळ स्वार्थासाठीं आणि सांपत्तिक सुस्थितीसाठीं ही संस्था अमेरिकेत स्थापन झालेली होती, हे आह्मां सर्वांनां माहीत होते. ईश्वर कांही विशिष्ट हेतु सिद्धीला नेण्याकरितां मनुष्ये आणि संस्था यांचा वारंवार कसा उपयोग करतो, हे दाखविण्याकरितां व इकडे लक्ष्य वेधण्याकरितां, मी वरील विधान केलें आहे. अत्यंत निराशाजनक दिसणाऱ्या परिस्थिती-मध्येंहि माझ्या ज्ञातीच्या भवितव्यतेविषयीं माझी इतकी श्रद्धा कशी आहे. असें जेव्हां लोक मला विचारतात, तेव्हां दयाळु ईश्वराने आह्मांला कोणत्या बिकट संकटांतून पार पाडलें आहे याची मी त्यांनां आठवण देतो.

मी मोठा होऊन चांगलें कळू लागल्यापासून मला असें वाटू लागले. की, आमच्या लोकांनां जरी निर्दयपणाने वागविण्यांत आले, तरी गुलामगिरीपासून काळ्यागोऱ्यांनां सारखेंच फळ मिळाले आहे. या संस्थेचे वाईट परिणाम नीग्रोंनांच भोंवून राहिले नाहीत. आमच्या मळ्यांतील व्रर्तनक्रमावरून हें चांगलें सिद्ध होतें. गुलामगिरीच्या यंत्राची अशी रचना केलेली होती, की, श्रम करणें हें कमी प्रतीचे किंवा अवनतीचे लक्षण आहे असें मानिले जात असे. यामुळे आमच्या मळ्यांमध्ये काळेगोरे लोक होतांहोईलतों काम करण्याचे टाळीत असत. आमच्या मळ्यांतील गुलामांच्या काम करणाच्या पद्धतीनें गोऱ्या लोकांमधील आत्मविश्वास आणि कर्तबगारी यांनां बहुतेक अंशी पिटाळून लाविलें. माझ्या वृद्ध धन्याला पुष्कळ मुळे व मुली होत्या; पण त्यांपैकी कोणीहि एकादा धंदा किंवा एकादा—-

—किफायतशीर उद्योग शिकलेलीं नव्हती. मुलींनां स्वयंपाक करण्यास, विद्याभ्यास करण्यास, अगर गृहव्यवस्था चांगली ठेवण्यास शिकविलें नव्हतें. हीं सर्व कामें गुलामांवर सोपविली होती. मळ्याची सुधारणा करण्यामध्यें गुलामांचा कांहीं संबंध नव्हता. आणि ते अज्ञानी असल्यामुळे आपलीं कामें व्यवस्थित व चोख कशीं करावीं, हें त्यांनां समजण्यास मार्ग नव्हता. याचा परिणाम असा झाला, कीं, कुंपण नादुरुस्त झालें होतें; फाटकाच्या बिजागऱ्या अर्ध्यामुर्ध्या निखळल्या होत्या व दरवाजे किरकिरत होते; खिडक्यांचीं तावदानें फुटून गेली होतीं; गिलावा पडून गेला होता आणि अंगणांत रान वाढलें होतें. साधारणपणें आमच्या मळ्यांत काळ्यागोऱ्या लोकांकरितां अन्नाची सामुग्री भरपूर असे; पण घरांत आणि जेवणाच्या मेजावर व्यवस्था, शिस्त, टापटीप आणि गृहसौख्य यांचा अभाव असे. ' अन्नाचा आणि इतर वस्तूंचा अपव्यय फार होत असे. स्वतंत्रता मिळाल्यावर, पुस्तकी ज्ञान आणि मालकी हक्क या गोष्टी खेरीजकरून, गुलाम आणि धनी स्वतंत्र रीतीनें आयुष्यक्रम पुनः नवीन सुरू करण्यास सारख्याच योग्यतेचे झाले होते. गुलामांचे धनी आणि त्यांचे पुत्र हे कोणताहि स्वतंत्र धंदा शिकलेले नव्हते. शारीरिक श्रम करणें हें आपल्या सारख्यांनां उचित नव्हे, ही कल्पना यांच्या अंगीं नकळत जडलेली होती. उलटपक्षीं, बरेच गुलाम कांहींतरी कला किंवा हुन्नर शिकलेले होते; आणि काम करण्यास कोणालाहि लाज वाटत नव्हती. कांहीं थोडेजण मात्र श्रम करण्यास नाखुष असत.

सरतेशेवटीं लढाईचा एकदां शेवट झाला, आणि स्वतंत्रतेचा दिवस उगवला ! आमच्या मळ्यांतील सर्व लोकांनां हा मोठा महत्त्वाचा दिवस होता. आह्मी या दिवसाची मार्गप्रतिक्षा करीत होतों. 'स्वतंत्रता मिळणार' असें कांहीं महिने गाजत होतें. लढाई सोडून परत घरीं जाणारे शिपाई वरचेवर दृष्टीला पडत. सैन्यांतून रजा मिळालेले लोक, आणि ज्यांच्या फलटणींपासून युद्ध न करावयाचें वचन घेतलेलें होतें अशा फलटणींतील लोक, हे आमच्या ठिकाणावरून वारंवार जात असत. 'कर्णोपकर्ण'------

तारायंत्राचे काम झपाट्यानें चालू होतें. घडलेल्यां उहानमोठ्या गोष्टीच्या बातम्या एका मळ्याहून दुसऱ्या मळ्याला ताबडतोब पोहोंचविल्या जात. उत्तरेकडील सैन्य हल्ला करील या भीतीनें चांदीचें आणि इतर मौल्यवान सामान मोठ्या घरांतून काढून जंगलांत पुरून ठेवण्यांत आलें, आणि त्यावर विश्वासू गुलामांचा पाहरा ठेवण्यांत आला. पुरलेल्या खजिन्याला कोणी हात लाविला, की, त्याची दुर्दशाच झाली ह्मणून समजावें ! उत्तरेकडील शिपायांनां गुलाम लोक अन्नपाणी, कपडेलत्ते आपल्याकडे विश्वासानें सोपविलेल्या वस्तूंखेरीजकरून इतर सर्व कांहीं-देत असत.. जसजसा तो संस्मरणीय दिवस समीप येऊं लागला, तसतसें नेहमीपेक्षां गुलामांच्या झोपड्यांत अधिक गाणें सुरू होऊं लागलें. हे गाणें आतां जोरानें रंगांत येऊ लागलें, आणि रात्रभर चालूं लागलें. बहुतेक गाण्यांत स्वतंत्रतेविषयी कांहीं उल्लेख असे. हीं गाणीं पूर्वीहि त्यांनी गाइलीं होतीं खरी, पण त्यावेळीं असें सांगण्यांत येत असे, की, या गाण्यांतील स्वतंत्रतेचा या जगांतील व्यवहाराशीं कांहीं संबंध नसून तो परलोकाशींच आहे! आतां हळुहळू त्यांनीं आपलें सोंग टाकून दिलें, आणि आपल्या गाण्यांतील स्वतंत्रता ह्मणजे या जगांतील या देहाचीच स्वतंत्रता होय, असे स्पष्टपणें सांगण्यास ते घाबरेनासे झाले. त्या संस्मरणीय दिवसाच्या आदल्या रात्रीं सर्व गुलामांनां असें सांगण्यांत आलें, कीं, उद्यां सकाळीं धन्याच्या घरीं कांहीं विलक्षण चमत्कार होणार आहे. या रात्रीं कोणालाहि झोप आली नाहीं. त्या दिवशीं सर्वत्र गडबड आणि उत्सुकता दिसून आली. दुसऱ्या दिवशीं पहांटेला लहानथोर सर्व गुलामांनां धन्याच्या घरीं जमण्याचा निरोप आला. माझी आई, भाऊ, बहीण आणि दुसरे पुष्कळ गुलाम यांसह मी तेथे गेलों. आमच्या धन्याच्या घरच्या मंडळीपैकीं कांहींजण यावेळीं घरच्या कट्ट्यावर बसलेले आणि कांहीं उभे होते. आणि तेथून काय प्रकार घडणार होता तो त्यांनां दिसण्याजोगा आणि ऐकू जाण्याजोगा होता, व त्यांच्या तोंडावर काळजीची, फारतर खिन्नतेची-पण द्वेषाची नव्हे- छटा दिसत होती. त्यावेळी माझ्या मनावर——--

—-झालेल्या संस्काराची आठवण करून पाहतां असें वाटतें, कीं, इतकी (गुलामरूपी) मिळकत आतां नाहीशी होते ह्मणून नव्हे, तर ज्यांनां आपण वाढविलें आणि इतकें जवळ केलें, त्यांनां आतां आपण अंतरणार, ह्मणूनच ते खिन्न दिसले. त्या सकाळची, सर्वात स्पष्ट आठवण ह्मणजे कोणी एका परकी गृहस्थानें हा बहुतेक संयुक्त संस्थानाचा कामगार असावा-एक लहानसें भाषण केले, आणि एक लांबलचक कागद-मला वाटतें हा दास्यविमोचनाचा जाहिरनामा असावा-वाचून दाखविला. यानंतर आम्ही सर्व मुक्त आहों आणि पाहिजे तिकडे व पाहिजे तेव्हां जाण्यास आह्मांला मुभा आहे, असें सांगण्यांत आलें. माझी आई माझ्या जवळ उभी होती. तिनें वांकून आपल्या मुलांचे मुके घेतले आणि तिच्या गालांवरून प्रेमाश्रु वाहूं लागले. झालेल्या सर्व प्रकारचा अर्थ तिनें आम्हांला नीट समजावून सांगितला. असा दिवस परमेश्वरानें आपणांला दाखवावा अशी आपण पुष्कळ दिवस प्रार्थना करीत होतों, आणि तो दिवस पाहण्यास आपण जगणार नाहीं असें आपल्याला वाटत होतें, इत्यादि तिनें सांगितलें.

कांहीं मिनिटें सर्वांनां मोठा आनंद झाला, आणि ते आभार मानून नाचूंबागडूं लागले. पण त्यांच्या मनामध्ये आपल्या पूर्वीच्या धन्यांविषयीं कांहीं वितुष्ट नव्हतें. उलट त्यांच्याबद्दल त्यांनां कींव वाटली. पुढे मुक्त झालेल्या काळ्या लोकांचा आनंद फार वेळ टिकला नाही ! कारण आपल्या खोपट्यांत परत गेल्यावर त्यांच्या मनोविकारांत बदल झालेला मला आढळून आला. स्वतंत्र झाल्यानंतरची मोठी जबाबदारी, स्वतःविषयी काळजी, आपल्याविषयीं आणि आपल्या मुलांबाळांविषयींचा पुढील बेत, इत्यादि विचारांनीं त्यांनां आतां घेरलें. एकाद्या दहाबारा वर्षांच्या तरुण मुलाला आपल्या निर्वाहासाठीं एकदम घराबाहेर अफाट जगांत पाठविण्यासारखाच हा प्रकार होता. थोड्याच अवधींत, इंग्रज लोक कित्येक शतकें ज्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां धडपडत आहेत, ते सर्व प्रश्न आतां आमच्या लोकांवर लादले गेलेः ते प्रश्न ह्मणजे गृह,--

–उपजीविका, मुलांची जोपासना, शिक्षण, नागरिकत्व, देवालयांची स्थापना इत्यादि गोष्टींविषयीं होते. थोड्याच अवधींत गुलामांच्या खोपट्यांमधील नाचणेंबागडणें बंद होऊन तेथे औदासीन्य पसरत चाललें, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कांहींनां असें वाटलेंसें दिसतें, की, आतां मिळालेली स्वतंत्रता आपल्या अंदाजापेक्षां अधिक भारी आहे ! गुलामांपैकी कित्येक सत्तरऐशीं वर्षाचे हमातारे होते. त्यांच्या आयुष्यांतील उत्तम भाग संपून गेला होता. निवासाचे नूतनस्थान जरी त्यांनां मिळण्याची खात्री होती, तरी परकीय स्थळांमध्ये आणि परकीय लोकांमध्यें उपजीविकेचें साधन मिळविण्याची शक्ति त्यांच्यामध्यें राहिली नव्हती. अशा लोकांनां हें कोडे फार कठिण वाटलें. शिवाय, त्यांच्या अंतःकरणांमध्ये आपला जुना धनी, धनीण आणि त्यांची मुलें यांच्याविषयीं विलक्षण निष्ठा होती; आणि ती निष्ठा तोडून टाकण्याची कल्पनाच त्यांनां फार जड वाटू लागली! कांही-जणांनीं आपल्या धन्यांबरोबर पन्नाससाठ वर्षे काढिलीं होतीं; त्यांनी आतां त्यांच्यापासू दूर व्हावें हें काम कांहीं सोपें नव्हतें. प्रथम चोरून चोरून, नंतर हळुहळू, वृद्ध गुलाम एकामागून एक आपल्या खोपट्यांमधून धन्याच्या घराकडे "आतां आपण पुढें काय करावें ?” याविषयीं त्यांच्याशी एकांतीं बोलण्यास जाऊं लागले.

प्रकरण दुसरें.

शैशव.

स्वतंत्रता मिळाल्यावर आमच्या मळ्यांतील सर्व लोकांचें पुढील दोन गोष्टींबद्दल एकमत झालें; आणि सर्व दक्षिणेंतहि हीच स्थिति होती, असें मला आढळून आलें.

१. आमच्या लोकांनीं आतां आपलीं नांवें बदललीं पाहिजेत.

२. आपण स्वतंत्र आहों असें खरेखुरें वाटण्यासाठीं त्यांनीं आतां आपली जुनी जागा निदान कांहीं आठवडे किंवा कांहीं दिवस तरी सोडिली पाहिजे.

कोणत्या कारणामुळे नकळे, पण काळ्या लोकांनां वाटूं लागलें, कीं, जुन्या धन्याचे आडनांव आपण ठेवणें हें कांहीं वाजवी नाहीं. ताबडतोब पुष्कळांनी दुसरीं आडनांवें धारण केलीं. स्वतंत्रतेचें हें पहिलें चिन्ह होय. गुलामगिरी चालू असतांना काळ्या मनुष्याला जॉन किंवा सुसान अशा एकेरी नांवानेंच हांक मारीत असत; एक नांवापेक्षां अधिक नांवांची जरूरी कचित् च लागत असे. जर जॉन किंवा सुसान हा हॅचर नामक गोऱ्या मनुष्याचा असला, तर केव्हांकेव्हां त्याला जॉन हॅचर किंवा हॅचरचा जॉन असें ह्मणत. पण हॅचरचा जॉन किंवा जॉन हॅचर हें नांव स्वतंत्र मनुष्याला योग्य नाहीं असा विचार त्यांच्या मनांत उद्भवला, आणि बहुतेकांनीं जॉन हॅचर याच्याऐवजीं जॉन. एस्. लिंकन, किंवा जॉन. एस्. शर्मन अशा त-हेचीं नांवें धारण केलीं. आडनांवाच्या आरंभींचा 'एस्' हा कोणत्याहि नांवाकरितां आलेला नसून काळ्या लोकांनीं पदवीप्रमाणे आपल्या नांवाला लावून टाकिला.

वर सांगितल्याप्रगाणें, पुष्कळ काळ्या लोकांनीं स्वतंत्रता कशी काय मानवते, हें पाहण्यासाठी जुना मळा थोडे दिवस सोडिला. कांहीं काल

बाहेर राहिल्यावर वृद्ध गुलामांपैकी पुष्कळ आपल्या जुन्या जागीं परत आले, आणि आपल्या जुन्या धन्यांशीं कांहीं करारमदार करून त्यांच्या मळ्यांत राहिले. माझ्या आईचा नवरा ह्मणजे माझ्या जॉन बंधूचा बाप व माझा सावत्र बाप-हा दुसऱ्या एका धन्याचा गुलाम होता. तो आमच्या मळ्याला कचितच येई. वर्षास एकदां नाताळाच्या वेळीं तो आमच्याकडे येत असावा, असे मला आठवतें. लढाई चालली असतांना तो संयुक्त सैन्याच्या मागें लागून पळून गेला, आणि वेस्टव्हर्जीनियाच्या नव्या संस्थानांत जाऊन राहिला. दास्यविमोचनाच्या जाहिरनाम्यानंतर, वेस्ट व्हर्जीनियांतील कन्हावा व्हॅली येथे यावें, असें त्यानें माझ्या आईला सांगून पाठविलें. त्यावेळीं व्हर्जीनियापासून पर्वतावरून वेस्टव्हर्जीनियाचा माग फारच त्रासदायक आणि अडचणींचा होता. आमचे सर्व कपडे आणि घरांतील सर्व माल खटाऱ्यांत घातला, आणि मुलें बहुतेक मार्ग-शेंकडो मैल-चालत गेलीं ! यावेळपर्यंत आमच्या मळ्यापासून फार लांब आमच्या पैकी कोणी गेलेला होता, असें मला आठवत नाहीं. त्यामुळे आतां हा लांबचा प्रवास ह्मणजे आमच्या आयुष्यांतील एक मोठी महत्त्वाची गोष्ट होय, असें आह्मांला वाटलें. आमच्या जुन्या धन्याला व ज्ञातिबांधवांना सोडून जाण्याचे आमच्या फार जीवावर आलें. आह्मीं दूर गेल्यापासून तों आमच्या-धन्याच्या मरणापर्यंत त्याच्या कुटुंबांतील वृद्ध माणसांशीं आह्मी पत्रव्यवहार ठेविला, आणि त्यानंतर पुढें त्या कुटुंबांतील तरुण माणसांशीं दळणवळण ठेविलें. आह्मी कित्येक आठवडे प्रवास करीत होतों, व रस्त्यावरच लांकडें पेटवून स्वयंपाक करीत होतों. एकेदिवशीं रात्रीं एका जुनाट फळ्यांच्या खोपटाजवळ आह्मीं तळ दिला होता, असें मला आठवतें. माझ्या आईने स्वयंपाकाकरितां आंत विस्तव तयार करण्याचा आणि नंतर जमिनीवर निजण्याकरितां बिछाना तयार करण्याचा बेत केला. विस्तव पेटविला नाहीं तोंच सुमारें तीन हात लांब असा काळा सर्प धुराड्यांतून खाली पडला, आणि जमिनीवरून पळाला. अर्थात् आह्मांला ती खोपटी सोडावी लागली. असें करतांकरतां सरतेशेवटी आह्मी आमच्या मुक्कामाला

ह्मणजे त्या संस्थानच्या चार्लस्टन नांवाच्या राजधानीपासून सुमारें पांच मैल लांब असलेल्या माल्डन गांवाला जाऊन पोहोंचलों.

त्यावेळीं वेस्टव्हर्जीनियाच्या त्या भागांत मिठाच्या खाणींचा उद्योग चांगला चालत असे, आणि माल्डन हा लहान गांव चुलाणांच्या मध्यभागी होता. माझ्या सावत्र बापाला एका मिठाच्या चुलाण्याचे काम मिळालें होतें, आणि त्यानें आह्मांला राहण्याकरितां एक लहानशी खोली घेऊन ठेविली होती. आमचें नवें घर व्हर्जीनियांतील आमच्या मळ्यांतील आमच्या घरापेक्षां कांहीं चांगले नव्हते. एका बाबतींत तर तें अधिकच वाईट होतें. व्हर्जीनियांतील मळ्यांतील आमचें घर जरी चांगलें नव्हतें, तरी आह्मांला तेथे नेहमीं स्वच्छ हवा खात्रीने मिळे. इकडील आमचे नवीन घर गच्च भरलेल्या आणि सभोंवार जवळजवळ असणाऱ्या खोपट्यांच्या मध्यभागीं होते; आणि आरोग्यखात्याचा कांहीं निर्बंध नसल्यामुळे सभोवार भयंकर आणि असह्य घाण नेहमीं सांठे. आमच्या शेजारी कांहीं काळे लोक असत, आणि कांहीं गरीब, अशिक्षित आणि खालावलेले गोरे लोक असत. दारुबाजी, जुगार, तंटेभांडणे आणि अनाचार इत्यादि - प्रकार वारंवार दृष्टीला पडत. त्या लहान शहरांत राहणाऱ्या सर्व लोकांचा - मिठाच्या खाणीशीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असे. मी जरी उहान मुलगा होतों, तरी माझ्या बापाने मला आणि माझ्या बंधूला मिठाच्या - भट्टीत काम करावयाला लाविले. नेहमीं मला पहांटेस चार वाजतां काम सुरू करावें लागे.

या मिठाच्या खाणींत काम करीत असतांना पुस्तकी ज्ञानासंबंधाने पहिली गोष्ट मी शिकलों. प्रत्येक मीठ भरणारा आपल्या पिपावर एक विवक्षित नंवर घाली. माझ्या सावत्र बापाच्या वांट्याला आलेला नंबर अठरा (१८) हा होता. प्रत्येक दिवसाचे काम संपण्याच्या वेळीं मुकादम फिरतफिरत येई, आणि आमच्या प्रत्येक पिपावर अठरा हा आंकडा घाली. तेव्हांपासून मी हा आंकडा पाहीन तेथे ओळखण्यास शिकलों,

आणि दुसरे कांहीं आंकडे किंवा अक्षरे मला माहित नव्हतीं, तरी अठरा (18) हा आंकडा मी काढण्यास शिकलो.

मला समजू लागल्यापासून वाचावयाला शिकावें अशी मला उत्कट इच्छा होती, असे मला आठवतें. लहानपणींच मीं असा निश्चय केला, कीं, माझ्या आयुष्यांत जरी विशेष कांहीं मला साध्य झालें नाहीं, तरी सामान्य पुस्तकें आणि वर्तमानपत्रे वाचतां येण्याजोगें शिक्षण मी प्राप्त करून घेईन. आह्मी वेस्टव्हर्जीनियांत येऊन राहिल्यानंतर आणि आमची एकदांची कशीबशी व्यवस्था लागल्यानंतर "माझ्याकरितां एक पुस्तक मिळवून आणून दे," अशी मी माझ्या आईची विनवणी केली. तिनें एक वेबस्टरचे 'ब्ल्यूब्लॅक स्पेलिंग बुक' नांवाचें पुस्तक- ज्यांत धुळाक्षरें 'Aa, Ba, Ca, Da,' (आ, बा, का, डा, असे अर्थरहित शब्द होते असे - मिळवून आणून दिलें. तिनें तें कसें व कोठून मिळविलें, हैं कांहीं मला माहीत नाहीं. माझ्या हातांत पडलेलें हेंच काय तें पहिलें पुस्तक, आणि तें मी झपाट्यानें वाचून टाकण्यास सुरुवात केली. वाचावयास शिकावयाचें असल्यास प्रथम धुळाक्षरें शिकलीं पाहिजेत, असें मी कोणाच्याशा तोंडून ऐकिलें होतें. ह्मणून मला सुचतील त्या मार्गांनीं मी प्रयत्न केले. या प्रयत्नाला मला शिक्षकाची मदत नव्हती. कारण, मला शिकविणारा असा कोणीच आढळेना. त्यावेळीं आजूबाजूच्या आमच्या ज्ञातीच्या लोकांपैकी कोणालाहि वाचावयाला येत नव्हतें, आणि मी गोऱ्या लोकांच्याजवळ जाण्यासहि घाबरत असे. कोणत्याहि मार्गानें कां होईना, थोड्या आठवड्यांत बहुतेक धुळाक्षरें मी शिकलो. वाचावयाला शिकण्यासाठी मी जे कांहीं प्रयत्न केले, ते माझ्या आईला आवडल्यानें तिनें मला या कामी शक्य तितकी मदत केली. जरी तिला कांहीं लिहितांवाचतां येत नव्हतें, तरी आपल्या मुलांनी मोठें व्हावें अशी तिला महत्त्वाकांक्षा होती. तिच्या अंगीं चोख व्यवहारज्ञानाचा बराचसा सांठा असल्यामुळे, पाहिजे त्या प्रसंगाला तिला टक्कर देतां आली. जर मी माझ्या आयुष्यांत कांही—-

शैशव.

—चांगलें केलें असेल, तर त्याचे सर्व श्रेय माझ्या आईलाच आहे, अशी माझी पक्की खातरी आहे.

शिक्षणाविषयीं माझे प्रयत्न चालू असतांना ओव्हिओ संस्थानांत वाचावयाला शिकलेला एक काळा मुलगा माल्डनला आला.

जेव्हां आमच्या लोकांनां या मुलाला वाचतां येतें असें कळून आले, तेव्हां त्यांनीं एक वर्तमानपत्र मिळविलें, आणि प्रत्येक दिवशीं सायंकाळीं काम संपल्यावर त्या वर्तमानपत्रांतील हकीगतवृत्त ऐकण्यासाठीं त्या मुलाभोंवतीं बायकांचा आणि पुरुषांचा घोळका जमूं लागला. या मुलासारखा मी केव्हां होईन, असें मला कितीतरी वाटूं लागलें ! आपण जें कांहीं मिळविलें आहे त्यांतच संतोष मानावा अशी जर या जगांत कोणाची स्थिति असेल, तर ती या मुलाचीच होय, असें मला वाटलें.

याच सुमारास काळ्या मुलांकरितां एकादी शाळा उघडावी, याबद्दल आमच्या ज्ञातींतील लोकांत वाटाघाट चालली. व्हर्जीनियाच्या या भागांत नीग्रो मुलांसाठीं उघडली जाणारी ही पहिलीच शाळा असल्यामुळे सर्व लोकांत या महत्त्वाच्या बाबीबद्दल मोठीच चळवळ उडाली. तेव्हां शिक्षक कोठून पैदा करावा, हा मोठा बिकट प्रश्न होता. वर्तमानपत्रे वाचणाऱ्या ओव्हिओच्या या तरुण मुलाला शिक्षक नेमण्याविषयीं विचार करण्यांत आला; पण त्याचें वय फार लहान असल्यामुळे तो बेत रहित करावा लागला. शिक्षकाविषयीं वाटाघाट चालली असतां शिपाइगिरींत ज्यानें बरेच दिवस काढलेले होते, असा ओव्हिओचा एक दुसरा तरुण काळा गृहस्थ अकस्मात् आमच्या गांवीं आला. त्याचें शिक्षण बरेंच झालेलें होतें, असे कळून आल्यामुळे काळ्या लोकांनीं आपल्या पहिल्या शाळेत त्याला शिक्षक नेमिलें. अद्यापि या भागांत काळ्या लोकांकरितां मोफत शिक्षणाच्या शाळा उघडल्या नसल्यामुळे प्रत्येक कुटुंबानें दरमहिना कांहीं रक्कम देण्याचें, आणि त्याचप्रमाणें शिक्षकाला भोजनाचा एकेक वार देण्याचें, कबूल केलें. ही व्यवस्था शिक्षकाला फार सोईची होती. कारण

प्रत्येक कुटुंब आपल्या घरी शिक्षक यावयाच्या दिवशीं भोजनाची फार चोख व्यवस्था ठेवीत असे. आमच्या लहान खोपींत शिक्षकाच्या वाराची वाट मी मोठ्या आतुरतेने पहात असें, असें मला आठवतें.

कोणत्याहि ज्ञातीच्या उन्नतीविषयी विचार करून पाहिलें असतां एकादी सर्व जात शिकण्याकरितां शाळेत जाऊं लागणें हा मोठा मनन करण्याजोगा प्रश्न आहे, असें दिसतें. "माझ्या ज्ञातिबांधवांनी शिक्षणाविषयीं जी उत्कट इच्छा दाखविली, तिची यथार्थ कल्पना प्रत्यक्ष पाहिलेल्या लोकांखेरीज दुसऱ्या कोणालाहि करितां येणार नाहीं. मी वर सांगितल्याप्रमाणें सबंध ज्ञात शाळेत जाऊन शिकू लागली. कांहीं अगदी लहान मुलांखेरीज बाकी कोणालाहि आपण आतां वृद्ध झालों, शिकण्याचा यत्नकरू नये, असें वाटत नव्हते. कसलेहि शिक्षक मिळू लागतांच दिवसाच्या शाळा तर सोडाच, पण रात्रीच्या शाळाहि भरून जाऊ लागल्या. वृद्ध लोकांनां मरण्यापूर्वी आपण बायबल वाचावयाला शिकावें, अशी मोठी महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. साठसत्तर वर्षाचे पुरुष व बायका रात्रीच्या शाळेत शिकण्यास येऊ लागल्या. दास्यविमोचनानंतर रविवारच्या शाळा स्थापन करण्यांत आल्या, आणि या शाळांत शिकविले जाणारे मुख्य पुस्तक झटले ह्मणजे 'स्पेलिंग बुक' होय. दिवसाच्या शाळा, रात्रीच्या आणि रविवारच्या शाळा या नेहमी गच्च भरलेल्या असत, आणि जागेच्या अभावामुळे पुष्कळांनां परत जावे लागे !

कनाव्हा व्हॅलीमध्ये शाळा उघडली गेली, तरी माझी अत्यंत निराशा झाली. मी कांहीं महिने मिठाच्या भट्टींत काम करीत असे. माझ्या सावत्र बापाला माझ्यापासून कांही कमाई होते असे आढळून आलें, आणि शाळा उघडल्यावर मी काम सोडून शाळेत जाऊं नये, असा त्यानें बेत ठरविला. यानें माझ्या प्रत्येक आशेवर विरजण पडले. माझ्या कामाच्या जागेवरून सकाळी व दुपारी शाळेत येणारी जाणारी मुले माझ्या दृष्टीला—-

---

* एकाद्या ज्ञातीतील एकूणएक मनुष्य शिकण्याकरितां शाळेला जाऊं लागावा, ही एक मननीय गोष्ट आहे खास-भा.क.

—-नेहमीं पडत असल्यामुळे माझी निराशा दुणावली. इतकी निराशा झाली, तरी कसेंहि करून मी कांहींतरी शिकण्याचा निश्चय केलाच. स्पेलिंग बुकांतील धडे मी पूर्वीपेक्षां अधिक काळजीनें आणि कळकळीनें तयार करूं लागलों.

माझ्या या निराशेबद्दल माझ्या आईलाहि वाईट वाटलें, आणि तिनें होईल तितकें करून माझें सांत्वन करण्याची आणि माझ्या शिक्षणाविषयी तजवीज करण्याची खटपट चालविली. कांहीं काळानंतर दिवसाचें माझें काम संपल्यावर शिक्षकानें रात्रीं मला कांहीं धडे द्यावे, अशी मी व्यवस्था करून घेतली. रात्रीचे हे धडे इतके चांगले होऊ लागले, कीं, दिवसा - कांहीं मुले शिकत त्यापेक्षां रात्रीं मी अधिक शिकलों, असें मला वाटूं लागलें. माझ्या स्वतःच्या अनुभवानें रात्रीच्या शाळेच्या उपयुक्ततेविषयीं माझ्या मनांत विश्वास उत्पन्न झाला, आणि पुढें हाम्पटन आणि टस्केजी येथे रात्रीच्या शाळांशीं मी बराच संबंध ठेविला. पण त्यावेळीं दिवसाच्या शाळेतच जावें असें माझ्या पोरबुद्धीला वाटे, आणि प्रसंगोपात हे साधण्यासाठीं कोणतीहि संधि मीं वायां जाऊं दिली नाहीं. सरतेशेवटी मला यश मिळालें, आणि कांहीं महिने दिवसा शाळेला जाण्याची मला परवानगी मिळाली. मीं सकाळी लवकर उठून भट्टींत नऊ वाजेपर्यंत काम करावें, आणि दुपारी शाळा सुटल्यानंतर पुनः दोन तास काम करण्यासाठी लवकर परत यावें, असें ठरलें होतें.

- भट्टीपासून शाळा कांहीं अंतरावर होती. शाळा नऊ वाजतां सुरू असे, आणि ज्याअर्थी मला भट्टींत नऊ वाजेपर्यंत काम करावें लागे, त्याअर्थी मी शाळेत पोहोचण्यापूर्वीच वर्ग सुरू होऊन माझ्या वर्गातील बहुतेक मुळांचे धडे पाठ म्हणून संपत असत. ही अडचण दूर करण्यासाठीं मी एका मोहाला बळी पडलों, आणि त्याबद्दल मला पुष्कळ लोक दोष देतील असें वाटते; पण घडलेला खरा प्रकार सांगितल्याशिवाय मला राहवत नाही. खऱ्या गोष्टींच्या सामर्थ्यावर आणि वजनावर माझी श्रद्धा आहे. गोष्ट लपविण्यानें कायमचा फायदा होतो असें क्वचित् च घडतें. भट्टीच्या—---

–लहान ऑफिसांत एक घड्याळ होते. या घड्याळाप्रमाणे, शेकडों किंबहुना त्याहून अधिक कामकरी लोक आपले प्रत्येक दिवसाचे काम सुरू करीत आणि संपवीत. घड्याळांतील ८।। चा कांटा ९ च्या आंकड्यावर लाविला ह्मणजे मला शाळेत वेळेवर जातां येईल, अशी कल्पना माझ्या डोक्यांत आली. मी ही कल्पना रोज सकाळी अमलांत आणू लागलो. कांहीं दिवसांनी भट्टीच्या म्यानेजराला घड्याळाला कोणीतरी हात लावितो, असें दिसून आल्यावरून त्यानें एक पेटी करून त्यांत घड्याळ ठेवून कुलूप लावून टाकिलें. दुसऱ्या कोणाची गैरसोय करावी असें माझ्या मनांत नसून, फक्त मी शाळेत वेळेवर जावें, असेंच होतें.

प्रथम मी जेव्हां शाळेला जाऊं लागलों, तेव्हां दोन अडचणी माझ्या पुढे उभ्या राहिल्या. पहिली ही, की, बाकीची सर्व मुलें साधी किंवा उभी टोपी घालून शाळेत येतात असे मी पाहिलें, आणि माझ्यापाशी तर कसलीच टोपी नव्हती! खरोखर पाहतां शाळेला जाईतोपर्यंत मी पूर्वी कधी डोकीला कांही घातले होते, अथवा दुसऱ्यानें डोकीला कांही घालण्याची जरूरी आहे, असे मला वाटलेलें आठवत नाही पण बाकीची सर्व मुळे कसा पोषाक करतात हे पाहून मला आता चैन पडेनासे झाले. नेहमीप्रमाणे ही अडचण मी माझ्या आईला कळविली, आणि त्यावेळी तरुण व वृद्ध अशा माझ्या ज्ञातिबांधवांनी वापरण्यास सुरू केलेली 'छापां'तील टोपी विकत घेण्यास आपल्याजवळ पैसा नाही, तथापि ही अडचण दूर करण्यास कांहींतरी तोड काढूं, असे तिने मला समजावून सांगितलें. पुढे तिनें आपल्या ह्मणण्याप्रमाणे घरीच तयार केलेल्या खरबरीत कापडाचे दोन तुकडे जोडून एक टोपी तयार केली, आणि ही माझी पहिली टोपी मला मिळाल्यावर तीबद्दल मला मोठा अभिमान वाटला !

या टोपीच्या बाबतीत माझ्या आईने मला जो धडा शिकविला, तो मी कधीं विसरलों नाहीं; आणि माझ्या हातून होतां होईल तेवढा मी तो दुसऱ्याला शिकविण्याचा प्रयत्न केला आहे. जेव्हांजेव्हां मला

या प्रसंगाची आठवण होते, तेव्हांतेव्हां, आपण जे नाहीं ते आहे असे दर्शविणाऱ्या छापांतील टोपी विकत घेण्याचे सामर्थ्य अंगी नसतां ते आहे असे माझ्या सोबत्यांनां आणि इतरांनां दाखविण्याऱ्या मोहाला बळी न पडण्याइतका मनाचा करारीपणा माझ्या आईच्या अंगीं होता, याबद्दल मला खरोखर अभिमान वाटतो! जी वस्तु विकत घेण्यास आपल्याजवळ पैसा नाहीं, त्याबद्दल कर्ज काढण्याचे माझ्या आईनें नाकारिलें, याबद्दल मला नेहमी अभिमान वाटत असे. या वेळेनंतर मी पुष्कळ साध्या आणि उभ्या टोप्या विकत घेतल्या; पण कपड्याचे दोन तुकडे शिवून माझ्या आईनें तयार केलेल्या टोपीचा मला जितका अभिमान वाटतो, तितका मला दुसऱ्या कोणत्याहि टोपीचा वाटत नाहीं! माझ्या सोबत्यांपैकी ज्यांनीज्यांनी छापांतील नवी टोपी घालून आपला आयुष्यक्रम सुरू केला, आणि मी घरी केलेली टोपी घातल्याबद्दल - ज्यांनीज्यांनी माझी थट्टा केली, त्यांपैकी बऱ्याचजणांनां कैदखान्यांत रहावे लागले, व दुसऱ्या कांहींजणांनां कोणतीहि टोपी घेण्याचे सामर्थ्य - आतां राहिलेलें नाहीं, हे मला मोठ्या कष्टाने सांगावे लागतें.

- माझी दुसरी अडचण ह्मणजे माझ्या नांवांसंबंधी किंवा नुसत्या नामासंबंधाने होय. मला समजू लागल्यापासून मला बुकर असे ह्मणतात. पण आणखी एका नांवाची मला जरूरी आहे असे शाळेला जाई-तोपर्यंत माझ्या ध्यानीमनींहि आले नव्हते. शाळेची हजिरी घेतांना जेव्हां मी ती ऐकिली, तेव्हां सर्व मुलांनां निदान दोन तरी नांवे आणि कांही जणांनां तीन नांवें आहेत, असे मला आढळून आले. मला तर एकच नांव आहे, आणि शिक्षक मला दोन नांवे विचारील तेव्हां मी काय करावें, या विचाराने मी घोटाळ्यांत पडलो. माझे नांव दाखल करण्याची संधि येण्याच्या सुमाराला मला एक कल्पना सुचली, आणि मी ही वेळ मारून नेईन, अशी मला खात्री वाटली. पुढे जेव्हां शिक्षकानें तुझे नांव काय असे विचारिलें, तेव्हां मी शांतपणे उत्तर दिले 'बुकर बाशिंग्टन.' जणूकाय याच नांवाने मला नेहमी हांक मारली जात असे! आणि याच नांवाने पुढे मला—--

—लोक ओळखू लागले. पुढे मला असे कळले, की, माझा जन्म झाल्यावर 'बुकर टॅलीफेरो' हैं नांव माझ्या आईने मला ठेविले होते; पण पुढे हे दुसरें नांव कसें नाहींसें झालें, आणि इतका वेळ कां विसरले गेले, हें माहीत नाहीं. परंतु मला कळल्याबरोबर मी तें पुनः सुरू केले, आणि माझें सबंध नांव 'बुकर टैलीफेरो वाशिंग्टन' असे ठेविले, न माझ्यासारखें नांव ठेवून घेण्याचे भाग्य आमच्या देशांत फारच थोड्यांच्या वांट्याला आलेलें असावें, असें मला वाटतें.

शेंकडों वर्षे नांवाजलेल्या आणि प्रसिद्धीला आलेल्या अशा एका मोठ्या संपन्न आणि उच्च कुलांत जन्मलेला आणि वाढलेला मुलगा किंवा मनुष्य मी असतों, तर काय बहार झाली असती, असें पुष्कळदां माझ्या मनांत आले आहे; पण अशी स्थिति खरोखरच प्राप्त झाली असती तर माझ्या कर्तृत्वशक्तीवरच अवलंबून राहण्याऐवजी माझें उच्च कुळ व माझा वर्ण यांवरच अवलंबून राहण्याच्या मोहाला मी बळी पडलों असतों. कांही वर्षांपूर्वी मी असा निश्चय केला, कीं, ज्याअर्थी मला कांहीं उत्तम कुलपरंपरा नाहीं, त्याअर्थी मी अशीं कांहीं सत्कृयें करीन, की, त्याबदल माझ्या मुलांनां अभिमान वाटावा, आणि माझ्याहिपेक्षां अधिक प्रयत्न करण्यात त्यांनां उत्तेजन यावें.

लोकांनीं नीग्रो लोकांविषयी, विशेषतः नीग्रो तरुणांविषयीं आपले मत घाईने आणि निष्ठुरतेनें प्रतिकूल होऊ देऊ नये. नीग्रो मुलाला ज्या कांहीं अडचणींशीं, नाउमेदीशी आणि मोहांशी झुंजावें लागतें, त्यांची कल्पना इतरांनां नाहीं. जेव्हां एकादा गोरा तरुण एकादें काम हाती घेतों, तेव्हां त्यांत त्याला यश येणारच, असें गृहीत धरिलें जातें. उलटपक्षी नीग्रो मुलाला अपयश आलें नाहीं, तर लोकांनां वारंवार आश्चर्य वाटतें. थोडक्यांत सांगावयाचे झटलें ह्मणजे, प्रारंभी कोणतेंहि अनुमान नीग्रो मुलाच्या विरुद्ध असतें.

वंशपरंपरेवर फारशी भिस्त ठेविली नाहीं, तरी एकाद्या व्यक्तीची किंवा ज्ञातीची उन्नति होण्यास कुलीनतेची फार मदत होते. नीम्रो तरुणाच्या

शैशव.

नैतिक दोषांकडे दृष्टि ठेवून, जे लोक त्यांच्या आणि गोऱ्या तरुणांच्या उन्नतीची तुलना करितात, ते मनांत चिकटून राहणाऱ्या आपल्या घराण्याच्या आठवणीचा प्रभाव लक्ष्यांत घेत नाहींत. मीं वर सांगितल्याप्रमाणें माझी आजी कोण होती, याची मला कल्पना नाहीं. मला चुलते, मामे, चुलत्या, आत्या, चुलतभाऊ, चुलतबहिणी होत्या; पण त्यांपैकी बहुतेक आतां कोठे आहेत, हें मला ठाऊक नाहीं. आमच्या देशांतील सर्व भागांतील लाखों काळ्या लोकांची स्थिति माझ्या उदाहरणावरून स्पष्ट होईल. आयुष्यांत जर आपणाला अपयश आले, तर कुलकीर्तीला बट्टा लागेल असें गोरा तरुण समजून असतो, आणि ही एकच गोष्ट पुष्कळ मोहांचे निवारण करण्यास त्याला मदत करिते. आपल्या कुलाचा इतिहास अभिमानास्पद आहे, आणि अशा उत्तम कुलाशीं आपला संबंध आहे, ही गोष्ट एकाद्या व्यक्तीला, यश मिळविण्याच्या प्रयत्नांत, मार्गातील अडथळे दूर सारण्यास उत्तेजन देते.

दिवसा थोडाच वेळ शाळेत जाण्यास मला परवानगी होती, आणि माझी हजिरीहि वेळेवर लागत नसे. थोड्याच दिवसांनीं माझें दिवसा शाळेला जाण्याचे बंद झालें, आणि सर्व वेळ पुनः कामांत घालवावा लागला. मी पुनः रात्रीच्या शाळेत जाऊं लागलों. खरें पाहूं गेलें असतां माझें लहानपणींचें बहुतेक शिक्षण दिवसा काम आटोपल्यावर रात्रीच्या शाळेतच झालें. चांगला शिक्षक मिळण्याची मला वारंवार मारामार पडे. केव्हांकेव्हां असेंहि होई, कीं, रात्रौ शिकविणारा एकादा शिक्षक मिळे, पण त्याचे ज्ञान माझ्याइतकेंच तुटपुंजें आहे असें मला आढळून येऊन माझी फार निराशा होई. पुष्कळदां रात्रीचे धडे ह्मणून दाखविण्याकरितां मला रात्रौ पुष्कळ मैल चालून जावें लागत असे. माझे दिवस कितीहि उदास, नाउमेदीचे आणि निराशेचे गेले, तरी माझ्या तरुणपणामध्ये माझा एक निश्चय सदोदित कायम होता, आणि तो हा, कीं, कांहींहि होवो, शिक्षण हें मिळवावयाचेंच !

वेस्टव्हर्जीनियामध्ये गेल्यावर माझ्या आईनें आह्मी गरीब असतांहि एक पोरका मुलगा आमच्या कुटुंबांत राहण्यास घेतला. त्याला पुढें आह्मी जेम्स. बी. वाशिंग्टन असे नांव दिलें. आमच्या कुटुंबांत घेतल्या दिवसापासून तो आमच्या कुटुंबापैकीच एक होऊन राहिला.

कांहीं दिवस मिठाच्या भट्टींत काम केल्यावर, मिठाच्या भट्टीला जळण पुरवावें ह्मणून मुख्यतः चालविलेल्या कोळशाच्या खाणींत मला काम मिळवून देण्यांत आलें. कोळशाच्या खाणींत काम करण्यास मी नेहमीं फार भीत असे. याचें एक कारण ह्यटलें, ह्मणजे कोळशाच्या खाणींत काम करतांना अंग फार घाणेरडें होई, आणि दिवसाचे काम संपल्यावर अंग धुऊन स्वच्छ करणें फार कठिण जाई. दुसरें, खाणीच्या तोंडापासून कोळशाच्या भागापर्यंत जाणारा रस्ता एक मैलभर असून तो काळ्याकुट्ट अंधारांतून होता. कोळशाच्या खाणींत निबिड अंधार असतो तसा इतरत्र कोठेंहि आढळेल असें मला वाटत नाहीं. खाणीच्या बऱ्याच शाखा असत, आणि या सर्व शाखांचीं ठिकाणें मला केव्हांहि बरोबर न समजल्यामुळे मी पुष्कळदां खाणींत वाट चुकत असें. वाट चुकलों ह्मणजे उरांत धस्स होई, आणि तशांतहि माझा दिवा केव्हांकेव्हां जाई, आणि त्यावेळीं जर माझ्याजवळ आगपेटी किंवा काडी नसली, तर मला अंधारांत, दुसरा कोणीतरी अकस्मात् भेटून दिवा लावीपर्यंत बरेंच फिरावें लागे. हें काम कठिण असून धोक्याचेंहि होतें. सुरुंगाच्या दारूच्या भडक्यानें तुकडे तुकडे होऊन जाण्याचे, किंवा कोसळणाऱ्या दगडांखालीं चिरडून जाण्याचें भय नेहमीं असे. या दोन्ही कारणांपासून वारंवार अपघात घडत असत, आणि याची मला नेहमीं धडकी बसलेली होती. त्यावेळीं हल्लींप्रमाणें पुष्कळ कोंवळ्या मुलांनां त्यांच्या आयुष्याचीं बरींच वर्षे खाणींत काम करावयाला लावीत असत; पण त्यांच्या शिक्षणाची कांहीं सोय केली जात नसे. आणि ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे, कीं, जीं मुलें लहानपणीं खाणींत काम करितात, ती पुढें शरीरानें आणि मनानें खुजीं होतात, असें मला—-

पुष्कळदां आढळून आले आहे. कोळशाच्या खाणींत काम करण्याशिवाय दुसरी कोणतीहि हांव किंवा हौस त्यांनां रहात नाहीं.

त्यावेळीं व पुढे मोठा झाल्यावर, कर्तृत्वशक्तीला आणि उमेदीला मर्यादा नसलेल्या अशा गोऱ्या तरुणांच्या महत्त्वाकांक्षा आणि मनोवृत्ति यांचे चित्र कल्पनाशक्तीनें रेखाटण्याचा मी प्रयत्न करीत असें. एका विशिष्ट कुलांत आणि ज्ञातींत जन्माला आल्यामुळे कांग्रेसचा सभासद, गव्हर्नर, बिशप किंवा प्रेसिडेंट (अध्यक्ष) होण्याला ज्याच्या मार्गात कांहीं * अडथळे नाहींत, असा गोरा तरुण मुलगा मी झालों असतों, तर किती बरें झालें असतें ! असा विचार माझ्या मनांत येई. त्या परिस्थितींत मी कसा वागलों असतों, अगदीं खालीं सुरू करून वरवर चढत शेवटच्या पायरीपर्यंत मी कसा पोहोंचलों असतों, याचें काल्पनिक चित्र मी माझ्या मनःपटावर रेखाटीत असें.

मी जसजसा मोठा होऊं लागलों, तसतसें गोऱ्या तरुणासारखें व्हावें, - असें मला पूर्वीप्रमाणें वाटू लागेनासें झालें, हें मी उघडपणे सांगतों. कारण, - यशाचें मोल ठरविण्याचें तें, आपण आयुष्यामध्ये कोणतें पद प्राप्त करून घेतलें आहे यानें नव्हे, तर यश मिळविण्याच्या मार्गात आपण किती अडचणींशी झुंजून त्यांनां पादाक्रांत केलें आहे, यानें ठरविलें पाहिजे. या दृष्टीने पहातां नीग्रो मुलाचा जन्म आणि त्याचा लोकांनां अप्रिय अशा आपल्या ज्ञातीशीं संबंध, हा संसारयात्रेत बहुतांशीं फायदाच आहे, असें मी बहुतेक ठरवितों. कांहीं अपवाद खेरीजकरून, पसंती किंवा मान्यता मिळविण्यासाठीं गोऱ्या तरुणापेक्षां नीग्रो तरुणाला अधिक प्रयत्न केले पाहिजेत, यांत संशय नाहीं; पण अशा या कठिण व न मळलेल्या मार्गानें चालणें अथवा झुंजणे भाग पडल्यामुळे, त्याच्या अंगी एकप्रकारचें सामर्थ्य, आत्मविश्वास आणि योग्यता हीं येतात.. जन्म (कुल) आणि जाति यांमुळें ज्याचा मार्ग सापेक्षतेनें सरळ आहे, त्याला हा फायदा मिळत नाहीं.

कोणत्याहि दृष्टीनें पाहतां दुसऱ्या कोणत्याहि उच्च जातीचा इसम होण्याऐवजीं आहें त्याच जातीचा मीं एक असावें, हेंच मला आतां इष्ट वाटतें. आपल्या योग्यतेकडे न पहातां आपण एका विशिष्ट ज्ञातीचे आहों, ह्मणून हक्क, मान आणि अधिकार आपणाला मिळावे, अशी कांही ज्ञातींच्या लोकांनीं मागणी केलेली ऐकून मला दुःख झालेले आहे. अशा लोकांची मला फार कींव येते. कारण, आपल्या अंगीं योग्यता असल्याशिवाय नुसता उच्च ज्ञातींशी संबंध असल्यानें कोणाहि व्यक्तीची फारशी उन्नति होणार नाहीं; आणि ज्याच्या अंगांत खरी योग्यता-श्रेष्ठता आहे, तो, त्याच्या निकृष्ट ज्ञातीच्या संबंधामुळे शेवटीं मागें केव्हांहि राहणार नाहीं, हें तत्त्व मी जाणून आहे. योग्यता किंवा श्रेष्ठता - मग ती कोणत्याहि रंगाच्या कातडीच्या मनुष्यांत आढळो-शेवटीं ओळखिली जाणार आणि विजयी होणार, हें तत्त्व-हा कायदा सार्वत्रिक आणि सनातन आहे ! गांजलेल्या आणि छळल्या जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आणि ज्ञातीनें या तत्त्वावर विश्वास ठेवून आपले समाधान करून घ्यावें, आणि आपली योग्यता वाढविण्यास लागावें. माझ्या व्यक्तीकडे लक्ष्य लागावें ह्मणून नव्हे, तर ज्या जातीची व्यक्ति होण्यास मला अभिमान वाटतो, त्या जातीकडे लक्ष्य वेधावें, ह्मणून मीं हें सांगितलें आहे.

प्रकरण तिसरें.

शिक्षणासाठी धडपड

एके दिवशीं कोळशाच्या खाणीत काम करीत असतांना, नीग्रो जातीच्या-काळ्या लोकांकरितां व्हर्जीनियांत कोठेंशी एक मोठी शाळा उघडली जाणार आहे, अशाविषयीं खाणींतील दोघां बेलदारांनां बोलतांना मीं आडून ऐकिलें. आमच्या गांवांतील लहानशा शाळेपेक्षां चांगली आणि मोठी शाळा किंवा कॉलेज याविषयीं मीं हेंच प्रथमतः ऐकिलें.

खाणीच्या अंधारांत ते दोघे बोलत असतां त्याठिकाणीं मी गुपचुप सरपटत गेलो. आमच्या ज्ञातीच्या लोकांकरितां शाळा स्थापन झालेली आहे, एवढेच नव्हे, तर गरीब पण हुषार विद्यार्थ्यांनां काम करून आपला भोजनखर्च भागवितां येतो, आणि कांहीं उद्योगधंदाहि शिकतां येतो, असेंहि एक बेलदार दुसऱ्याला सांगत असतांना मी ऐकिलें.

जेव्हां ते पुढे शाळेचे वर्णन करूं लागले, तेव्हां मला असे वाटलें, की, जगांत जर कांहीं सर्वात मोठी किंवा महत्त्वाची जागा असेल, तर ती हीच होय ! आणि 'हाम्पटन, नार्मल आणि ॲग्रिकल्चरल इन्स्टिटयूट' (जिच्याविषयी हे दोघे बोलत होते) या नांवाच्या संस्थेपुढें स्वर्गसुखहि तुच्छ होय ! ही संस्था कोठें आहे, किती मैल दूर आहे, मी तेथे कसा जाऊन पोहोचणार, याची जरी मला तेव्हां कांहीं कल्पना नव्हती, तरी मी त्या शाळेला जाण्याचा झटदिशीं निश्चय केला. एकच महत्त्वाकांक्षा माझ्या अंतःकरणांत पेटत होती, आणि ती ह्मणजे हाम्पटनला जाणें ही होय. तेथे जाण्याचा विचार माझ्या मनांत अहोरात्र घोळू लागला.

हाम्पटनच्या संस्थेविषयीं ऐकल्यानंतर कांहीं महिने मी खाणीत काम करीत राहिलों. तेथे काम करीत असतांना मिठाची भट्टी आणि कोळशाची खाण यांचे मालक जनरल लेविस रफनर यांच्या घरीं एक जागा रिकामी झाली आहे, असें मी ऐकिलें. जनरल रफनरची पत्नी उत्तर अमेरिकेतील व्हरमांट येथील असून तिचे नांत्र व्हायोला रफनर असें—-

—_होतें. आपल्या नोकरांशीं आणि विशेषतः आपल्या हाताखालच्या छोकऱ्यांशी व्हायोलाबाई फार कडक रीतीनें वागते, अशी तिची आसपास ख्याति होती. नोकरांपैकीं फारच थोडे तिच्यापाशीं दोनतीन महिने टिकले होते. सर्वांनीं एकाच सबबीवर ती फार कडक आहे, या एकाच सबबीवर तिची नोकरी सोडिली. कोळशाच्या खाणींत राहून काम करण्यापेक्षां रफनरबाईच्या घरीं काम करून पहावें, असा मीं निश्चय केला; आणि माझ्या आईनें ती रिकामी जागा मला मिळावी, ह्मणून तिच्यापाशीं मागणी केली, व दरमहिना पांच डालर * पगारावर मला कामावर नेमिलें.

रफनरबाईच्या कडकपणाविषयीं मीं इतकें कांहीं ऐकिलें होतें, की, तिला भेटण्याला मी फार भीत असें; आणि जेव्हां मी तिच्या समोर गेलों, तेव्हां तर मला कांपरें सुटलें. तथापि तिच्या हाताखालीं मीं थोडे आठवडे काढल्यावर तिचें सर्व कांहीं मला समजूं लागलें. तिच्या घरांतील प्रत्येक वस्तु स्वच्छ ठेविली पाहिजे, तसेंच सर्व कामें चोख आणि व्यवस्थितपणें ताबडतोब केलीं पाहिजेत, आणि सर्व व्यवहारांत प्रामाणिक आणि स्पष्ट असलें पाहिजे, इत्यादि गोष्टी रफनरबाईला हव्या होत्या, असें मला पहिल्याप्रथम कळून आलें. कोणतेंहि काम निष्काळजीपणानें किंवा हलगर्जीपणानें करूं नये; प्रत्येक दरवाजा, प्रत्येक वई इत्यादि सर्व कांहीं बरोबर राखावें, अशी त्या बाईची इच्छा होती, आणि ती रास्तच होती.

हाम्पटनला जावयाच्या पूर्वी रफनरबाईपाशीं मी किती काळ राहिलों, हें मला आतां आठवत नाहीं; तरी वर्ष दीड वर्ष मी तेथे राहिलों असेन, असें मला वाटतें. रफनरबाईच्या घरीं जे धडे मी शिकलों, त्यांची योग्यता मला जें कांहीं पुढे दुसरीकडे शिक्षण मिळाले, त्या शिक्षणाच्या योग्यतेइतकीच आहे, असें मी पूर्वी अनेकदां बोलून दाखविलें आहे, आणि तेंच मी पुनः एकवार येथे नमूद करितों. आतांसुद्धां घराभोंवतीं—-

---

* एक डालर-तीन रुपये दोन आणे.

शिक्षणासाठीं धडपड.

—-किंवा रस्त्यावर कागदाचे तुकडे पसरलेले मी पाहिले, की, मी ते लगेच उचरतों; अंगण घाणेरडें दिसले की, तें लगेच स्वच्छ करितों; वईच्या काठ्या निसटून पडलेल्या पाहिल्या, कीं, त्या पुनः बसवितो; घराचा रंग किंवा 'व्हाइट वाश' गेलेला पाहिला, कीं, तो लागलीच देतों: एकाद्याच्या कपड्याची बटनें गेलेली असलीं, किंवा कोणाच्या जमीनीवर अगर कपड्यावर तेलकट डाग पडलेले असले, कीं, मी लागलीच त्याच्या नजरेला या गोष्टी आणितो .

प्रथम रफनरबाईला मी भीत असे; पण लवकरच माझ्या एकाद्या उत्तम मित्राप्रमाणें मी तिला मानूं लागलों. मी विश्वासार्ह आहे, असें जेव्हां तिला आढळून आलें, तेव्हां तीहि माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवूं लागली. तिच्यापाशीं एकदोन हिंवाळयांत मी राहिलों असतांना, हिंवाळयांतील कांहीं दिवशी, दिवसा एक तासभर शाळेला जावयाची तिनें मला सोय करून दिली; पण माझा बहुतेक अभ्यास रात्रींच झाला. मी स्वतः प्रयत्न करीत असें, आणि केव्हांकेव्हां पैसे देऊन शिक्षकाच्या हाताखालीं अभ्यास करीत असें. शिक्षण मिळविण्याच्या माझ्या प्रयत्नाला रफनरबाईची पूर्ण सहानुभूति होती, आणि ती या कामीं नेहमीं मला उत्तेजन देत असे. तिच्यापाशीं रहात असतांनाच माझी पहिली लायब्ररी जुळविण्याचें मी सुरू केलें. मीं एक लांकडी खोका मिळविला, त्याची एक बाजू कापून काढून त्यांत फळ्या बसविल्या, आणि माझ्या हाताला जें कांहीं पुस्तक मिळेल तें यांत ठेवूं लागलों, व मी याला माझी लायब्ररी असें ह्मणूं लागलों. याप्रमाणें रफनरबाईच्या घरीं माझें चांगलें चाललें होतें. तरी हाम्पट्नला जाण्याची कल्पना मीं कांहीं सोडून दिली नाहीं. हाम्पटन कोणत्या ची दिशेला आहे व तेथे जावयाला काय खर्च येईल, याची मला नक्की कल्पना नव्हती. तरी १८७२ च्या पावसाळ्यांत मी तेथे जाण्याचा प्रयत्न केला. हाम्पटनला जावयाच्या महात्त्वाकांक्षेविषयीं माझ्या आईशिवाय कोणींहि सहानुभूति दर्शविली नाहीं. तथापि भलतीच हांव धरून मी निघालों आहे, असे माझ्या आईला वाटून तिचें मन थोडेसें अस्वस्थ झालें.

कसेंहि करून निघण्याची परवानगी मी तिच्यापासून, तिच्या नाखुषीनें कां होईना, मिळविलीच. मीं जो कांहीं थोडासा पैसा मिळविला होता, त्यापैकीं कांहीं थोडे डालर खेरीजकरून बाकी सर्व पैसा माझ्या सावत्र बापानें आणि बाकीच्या कुटुंबानें खर्च करून टाकिला; यामुळे कपडे विकत घेण्याला व वाटखर्ची भागविण्याला माझ्याजवळ फार थोडे पैसे शिल्लक राहिले. माझा बंधु जॉन यानें आपल्या हातून शक्य तितकी मला मदत केली; पण ही मदत फारशी मोठी नव्हती. कारण, त्याला खाणीत फारसा पगार मिळत नसे, व जें कांहीं त्याला मिळे त्यांपैकी बराचसा भाग घरखर्चाकडे खर्च होत असे.

माझ्या हाम्पटनला जाण्याबाबतींत वृद्ध नीग्रोंनीं जी आस्था दाखविली, ती अपूर्व आणि अत्यंत उत्साहजनक अशी होती. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील उत्तम दिवस गुलामगिरीत काढलेले होते; आणि आपल्या जातीपैकी एकादा विद्यार्थी वसतिगृहांत शिकण्याकरितां रहावयाला जाण्याचा सुयोग पहावयाला मिळेल, असें त्यांनां क्वचितच वाटत होतें. या वृद्धांपैकी कांहींनीं मला निकल (अडीच आणे), कित्येकांनीं पाव डालर आणि कैकांनीं हातरुमाल दिले.

सरतेशेवटीं तो महत्त्वाचा दिवस उगवला, आणि मी हाम्पटनला निधालों. मिळाले तेवढे कपडे मी एका लहान पिशवीत घालून ती पिशवी बरोबर घेतली. यावेळीं माझ्या आईची प्रकृति एकाएकी बिघडून ती बरीच अशक्त झाली होती. तिला मी पुनः भेटेन असें कांहीं चिन्ह मला दिसेना, आणि यामुळे हा वियोग फारच दुःसह झाला; पण तिनें हा प्रसंग मोठ्या धैर्यानें सोसला. त्यावेळीं वेस्टव्हर्जीनियापासून ईस्टव्हर्जीनियाला जाणाऱ्या थेट गाड्या नव्हत्या. कांहीं मेल आगगाड्या जात असत, आणि बाकीचा प्रवास टप्प्याच्या गाड्यांनी करावा लागे.

माल्डनपासून हाम्पटन सुमारें ५०० मैल आहे. घर सोडून मीं कांहीं तास प्रवास केला नाहीं तोंच मला असें कळून आलें, की, हाम्पटनला——---

—-जावयाला पुरेंसें भाडें मजजवळ नाहीं. वाटेंतील एका प्रसंगाची आठवण तर मी केव्हांहि विसरणार नाहीं. एकेदिवशीं दोनप्रहरी एका जुन्या तऱ्हेच्या टण्याच्या गाडींतून मी डोंगरावरून प्रवास करीत होतों. संध्याकाळ झाल्यावर ती गाडी एका साधारण प्रतीच्या खाणावळीपाशी थांबली. त्या गाडींतील माझ्याशिवाय बाकीचे उतारू गोरे होते. टण्याच्या गाडीनें प्रवास करणाऱ्या उतारूंसाठीं ही लहानशी खाणावळ आहे, असा माझा चुकीचा समज झाला. एकाद्याच्या कातडीच्या रंगानें काय भेद होतो, याचा मीं विचार केला नव्हता. बाकीच्या उतारूंची खोल्यांत व्यवस्था झाल्यावर आणि त्यांच्या भोजनाची तयारी झाल्यावर मी संकोचानें हळूच तेथील व्यवस्थापकाकडे गेलो. जेवणाकरितां किंवा निजण्याकरितां देण्यासाठीं य माझ्याजवळ एक पैसाहि नव्हता, हें खरें; परंतु कसेंहि करून मालकाची कृपा संपादन करावी, अशी मी आशा केली होती. कारण, या ऋतूंत व्हर्जीनियाच्या डोंगरावर हवा फार थंड असे, आणि रात्रीं निजण्यास कोठेतरी घरांत आसरा मिळणें फार अवश्य होतें. मजजवळ पैसे आहेत किंवा नाहींत याची कांहींएक विचारपूस न करतां व्यवस्थापकानें मला अन्न आणि आसरा देण्याचें साफ नाकारिलें ! माझ्या कातडीच्या रंगाचा अर्थ काय आहे, हे जाणण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होय ! इकडून तिकडे फिरून मी माझ्या अंगांत उष्णता आणिली, आणि ती रात्र कशीबशी काढिली. हाम्पटनला जाऊन पोहोचण्यासाठीं मी पूर्णपणे इतका व्यग्र झालो होतों, कीं, त्या खाणावळवाल्याविषयीं वितुष्ट बाळगण्याला मला वेळच मिळाला नाहीं.

कांहीं मार्ग चालून आणि मेहरबानीनें गाडीत जागा मिळवून बऱ्याच दिवसांनी मी व्हर्जीनियांतील रिचमंड शहरास आलो. तेथून हाम्पटन ८२ मैल उरलें. मी या शहराला थकूनभागून क्षुधेने व्याकूळ होऊन मलिन अशा अवस्थेंत मध्यरात्रीच्या सुमाराला येऊन पोहोचलों. मी आजपर्यंत कोणतेंहि मोठें शहर पाहिले नसल्यामुळे माझी अधिकच दुर्दशा झाली. मी रिचमंडला पोहोंचलों, तेव्हां मजजवळ एक छदामहि नव्हता;----

—मला तेथे राहावयाला कोणाची ओळख नव्हती; आणि शहरांतील रस्ते माहीत नसल्यामुळे कोठें जावें हें समजेना. मला रहावयाला मिळावें, अशा हेतूनें मीं बऱ्याच ठिकाणीं विनवणी केली; पण सर्वजण पैसा मागू लागले, आणि पैसातर मजजवळ बिलकूल नव्हता ! आतां पुढें काय करावें हें न समजल्यामुळे, मी रस्त्यांत हिंडूं लागलों. हिंडतांना बरीच दुकानें माझ्या दृष्टीला पडली. तेथे खावयाचे अनेक प्रकारचे पदार्थ, मन मोहून जाईल अशा त-हेनें ठेवलेले होते. त्यांपैकीं माझी क्षुधा निवारण्यापुरता थोडासा कोणताहि पदार्थ मला मिळाला असता, तर पुढें जें कांहीं मला मिळालें असतें, तें. सर्व मीं देऊं केलें असतें ! परंतु त्यावेळीं मला कांहीं खावयाला मिळालें नाहीं.

याप्रमाणें मध्यरात्रीनंतरहि बराच वेळ मी हिंडलों असेन. सरतेशेवटीं मी इतका दमलों, कीं, मला पुढे चालतां येईना. मी थकलों भागलों, क्षुधित झालों, सर्व कांहीं झालें, पण मी निराश मात्र झालों नाहीं! यावेळीं मी एका पायवाटेंतील उंचवट्यापाशीं आलों व तेथें कांही मिनिटें थांबलों. कोणीहि मला पाहत नाहीं अशी खात्री करून घेऊन मी उंचवट्याखालीं शिरलों, आणि त्या रात्रीं तेथे जमिनीवर माझी कपड्यांची पिशवी उशाला घेऊन निजलों. रात्रभर वरून (उंचवट्यावरून) जाणाऱ्या लोकांच्या पावलांची चाहूल मला ऐकू येत होती. दुसरे दिवशी सकाळीं मला थोडासा तकवा आल्यासारखें वाटलें; पण पुष्कळ दिवसांत पोटभर अन्न न मिळाल्यामुळे मला फार भूक लागली होती. चांगलेंसें दिसू लागल्यावर मीं आजूबाजूला पाहिलें, तो मला जवळच एक मोठें जहाज दिसलें, आणि त्या जहाजावरून त्यावेळी लोखंड खालीं उतरविण्याचें काम चाललें होतें. मी एकदम त्या जहाजा-कडे गेलों आणि खाण्यासाठीं कांहीं पैसे मिळवावे या हेतूनें जहाजांनतील लोखंड खालीं उतरविण्याची परवानगी देण्याविषयीं कप्तानाची विनवणी केली. त्या गोऱ्या दयाळू कप्तानानें माझी विनंति मान्य केली. न्याहारीचे पैसे मिळविण्यासाठी मला बराच वेळ काम करावें लागले,-------

आणि आतां मला असें आठवतें, की, दुसरें कोणतेंहि जेवण त्या वेळच्या जेवणासारखें मला उत्तम लागलें नाहीं !

माझे काम पाहून कप्तानसाहेब इतके खूष झाले, कीं, मर्जीला वाटल्यास रोज कांहीं थोडी मजुरी घेऊन काम करीत रहा, असें त्यांनीं मला सांगितलें. काम मिळाल्यामुळे मलाहि आनंद झाला. मी तेथेच काम करीत कांहीं दिवस राहिलों. मजुरीच्या पैशानें माझें अन्न मी रोज विकत घेत असल्यामुळे हाम्पटनच्या वाटखर्चीला पुरेसा पैसा मजजवळ जमला नाहीं. हाम्पटन येथे लवकर जातां यावें ह्मणून मी होतां होईल तों प्रत्येक बाबतींत काटकसर करूं लागलों; आणि रिचमंड शहरांत पहिल्या रात्रीं मला आसरा दिलेल्या पायरस्त्याच्या उंचवठ्याखालीं मी रोज निजूं लागलों. पुढे पुष्कळ वर्षांनीं रिचमंड येथील काळ्या लोकांनी मोठ्या ममतेनें माझें स्वागत केलें. या स्वागताच्या समारंभाला दोन हजारांवर लोक जमले असावेत, आणि हें स्वागतस्थान मी पहिल्या रात्रीं निजलेल्या ठिकाणाहून जवळच होतें. येथे मला हें कबूल केलें पाहिजे, कीं, जरी माझें स्वागत लोकांनीं अंतःकरणपूर्वक आणि मोठ्या प्रेमानें केलें, तरी माझें मन तिकडे नसून मला प्रथम आसरा दिलेल्या पायवाटेकडे तें विशेष होतें.

हाम्पटनला जाण्याला पुरेशी वाटखर्ची मजजवळ जमली आहे असें वाटतांच, त्या जहाजाच्या कप्तानाचे त्याच्या दयाळूपणाबद्दल मी आभार मानिले, आणि पुनः हाम्पटनची वाट धरिली. वाटेंत विशेष कांहीं न घडतां मी हाम्पटनला पोहोंचलों. यावेळीं मजजवळ नुसते ५० सेंट्स् (२५ आणे) शिल्लक होते, आणि या रकमेनेंच मीं माझें शिक्षण सुरू केलें. माझ्या हाम्पटनच्या प्रवासांत लक्ष्यांत ठेवण्यासारख्या बऱ्याच गोष्टी घडून आल्या; पण जेव्हां मला विटांनीं बांधलेल्या तीन मजली शाळेच्या इमारतीचें प्रथम दर्शन झालें, तेव्हां येथे येण्यासाठीं मी जे कांहीं श्रम घेतले आणि हाल सोसले, त्या सर्वांचें सार्थक झालें, असे मला वाटलें. माझ्या आणि माझ्यासारख्या हजारों तरुणांच्या मनावर —-

—या शाळेच्या दर्शनानें जो कांहीं परिणाम झाला, त्याची योग्य कल्पना या शाळेची इमारत बांधण्याकरितां पैसे देणाऱ्या सद्गगृहस्थांनां करितां आली, तर अशा देणग्या देण्यास त्यांनां अधिक उत्तेजन येईल, असें मला वाटतें.

मीं माझ्या जन्मांत पाहिलेली, सर्वांत मोठी आणि सुंदर इमारत हीच असावी, असें मला वाटलें. या इमारतीच्या दर्शनानें माझ्या अंगांत नवीन चैतन्य भरलें. येथून माझें नवीन जीवित सुरू झालें. आतां जीविताचा अर्थ नवीनच आहे, असें मला वाटूं लागलें. मी स्वर्गाला येऊन पोहोंचलों असें मला झालें, आणि या जगांत माझ्या हातून होईल तितकें लोककल्याण करण्याची पात्रता अंगीं आणण्यास बिलकूल कसूर करावयाची नाहीं, असा मी निश्चय केला.

हाम्पटनच्या संस्थेत जाऊन पोहोंचल्यावर, मला कोणत्या तरी वर्गात दाखल करून घ्यावें, ह्मणून मी लागलीच मुख्य अध्यापिकेकडे गेलों.योग्य अन्न, स्नान आणि कपड्यांची बदल (दुसरे कपडे) यांचा योग मला बऱ्याच दिवसांत न घडल्यामुळे, प्रथमदर्शनीं मी तिच्या मनांत भरलों नाहीं, आणि मला विद्यार्थ्यांत दाखल करून घ्यावें किंवा नाहीं, अशी तिच्या मनांत शंका आलेली मला स्पष्ट दिसली. मी एक भटकणारा उनाड पोर आहे, असा तिचा ग्रह झाल्यास तिची कांहीं चूक नाहीं, असें मला वाटलें. कांहींवेळ तिनें मला दाखल करून घेईन किंवा घेत ना नाहीं, तें कांहींच सांगितलें नाहीं. मी तिच्या मागोमाग रेंगाळत राहून माझी लायकी तिच्या नजरेसमोर आणण्याची शक्य तितक्या सर्व तऱ्हांनी " खटपट करूं लागलों. मध्येच दुसऱ्या विद्यार्थ्यांनां दाखल करून घेतांना जेव्हां मी तिला पाहिलें, तेव्हां तर मला अतिशय दुःख झालें. कारण, माझ्या अंगांत काय पाणी आहे हैं दाखविण्याची जर मला संधि मिळेल, तर मी त्यांच्या इतकाच चांगला होईन, अशी माझ्या अंतःकरणांत मला खात्री वाटत होती.

कांहीं तास गेल्यावर मुख्य अध्यापिका मला ह्मणाली " जवळची खोली झाडून स्वच्छ केली पाहिजे, केरसुणी घे आणि ती लोटून टाक."

शिक्षणासाठी धडपड.

आतां माझी संधि आली, असे एकदम मला स्पष्ट दिसलें. इतकी मोठ्या आनंदाची दुसरी कोणतीहि आज्ञा मला मिळालेली नाहीं ! मला उत्तम लोटतां येतें अशी मला खात्री होती; कारण, रफनरबाईच्या घरी राहत असतांना तिनें हें काम मला उत्तम शिकविलें होतें.

मी ती रेसिटेशनरूम-धडे पाठ ह्मणून दाखविण्याची खोली-तीनदां लोटली. नंतर धूळ झाडावयाचे फडकें घेऊन मी ती चारदां स्वच्छ केली. प्रत्येक बांक, मेज, भिंतींच्या बाजूंचे लांकडी सामान (खांब वगैरे) - इत्यादि सर्वांवरून मी चारदां (फडकें घेऊन) माझा हात फिरविला. याशिवाय प्रत्येक सामान दुसरीकडे उचलून ठेवून त्याखालची जागा स्वच्छ केली, आणि प्रत्येक कोनाकोपराहि लोटून स्वच्छ केला. खोली स्वच्छ करण्याच्या माझ्या कामानें मुख्य अध्यापिकेचें काय मत होईल, यावर माझें भविष्य अवलंबून आहे, हें मी जाणून होतों. खोली पूर्णपणे स्वच्छ केल्यावर मी जाऊन तिला कळविलें. ती उत्तर अमेरिकेतील बाई असून धूळ किंवा कचरा कोठें शिल्लक राहतो, हें तिला माहीत होतें. ती खोलींत आली आणि तिनें जमीन, कोनाडे तपासिले. नंतर तिनें आपला हातरुमाल काढून तो भिंतीचे खांब, मेज, बांकें इत्यादि लांकडी - सामानावर घांसला. जमिनीवर किंवा कोणत्याहि लांकडी सामानावर - धुळीचा एकहि कण जेव्हां तिला सांपडेना, तेव्हां ती शांतपणें म्हणाली - " या शाळेत दाखल होण्यास तूं योग्य आहेस, असें मला वाटतें. "


झालें ! या जगांत मोठ्या भाग्यवान् लोकांपैकीं मी एक झालों !
मी धन्य झालों ! ती खोली लोटून स्वच्छ करणें, ही माझी कॉलेजची - प्रवेशपरीक्षा होय. आणि हारवर्ड किंवा येल विश्वविद्यालयांची प्रवेशपरीक्षा पास होणाऱ्या कोणाहि तरुणाला माझ्या इतका खरा आनंद झाला नसेल ! यानंतर मी पुष्कळ परीक्षा पास झालों, पण मी पास झालेल्या सर्व परीक्षांत हीच परीक्षा उत्तम होय, असें मला नेहमीं वाटतें.

आत्मोद्धार.

हाम्पटन येथील संस्थेत प्रवेश होतांना मला जो अनुभव आला, तो मीं येथे सांगितला आहे. माझ्यासारखा अनुभव कदाचित् फारच थोड्यांनां आला असेल; पण त्यावेळी मला ज्या कांहीं अडचणी सोसाव्या लागल्या, त्यांपैकी किंवा त्यांसारख्या दुसऱ्या कांहीं अडचणी, हाम्पटनच्या आणि दुसऱ्या संस्थेत दाखल होणाऱ्या शेंकडोंजणांनां त्याच सुमाराला सोसाव्या लागल्या असाव्यात. कांहींहि होवो, शिक्षण मिळवावयाचें, असा आमच्या ज्ञातीच्या पुष्कळ तरुण मुलांमुलींनीं निश्चय केला होता.

हाम्पटनच्या संस्थेच्या शिक्षणक्रमांतून पार पडण्याचा मार्ग, ती खोली लोटून पूर्णपणें स्वच्छ करण्याच्या माझ्या कामानें मोकळा केला असावा, असें मला वाटतें. मुख्य अध्यापिका मिस मेरी एफ. म्याकी हिनें मला द्वार-(खोली)-रक्षकाची (Janitor) जागा दिली, आणि मीं ती मोठ्या आनंदानें लागलीच पतकरिली. कारण, या जागेवर काम करून मला माझ्या जेवणाचा बहुतेक खर्च भागवितां येण्याजोगा होता. हें काम फार श्रमाचे आणि त्रासदायक होतें, तरी मीं तें सोडलें नाहीं. मला पुष्कळ खोल्यांवर देखरेख करावी लागे, आणि रात्रौ पुष्कळ तास हें काम करून, विस्तव पेटविण्यासाठीं आणि माझे धडे तयार करण्यासाठीं पुनः सकाळीं चार वाजतां उठावें लागे. हाम्पटन येथील माझ्या सर्व कारकीर्दीत आणि मी पुढे दुसरीकडे गेल्यावरहि, मुख्य अध्यापिका मिस मेरी एफ. म्याकी मला हातभार लावणारी, उत्तम अशी माझी मैत्रिण झाली. तिचा सल्ला आणि तिचें प्रोत्साहन हीं नेहमीं मला मदत करीत असून माझ्या अंगीं सामर्थ्य आणीत असत.

हाम्पटन संस्थेच्या इमारतीनें आणि देखाव्यानें माझ्यावर जो परिणाम झाला, तो मी सांगितलाच आहे; पण सर्वांत मोठा महत्त्वाचा आणि कायमचा परिणाम ज्यानें माझ्यावर केला, त्याविषयीं-त्या पुरुषाविषयी मीं कांहींच सांगितलें नाहीं. ज्याची मुलाखत ह्मणजे मी मोठा मान समजतों, असा हा पुरुष अतिशय उदार महात्मा होता. तो परलोकवासी जनरल एस्. सी. आर्मस्ट्रांग होय.



जनरल एस्. सी. आर्मस्ट्रांग.

शिक्षणासाठी धडपड.

यूरोप आणि अमेरिका येथील मोठ्या सच्छील गृहस्थांची सुदैवानें माझ्याशी मुलाखत झाली आहे; पण जनरल आर्मस्ट्रांगच्या बरोबरीचा गृहस्थ मला एकहि अद्याप भेटला नाही, हे मी सांगण्याला मागेपुढे पहात नाही. गुलामांचा मळा आणि कोळशांच्या खाणी यांच्या अवनतिकारक वातावरणांतून नुकत्याच बाहेर पडलेल्या मला जनरल आर्मस्ट्रांगसारख्या सत्पुरुषाचा समागम लाभणे, ह्मणजे हा एक मोठा मान किंवा अधिकारच होय, असे मी मानतो. प्रथम मी जेव्हां त्यांच्यापाशी गेलों, तेव्हां ते परिपूर्ण आहेत असा माझा ग्रह झाला. त्यांच्यांत कांहीं दैवी अंश आहे, असे त्यांनी मला भासवून दिले. हाम्पटन येथे माझा प्रवेश झाल्यापासून तों आर्मस्ट्रांगच्या मृत्यूपर्यंत मला त्यांचा सहवास होण्याचा सुयोग प्राप्त झाला, आणि जसजसा त्यांच्याशी माझा परिचय अधिक होत चालला, तसतसा त्यांच्याविषयी माझा आदरहि वाहूं लागला. हाम्पटन येथील सर्व इमारती, वर्ग, शिक्षक आणि उद्योगधंदे ही सर्व पाहिजे तर नाहींशी करावीत, आणि तेथील स्त्रीपुरुषांनां विद्यार्थ्यांनां जनरल आर्मस्ट्रांगच्या सहवासांत नित्य राहूं देण्याची संधि यावी, ह्मणजे या गोष्टीनेंच-सत्समागमानेंच त्यांनां उदात्त शिक्षण दिल्याप्रमाणे होईल ! मी जसजसा वृद्ध होत जातों, तसतशी माझी अधिकाधिक अशी खात्री पटत जाते, की, पुस्तकें आणि मौल्यवान उपकरणें यांच्यापासून मिळणाऱ्या शिक्षणाची किंमत सत्पुरुषांच्या समागमापासून मिळणाऱ्या शिक्षणापुढें कांहींच नाहीं ! पुस्तकांचाच नेहमी अभ्यास करण्याऐवजी आमच्या शाळांत आणि कॉलेजांत मनुष्यांचा आणि वस्तूंचा अभ्यास करण्यास शिकवितील, तर कितीतरी बरे होईल, असे मला वाटतें.

टस्केजी येथील माझ्या घरांत आपल्या आयुष्यांतील शेवटच्या सहा महिन्यांपैकी दोन महिने जनरल आर्मस्ट्रांग यांनी काढिले. त्यावेळी त्यांनां पक्षाघाताचा विकार होऊन आपल्या शरीरावरील आणि आवाजावरील त्यांचा बहुतेक ताबा नाहीसा झाला होता. इतकी पीडा झाली होती,---

—तरी सर्व आयुष्यभर आपण वाहून घेतलेल्या कार्याकरितां ते अहोरात्र प्रयत्न करीत असत. स्वतःविषयीं इतका विसर ज्याला पडलेला आहे, असा दुसरा मनुष्य मीं पाहिला नाहीं! स्वार्थी विचार त्यांच्या मनांत कधीं आला असेल, असें मला वाटत नाहीं. हाम्पटन संस्थेबद्दल काम करीत असतांना, किंवा दक्षिणेंतील दुसऱ्या कोणत्याहि संस्थेला मदत करण्याची खटपट करीत असतांना, त्यांनां सारखाच आनंद होई. सिव्हिलवॉरमध्यें जरी ते दक्षिणेंतील गोऱ्या लोकांशी लढले, तरी पुढें त्यांनीं त्यांच्याविरुद्ध एकहि वाईट शब्द काढतांना मीं ऐकिलें नाहीं. उलट, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्या उपयोगी कोणत्या मार्गानें पडावें, याचा ते नेहमीं विचार करीत.

हाम्पटन येथील विद्यार्थ्यांवर त्यांनीं बसविलेली छाप, किंवा त्यांच्यावर असलेली विद्यार्थ्यांची श्रद्धा, यांविषयीं वर्णन करणें फार कठिण होईल. खरोखर त्यांचे विद्यार्थी त्यांनां ईश्वराप्रमाणें मान देत होते. हातीं घेतलेल्या कामांत जनरल आर्मस्ट्रांगनां अपयश येईल, असें मला केव्हांच वाटलें नाहीं. त्यांनीं कधीं कोणाला एकादी विनंति केली, आणि ती अमान्य झाली, असें केव्हांच झालें नाहीं. जेव्हां ते अलाबामा येथे माझ्या घरीं पाहुणे होते, तेव्हां पक्षघाताचा विकार झाला असल्यामुळे त्यांनां आजाऱ्याच्या खुर्चीत बसवून ती खुर्ची लोटावी लागे. मला आतां असें आठवतें, कीं, एकदां जनरलच्या एका जुन्या विद्यार्थ्याला त्यांची खुर्ची एका लांब व उंच अशा टेंकडीवर अतिशय त्रासानें व कष्टानें लोटण्याचा प्रसंग आला. टेंकडीचें शिखर गांठल्यावर तो जुना विद्यार्थी प्रसन्न मुद्रेनें हमणाला "जनरलच्या मृत्यूपूर्वी खरोखर अवघड असें काम त्यांच्यासाठीं करण्याची संधि मला मिळाली, हें. पाहून मला अतिशय आनंद झाला आहे !"

मी हाम्पटन येथे विद्यार्थी असतांना वसतिगृहें इतकी गच्च भरलीं, कीं, नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांनां जागा मिळणे अशक्य झालें. ही अडचण दूर करण्याकरितां कांहीं नवीन तंबू मारून त्यांचा खोल्यांसारखा उपयोग करावा, असें जनरलनीं ठरविलें. जुन्या विद्यार्थी-

शिक्षणासाठी धडपड.

पैकी कांहीं जर हिंवाळ्यांत तंबूत राहण्यास जातील, तर जनरल आर्मस्ट्रांगनां बरें वाटेल, असे जेव्हां समजलें, तेव्हां शाळेतील बहुतेक सर्व विद्यार्थ्यांनीं तंबूत जाण्याचे आपण होऊन कबूल केलें !

त्यांपैकीच मी एक होतो. त्या तंबूत आह्मी जो हिंवाळा काढला, तो अत्यंत कडक होता, आणि आह्मांला त्यापासून अतिशय त्रास झाला. किती त्रास झाला, याची कल्पना जनरल आर्मस्ट्रांग यांनां नाहीं. कारण, आह्मीं केव्हांहि तक्रार केली नाहीं. जनरल आर्मस्ट्रांगनां आह्मी खूष ठेवीत आहों आणि अधिक विद्याथ्यानां शिक्षण मिळवू देण्याची सोय करीत आहों, या दोन गोष्टींपेक्षां अधिक आनंददायक असें आह्मांला काय आहे ? पुष्कळदां थंडीच्या रात्रीं सोसाट्याचा वारा वाहत असतां आमचा तंबू सबंध उडून जाई, आणि आह्मांला उघड्या हवेंत रात्रभर कुडकुडत बसावें लागे. जनरल पहांटेला तंबूकडे येत आणि त्यांचे आनंददायक, उत्तेजक व कळकळीचे शब्द ऐकतांच आमची उदासीनता पार निघून जाई.

मी जनरल आर्मस्ट्रांगविषयीं माझी भक्ति व्यक्त केली आहे, आणि मला हेंहि सांगितलें पाहिजे, की, माझ्या ज्ञातीची उन्नति करण्याकरितां प्रभु खिस्ताप्रमाणें ज्या उदार अशा शेंकडों स्त्रीपुरुषांचा समुदाय नीग्रो शाळांत शिकविण्याकरितां गेला, त्यांच्यापैकींच हे एक नमुनेदार गृहस्थ होते.

नीग्रो शाळांत शिकविण्याकरितां जाणाऱ्या स्त्रीपुरुषांहून अधिक उच्च, अधिक उदात्त आणि अधिक स्वार्थत्यागी स्त्रीपुरुष जगाच्या इतिहासांत मिळणार नाहींत !

हाम्पटन येथे राहत असतां मला पुष्कळ नवीन गोष्टी शिकावयाला मिळाल्या. मी दुसऱ्या एका नवीनच जगांत आहे, असे मला वाटे. नियमित वेळीं भोजन करणें, जेवतांना मेजावर कपडा घालणें, तोंडपुसणीं वापरणे, स्नानासाठीं पीप आणि दांत घासण्यासाठीं कुंचला-ब्रश-वापरणें, बिछान्यावर चादरी घालणें, इत्यादि सर्व गोष्टी मला नवीनच होत्या.

- हाम्पटनसंस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचा मी जो कांहीं घडा शिकलों, तो' स्नानाचा उपयोग आणि त्याचें महत्त्व' हा होय. स्नान शरीर—--

—-निरोगी ठेवितें, इतकेंच नव्हे, तर स्वतःविषयीं अभिमान आणि सहुण वाढविते, इत्यादि स्नानाची उपयुक्तता मी येथे शिकलों. हाम्पटन सोडल्यानंतर दक्षिणेंत आणि इतर ठिकाणीं मी प्रवास करीत असतां रोज स्नान करण्याचा मीं यत्न केलाआहे. कधींकधीं आमच्या ज्ञातीच्या लोकांच्या एकच खोली असलेल्या घरीं मी पाहुणा असतांना मला स्नान करणें कठिण जाई, अशावेळीं जंगलांत जाऊन केव्हांकेव्हां मी झऱ्यांत स्नान करी-प्रत्येक घरांत स्नानाकरितां अवश्य सोय असावी, असें मीं माझ्या लोकांनां वारंवार शिकविण्याचा प्रयत्न केला आहे.

हाम्पटन येथे मी विद्यार्थी असतांना कांहींकाल माझ्यापाशीं पाय-मोजांची एकच जोडी होती. ही जोडी वापरून घाण झाली ह्मणजे मी ती रात्रीं धुऊन, दुसरे दिवशीं वापरितां यावी ह्मणून विस्तवावर सुकवीत असें.

हाम्पटन येथे माझ्या भोजनाचा खर्च दरमहा १० डालर असे. यापैकी कांहीं भाग मी रोख द्यावा, आणि बाकीचा भाग काम करून फेडावा, असें ठरलेलें होतें. ही रोख रक्कम द्यावी, तर मी प्रथम संस्थेत आलों तेव्हां मीं मागें सांगितल्याप्रमाणें माझ्याजवळ अवघे ५० सेंट्स (अर्धा डालर) होते. माझा बंधु जॉन यानें मला एकदां कांहीं थोडे डालर पाठविले होते, तरी माझा भोजनखर्च रोख देण्यास मजजवळ पैसा नव्हता. यासाठीं खोलीरक्षकाचें काम इतकें चांगलें करून दाखवावें ह्मणून मीं निश्चय केला, कीं, त्यांनां माझ्या कामाची जरूरी लागावी. मी माझें काम इतकें चोख करूं लागलों, कीं, माझ्या कामगिरीबद्दल माझा सर्व भोजनखर्च माफ होईल, असें मला लवकरच कळविण्यांत आलें. शिक्षणाचा खर्च एका वर्षाला ७० डालर असे, आणि इतकी रक्कम देणे माझ्या शक्तीबाहेर होतें. माझ्या भोजनखर्चाच्या व्यव स्थेशिवाय आणखी शिक्षणाची फी ७० डालर देण्याचें मला भाग पडले असतें, तर हाम्पटनची संस्थाच मला सोडावी लागली असती. हाम्पटन-मध्ये मी असेंतोंपर्यंत माझ्या शिक्षणाचा सर्व खर्च जनरल आर्मस्ट्रांग–

शिक्षणासाठीं धडपड.

– यांनी माझ्यावर मोठी मेहेरबानी करून, मासाच्युसेटस प्रांतांतील बेडफर्ड येथील सद्गृहस्थ मिस्टर एच्. ग्रीफीट्स् मार्गन यांच्याकडून देवविला. हाम्पटन येथील माझें शिक्षण पुरें झाल्यावर आणि माझ्या आयुष्यांतील मुख्य काम मीं हाती घेतल्यावर मी पुष्कळदां मिस्टर मार्गन यांनां भेटलों आहे.

हाम्पटन येथे आल्यावर थोड्याच दिवसांनी मला पुस्तकांची आणि कपड्यांची अडचण भासू लागली. तेव्हां माझ्यापेक्षां अधिक भाग्यवान् अशा लोकांकडून मी पुस्तकें उसनीं मागून आणून एक अडचण भागविली. कपडे बहुतेक माझ्यापाशीं नव्हते. जे कांहीं होते, ते माझ्या उहान पिशवीत होते. तरुण मंडळीनां रांगेने उभे करून जनरल आर्मस्ट्रांग त्यांची तपासणी करीत, हे पाहून कपड्यांविषयीची माझी काळजी वाढली. जोडे घांसूनपुसून स्वच्छ ठेवावे लागत, अंगरख्याचे बटन तुटलेले असतां कामा नयेत, आणि कपड्यांवर तेलकट डाग पडतां कामा नयेत. काम करीत असतांना आणि शाळेत, नेहमीं तेच कपडे वापरणें आणि ते पुनः स्वच्छ ठेवण हा प्रश्न कसा सोडवावा, हे मला कळेना. कसेंबसें करून मीं कांहीं दिवस काढिले. शिक्षणाच्या कामांत यश मिळविण्याची माझी आस्था, कळकळ आणि खटपट पाहून कांहीं दयाळू शिक्षकांनी उत्तरेकडून पीपें भरून आलेल्या कपड्यांपैकी कांहीं जुने कपडे मला दिले. गरीब, लायक अशा शेंकडों विद्यार्थ्यांचे या पिपांनी फार कल्याण केलें. या पिपांतील जुन्या कपड्यांच्या मदतीवांचून हाम्पटनमधून मी पार पडलों असतो किंवा नाही, याची मला शंका आहे !

हाम्पटनला जाण्याच्या पूर्वी दोन चादरी असलेल्या बिछान्यावर मी केव्हां निजलों होतों, असे मला आठवत नाहीं. त्यावेळी तेथे इमारती पुष्कळ नव्हत्या, व जागा फार थोडी होती. माझ्याबरोबर दुसरी सात मुले एकाच खोलीत होती. यांपैकी बरेच विद्यार्थी तेथे कांही दिवस राहिले होते. प्रथम मला चादरींचे कोडें कांहींच समजेना. पहिल्या रात्रीं मी त्या दोन्ही चादरीच्या आंत निजलों, आणि दुसऱ्या रात्री तर त्या—-

—दोन्हींच्यावर निजलों. पुढे दुसऱ्या मुलांचें पाहून चादरीचा उपयोग कसा करावा हें मी शिकलों, व दुसऱ्यांनांहि शिकवू लागलों,

त्यावेळीं हाम्पटन येथे असलेल्या विद्यार्थ्यांमध्यें मी सर्वांत लहान होतों. पुष्कळ विद्यार्थी, पुरुष आणि बायका होत्या. कांहींजण तर चाळीस वर्षांचे होते. माझ्या पहिल्या वर्षाचा देखावा मनांत आणतांच, मोठ्या आस्थेनें शिक्षणाकरितां प्रयत्न करीत असलेल्या ३००|४०० पुरुष आणि बायका यांच्या सहवासाचा सुयोग कोणालाहि वारंवार मिळेल, असें मला वाटत नाहीं. आमचा प्रत्येक तास कामांत आणि अभ्यासांत जाई. सर्वांनां शिक्षणाची किती जरूरी आहे, हें जगांतील व्यवहारानें त्यांनां कळून आलेलें होतें. कांहीं विद्यार्थी तर इतके वृद्ध होते, कीं, त्यांनां आपल्या वर्गातील पुस्तकें पूर्णपणे समजणें फारच कठिण जाई, आणि त्यांचे प्रयत्न पाहून कोणालाहि कींव येई. पुस्तकी ज्ञानाची उणीव त्यांनीं खऱ्या आस्थेनें आणि कळकळीलें भरून काढिली.त्यांपैकी बरेचजण माझ्यासारखेच गरीब असत. पुस्तकांबरोबरच नव्हे, तर दारिद्र्याबरोबरहि त्यांनां झगडावें लागे. अत्यंत जरूरीच्या वस्तुहि त्यांच्यापाशीं नव्हत्या. कांहींजणांनां आपल्या वृद्ध मातापितरांच्या आणि कांहींनां आपल्या बायकांच्या पोटापाण्याची कांहींतरी सोय करावी लागे.

आपल्या घराकडील अथवा गांवांतील लोकांची उन्नति करण्याची पात्रता आपल्या अंगीं कशी येईल, याच एका मोठ्या मुख्य संकल्पानें प्रत्येकाला पछाडलेलें होतें. स्वतःविषयींचा विचार कोणाच्याहि मनांत येत नसे. संस्थेतील कामदार आणि शिक्षक तर किती अत्युत्तम, असामान्य मानवी प्राणी-नव्हे दैवी प्राणी होते ! अहोरात्र, पाहिजे त्या वेळीं विद्यार्थ्यांसाठीं ते एकसारखे खपत असत. कोणत्यातरी रीतीनें कां होईना, विद्यार्थ्यांनां मदत करीत असले, तरच त्यानां सुख वाटे.सिव्हिलवारनंतर उत्तरअमेरिकेतील गोऱ्या शिक्षकांनीं नीग्रो लोकांच्या शिक्षणासंबंधी जी कांहीं कामगिरी केली, ती लिहिली गेली, ह्मणजे—

शिक्षणासाठीं धडपड-

–हा भाग आमच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिण्याजोगा अत्यंत मनोवेधक होईल, यांत संशय नाहीं ! दक्षिणअमेरिकेंतील सर्व लोकांनाहि या कामगिरीची यथार्थ कल्पना होण्यास व तिचें महत्त्व जाणण्यास फारसा कालावधि लागणार नाहीं.

प्रकरण चौथे

इतरांनां मदत.

हाम्पटन येथें माझें पहिलें वर्ष गेल्यावर माझ्यापुढें दुसरी एक अडचण येऊन उभी राहिली. बहुतेक विद्यार्थी आपली सुटी घरीं घालवीत असत. मजजवळ घरीं जाण्यास पैसा नव्हता; परंतु कोठेतरी मला गेलें पाहिजे होतें. त्यावेळीं फारच थोड्या विद्यार्थ्यांनां सुटींत संस्थेत रहावयाला परवानगी देत. दुसरे विद्यार्थी घरीं जाण्याच्या तयारींत आहेत, हें पाहून मलाहि घरीं जाण्याचा ध्यास लागून मी दुःखी झालों. जाण्यासच नव्हे, तर दुसरीकडे कोठेंहिं जाण्यास मजजवळ कांहीं नव्हता.

कसेंतरी करून मीं एक जुना कोट मिळविला, आणि तो बऱ्याच किमतीचा असावा असें मला वाटलें. प्रवासाच्या खर्चाकरितां मीं हा कोट विकण्याचे ठरविलें. मला पोरकट अभिमान पुष्कळ असल्यामुळे जवळ पैसा नसल्यानें मला कोठें जातां येत नाहीं, ही गोष्ट दुसऱ्या विद्यार्थ्यांपासून छपवून ठेवण्याचा मीं शक्य तितका प्रयत्न केला. हाम्पटन गांवामधील कांहीं थोड्या लोकांनां हा कोट मला विकावयाचा असें मीं जाहीर केलें, आणि पुष्कळशी समजूत घातल्यावर एका या मनुष्यानें तो कोट पाहण्याकरितां आणि तो विकत घ्यावा किंवा नाही हें ठरविण्याकरितां माझ्या खोलीकडे येण्याचें कबूल केलें. याच्या योगानें माझ्या खचलेल्या मनाला बराच धीर आला. दुसऱ्या दिवशीं मोठ्या पहांटेला, ठरल्याप्रमाणें तो मनुष्य आला. माझा कोट लक्ष्यपूर्वक पाहून"हा कितीं किंमतीला देणार," असें त्यानें मला विचारलें. “याची किंमत तीन डालर असावीसें वाटतें, "असें मीं सांगितलें. नंतर ही किंमत त्याला मान्य झालीसें दिसलें; आणि मोठ्या हिकमतीनें व हुषारीनें तो म्हणाला "हें पहा--मी असें करतों. मी तो कोट घेतों आणि तुला यायेथेंच पांच सेंट्स (अडीच आणे) रोख देतों, आणि बाकीचे पैसे

मला मिळाल्यावर देईन." त्यावेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल, याची कल्पना करणें कांहीं कठिण नाहीं !

याप्रमाणें निराशा झाल्यावर हाम्पटन गांवाबाहेर सुटीत काम मिळविण्याकरितां जाण्याची मी सर्व आशा सोडून दिली. मला अत्यंत आवश्यक असलेले कपडे आणि कांहीं इतर जरूरीच्या वस्तु विकत घेण्यासाठीं काम करून जेथे पैसे मिळतील तेथे जावें, असें माझ्या मनांत फार होतें. थोड्याच दिवसांत बहुतेक सर्व विद्यार्थी आणि शिक्षक आपापल्या घरी निघून गेले, आणि यायोगानें तर माझें अंतःकरण अधिकच खिन्न झाले.

हाम्पटन गांवांत आणि आसपास बरेच दिवस खटपट केल्यावर फॉरदेस मनरो येथील फराळाच्या दुकानांत मला शेवटीं काम मिळालें. माझी मजुरी भोजनखर्चाला पुरून अगदी थोडीशी उरेल, अशीच होती. रात्री आणि दोन्ही वेळच्या जेवणाच्या मधील वेळांत मला अभ्यास करण्याला आणि वाचनाला फुरसत मिळे, आणि अशा रीतीनें उन्हाळ्याच्या सुटींत मी माझी पुष्कळ सुधारणा केली.

पहिले वर्ष संपतांच शाळा सोडतेवेळीं मीं संस्थेचे सोळा डालर देणें होतो. हे देणें मला काम करून फेडतां आलें नाहीं. उन्हाळ्यांत काम करून पैसा जमवून हें ऋण फेडून टाकावें, अशी माझी इच्छा होती. हें अब्रूचे कर्ज आहे असें मला वाटलें, आणि हें फेडल्याशिवाय मला शाळेत तोंड दाखविण्याची लाज वाटू लागली. शक्य तितकी काटकसर मी केली. माझें धुणें मीं स्वतः धुतलें, आणि जरूरीचे कपडेहि अंगावर घातले नाहींत. इतकें करूनहि उन्हाळ्याची सुटी संपून गेली, आणि माझ्याजवळ सोळा डालर कांहीं जमले नाहींत !

फराळाच्या दुकानांत रहात असतांना शेवटच्या आठवड्यांत टेबला-खाली मला एक दहा डालरची कोरी करकरीत नोट मिळाली. मला फार आनंद झाला. माझी ती जागा नसल्यामुळे ती हुंडी मालकाला

दाखविणें योग्य आहे असें मला वाटलें; आणि मीं तसें केलें. त्यालाहि माझ्याइतकाच आनंद झाला; आणि त्यानें मला शांतपणें सांगितलें, की, "ही जागा आपली असल्यामुळे आपणाला ती हुंडी ठेवून घेण्याचा हक्क आहे." आणि त्यानें ती ठेवून घेतली. यानें मला दुसरा जबरदस्त धक्का बसला, असें मी उघडपणें सांगतों. मी निराश झालों, असें मी कांहीं कबूल करीत नाहीं. कारण, माझें मागील जीवित पाहतां मीं जें कांहीं साधण्याचा निश्चय केला, त्याविषयीं मी कधीं निराश झालों, असें मला आठवत नाहीं. मला यश मिळणारच अशा भावनेनें मीं प्रत्येक गोष्ट सुरू केली आहे. आपणाला यश कां येत नाहीं, याचें कारण सांगण्याला पुष्कळ लोक तयार असतात, हें पाहून माझ्यानें गप्प बसवत नसे. यश कसें मिळवावें, हें सांगणाऱ्या मनुष्याबद्दल मला नेहमीं फार आदर वाटे. आलेल्या प्रसंगाला तोंड देण्याचा मीं निश्चय केला. आठवड्याच्या शेवटीं हाम्पटन संस्थेचे खजिनदार, जनरल जे. एफ्. बी. मारशल यांच्यापाशीं मी गेलों, आणि त्यांनां माझी स्थिति मी स्पष्ट कळविली. " संस्थेत पुनः दाखल होण्याला हरकत नाहीं, आणि मिळेल तेव्हां कर्ज तूं फेड, माझा तुझ्यावर विश्वास आहे," असें त्यांनीं मला सांगितल्यावर मला मोठें समाधान वाटलें. दुसऱ्या वर्षीहि मीं खोलीरक्षकाचें काम चालू ठेविलें.

हाम्पटन येथें नेमलेल्या पुस्तकांतून मला जें कांहीं शिक्षण मिळालें, तें, मी तेथें जें कांहीं शिकलों, त्याचा एक लहानसा भाग होतें. दुसऱ्या वर्षी ज्या कांहीं गोष्टींचा माझ्या मनावर चांगला परिणाम झाला, त्यांपैकी शिक्षकांचा स्वार्थत्याग -निःस्वार्थीपणा ही एक होती. दुसऱ्यां-करितां झटत असतांना कांहीं लोकांनां इतकें सुख कसें होतें, हें समजणें मला तेव्हां फार कठिण होतें. दुसरें वर्ष संपण्यापूर्वी, जे लोक दुसऱ्यां-करितां फार मेहनत घेतात, तेच सर्वांपेक्षां अधिक सुखी असतात, असें मला समजूं लागलें. तेव्हांपासून मी हा धडा ध्यानांत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहें.

इतरांनां मदत.

हाम्पटन येथे उत्तम जनावरें आणि कोंबडींबदकें पैदास करण्याच्या उत्तम तऱ्हा वारंवार पाहून मी दुसरा एक महत्त्वाचा धडा शिकलों आहे. ज्या विद्यार्थ्याला हें पाहण्याची संधि मिळालेली आहे, तो शाळेतून जगांत वावरू लागल्यावर हलक्या प्रतीच्या गुरांढोरांनी केव्हांहि संतुष्ट होणार नाहीं.

दुसऱ्या वर्षी सर्वात मौल्यवान धडा मी शिकलों, तो हा, की, बायबलचा उपयोग आणि त्याचें महत्त्व हीं मला कळू लागलीं. पोर्टलंडच्या मिस नार्थली लार्ड नांवाच्या एका अध्यापिकेनें बायबलचा उपयोग कसा करावा, हे मला शिकविलें. यापूर्वी बायबलची मी कधी फारशी पर्वा केली नव्हती. पण, आतां आपल्या अध्यात्मिक उन्नतीसाठींच नव्हे, तर वाङ्मय या नात्यानेंहि बायबल वाचणें मला आवडूं लागलें. याविषयीं जें कांहीं मला शिकविण्यांत आलें, त्याचा माझ्या मनावर इतका चांगला परिणाम झाला, कीं, आतां देखील घरीं मी कितीहि कामांत गुंतलेला असलों, तरी काम सुरू करण्यापूर्वी सकाळी बायबलांतील एकादा अध्याय, किंवा अध्यायाचा कांहीं भाग वाचण्याचा माझा नियम आहे.

व्याख्याता या नात्याने माझ्या अंगीं जी कांहीं योग्यता असेल, त्याचे बहुतेक श्रेय बऱ्याच अंशीं मिस लॉर्ड हिला आहे. माझा या विषयाकडे कल आहे असे तिला जेव्हां आढळून आलें, तेव्हां तिनें श्वासोच्छास कसा करावा, वाक्यांत कोठें जोर द्यावा आणि स्पष्ट उच्चार बरोबर कसा करावा, इत्यादि विषयांवर मला खासगी पाठ दिले. लोकांसमोर बोलावें ह्मणून नुसतें कांहींतरी बोलतां येणें या गोष्टीकडे माझा यत्किंचितहि ओढा नव्हता. खरोखर लोकांसमोर केवळ निरुपयोगी व्याख्यानें देण्याइतकें असमाधानकारक आणि फोल दुसरें कांहीं आहे, असे मला वाटत नाहीं. परंतु लहानपणापासून, जग आहे त्यापेक्षां कांहींतरी अधिक चांगलें करण्यासाठी माझ्या हातून—

—कांहींतरी व्हावें, आणि त्याविषयीं जगाला कांहींतरी मला सांगतां यावें, अशी माझी उत्कट इच्छा होती.

हाम्पटन येथील वाद्विषयक Debating society सभेपासून मला नेहमीं फार आनंद होत असे. या सभा शनिवारी सायंकाळीं भरत असत; आणि मी हाम्पटन येथे असतांना एकहि सभा चुकविली आहे, असें मला आठवत नाहीं. मी दर आठवड्याला या सभांनां जात असें; इतकेंच नव्हे, तर तशीच दुसरी एक संस्था सुरू करण्याला मी कारणीभूत झालों. संध्याकाळचे जेवण झाल्यावर आणि त्यानंतर अभ्यास सुरू करण्याच्या पूर्वी संस्थेतील मुलांनां वीस मिनिटांची मोकळीक मिळत असे, आणि हा वेळ गप्पागोष्टींत घालविला जात असे, असें मला आढळून आलें. वादविवाद आणि वक्तृत्व यांत कौशल्य मिळविण्यासाठी या वीस मिनिटांचा उपयोग करावा, ह्मणून आमच्यापैकीं वीस जणांनी एक संस्था स्थापन केली. अशा त-हेनें वीस मिनिटांचा उपयोग केल्यापासून आह्मांला जो फायदा झाला, तसा फारच थोड्यांनां झाला असेल.

दुसऱ्या वर्षाच्या अखेरीला माझ्या आईनें आणि माझा बंधु जॉन यानें कांहीं पैसा पाठविल्यामुळे, आणि एका शिक्षकानें थोडीशी मदत केल्यामुळे, मला सुटींत माल्डन येथें घरीं जातां आलें. मी घरीं गेल्यावर मिठाच्या भट्टया बंद होत्या, आणि खाणींतील लोकांनीं संप केल्यामुळे कोळशाची खाण चालू नव्हती, असें मला आढळून आलें. मजुरांच्या-जवळ जेव्हां दोनतीन महिन्यांच्या पगाराएवढी रक्कम शिल्लक राही, तेव्हां असे संप घडून येत, असें मला आढळून आलें. संप चालू असतांना अर्थात् शिल्लक असलेली रक्कम त्यांनां खर्चावी लागे, आणि नंतर कर्जबाजारी होऊन त्याच मजुरीवर त्यांनां कामावर यावें लागे, किंवा बऱ्याच खर्चानें दुसऱ्या लांबच्या खाणीला कामासाठीं जावें लागे. कोणत्याहि स्थितींत मजूरलोकांची दशा संपाच्या शेवटीं अधिक वाईट होत असे, अशी माझी माझ्या निरीक्षणानें खात्री झाली. देशाच्या त्या भागांत संपाच्या पूर्वी खाणींतील मजुरांचा ब्यांकेंत बराच पैसा शिल्लक असे,

—हे मला माहीत होतें; परंतु मजुरांच्या वतीनें चळवळ करणारे लोक येऊन जेव्हां त्यांनी त्यांनां आपल्या ताब्यांत घेतलें, तेव्हां त्यांपैकी फार काटकसर करणाऱ्या लोकांचीहि शिल्लक नाहींशी होऊ लागली !

मी घरी परत आलेला पाहून आणि दोन वर्षांच्या अवधीत माझ्यांत चालेली सुधारणा पाहून, माझ्या आईला आणि कुटुंबांतील दुसऱ्या मंडळीला फारच आनंद झाला. माझ्या परत येण्यानें सर्व काळया लोकांनां, विशेषतः वृद्धांनां जो कांहीं आनंद झाला, तो अपूर्व होता ! प्रत्येक कुटुंबाच्या घरी भेटावयाला आणि जेवावयाला मला जावें लागलें, आणि दरठिकाणीं हाम्पटन येथील माझ्या अनुभवाची कहाणी सांगावी लागली. याशिवाय देवालयांत आणि रविवारच्या शाळेत आणि दुसऱ्या इतर ठिकाणीं मला भाषण करावें लागे. पण मी जें कांहीं शोधीत होतों, तें, ह्मणजे काम, मला मिळालें नाहीं. संपामुळे कोठेंच काम नव्हते. हाम्पटनला परत जाण्याच्या वाटखर्चासाठीं काम शोधण्याच्या प्रयत्नांत माझ्या सुटीचा पहिला महिना बहुतेक मीं घालविला.

कांहीं कामाच्या शोधार्थ पहिल्या महिन्याच्या अखेरीला मी घराहून बऱ्याच दूर असलेल्या अशा एका ठिकाणीं गेलों. मला तेथे यश आले नाहीं, आणि रात्र झाल्यावर मी घरी परत यावयाला निघालों. घर एक-दोन मैल राहिलें असतां, मी इतका दमून गेलों, की, माझ्याने पुढे कांहीं चालवेना. ह्मणून जवळच्याच एका पडक्या घरांत बाकीची रात्र घालविण्यास मी गेलों. पहांटे सुमारें तीन वाजतां माझा बंधु जॉन तेथे आला आणि त्यानें मला हळूच उठवून कळविलें, कीं, आमची प्रिय माता काल रात्री स्वर्गवासी झाली !

हा माझ्या आयुष्यांतील अतिशय दुःखाचा आणि उदासीनतेचा प्रसंग होय! कांहीं वर्षे माझ्या आईची प्रकृति बिघडलेली होती, आणि तिला सोडून इकडे येण्याच्या पूर्वदिवशीं मी जेव्हां निघालों, त्यावेळी ती पुढें जीवंत माझ्या दृष्टीला पडणार नाहीं, असे कांहीं मला वाटलें नव्हतें. याशिवाय तिच्या अंतकाळीं मी तिच्याजवळ हजर असावें, अशी नेहमीं—

—मला उत्कट इच्छा असे. हाम्पटनमध्यें मी जारीनें अभ्यास करीत असें, याचें एक मुख्य कारण हें होतें, कीं, माझी स्थिति लवकर सुधारून, मी माझ्या आईला लवकर सुखी आणि आनंदित करावें, अशी माझी महत्त्वाकांक्षा होती. आपल्या मुलांनां चांगलें शिक्षण मिळावे आणि जगांत त्यांचें चांगलें चालावें, हें पाहण्यास ईश्वरानें आपणाला जीवंत ठेवावें, अशी मनीषा तिनें बरेचदां व्यक्त केली होती !

माझ्या आईच्या मरणानंतर थोड्याच दिवसांनीं आमच्या लहान घरी घोटाळा उडाला. माझ्या आमंदा बहिणीनें शक्य तितकी खटपट केली, पण ती फार लहान असल्यामुळे तिला गृहव्यवस्था नीट ठेवितां येईना; आणि माझ्या सावत्र बापाला गरीबीमुळे घर सांभाळण्याला बाई ठेवितां येईना. कांहींवेळां आह्मांला चांगलें जेवण मिळे, आणि कित्येकदां तें मिळतहि नसे. एक वाटीभर टोमॅटो आणि कांहीं पातळ बिस्किटें, इतकेंच जेवण अनेकदां आमच्या वांट्याला आलेलें मला आठवतें. आमच्या कपड्यांची अव्यवस्था होऊं लागली आणि आमच्या घरांतील हरएक गोष्टीची घडी बिघडली. माझ्या आयुष्यांतील सर्वात उद्वेगजनक प्रसंग हाच असावा, असें मला वाटतें.

मला मदत करणारी परोपकारी रफनरबाई मला नेहमीं घरीं प्रेमानें बोलावीत असे, आणि तिनें या दुर्धर प्रसंगीं मला नानातऱ्हांनीं मदत केली. सुटी संपण्याच्या पूर्वी तिनें मला कांहीं काम दिले, आणि माझ्या घरापासून कांहीं अंतरावर असलेल्या कोळशाच्या खाणींतहि मला काम मिळाल्यानें मजजवळ थोडासा पैसा जमला.

हाम्पटनला परत जाण्याची कल्पना सोडून द्यावी लागेल, असे मला एकदां वाटलें; पण तेथें परत जाण्याविषयीं माझें मन इतके आतुर झालें होतें, कीं, तेथे जाण्याविषयीं आटोकाट प्रयत्न केल्यावांचून रहावयाचेंच नाहीं, असा मी निश्चय केला. हिंवाळ्याकरितां कांहीं कपडे मिळवावे, अशी माझी इच्छा होती; पण यांत माझी बहुतेक निराशा झाली. फक्त माझा बंधु जॉन यानें माझ्यासाठीं कांहीं थोडे–

कपडे पैदा केले. पैसे आणि कपडे यांची मला जरूर होती, तरी हाम्पटनला परत जाण्याला पुरेशी वाटखर्ची मीं मिळविलेली होती, या एकाच गोष्टीनें मला फार आनंद झाला. एकदां मी तिकडे गेलों, म्हणजे खोलीरक्षकाचे काम चांगलें करून मी इतका उपयोगी पडेन, की, त्या शाळेतील दुसरें वर्ष मी कसेंहि काटूं शकेन, अशी मला खात्री होती.

हाम्पटनची टर्म सुरू होण्याच्या पूर्वी तीन आठवडे मुख्य अध्यापिका मिस मेरी म्याकी इच्याकडून अकस्मात् एक पत्र येऊन मला मोठा आनंद झाला. इमारती स्वच्छ करण्याच्या आणि नवीन वर्षाकरितां सर्व वस्तु व्यवस्थित मांडण्याच्या कामीं मीं तिला मदत करावी, म्हणून शाळा उघडण्याच्या पूर्वी दोन आठवडे हाम्पटनला मीं परत यावें, असें तिनें त्या पत्रांत लिहिलें होतें. मी याचीच वाट पहात होतों. तिजोरी-आफिसांत माझ्या नांवें कांहीं रक्कम जमा होण्याची अनायासें ही संधि मला प्राप्त झाली. मी ताबडतोब हाम्पटनला जावयाला निघालो.

या दोन आठवड्यामध्ये मी जो कांहीं धडा शिकलो, तो मी केव्हांहि विसरणार नाहीं. मिस म्याकी ही उत्तरेकडील एका जुन्या आणि सुसंस्कृत कुलापैकी होती; तरी ती माझ्याबरोबर खिडक्या स्वच्छ करी, खोल्या छोटी, बिछाने झाडून व्यवस्थित ठेवी आणि सर्व कांहीं करी. खिडकीचे प्रत्येक तावदान अगदीं स्वच्छ असल्याशिवाय शाळेच्या सुरुवातीला सर्व वस्तु व्यवस्थित राहून काम चांगले सुरू होणार नाहीं, असे तिला वाटे, आणि तीं सर्व तावदानें स्वतः स्वच्छ करण्यांत तिला मोठें सुख होई. मीं वर्णन केलेलें हें काम मी हाम्पटन येथे असतांना प्रत्येक वर्षी ती करीत असें.

तिच्यासारख्या सुशिक्षित, वजनदार आणि कुलीन स्त्रीनें, एका दुर्दैवी ज्ञातीच्या उन्नतीला मदत व्हावी म्हणून अशा प्रकारची सेवा करण्यांत इतका आनंद मानावा, हे त्यावेळीं माझ्या घ्यानांत येणें फार कठिण होतें. त्यानंतर पुढे ज्या शाळेत आपल्या विद्यार्थ्यांनां श्रमाची—

—थोरवी शिकविली जात नसे, अशा कोणत्याहि माझ्या ज्ञातीकरितां उघडलेल्या शाळेशीं माझें क्षणभर पटत नसे.

हाम्पटन येथें अखेरच्या वर्षी खोलीरक्षकाचें काम करून मला जो कांहीं वेळ मिळे, त्यापैकीं प्रत्येक मिनिट मी कसून अभ्यास करण्याकडे लावीत असें. माझ्या वर्गातील सर्व मुलांपेक्षां बरेच अधिक गुण (मार्क) मिळवून माझा नंबर वर यावा, आणि विद्यालयाच्या पदवीदान-समारंभाच्या वेळीं माझें नांव सन्माननीयांच्या यादीत (Honour-roll) नमूद व्हावें असा मीं निश्चय केला, आणि यांत मला शेवटीं यश आलें. १८७९ च्या जून महिन्यांत माझा हाम्पटन येथील सर्व शिक्षणक्रम संपूर्ण झाला. हाम्पटन संस्थेतील माझ्या कारकीर्दीत मला सर्वांत मोठे दोन लाभ झाले, ते पुढीप्रमाणेंः-

(१) माझ्या सुदैवानें जनरल एस. सी. आर्मस्ट्रांगसारख्या अद्वितीय, उदार, सच्छील आणि परोपकारी महात्म्याचा मला सहवास मिळाला.

(२) खरें शिक्षण एकाद्या व्यक्तीची किती उन्नति करितें, हें मला हाम्पटन येथे प्रथमच समजलें. तेथे जाण्यापूर्वी शिक्षण ह्मणजे शारीरिक श्रम करण्याची आवश्यकता नसणें, आणि आयुष्य खुशाल चैनींत घालवितां येणें, हेंच होय, अशा तऱ्हेची त्यावेळची शिक्षणाविषयींची प्रचलित कल्पना माझ्या डोक्यांत बरीच भरली होती. श्रम करणें हें लज्जास्पद किंवा निंद्य नाहीं, तर उलट श्रमावर प्रेम करावें, हें मी हाम्पटन येथे शिकलों. श्रमापासून मोबदला ह्मणून कांहीं पैसा मिळतो, एवढ्याकरितांच नव्हे, तर जगाला जें कांहीं पाहिजे आहे तें करण्याची पात्रता आपल्या अंगीं आहे असा आत्मविश्वास, आणि स्वतंत्रता यांकरितां श्रमावर प्रेम करण्याला आणि श्रमासाठींच श्रमावर प्रेम करण्याला, मी तेथें शिकलों. परोपकारांतच आपलें आयुष्य घालविण्यांत काय मौज व आनंद आहे, याचा आस्वाद मला प्रथम त्या संस्थेतच मिळाला. आणि इतरांनां उपयोगी आणि सुखी करण्यांत जे अतिशय—

पराकाष्ठा करितात, तेच पुरुष सर्वात अधिक भाग्यवान् होत, ही गोष्ट प्रथम मला तेथेच कळून आली.

माझा शिक्षणक्रम पुरा झाला, तेव्हां माझ्याजवळ कांहीं पैसा शिलक नव्हता. हाम्पटनच्या दुसऱ्या कांहीं विद्यार्थ्यांबरोबर मींहि कानेक्टिकट येथील उन्हाळ्याकरितां उघडलेल्या भोजनगृहांत खिदमतगाराची-हुजऱ्याची (Table-waiter) नोकरी पत्करिली, आणि तेथें जाण्यास कागणारा पैसा मीं कसाबसा कर्ज काढून मिळविला. खिदमतगाराचें काम कसें करावें याचें मला बिलकूल ज्ञान नव्हतें, हें मला त्या खाणाळीत गेल्यावर लागलीच कळून आलें. तथापि मी एक कुशल खिदमतगार आहे, अशी मुख्य खिदमतगाराची समजूत होऊन त्यानें चारपांच बड्या लोकांच्या मेजांची-भोजनांची व्यवस्था माझ्यावर सोपविली. त्यांची व्यवस्था कशी ठेवावी, याविषयींचें माझें अज्ञान उघडकीला आल्यामुळे या लोकांनीं माझी इतकी खरडपट्टी काढिली, कीं, मला तेथून घाबरून पळून जावें लागलें, आणि त्यांनां तेथेंच अन्नाशिवाय तिष्ठत बसावें लागलें. बाचा परिणाम असा झाला, कीं, माझे खिदमतगाराचें काम जाऊन, ताटें नेआण करण्याचे काम माझ्या वांट्याला आलें !

परंतु खिदमतगाराचें काम शिकण्याचा मीं निश्चय केला आणि थोड्याच आठवड्यांत तें शिकलों. यामुळे माझी पूर्वीची जागा मला देण्यांत आली. यानंतर पुढें मला याच भोजनगृहांत पाहुण्याच्या नात्यानें येण्याचा बरेचदां प्रसंग आला.

भोजनगृहाचा हंगाम संपल्यावर मीं माल्डन येथे आमच्या घरी परत आलों, आणि तेथे मला काळ्या लोकांच्या शाळेत शिक्षक नेमिलें. माझ्या आयुष्यांतील सुखाच्या कारकीर्दीचा हा पहिला प्रसंग-प्रारंभहोय. माझ्या गांवांतील लोकांची उन्नति करण्याची मला आतां संधि मळाली, असे मला वाटलें. या गांवांतील तरुणांनां नुसत्या पुस्तकी ज्ञानाशिवाय दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची आवश्यकता आहे, असें मला प्रथम-पासून माहीत होतें. मी माझें काम सकाळी आठ वाजतां सुरू करीं—

–आणि तें रात्रौ दहा वाजेपर्यंत आटपत नसे. अध्ययनाच्या नित्य क्रमाशिवाय, मीं विद्यार्थ्यांनां आपले केस कसे विंचरावे, हात, तोंड आणि कपडे कसे स्वच्छ ठेवावे, हेंहि शिकविलें. ब्रशाच्यायोगें दांत स्वच्छ ठेवणें आणि स्नान, या गोष्टींकडे मी त्यांचे लक्ष्य विशेष वेधिलें. माझ्या सर्व अध्ययनांत, ब्रशाचा परिणाम कसा होतो, हें मीं लक्ष्यपूर्वक पाहिलें आहे, आणि याच्याइतकी चांगली परिणामकारक, उन्नतीचीं साधनें फारच थोडीं आहेत, अशी माझी खात्री झालेली आहे.

दिवसा काम करणाऱ्या, पण कांहींतरी शिक्षण मिळावें हमणून उत्सुक असलेल्या अशा प्रौढ मुलांमुलींची आणि स्त्रीपुरुषांची संख्या या गांवांत इतकी मोठी होती, कीं, मीं लवकरच एक रात्रीची शाळा उघडली. प्रथमपासून ही शाळा दररात्रीं दिवसाच्या शाळेइतकीच गच्च भरलेली असे. कित्येक ५०/६० वर्षांपेक्षांहि वृद्ध स्त्रीपुरुषांचे शिकण्याचे प्रयत्न फारच हृदयद्रावक असत.

रात्रीची आणि दिवसाची शाळा एवढेच काम मीं हातीं घेतलें होतें, असें नव्हे. या शिवाय मीं एक वाचनालय आणि वाद्विषयक सभाहि स्थापन केलीं. दुपारी माल्डनच्या शाळेत आणि सकाळीं माल्डनहून तीन मैल असलेल्या शाळेत, अशा दोन रविवारच्या शाळांत मी दर रविवारीं शिकवीत असे. तसेंच हाम्पटनच्या संस्थेत दाखल करण्यासाठीं मीं कांहीं तरुणांनां खाजगी धडे देत असें. वेतनाचा कांहींएक विचार मनांत न आणतां, मला जें कांहीं शिकवितां येईल तें शिकण्याची इच्छा असणाऱ्या कोणालाहि मी शिकवीत असें. दुसऱ्या कोणालाहि मदत करण्याची संधि मिळालेली पाहून मला फार आनंद होत असे. सार्वजनिक फंडांतून माझ्या शिक्षकाच्या कामगिरी बद्दल मला थोडेंसें वेतन मिळे.

मी हाम्पटन येथे शिकत असतांना, माझा वडील बंधु जॉन यानें मला शक्य तितकी मदत केली; इतकेंच नव्हे, तर कुटुंबाच्या पोषणार्थ—-

त्याने आपला सारा वेळ कोळशाच्या खाणीत काम करण्यांत घालविला. मला मदत करितां यावी, ह्मणून त्यानें आपखुषीनें आपल्या शिक्षणाची हयगय केली. हाम्पटनमध्ये त्याचा प्रवेश होण्यासाठी त्याला मदत करावी, आणि प्रवेशानंतर त्याचा तेथील खर्च भागण्यासाठी रक्कम शिलक पाडावी, अशी मला आस्था लागली. या दोन्ही गोष्टी साधण्यांत मला यश मिळाले. तीन वर्षात माझ्या वडील बंधूने हाम्पटन ऐथील शिक्षणक्रम पुरा केला, आणि आतां तो टस्केजी येथील उद्योगधंद्याच्या शाखेवरील व्यवस्थापकाचें काम पाहत आहे. तो हाम्पटनहून परत आल्यावर आह्मीं दोघांनी आमची शिल्लक आणि आमचे श्रम एकत्र करून आमच्या जेम्स नामक दत्तकबंधूला हाम्पटनमध्ये पाठविण्याचे ठरविले. यांतहि आह्मांला यश आलें. आणि आतां तो टस्केजी संस्थेचा पोस्टमास्तर आहे. १८७७ हे साल ह्मणजे माल्डन येथील माझे दुसरे वर्ष पहिल्या वर्षाप्रमाणेंच मी काढिलें.

माल्डन येथे आमचें घर असतांना
'कु क्लक्स क्लान-Ku klux klan' नांवाची संस्था फार जोरांत होती. काळया लोकांच्या वागणुकीचे नियमन करण्यासाठीं, विशेषतः त्या जातीचे वजन राजकारणांत पडू न देण्याकरितां पुष्कळ गोऱ्या लोकांनी मिळून ज्या कांहीं टोळया केल्या होत्या, त्या सर्वांचें ' कु लक्स क्लान' हे नांव होते. गुलामगिरीच्या दिवसांत मी लहान असतांना, 'पॅट्रोलर्स-Patrollers' म्हणून ज्यांविषयीं मी ऐकत होतों, त्या लोकांसारख्याच याहि टोळ्या बसत. पासाशिवाय एका मळयांतून दुसऱ्या मळ्यांत जाऊं न देणें, पासाशिवाय आणि एकदा गोरा मनुष्य हजर असल्याशिवाय सभा भरू न देणे, यासारख्या गोष्टींमध्ये गुलामांच्या वागणुकीचे नियमन करण्यासाठी गोऱ्या लोकांच्या विशेषतः तरुणांच्या ज्या कांही टोळ्या होत असत, त्यांनां पॅट्रोलर्स असें ह्मणत.

पॅट्रोलर्सप्रमाणें 'कु लक्स क्लान 'चें सर्व काम बहुतेक रात्रीच चाले, पण 'पॅट्रोलर्स 'पेक्षां 'कुक्कक्स क्लान' फार क्रूर असत. त्यांचा मुख्य उद्देश—--

—नीग्रो लोकांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा नाहींशा करणें, हा असे. पण इतक्यानेंहि त्यांची तृप्ति न होतां ते त्यांची शाळागृहें आणि देवालयें जाळून टाकीत असत, आणि पुष्कळ निरपराधी लोकांनां त्रास देत असत. या दिवसांत पुष्कळ काळे लोक प्राणाला मुकले !

या लोकांच्या बेकायदेशीर कृत्यांचा माझ्या तरुण मनावर बराच परिणाम झाला. माल्डन येथे कांहीं काळ्या आणि गोऱ्या लोकांमध्ये खडाजंगी झालेली मी पाहिली. प्रत्येक बाजूला सुमारें शंभरशंभर लोक असावेत. दोन्ही पक्षांकडील बऱ्याच लोकांनां भारी दुखापती झाल्या. मला मदत करणाऱ्या व्हायोला रफनरबाईच्या पतीला-जनरल लेविस रफनरनां त्यांत मोठी दुखापत झाली. जनरल रफनर यांनीं काळ्या लोकांनां वांचविण्याचा प्रयत्न केला, आणि याबद्दल त्यांनां खाली पाडून इतका कांहीं बेदम मार देण्यांत आला, कीं, त्यांतून ते बरेच झाले नाहींत. दोन ज्ञातींत चाललेली ही लढाई पाहून या देशांत आमच्या लोकांनां कांहीं आशा नाहीं, असें मला वाटलें. पुनर्घटनात्मक कालामध्ये
'कु क्लक्स क्लान 'चा काळ हा अतिशय काळाकुट्ट भाग होय! 'कु क्लक्स क्लान 'च्या कालानंतर जें कांहीं चांगलें स्थित्यंतर झालें आहे, त्याकडे लोकांचें विशेष लक्ष्य जावें, ह्मणून दक्षिण अमेरिकेतील इतिहासाच्या या उद्वेगजनक भागाविषयीं मीं थोडेंसें सांगितलें. आज तशा कांहीं संस्था दक्षिणअमेरिकेंत नाहींत, आणि त्या पूर्वी होत्या, ही गोष्टहि दोन्ही ज्ञाति विसरून गेल्या आहेत. लोकमत अशा संस्था टिकूं देईल, अशीं फारच थोडीं स्थळे आतां दक्षिणअमेरिकेत आहेत.

प्रकरण पांचवें.

पुनर्घटनात्मक काल.

इसवी सन १८६७ पासून १८७८ या वर्षांनां माझ्या मतें ' पुनर्घटनात्मक काल' अशी संज्ञा देतां येईल. मीं हाम्पटन येथे विद्यार्थी या नात्याने आणि वेस्ट व्हर्जीनियांत शिक्षक या नात्यानें जो काळ घालविला, त्याचाहि पुनर्घटनात्मक काळांतच समावेश होतो. या सबंध कालांत बहुतेक काळया लोकांच्या मनांत दोन कल्पना नेहमीं घोळत असत. यांपैकी पहिली-ग्रीक आणि लॅटिन शिकण्याची उत्कंठा, व दुसरी नोकरी करण्याची इच्छा.

ज्या लोकांनीं पुष्कळ पिढ्या गुलामगिरींत आणि त्याच्याहिपूर्वी कांहीं पिढ्या शुद्ध रानटीपणांत काढलेल्या होत्या, अशा लोकांनां प्रथमच शिक्षणाची योग्य कल्पना येणें संभवनीय नाहीं. दक्षिणेच्या प्रत्येक भागांत पुनर्घटनात्मक कालामध्ये सर्व वयाच्या आणि स्थितीच्या लोकांनीं-यांपैकीं कांहीं लोक ६०।७० वर्षांचेहि असत-दिवसाच्या आणि रात्रीच्या शाळा अगदीं गच्च भरून जात. शिक्षण मिळविण्याची महत्त्वाकांक्षा फारच स्तुत्य आणि उत्तेजक होय; परंतु एकाद्याला थोडेंसें शिक्षण मिळालें म्हणजे तो जगाच्या बहुतेक त्रासांपासून व संकटांपासून कांहीं अघटित रीतीनें मोकळा होईल, आणि कांहीं शारीरिक श्रम केल्यावांचून त्याला राहतां येईल, अशी कल्पना त्यावेळीं फार प्रचलित होती. आणखी ग्रीक आणि लॅटिन भाषांचें, थोडेंच कां होईना, ज्ञान एकाद्यानें मिळविलें, म्हणजे तो श्रेष्ठ मनुष्य होईल-नव्हे जवळजवळ देवच होईल, असेंहि लोकांनां वाटत होतें. विदेशी (ग्रीक लॅटिन) भाषांचें तुटपुंजें ज्ञान असलेला असा एक काळा मनुष्य मीं प्रथमच पाहिला, आणि त्यावेळीं मला हा सर्वात श्रेष्ठ आहे, असें वाटून, मींहि त्याच्यासारखेंच व्हावें, असें मला वाटल्याचे आठवतें.--

–साधारणपणें आमच्या लोकांपैकीं कांहीं थोडेंसें शिक्षण मिळालेले बहुतेक लोक शिक्षक किंवा उपदेशक होत; आणि जरी या दोन्ही वर्गामध्ये योग्य, आस्थेवाईक आणि सदाचरणी असे स्त्रीपुरुष असत, तरीं पुष्कळजण शिक्षकाचा किंवा उपदेशकाचा धंदा उदरनिर्वाह चांगल्या रीतीनें व्हावा ह्मणून करीत असत. आपलें नांव लिहितां येण्यापेक्षां ज्यांनां कांहीं अधिक करतां येत नसे, असे बरेच जण शिक्षक झाले. मला आठवतें, कीं, या वर्गापैकीं एक शिक्षक आमच्या शेजारीं नोकरीच्या शोधार्थ आला; आणि तो तेथें असतांना, पृथ्वीचा आकार कसा आहे आणि तो या विषयासंबंधानें मुलांनां कसें शिकविणार, असा एक प्रश्न उपस्थित झाला. आपल्या आश्रयदात्यांच्या बहुमताप्रमाणें पृथ्वी सपाट आहे किंवा वाटोळी आहे, या दोन्ही मतांपैकी आपण कोणतेंहि मत शिकविण्याला तयार आहों, असें त्यानें सांगितलें!

जरी पुष्कळ सुधारणा होत चालली आहे, तरी त्यांतहि उपाध्यायाचा धंदा हा अशिक्षित लोक, तसेंच आपणांला उपदेश करण्यासाठीं निमंत्रण आलें आहे असें हट्टानें समजणारे दुराचरणी लोक, या दोघांमुळे खालावलेला आहे, व अद्यापहि खालावत आहे. स्वतंत्रता मिळाल्यावर वाचतां येणाऱ्या प्रत्येक काळ्या मनुष्याला वाचन सुरू केल्यापासून थोडक्याच दिवसांत उपदेश करण्याचें आमंत्रण (Call) येई. आमच्या ह गांवीं ही निमंत्रणाची पद्धत फार मजेची असे. बहुतकरून देवालयांत बसल्यावेळीं एकाद्या व्यक्तीला आमंत्रण मिळे. आगाऊ सूचना दिल्या शिवाय आमंत्रित मनुष्य गोळीनें मारल्याप्रमाणें जमीनीवर पडे, आणि तेथे कित्येक तास अगदीं न बोलतां आणि न हालतां राही; असे झालें ह्मणजे या व्यक्तीला (उपाध्येपणाचे) आमंत्रण मिळालें, अशी बातमी आजुबाजूला सर्वत्र पसरे. त्याच्या मनांत समन्स - आमंत्रण -चुकविण्याचें आलें, तर तो दुसऱ्यांदां किंवा तिसऱ्यांदांहि पडे, किंवा पाडविला जाई. सरतेशेवटीं त्याला हें आमंत्रण पतकरावें लागे. मलाहि शिक्षणाची अत्यंत जरूर होती, तरी मला लिहितांवांचतां चांगलें येऊं—

लागलें ह्मणजे हें आमंत्रण मलाहि येईल, अशी मला तरुणपणांत भीति वाटत होती; परंतु कांहीं कारणांमुळे कां होईना, मला ही पाळी आलीच नाहीं!

अगदींच अशिक्षित उपदेशक आणि कांहींसें शिक्षण मिळालेले उपदेशक, अशी दोघांची संख्या मिळविली असतां उपदेशकांचा भरणा बराच मोठा होता, असें सकृद्दर्शनीं दिसून येई. एका चर्चचे दोनशें लोक होते, आणि यांपैकीं अठराजण उपदेशक होते, ही गोष्ट मला माहीत आहे; पण मी येथे नमूद करतों, की, दक्षिणेतील बहुतेक समाजांमध्ये उपदेशकांचें शील सुधारत चाललें आहे, आणि पुढील २०।३० वर्षांत बरेच नालायक लोक नाहींसे होऊन जातील, असे मला वाटतें. पूर्वीपेक्षां आतां आमंत्रणें कमी होत चाललीं आहेत. आणि बऱ्याच उद्योगधंद्यांचीं आमंत्रणें वाढत चालली आहेत, हें कळविण्यास मला आनंद वाटतो. उपदेशकांतील सुधारणेपेक्षां शिक्षकांत होत चाललेली सुधारणा अधिक स्पष्ट दिसून येत आहे.

पुनर्घटनात्मक कालामध्यें दक्षिणेंतील आमचे सर्व लोक, मूल ज्या-प्रमाणे मातेवर सर्वस्वीं अवलंबून राहतें, त्याप्रमाणें प्रत्येक गोष्टीबद्दल संयुक्त सरकार- (Federal Govt.)--च्या तोंडाकडे पाहात होते. व हें कांहीं अस्वाभाविक नव्हतें. सरकारानें त्यांनां स्वतंत्रता दिली होती, आणि सर्व राष्ट्राला दोन शतकांहून अधिक काल नीग्रोंच्या श्रमांचा फायदा मिळाला होता. माझ्या तरुणपणीं आणि मी मोठा झाल्यावरहि मला असें वाटत होतें, कीं, आमच्या लोकांनां नागरिकांचीं कर्तव्यकर्मे बजावण्याची पात्रता येण्यासाठीं संस्थानें जी कांहीं शिक्षणाची सोय करतील, त्याशिवाय, मुख्य सरकारनें स्वतंत्रता दिल्यावर सार्वत्रिक शिक्षणाची कांहींच सोय न करणें ह्मणजे मोठें पाप आहे.

दोष काढणें व काय करतां आलें असतें हें सांगणें सोपें आहे! पण त्यावेळची परिस्थिति पाहिली असतां अधिकाऱ्यांनी त्यावेळीं जें कांहीं योग्य तेंच केलें. तथापि, आमच्या स्वतंत्रतेचा सर्व काळ ध्यानांत—

-आणिला असतां, एकाद्याला अमुक एक शिक्षण मिळालं, किंवा त्याची कांहीं मालमत्ता असली, अथवा दोन्ही असलीं, ह्मणजे त्याला मत देण्याचा अधिकार असावा अशी योजना झाली असती, तसेंच काळ्या व गोऱ्या अशा उभयज्ञातींनां ही मत देण्याची पात्रता प्रामाणिकपणानें आणि सचोटीनें लागू करण्याचा कांहीं उपाय शोधून काढिला असता, तर हें काम अधिक शहाणपणाचे झालें असतें, असें माझ्यानें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

पुनर्घटनात्मक कालाच्या वेळीं मी जरी नुकताच प्रौढ झालो होतों तरी चुका होत आहेत आणि आतां आहे तशी स्थिति फार वेळ राहणार नाहीं, असें मला वाटत होतें. माझ्या ज्ञातीविषयींची ठरलेल पॉलिसी (Policy) ही बहुतेक चुकीच्या पायावर उठविलेली असून अस्वाभाविक आणि वेठीची होती, असा माझा ग्रह झाला. मला असे दिसलें, कीं, आमच्या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन गोऱ्या लोकांना मोठ्या जागा देण्यांत येत असत; आणि उत्तर अमेरिकेंत कांहीं लोकांना असें हवें होतें, कीं, नीग्रो लोकांनां दक्षिणेतील गोऱ्या लोकांपेक्षां श्रेष्ठ जागा देऊन त्यांची खोड मोडावी. पण यानें शेवटीं नीग्रोंचाच तोटा होईलसें मला वाटलें. याशिवाय सार्वजनिक राजकीय चळवळीनें आपल्या समीपच्या उद्योगधंद्यांत पूर्णता मिळवणें आणि मिळकत कमावणे या मुख्य गोष्टींपासून आमच्या लोकांचें मन परावृत्त केलें.

राजकीय कामांत शिरण्याच्या मोहांनीं मला इतकी भुरळ पाडिल होती, कीं, मी एकदां त्यांनां बहुतेक बळी पडणार होतो. पण कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें आणि अंतःकरण, अथवा कर, शिर व हृदय (Hand head and heart) यांच्या उदार

व भरपूर शिक्षणानें ज्ञातीच्या उन्नतीचा पाया चांगला बसविला असतां, ज्ञातीला माझ्या हातून चांगली आणि खरीखुरी मदत होईल, या विचारानें मी त्या मोहांपासून बचावलों गेलों. कांहीं काळे लोक संस्थानच्या कायदेकौन्सिलचे सभासद आणि प्रांतांतील अधिकारी असत, पण त्यांनां लिहितांवाचतां येत—---

—नव्हते, आणि त्यांची नीतिमत्ता त्यांच्या शिक्षणाइतकीच कोती व कमजोर होती, अशीं उदाहरणेंहि मी पाहिली आहेत. थोड्या दिवसां पूर्वी मी दक्षिणअमेरिकेतील एका शहराच्या रस्त्यातून जात असतां कांहीं गवंडी कोणालासे हांका मारीत आहेत, असें मी ऐकिलें. ते लोक विटांच्या दुमजली इमारतीवर काम करीत होते, आणि तेथूनच जलदी कर, अधिक विटा घेऊन ये,' असे एका 'गव्हर्नर'ला ओरडून सांगत होते. "जलदी कर, गव्हर्नर ! जलदी कर, गव्हर्नर !' असा शब्द होत असलेला मीं पुष्कळ वेळां ऐकिला. माझी जिज्ञासा इतकी वाढली, की, तो गव्हर्नर कोण असावा याची चौकशी केल्यावांचून माझ्यानें राहवले नाहीं. चौकशीअंतीं मला असें समजलें, कीं, तो एक काळा मनुष्य होता, आणि त्याला एकदां आपल्या संस्थानची लेफ्टनंट गव्हर्नरची जागा मिळाली होती.

पण या कालांतील सर्वच काळे अधिकारी आपापल्या जागेला नालायक होते, असें कांहीं नाहीं. त्यांपैकीं कांहीं, माजी सिनेटर बी. के. ब्रुस, गव्हर्नर पिंकबॅक, आणि दुसरे कित्येक खंबीर, प्रामाणिक आणि उपयोगी पुरुष असत. सर्वच लोक कांहीं अप्रामाणिक कारपेटबॅगर*-असे मानिले जात - नसत. त्यांपैकीं कांहीं जॉर्जियाचे माजी गव्हर्नर बुकलसाहेब यांच्या-प्रमाणें फार थोर स्वभावाचे आणि परोपकारी असत.
अर्थातच शिक्षण नसलेल्या आणि राजशासनाचा अनुभव नसलेल्या काळ्या लोकांनीं मोठ्या ढोबळ चुका केल्या. यासारखी परिस्थिति असलेल्या दुसऱ्या लोकांनींहि अशाच चुका केल्या असत्या. दक्षिणेंतील पुष्कळ गोऱ्या लोकांचा असा ग्रह झालेला दिसतो, कीं, जर आतां नीग्रोला कांहीं थोडेसे राजकीय हक्क दिले, तर पुनर्घटनात्मक कालां-

---

* अमेरिकेतील संयुक्त संस्थानांपैकीं उत्तरेचे व दक्षिणेचे लोक यांच्यामध्यें १८३५त आपापसांत लढाई झाल्यावर उत्तरेकडील इसम दक्षिणेकडे तयेऊन राजकीय हक स्वार्थपरायणतेनें मिळविण्याची खटपट करूं लागले. त्यांपैकी प्रत्येकाला तिरस्कारानें हा शब्द लावतात. एन्. बी. रानडे यांचा कोश.

—-तील चुका पुनः होतील. पण मला तशी भीति मुळींच वाटत नाहीं-पूर्वीच्या पसतीस वर्षांपेक्षां आतां नीग्रो अधिक शहाणा व सशक्त झालेला आहे, आणि आपल्यापासून आपले दक्षिणेंतील गोरे शेजारी विभक्त होतील अशा रीतीनें वागतां येणार नाहीं, हें तो अनुभवाने लवकर शिकत आहे. माझी अशी अधिकाधिक खात्री होत चालल आहे, कीं, आमच्या ज्ञातीच्या राजकीय प्रश्नांचा निकाल, हल्लींचा मत देण्याचा कायदा बदलून टाकून, तो, दुटप्पी वर्तन व टाळाटाळी यांन वाव न देतां, दोन्ही जातींनां सारखाच पूर्ण प्रामाणिकपणें लागू करणे ज्या संस्थानाला इष्ट वाटत असेल, अशा प्रत्येक संस्थानाच्या विचाराचा प्रश्न होईल. दक्षिणेंतील माझ्या नित्याच्या निरीक्षणानें माझी अशी खात्री झालेली आहे, कीं, दुसरा कोणताहि मार्ग स्वीकारणें हें नीग्रोला, गोऱ्या मनुष्याला आणि संघांतील इतर संस्थानांनां अन्यायाचे आणि गुलामगिरीसारखें पापाचें होईल; आणि या पापाचा दंड पुढें केव्हांतरी आह्मांला भरावा लागेल. असो.

दोन वर्षे माल्डन येथे शिक्षकाचें काम केल्यावर आणि माझ्या दोन बंधूंशिवाय दुसऱ्या कित्येक तरुण स्त्रीपुरुषांची हाम्पटन संस्थेत प्रविष्ट होण्याची तयारी करून दिल्यावर इ. स. १८७८ च्या शरदॠतूंत कोलंबिया प्रांतांतील वॉशिंग्टन येथें कांहीं महिने अभ्यासांत घालविण्याचा मीं निश्चय केला. मीं तेथें आठ महिने राहिलों. तिकडील माझ्या अभ्यासापासूनहि माझा बराच फायदा झाला, आणि कांहीं चांगल्या व्यक्तींचा सहवास मला लाभला. तेथें मी राहिलेल्या संस्थेत विद्यार्थ्यांनां औद्योगिक शिक्षण दिलें जात नसे; आणि यामुळे हाम्पटन-सारख्या औद्योगिक शिक्षणावरच भर देणाऱ्या संस्थेचा व धंदेशिक्षण मुळींच न देणाऱ्या संस्थेचा कसा काय परिणाम होतो, हें तुलना करून पाहण्याची मला संधि मिळाली. या शाळेत बहुतेक विद्यार्थ्यांकडे अधिक पैसा असे, व त्यांचे पोषाख अधिक चांगले असत; इतकेंच नव्हे, तर ते प्रचारांतील ताज्या फॅशन-पद्धतीप्रमाणें असत. यांतील कांहीं विद्यार्थी मनानें——

—अधिक तरतरीत असत. हाम्पटन येथे असा नियम असे, कीं, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च कोणाकडून तरी देवविण्याची जवाबदारी संस्था घेत असे. पण भोजनखर्च, पुस्तके, कपडेलत्ते आणि खोलीभाडे या खर्चाची व्यवस्था विद्यार्थ्यांनी काम करून, किंवा अर्धेमुर्धे काम व अर्धेमुर्धे रोख पैसे देऊन त्यांनां करावी लागत असे. या शाळेत बहुतेक विद्यार्थ्यांचा खासगी खर्च त्यांनां कसातरी मिळे. हाम्पटन येथे उद्योगधंद्यांत प्रयत्न करून विद्यार्थ्यांनां आपला खर्च भागवावा लागे, आणि त्यांचे शील उत्तम बनविण्यास या प्रयत्नांचा अत्यंत उपयोग होई. पण या शाळेतील विद्यार्थी स्वतःवर फार थोडे अवलंबून रहात. बाह्यरूपाकडेच ते फार लक्ष्य देत असत! थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, हाम्पटन येथे विद्यार्थी जसे आपले शिक्षण मूळापासून उत्तम पायावर सुरू करीत असत, तसे इकडील विद्यार्थी करीत नव्हते, असे माझ्या निदर्शनाला आलें. येथील विद्यार्थ्यांचा शिक्षणक्रम पुरा झाला, ह्मणजे त्यांनां लॅटिन आणि ग्रीक या भाषांचे ज्ञान अधिक होत असे; पण त्यांनां प्रपंचाचे आणि व्यवहाराचे ज्ञान कमी होई, असें मला आढळून आलें. सुखकारक परिस्थितीत पुष्कळ वर्षे काढल्यानें हाम्पटन येथील विद्यार्थ्यांप्रमाणें दक्षिणेंतील त्रासदायक खेड्यापाड्यांत जाऊन आपल्या लोकांकरितां काम करणें त्यांनां आवडत नसे; पण हॉटेलांमध्यें खिदमतगार होणें, आणि पुलमन कार* मध्यें पोर्टर -होणें, हेंच आपल्या आयुष्यांतील इतिकर्तव्य आहे, असा त्यांनां मोह पडे !

मी वाशिंग्टन येथें शिकत असतां नुकत्याच दक्षिणेतून आलेल्या काळ्या लोकांनीं हें शहर गच्च भरून गेलें होतें. येथे आपणाला चैनीनें दिवस काढितां येतील, अशा समजुतीनें यांपैकी बरेच लोक वाशिंग्टनला आलेले होते. दुसऱ्या कांहींनां लहानसहान सरकारी जागा मिळाल्या होत्या; आणि बरेच लोक संयुक्त राज्यांतील जागा मिळण्याच्या आशेनें आलेले होते. बरेच काळे लोक-यांपैकीं कांहीं बरेच बुद्धिमान् आणि—-

---

*निजण्याची सोय असलेल्या अमेरिकेंतील मोठ्या गाड्या.

–तरतरीत असत हे अमेरिकेच्या पार्लमेंटां-House of Representatives-मध्यें होते; आणि ऑनरेबल बी. के. ब्रूस नांवाचे गृहस्थ सीनेटमध्यें होते. या सर्व गोष्टींमुळे काळ्या जातीच्या लोकांनां वाशिंग्टन हें मोठें रमणीय शहर झालें होतें. याशिवाय कोलंबिया प्रांतांत नेहमीं आपणांला कायद्याचा आसरा मिळतो, हें त्यांनां माहीत होते. वाशिंग्टन येथील काळ्या लोकांच्या सार्वजनिक शाळा इतर ठिकाणच्या शाळांपेक्षां अधिक चांगल्या असत. येथील आमच्या लोकांच्या स्थितीचे मीं आस्थापूर्वक व बारकाईनें निरीक्षण केलें. त्यांमध्ये चांगले आणि लायक नागरिक पुष्कळ होते असें मला आढळून आलें, तरी बऱ्याच लोकांच भपका पाहून मी काळजींत पडलों. आठवड्याला चार डालरडून जास्त मिळकत नसलेले तरुण काळे लोक, आपल्याजवळ हजारों डालर आहेत असें लोकांनां भासविण्याकरितां रविवारीं पेन्सिलव्हॅनिया रस्त्यावर इकडून तिकडे बगींतून हिंडण्यासाठीं दोन किंवा त्यांहून अधिक डालर खर्च करतांना मीं पाहिलेले आहेत. सरकाराडून दरमहा ७५ किंवा १० डॉलर मिळविणारे, पण प्रत्येक महिन्याच्या शेवटीं कर्जबाजारी असणारे कांहीं तरुण गृहस्थ मी पाहिले आहेत. कांहीं दिवसांपूर्वी प्रतिनिधी सभेचे सभासद असलेले, पण नंतर रिकामे व दरिद्री बनलेले असेही लोक मीं पाहिले आहेत. बरेच लोक प्रत्येक लहानसहान गोष्टीबाबत सरकारावर अवलंबून रहात असत. या वर्गातील लोकांनां आपली स्थिती सुधारावी अशी फारच थोडी इच्छा होती, आणि ती सुधारण्यासाठी संयुक्त अधिकाऱ्यांवर ते पूर्णपणे अवलंबून असत. त्यावेळीं आणि तदनंतर पुढ मी कितीदां तरी अशी मागणी केली, कीं, कांहीं अद्भुत जादुसामर्थ्यानें यांपैकी बहुतेकांची उचलबांगडी करून त्यांनां खेड्यापाड्यांत न्यावे आणि त्यांनां येथे भक्कम आणि कधीहि दगा न देणाऱ्या 'भूमाते अंकावर' रोवावें. सर्व यशस्वी राष्ट्रांनी आणि लोकांनी येथून आपल्या उन्नतीला प्रारंभ केला आहे. प्रथमदर्शनी हा उन्नतीचा मार्ग मंद आणि कठिण वाटेल, तथापि तोच खरा मार्ग आहे.

वाशिंग्टनमध्यें मीं कांहीं मुली पाहिल्या. त्यांच्या आया धुण्याच्या धंद्यानें आपला उदरनिर्वाह करीत. आपल्या मुलींनां त्या, हा धुण्याचा आपल्या धोपट मार्गानें शिकवीत असत. पुढे या मुली सार्वजनिक शाळेत जाऊं लागल्या आणि तेथे सातआठ वर्षे राहिल्या. शिक्षणक्रम पुरा झाल्यावर त्यांनां अधिक मौल्यवान पोषाख, तसेंच टोप्या आणि जोडेहि अधिक मौल्यवान लागू लागले. सारांश, त्यांच्या गरजा वाढलेल्या होत्या, पण त्या भागविण्याची पात्रता मात्र वाढलेली नव्हती! उलटपक्षीं, सातआठ वर्षाच्या पुस्तकी शिक्षणानें त्यांनां आपल्या आयांचा धंदा सोडावा लागला. याचा परिणाम असा झाला, कीं, त्या मुलींपैकीं बहुतेक भिकेला लागल्या. त्या मुलींनां, तेंच मानसिक शिक्षण देऊन भाषा, गणित यांपैकी कोणतेंहि मनाला सशक्त आणि सुसंस्कृत करणारें शिक्षण द्यावें असें माझें मत आहे,) आणि त्याबरोबरच धोब्याच्या धंद्याचें आधुनिक व उत्तम शिक्षण किंवा त्यासारखेंच दुसरें कांहीं धंदेशिक्षण दिलें असतें, तर फार शहाणपणाचें झालें असतें, असें मला पुष्कळदां वाटलें.

प्रकरण सहावें.

कृष्णवर्ण व ताम्रवर्ण ज्ञाति.

मी वाशिंग्टन येथे वर्षभर रहात असतां आणि त्यापूर्वी कांहीं दिवस, वेस्टव्हर्जीनियाच्या संस्थानामध्ये व्हीलिंग गांवाहून संस्थानचे ठाणें हालवून तें कोणत्यातरी मध्यवर्ति शहराला न्यावें, याबद्दल बरीच चळवळ चालली होती. या चळवळीचा परिणाम असा झाला, की, सरकारानें तीन शहरें निवडली, आणि यांपैकी संस्थानांतील नागरिकांच्या बहुमतें जें शहर पसंत होईल, तेथेंच सरकारचें ठाणें करावयाचे, असें ठरलें. या तीन्हींपैकी माझ्या गांवाहून-माल्डनहून-पांच मैलांच्या अंतरावर चाल्सर्टन या नांवाचा गांव होता. वॉशिंग्टन येथील माझा शाळेचा शिक्षणक्रम संपण्याच्या सुमाराला चाल्सर्टन येथील गोऱ्या लोकांच्या पंचसभेकडून मला आपल्या शहरच्या वतीनें खटपट करण्याचें आमंत्रण आलेलें पाहून मला आश्चर्य वाटून आनंद झाला. मीं तें आमंत्रण स्वीकारिलें, आणि संस्थानच्या बऱ्याच भागांमध्यें व्याख्याने देण्यांत तीन महिने खर्च केले. चाल्सर्टन गांवाला या बाबतींत यश आलें, व तेथेंच हल्लीं सरकारचें कायमचें ठाणें आहे.

या चळवळींत माझी जी व्याख्याता या नात्यानें थोडीबहुत प्रसिद्धि झाली, ती पाहून मीं राजकारणांत शिरावें, ह्मणून बऱ्याच जणांनीं खटपट केली. पण मीं तें नाकारिलें. कारण, माझ्या ज्ञातीची यापेक्षां अधिक सेवा मी दुसऱ्या कोणत्याहि कामानें करीन, अश मला खात्री होती. त्यावेळीं आमच्या लोकांनां शिक्षण, उद्योगधंदे आणि मिळकत यांचा चांगला आधार मिळणें हें अत्यंत जरूरीचे आहे, असें मला फार वाटत होतें; आणि याकरितां राजकीय हक्क (असामी) मिळविण्यापेक्षां वरील त्रयीबद्दल खटपट करणें फार इष्ट होते माझ्याविषयीं ह्मणाल, तर राजकारणांतहि मला खात्रीनें यश आलें असतें; पण तें यश ह्मणजे एक प्रकारचा स्वार्थच होय, आणि —---

—-यांत माझ्या समाजाच्या उन्नतीचा पाया घालण्याच्या कामीं माझ्या स्वतःच्या हातभार लावण्याच्या कर्तव्यकर्माला मी अंतरलों असतों.

आमच्या ज्ञातीच्या अशा उन्नतीच्या वेळीं, शाळेला किंवा कॉलेजाला जाणारे बहुतेक तरुण लोक मोठमोठे वकील किंवा प्रतिनिधिसभेचे सभासद होण्याच्या निश्वयानें जात असत; आणि पुष्कळ बायका वादनकलेच्या अध्यापिका होऊं पहात. पण तारुण्यांतहि माझा एकच विचार ठरलेला होता, आणि तो ह्मटला ह्मणजे चांगले वकील, चांगले प्रतिनिधि आणि गायनवादनकलेचे चांगले अध्यापक बनविण्याची भूमिका तयार करण्याच्या आवश्यकतेकडे लक्ष्य देणें, हा होय.

गुलामगिरीच्या दिवसांत सारंगी शिकूं इच्छिणाऱ्या एका वृद्ध नीग्रोच्या स्थितीप्रमाणेंच आतांची परिस्थिति आहे, असें मला वाटलें. सारंगीचे धडे शिकविण्याकरितां एका तरुण पंतोजीला त्यानें विनंति केली; पण इतक्या वृद्ध वयांत याला सारंगी वाजवितां येईल कीं नाहीं, याची शंका वाटून त्या तरुण पंतोजीनें त्याची नाउमेद करण्याच्या हेतूनें असें सांगितलें, कीं, "जेक काका, मी तुला सर्व धडे शिकवितों; पण पहिल्या धड्याकरितां मी तुझ्यापासून तीन, दुसऱ्याकरितां दोन आणि तिसऱ्या-करितां एक डालर घेईन; आणि शेवटच्या ह्मणजे चौथ्या धड्याकरितां तुला फक्त पाव डॉलर द्यावा लागेल!" जेक काकानें उत्तर दिलें "बरें आहे, महाराज ! मला आपल्या अटी मान्य आहेत; पण मला शेवटचाच धडा प्रथम द्या, ह्मणजे झालें."

संस्थानचें मुख्य ठाणें बदलल्यावर मला दुसरें एक आमंत्रण आलें, आणि त्यायोगानें मला फार आश्चर्य वाटून अत्यानंद झाला. येत्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं ग्रॅज्युएट झालेल्या विद्यार्थ्यांनां मीं चार शब्द सांगावे, या आशयाचें जनरल आर्मस्ट्रॉंग यांनीं मला पत्र लिहिलें. असा मान मला मिळेल हैं माझ्या स्वप्नींहि नव्हतें. माझ्या हातून होईल इतकें काळजीपूर्वक भाषण मी तयार केलें. आणि माझ्या भाषणाचा विषय 'यशस्वी शक्ति-The force that wins' हा मीं पसंत केला.

आत्मोद्धार.

सहा वर्षापूर्वी हाम्पटन संस्थेत विद्यार्थी या नात्यानें प्रविष्ट व्हावें ह्मणून ज्या मार्गानें मी गेलों, त्याच मार्गानें हें भाषण करण्याकरितां या वेळीं मी हाम्पटनला गेलों; पण या खेपेला तो सर्व मार्ग मला आगगाडीनें आक्रमितां आला. माझ्या पहिल्या प्रवासांत आणि या प्रवासांत किती तरी अंतर ! पांच वर्षात कोणाहि व्यक्तीच्या जीवितक्रमांत आणि आशेत इतका फरक कचितच झाला असेल, असें ह्मटलें असतां मी आत्मस्तुति करीत आहे, असें कांहीं होणार नाहीं.

हाम्पटन येथें शिक्षक आणि विद्यार्थी या उभयतांनीं माझें मनापासून स्वागत केलें. मी हाम्पटन सोडल्यावर ती संस्था आमच्या लोकांची स्थिति आणि गरजा यांनां दिवसेंदिवस योग्य होत चालली आहे, तसेंच औद्योगिक आणि इतर शिक्षण फार सुधारत चाललें आहे, असें मला दिसून आलें. तेव्हां अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि शाळेच्या नमुन्याबरहुकूम हाम्पटन संस्थेचा नकाशा ठरविलेला नसून, त्यावेळी आमच्या लोकांच्या गरजा कशा भागवाव्या आणि त्यांची परिस्थिति कशी सुधारावी, या उद्देशानें जनरल आर्मस्ट्रांगच्या उदार नेतृत्वाखालीं च नियमनाप्रमाणें प्रत्येक सुधारणा करण्यांत येत असे. अशिक्षित लोकांमध्यें शिक्षणाचे आणि इतर मिशनरी (परोपकार) काम करीत असतांना, मागें शेंकडों वर्षापूर्वी केलेला, किंवा हजारों मैलांवर दुसऱ्या ज्ञातींत चालू असलेला प्रयोग करून पहावा, असें पुष्कळांनां वाटत असतें. व्यक्तीची परिस्थिति आणि साध्य यांकडे बिलकूल लक्ष्य न देतां प्रत्येकाला ठराविक शिक्षणाच्या सांच्यांत घालून बाहेर काढण्याचा मोह नेहमीं पडतो. पण हाम्पटन संस्थेत असा प्रकार नव्हता.

पदवीदानाच्या दिवशीं केलेल्या माझ्या भाषणानें सर्वजण फार खूष झाले, आणि हें भाषण फार चांगलें झालें असें पुष्कळांनीं मोठ्या ममतेने सांगून मला प्रोत्साहन दिलें. मी लवकरच वेस्टव्हर्जीनियांत आमच्या गांवी परत गेलों, आणि पुनः शिकविणें सुरू करण्याचा बेत करूं लागलों। इतक्यांत पुनः जनरल आर्मस्ट्रांग यांचें मला अकस्मात् एक पत्र १८७९ —--

—च्या उन्हाळ्यांत आलें. शिक्षकाचें काम करण्यासाठीं आणि कांहीं राहिलेला अभ्यास पुरा करण्यासाठीं मीं हाम्पटनला लवकर परत यावें, असें त्यांनीं मला लिहिलें. वेस्टव्हर्जीनियामध्यें मीं शिकविण्याचें काम प्रथम सुरू केल्यावर माझ्या दोन बंधूंशिवाय दुसरे चार अत्यंत हुषार आणि होतकरू विद्यार्थी मीं निवडून काढून हाम्पटन संस्थेत त्यांनां प्रविष्ट होतां यावें म्हणून त्यांच्या तयारीकडे विशेष लक्ष्य दिलें. हे सर्व विद्यार्थी हाम्पटनला गेले आणि तेथील शिक्षकांनां ते इतके पसंत पडले, कीं, त्या सर्वांनां एकदम वरील वर्गात दाखल करण्यांत आलें. यावरूनच हाम्पटन येथें शिक्षकाचें काम करावें म्हणून मला बोलाविलें असावें, असें मला वाटतें. मीं हाम्पटनला पाठविलेल्या विद्यार्थ्यांपैकी एकजण डाक्टर साम्युएल इ. कर्टने या नांवाचा असून हा सध्यां बोस्टन शहरांतील उत्तम वैद्य आणि तेथील स्कूलबोर्डाचा एक सभासद आहे.

यावेळीं हाम्पटन येथें प्रथमच इंडियन लोकांनां शिक्षण देण्याचा प्रयोग जनरल आर्मस्ट्रांग करून पाहत होते. इंडियन लोकांनां शिकतां येईल आणि त्यापासून आपला फायदा करून घेतां येईल, असें फारच थोड्या लोकांनां त्यावेळीं वाटत होतें. मोठ्या प्रमाणावर पद्धतशीर रीतीनें हा प्रयोग करून पहावा, असें जनरल आर्मस्ट्रांगच्या मनांत आलें. पश्चिमेकडील संस्थानांतील राखून ठेविलेल्या जंगलांमधून रानटी, अगदीं अशिक्षित, असे शंभरांपेक्षां जास्त इंडियन त्यांनीं मिळविले. त्यांपैकी बरेच तरुण होते. मीं त्या सर्व तरुण इंडियनांचा पित्याप्रमाणें पालक व्हावें म्हणजे मीं त्यांच्याबरोबर एकाच इमारतींत राहून त्यांचें शिक्षण, कपडेलत्ते, खोल्या इत्यादिकांवर देखरेख करावी, अशी जनरल आर्मस्ट्रांगची इच्छा होती. मला देऊं केलेलें हें काम फार मोहक होतें खरें, पण वेस्टव्हर्जीनिया येथील माझ्या कामांत मीं इतका मग्न झालों होतों, कीं, तें आतां सोडून देणे माझ्या अगदीं जीवावर आलें. पण—

शेवटीं मीं तें सोडलेंच. कारण, जनरल आर्मस्ट्रांग यांनी सांगितलेले काम करण्याचें कसें नाकारावें, हें मला समजेना.

हाम्पटनला गेल्यावर पाऊणशें इंडियन विद्यार्थी राहत असलेल्या इमारतींत मला रहावें लागलें. त्यांच्या जातीपैकीं नसलेला असा मी एकटाच तेथे होतों. आपल्याला यांत यश कसें मिळवितां येईल, याची मला प्रथम शंका वाटू लागली. आपण गोऱ्या मनुष्यापेक्षां श्रेष्ठ आहों, अर्थात् नीग्रो-पेक्षां कितीतरी श्रेष्ठ-विशेषतः जी गोष्ट आपण केव्हांहि करणार नाही ती ह्मणजे गुलामगिरी व तिच्याखालीं नीग्रोंनीं मान लवविल्यामुळे आपण त्यांच्यापेक्षां कितीतरी पटीनें श्रेष्ठ आहों, असें प्रत्येक इंडियनाला वाटत होतें, हें मला माहीत होतें. गुलामगिरीच्या दिवसांत इंडियन लोकांचेहि त्यांच्या प्रांतांत बरेच गुलाम होते. याशिवाय हाम्पटन येथें, ताम्रवर्णी इंडियनांनां शिकविण्याचा आणि सुधारण्याचा चाललेला प्रयत्न यशस्वी होणार नाहीं, असा बहुतेकांचा समज झालेला होता. या सर्व गोष्टी आणि माझ्यावरील मोठी जबाबदारी जाणून मीं मोठ्या सावधगिरीनें आणि हुषारीनें काम सुरू केलें, व त्यांतहि यश मिळवावयाचेंच असा निश्चय केला. थोड्याच दिवसांत या इंडियनांचा माझ्यावर विश्वास बसला; इतकेंच नव्हे, तर ते माझ्यावर प्रेम करून मला मोठा मान देऊ लागले. इतर मानवी प्राण्यांप्रमाणेंच ते आहेत, त्यांनां चांगल्या रीतीनें वागविलें ह्मणजे ते खूष होतात, आणि वाईट रीतीनें वागविलें ह्मणजे ते रागावतात, असें मला आढळून आलें. मला सुख आणि आनंद कशानें होईल, तें करण्याची मसलत ते नेहमीं करूं लागले. आपले लांब केस कापून घेणे, घोंगड्या वापरण्याचें सोडणें आणि तंबाखू ओढण्याचें बंद करणें, या गोष्टी त्यांनां आवडत नव्हत्या, असें वाटतें; परंतु दुसऱ्या कोणत्याहि ज्ञातीच्या मनुष्यानें आपल्यासारख्या गोऱ्या मनुष्याचा पोषाख केल्याशिवाय, गोऱ्या मनुष्याचें अन्न खाल्याशिवाय, गोऱ्या मनुष्याची भाषा बोलल्या-शिवाय, आणि गोऱ्या मनुष्याचा धर्म आपल्याला मान्य आहे असें सांगितल्याशिवाय, त्याची सुधारणा झाली आहे, असें कोणाहि गोऱ्या अमेरिकनाला वाटत नाहीं.

कृष्णवर्ण व ताम्रवर्ण जाति.

इंग्रजी भाषा शिकण्याची अडचण बाजूला ठेविली असतां, इतर विषय आणि उद्योगधंदे शिकण्यांत काळ्या आणि इंडियन विद्यार्थी-मध्ये फारच थोडा फरक होता, असे मला आढळून आलें. इंडियनांनां आपल्या हातून होईल तितक्या तऱ्हांनी मदत करण्यांत काळे विद्यार्थी जें कांहीं अगत्य किंवा आस्था दाखवीत, ते पाहून मला नेहमी आनंद होई-इंडियनांनां हाम्पटन संस्थेत दाखल करूं नये, असें वाटणारे कांहीं काळे विद्यार्थी होते; पण अशांची संख्या सुदैवानें फारच थोडी होती. इंडियनांनां इंग्रजी बोलण्यास शिकवितां यावें आणि चांगल्या सुधारलेल्या सवयी त्यांनां लागाव्या, ह्मणून नीग्रो विद्यार्थी शिक्षकांच्या सांगण्यावरून त्यांनां साथीदार (जोडीदार) या नात्यानें आपल्या खोल्यांत राहण्यास खुषीनें घेत.

काळ्या विद्यार्थ्यांनीं ज्याप्रमाणें ताम्रवर्णी विद्यार्थ्यांचे मनापासून स्वागत केळे, त्याप्रमाणें दुसऱ्या ज्ञातींतील शंभराहून अधिक विद्यार्थ्यांच्या आगमनापासून आनंद पावणारे विद्यार्थी ज्या गोऱ्या संस्थेत आहेत, अशी एकहि संस्था या देशांत असू नये, याचें मला आश्चर्य वाटतें. दुसऱ्याची उन्नति करण्याला आह्मी जेवढे साहाय्य करतों, तेवढेच आह्मीं स्वतः वर जातों; आणि ज्या मानानें एकादी जात अगदीं अभागी आणि सुधारणेंत खालच्या पायरीवरची असेल, त्या मानानें आह्मीं तिला मदत केली असतां आमची स्वतःची उन्नति होते, असें गोऱ्या विद्यार्थ्यांनां सांगण्याचें कितीदां तरी माझ्या मनांत आलें होतें.

याप्रसंगी ऑनरेबल फेडरीक डगलस यांच्या भाषणाची मला आठवण होते. एकदां पेन्सिलव्हॅनिया संस्थानांत मिस्टर डगलस हे प्रवास करीत होते; आणि इतर उतारूंप्रमाणें त्यांनी भाडे दिलें होतें, तरी त्यांच्या वर्णामुळे त्यांनां मालाच्या डब्यांत बसावें लागलें ! मिस्टर डगलसचें सांत्वना करावें ह्मणून कांहीं गोरे उतारू त्या मालाच्या डब्यांत गेले आणि त्यांपैकी एकानें ह्मटलें "मिस्टर डगलस ! आपला अशा तऱ्हेनें अपमान झालेल पाहून मला फार वाईट वाटतें. " बसलेल्या ठिकाणींच जरा ताठ होऊन—--

महाशय डगलस यांनीं उत्तर दिलं, कीं, "ते फ्रेडरिक डगलसचा अवमान करू शकणार नाहींत ! माझ्यामध्ये असलेल्या आत्म्याचा अपमान कोणाहि मनुष्याला करितां येणार नाहीं. या वागणुकीने माझा अपमान होत नाहीं, तर मला जे अशा रीतीनें वागवीत आहेत ते आपला स्वतःचा अपमान करून घेत आहेत !"

आमच्या देशांतील एका भागांत काळ्या व गोऱ्या ज्ञातीनीं निरनिराळ्या डब्यांत बसावें, असा कायदा आहे. या भागांत मीं एक मौजेचे उदाहरण पाहिलें. या उदाहरणावरून काळा रंग कोठें सुरू होतो आणि पांढरा कोठें संपतो, हें ओळखणे किती कठिण आहे, हें दिसून येते.

आपल्या समाजांत सुप्रसिद्ध असा एक नीग्रो मनुष्य होता. पण तो इतका गोरा होता, कीं, कोणाहि चतुर पारख्याला अगर परीक्षकाला त्याला काळ्या वर्गांत घालणें फार जड जात असे. काळ्या उतारूंसाठी राखून ठेविलेल्या डब्यांतून हा एकदां प्रवास करीत होता. गाडीचा कंडक्टर (म्यानेजर) जेव्हां त्याच्यापाशीं आला, तेव्हां तो गोंधळून गेलासे स्पष्ट दिसलें. जर तो मनुष्य नीग्रो असेल, तर त्याला गोऱ्या लोकांच्या डब्यांत पाठविण्याची जरूरी नाहीं; पण जर तो गोरा मनुष्य असेल, तर तूं नीग्रो आहेस काय, असें विचारून त्याचा अपमान करावा असे त्या कंडक्टरला वाटेना. त्या कामगारानें त्या मनुष्याकडे लक्ष्यपूर्वक पाहिले. त्याचे केस, डोळे, नाक आणि हात वगैरे तपासले, तरी त्याचा घोटाळा नाहींसा होईना. शेवटीं हें कोडें सोडविण्यासाठीं त्यानें वांकून त्या मनुष्याच्या पायांकडे पाहिलें. तसें करितांना त्या कंडक्टरला पाहून मीं मनांत ह्मटलें, कीं, "यानें मात्र आतां निकाल लागेल!" आणि तसा निकाल लागलाहि ! कारण, तो नीग्रो आहे असें त्यानें ठरवून तेथेच त्याला बसू दिलें. आमच्या ज्ञातीपैकीं एक इसम कमी झाला नाहीं, ह्मणून मी तिचें मनःपूर्वक अभिनंदन केलें !

मी अनुभवानें सांगतों, कीं, कोणाहि खऱ्या सभ्य गृहस्थाची पारख त्याला आपल्याहून कमी दर्ज्याच्या लोकांशीं मिसळण्याचा—-

प्रसंग आल्यावेळी करावी. दक्षिणेंतील जुन्या तऱ्हेचा सभ्य गृहस्य आपल्या जुन्या गुलामांशी किंवा त्यांच्या वंशजांशी आपली वागणूक कशी ठेवितो हें पाहिलें असतां, वरील विधान चांगलें स्पष्ट होईल. माझ्या विधानाचा मथितार्थ जार्ज वॉशिंग्टनविषयीं सांगितलेल्या एका गोष्टीनें विशेष स्पष्ट होतो. रस्त्यांत जार्ज वॉशिंग्टनला पाहून एका नीग्रोनें सभ्यपणानें आपली टोपी वर उचलली. जार्ज वॉशिंग्टननीं परत आपली टोपी वर केली. कांहीं गोऱ्या मित्रांनीं या त्यांच्या कृतीबद्दल बरीच टीका केली. त्यावर उत्तरादाखल जार्ज वॉशिंग्टन हमणाले "एका अशिक्षित काळ्या मनुष्याला माझ्याहून अधिक सभ्य मी होऊं देईन, असें तुह्मांला वाटतें काय ?"

इंडियन तरुण हाम्पटन येथे माझ्या ताब्यांत असतांना, अमेरिकेंत जातिभेद कसा चमत्कारिक आहे, हें दाखविणारे एकदोन प्रसंग माझ्या दृष्टीला पडले. एक इंडियन मुलगा आजारी पडला. मला त्याला घेऊन वाशिंग्टनला जावें लागलें, व त्याला आपल्या पश्चिमेकडील जंगली प्रदेशांत परत पोहोंचविण्यांत यावें, हमणून त्याला त्या प्रदेशाच्या सेक्रेटरीच्या हवालीं करून त्याबद्दल मला पावती घ्यावी लागली. त्यावेळीं मी जगाच्या रीतिभातींशीं अपरिचित होतों. वाशिंग्टनला येत असतांना आगबोटींत भोजनाची घंटा झाल्याबरोबर मी एकदम जेवावयाला न जातां बहुतेक उतारूंचें जेवण संपेपर्यंत वाट पाहिली. नंतर त्या मुलासहित मी भोजनगृहांत गेलों. त्या इंडियनला जेवण मिळेल, पण मला मिळणार नाहीं, असें तेथील मनुष्यानें मोठ्या सभ्यपणानें मला कळविलें ! माझा आणि त्या इंडियनाचा वर्ण सारखाच असल्यामुळे त्यानें आमच्या जाति कशा ओळखल्या, हें मला समजेना; पण तो मनुष्य या कामीं पूर्ण वाकबगार दिसला. हाम्पटन येथील अधिकाऱ्यांनीं मी मुलासहित वाशिंग्टन येथें अमुक हॉटेलांत उतरावें, असें सांगितलें होतें; पण तेथे जातांच तेथील कारकुनानें कळविले, कीं, त्या इंडियनाला हॅटेलांत घेतलें जाईल, पण माझी कांहींच सोय करितां येणार नाहीं !

पुढें, याच प्रकारचें आणखी एक उदाहरण माझ्या नजरेला आलें.मी एकदां एका गांवी गेलों होतों, तेव्हां तेथे इतका कांहीं क्षोभ आणि त्वेष माजला होता, कीं, आतां येथे सुलतानी न्याय, 'लिंच न्याय-Lynching सुरू होणार, असें मला कांहीवेळ वाटलें. या खळबळीचें कारण असे होतें, कीं, एका काळ्या कातडीच्या मनुष्यानें गांवांतील हॉटेलांत वस्ती केली असून तो मोरोक्कोचा नागरिक होता, व या देशांत प्रवास करितांना तो इंग्रजी भाषेत बोलला, असें तपासाअंतीं कळलें ! पुढे हा अमेरिकन नीग्रो नाहीं, असें कळतांच सर्व खळबळ एकदम शांत झाली ! यापुढें आपण इंग्रजी भाषा बोलतां कामां नये, असें तो मनुष्य शहाणपणानें शिकला.

इंडियन विद्यार्थ्यांबरोबर एक वर्ष घालविल्यानंतर मला हाम्पटन येथे दुसरी एक संधि मिळाली. टस्केजी येथे पुढें काम करण्याची पात्रता अंगी आणण्याकरितां मला आयती ही संधि ईश्वरानेंच आणून दिली, असें माझ्या मागील आयुष्याचा विचार केला असतां दिसतें. पुष्कळ काळे स्त्रीपुरुष शिक्षण मिळविण्याला फार उत्सुक आहेत, पण भोजन आणि पुस्तकें यांचा खर्च देण्याची ताकद नसल्यामुळे त्यांनां हाम्पटन संस्थेंत दाखल होतां येत नसे, असें जनरल आर्मस्ट्रांगनां आढळून आलें. हाम्पटन संस्थेला जोडूनच एक रात्रीची शाळा काढावी, आणि त्यां शाळेत हुषार आणि होतकरू अशा कांहीं नियमित स्त्रीपुरुषांनां, त्यांनीं दिवसा दहा तास काम करावें आणि रात्रीं दोन तास शाळेत शिकावें, या अटीवर घेण्यांत यावें, अशी जनरल आर्मस्ट्रांग यांनी योजना केली. या विद्यार्थ्यांनीं केलेल्या कामाबद्दल त्यांनां भोजनखर्चापेक्षां थोडीशी जास्त रक्कम देण्यांत यावी, त्यांची शिल्लक शाळेच्या तिजोरीत जमा करण्यांत यावी, व एकदोन वर्षे रात्रीच्या शाळेत काढल्यावर त्यांनां दिवसाच्या शाळेत घेऊन त्यांची शिल्लक भोजनखर्चाकडे उपयोग करण्यांत यावी, असें ठरलें. या रीतीनें त्यांनां संस्थेपासून पुष्कळ चांगले, परिणामीं हितावह फायदे मिळून, शिवाय त्यांनां कोणत्या तरी उद्योग—

धंद्याचा माहिती आणि पुस्तकें यांचाहि फायदा मिळावा, अशी ही योजना होती.

जनरल आर्मस्ट्रांग यांनी ही रात्रीची शाळा माझ्या ताब्यांत घेण्याला मला सांगितले, व मी तसे केलें. प्रथमारंभी या शाळेत खऱ्या कळकळीचे आणि सशक्त असे बारा स्त्रीपुरुष दाखल झाले. पुरुष दिवसा बहुतेक करवतीनें लांकूड चिरण्याचे काम करीत, आणि बायका धोबीखान्यांत काम करीत. दोन्ही ठिकाणचे काम कांही सोपे नव्हते; पण माझ्या सर्व अध्यापनांत यांनी जितकें मला समाधान दिले, तितकें दुसऱ्या कोणाहि विद्यार्थ्यांनी दिलें नाहीं ! ते चांगले विद्यार्थी होते, आणि आपलीं कामें ते पूर्णपणे शिकले. ते इतक्या आस्थेनें शिकत असत, की, निजावयाची घंटा झाली, की, ते निरुपायानें आपला अभ्यास बंद करीत, आणि केव्हां केव्हां तर निजावयाची वेळ झाली, तरी मीं धडे चालू ठेवावे, अशी मला निकड लावीत.

दिवसा कसून श्रम करण्यांत आणि रात्रीं नेटानें अभ्यास करण्यांत या विद्यार्थ्यांनी इतकी कांहीं कळकळ दाखविली, कीं, मीं त्यांनां 'पाणीदार वर्ग-The Plucky Class' हे नांव दिलें. हें नांव लागलेंच प्रिय होऊन सर्व संस्थेभर पसरले. रात्रीच्या शाळेत बरेच दिवस राहून आपल्या अंगांतील करामत दाखविली, हमणजे मी विद्यार्थ्याला खाली दिल्याप्रमाणें सर्टिफिकेट देत असेंः -

"जेम्स् स्मिथ याला सर्टिफिकेट देण्यांत येते, की, तो हाम्पटन संस्थेच्या 'पाणीदार वर्गा'पैकी आहे, आणि त्यानें एकसारखा चांगला टिकाव धरलेला आहे."

विद्यार्थी या सर्टिफिकेटांनां फार मान देऊ लागले, आणि त्यामुळे रात्रीची शाळा विशेष लोकप्रिय होऊ लागली. थोड्याच आठवड्यांत हे खातें इतकें बाढले, की, विद्यार्थ्यांची संख्या सुमारे पंचवीस झाली.

या पंचवीस स्त्रीपुरुषांची पुढे काय गति झाली, हें मीं पाहिलें आहे. ते सर्व आतां दक्षिणेंतील बहुतेक भागांत महत्त्वाच्या आणि उपयुक्त अशा कामांवर आहेत. हाम्पटन संस्थेची रात्रीची शाळा प्रथम बारा विद्यार्थ्यांनिशी सुरू झाली, पण आतां त्या शाळेत तीनशेंपासून चारशे विद्यार्थी आहेत, आणि ही रात्रीची शाळा त्या संस्थेचा अति महत्त्वाचा आणि कायमचा भाग झाली आहे !

प्रकरण सातवें.

टस्केजी येथील प्रारंभाचे दिवस.

हाम्पटन येथे रात्रीची शाळा आणि इंडियन विद्यार्थी माझ्या ताब्यांत 'असतांना, तेथील शिक्षकांच्या देखरेखीखालीं मी कांहीं अभ्यास चालू ठेविले. जनरल आर्मस्ट्रांगच्या नंतरचे हाम्पटन संस्थेचे हल्लीचे प्रिन्सिपाल रे. डॉक्टर एच्. बी. फिसेल् हे त्या शिक्षकांपैकी एक होते.

इ. स. १८८१ च्या मे महिन्यांत, ह्मणजे रात्रीच्या शाळेत शिकवि-ण्याचें सुरू केल्यानंतर सुमारें एक वर्षानें माझ्या आयुष्यांतील मुख्य काम सुरू करण्याची संधि मला अकस्मात् प्राप्त झाली. एकेदिवशों रात्री नेहमींची प्रार्थना आटोपल्यावर जनरल आर्मस्ट्रांग यांनीं भजन-मंदिरांत अशी गोष्ट काढिली, कीं, "अलाबामा संस्थानांतील टस्केजी-नामक लहानशा गांवांत काळ्या लोकांकरितां एक नार्मल स्कूल-नमुनेदार शाळा सुरू केली जाणार आहे, आणि ती शाळा ताब्यांत घेण्याकरितां कोणाची तरी शिफारस करावी, असें अलाबामा येथील कांही सद्गृहस्थांचें आपणाला पत्र आलेलें आहे." या जागेकरितां लायक असा कोणीहि काळा मनुष्य मिळणार नाहीं, असे त्या गृहस्थांनी गृहीत धरिलें असावेंसें दिसलें, आणि ह्मणूनच जनरल आर्मस्ट्रांग यांनीं कोणत्या तरी गोऱ्या मनुष्याची शिफारस करावी, ह्मणूनच ते अपेक्षा करीत होते. दुसऱ्या दिवशीं जनरल आर्मस्ट्रांगनीं मला आपल्या ऑफिसांत बोलाविलें, आणि " अलाबामा येथील जागा भरून काढशील ना ?" ह्मणून मला एकाएकीं विचारिलें. "प्रयत्न करून पाहीन," असें मी मोठ्या खुषीनें उत्तर दिले. त्याप्रमाणें त्यांनीं त्या गृहस्थांनां पत्र लिहून कळविले, की, कोणीहि गोरा मनुष्य मिळेल असें दिसत नाहीं; पण काळा मनुष्य घेण्याला ते तयार असतील, तर आपण एकाचें नांव सुचवू, आणि या पत्रांत त्यांनी माझें नांव सुचविलें.

बरेच दिवस गेले, तरी याविषयीं कांहींच जबाब आला नाही. कांहीं कालानंतर प्रार्थना मंदिरांत भजन चाललें असतां एका शिपायाने—--

—जनरलच्या हातांत एक तार आणून दिली. भजन आटोपल्यावर त्यांनी ती तार सर्वांनां वाचून दाखविली. 'बुकर टी. वॉशिंग्टन आह्मांला मान्य आहेत, त्यांनां ताबडतोब पाठवा,' असा तो संदेश होता.

विद्यार्थ्यांनां आणि शिक्षकांनां फार आनंद झाला, आणि त्यांनीं माझे मनापासून अभिनंदन केलें. टस्केजीस जाण्याची मीं लगेच तयारी केली. वेस्टव्हर्जीनियांतील आमच्या गांवावरून मी गेलों. घरीं कांहीं दिवस राहून नंतर टस्केजीस निघालों. टस्केजी हा लहानसा गांव असून तेथील लोकसंख्या दोन हजार होती. त्यांपैकीं काळे लोक बहुतेक निम्मे असावेत. हा अर्धा भाग दक्षिणेंतील कृष्णकटिबंधांत (Black Belt) मुख्यतः होता. टस्केजी गांव वसला होता, त्या प्रांतांत काळ्या आणि गोऱ्या लोकांची संख्या तीन ते एक या प्रमाणांत होती. कांहीं शेजारच्या प्रांतांत तर हें प्रमाण सहा ते एक असें होतें.

कृष्णकटिबंध ह्मणजे काय, असा प्रश्न मला पुष्कळदां विचारण्यांत आला आहे. प्रथम हा शब्द देशांतील काळ्या भागाला - जमीनीला लावण्यांत येत असे. दक्षिणअमेरिकेंत या काळ्या आणि सुपीक जमीनीचा बराचसा भाग असल्यामुळे तेथें गुलमांनां नेणें फारच फायदेशीर होत असे, आणि यामुळे तेथें पुष्कळ गुलामांनां नेण्यांत आले होतें. पुढें, ह्मणजे लढाई सुरू झाल्यानंतर हा शब्द राजकीय अर्थी वापरण्यांत येऊं लागला. ह्मणजे ज्या प्रांतांत गोऱ्यांपेक्षां काळे लोक अधिक आहेत, त्या प्रांतांनां हें नांव पडलें.

टस्केजीस जाण्यापूर्वी, इमारत आणि सर्व उपकरणें, शिक्षण सुरू करण्याला तयार असतील, असें मला वाटलें; पण तेथे गेल्यावर इमारतहि नाहीं आणि साधनेंहि नाहींत, हें पाहून माझी निराशा झाली. तथापि कितीहि बहुमोल इमारती आणि उपकरणें देऊ शकणार नाहींत, असे शेंकडों, खऱ्या कळकळीचे, आणि ज्ञानाकरितां हपापलेले आत्मे मात्र मला तेथें मिळाले !

टस्केजी येथील प्रारंभाचे दिवस.

शाळेकारतां टस्केजी हें फार उत्तम स्थळ आहे, असें दिसलें. हें गांव नीग्रो लोकांच्या वस्तीच्या मध्यभागीं असून निवांत होतें. रेल्वेच्या मुख्य रस्त्यापासून हें पांच मैल होतें. रेल्वेचा दुसरा एक लहानसा फांटा या गांवापर्यंत गेला होता. गुलामगिरीच्या दिवसांत आणि त्यानंतर हें गांव गोऱ्या लोकांच्या शिक्षणाचें केंद्र होतें. ही गोष्ट फार फायदेशीर झाली. कारण, शिक्षणांत,विद्येत आणि विनयांत येथील गोऱ्या लोकांची बरोबरी पुष्कळ ठिकाणच्या लोकाकडून झालेली नाहीं, असें मला आढळून आलें. काळे लोक अशिक्षित होते, तरी त्यांनीं आपलीं शरीरें मोठ्या शहरांतील खालच्या वर्गात प्रचलित असलेल्या दुर्गुणांनीं बिघडवून आणि अशक्त करून सोडलीं नव्हतीं. एकंदरींत दोन्ही ज्ञातींचे परस्परांशी संबंध फार चांगले व सुखावह असत, असें मला आढळून आलें. उदाहरणार्थ, गांवांत सर्वांत मोठें आणि एकच असलेलें असें लोखंडी सामानाचें दुकान एका काळ्या व गोऱ्या इसमांचे मिळून होतें, आणि ते दोघेहि त्या दुकानाची व्यवस्था पहात असत. गोऱ्या - मनुष्याच्या निधनापर्यंत हें भागीचें दुकान चाललें. टस्केजी येथें मी जाण्याच्यापूर्वी सुमारें एक वर्ष हाम्पटन येथें शिक्षणाविषयीं काय काय व्यवस्था केलेली आहे हें ऐकून, टस्केजी येथील कांहीं लोकांनीं आपल्या गांवांत एक नार्मल स्कूल सुरू करण्याकरितां कांहीं रक्कम द्यावी, असा अर्ज आपल्या प्रतिनिधींमार्फत सरकाराकडे पाठविला होता. सरकारानें ही विनंति मान्य करून दरवर्षी दोन हजार डालरचा विनियोग या कामीं करावा, असें ठरविलें; पण ही रक्कम शिक्षकांच्या पगारालाच खर्च व्हावयाची होती, आणि जमीनजुमला, इमारत किंवा उपकरणें विकत घेण्याविषयीं कांहीं सोय केली नव्हती, असे मला लवकरच कळून आलें. माझ्यावर सोंपविलेलें काम मला आशा- जनक वाटलें नाहीं. हें काम म्हणजे नवरानवरीवांचून वऱ्हाड करण्या-- तारखेंच होतें. काळ्या लोकांनां मात्र अतिशय आनंद झाला, आणि शाळा सुरू करण्याला शक्य तितकी मदत देण्याला ते एका पायावर तयार झाले.

माझें पहिलें काम ह्मणजे शाळेकरितां जागा पाहणें, हें होते. काळजीपूर्वक गांवांत जागा पाहण्याला हिंडल्यावर मला असे आढळून आलें, कीं, काळ्या लोकांच्या 'मेथाडिस्ट चर्च' जवळ असलेलें एक जुनाट पडकें लहानसें घर शाळेसाठीं, आणि तें चर्च सभामंदिरासाठीं उत्तम जागा होऊं शकेल. चर्च आणि तें घर हीं दोन्ही फार मोडकळीस आलीं होतीं. या इमारतींत प्रथम कांहीं दिवस मी शिकवीत असतांन ही इमारत इतकी नादुरुस्त होती, कीं, जेव्हांजेव्हां पाऊस पडे, तेव्हां तेव्हां जुन्या विद्यार्थ्यांपैकी एकादा मोठ्या मेहेरबानीनें आपले धडे सोडून येई, आणि मी दुसऱ्या मुलांचे धडे ह्मणून घेत असतांना माझ्यावर छत्री धरी, असें मला आठवतें. पुष्कळदां माझ्या घरधनिणीनें मी जेवीन असतांना माझ्यावर छत्री धरल्याचें मला स्मरण आहे.

मी अलाबामा येथे गेल्या वेळीं, तेथील काळे लोक राजकारणांत बरेंच लक्ष्य घालीत होते, आणि मींहि सर्वस्वीं त्यांच्या पक्षाला मिळावें, अशी त्यांची फार इच्छा होती. राजकारणाच्या बाबतींत परकीयांवर ते विशेषसा भरंवसा ठेवीत नसत, असें मला दिसून आलें. राजकारणांतील माझ्य भवितव्याविषयीं विचार करण्यासाठीं नेमलेला एक मनुष्य पुष्कळदा माझ्यापाशीं आला आणि त्यानें मोठ्या कळकळीनें मला असें सांगितलेलें आठवतें, कीं, "आह्मीं जशीं मतें देतों त्याप्रमाणें तुह्मींहि द्यावें, अश आमची इच्छा आहे. आह्मांला वर्तमानपत्रे फारशीं वाचतां येत नाहींत तरी आह्मांला मत कसें द्यावें हें समजतें; आणि आमच्याप्रमाणें तुह्मीही मत द्यावें असें आह्मांला वाटतें. गोरा मनुष्य कोणत्या बाजूनें आपलें मत देत आहे, हें कळेपर्यंत आह्मीं त्याच्यावर लक्ष्य ठेवितों; मग तो कोणत्य बाजूनें मत देतो हें आह्मांला कळलें, कीं, आह्मी त्याच्या अगदीं उलट मत देतों. नंतर आह्मांला असें वाटतें, कीं, आह्मी आमचे मत बरोबर दिलें. तथापि आतां मला सांगण्याला आनंद वाटतो, कीं, कोणी एकादा गोर आहे, ह्मणूनच त्याच्याविरुद्ध मत देण्याची प्रवृत्ति बहुतेक नाहींशी होत चालली आहे, आणि उभयज्ञातींचें हित कशांत आहे, याचा विचार करून मतदारानें आपलें मत द्यावें, हें तत्त्व आमची ज्ञात शिकत आहे.

टस्केजी येथील प्रारंभाचे दिवस.

मागें सांगितल्याप्रमाणे १८८१ च्या जून महिन्याच्या प्रारंभीं मी टस्केजी येथें आलों. शाळेसाठीं जागा पाहण्यांत, आणि खेड्यापाड्यांतील लोकांची राहणी नीट बारकाईनें अवलोकन करण्यांत, व शाळेत ज्यांनीं यावें असें मला वाटत होतें त्या लोकांमध्यें शाळेची प्रसिद्धि करण्यांत, मीं पहिला महिना घालविला. एक खेचर आणि एक गाडी घेऊन खेड्यापाड्यांतून मी प्रवास केला. मीं काळ्या लोकांबरोबर जेवण करीं आणि त्यांच्या झोपड्यांत राहीं. या रीतीनें त्यांचीं शेतें, त्यांच्या शाळा, त्यांचीं देवालयें मीं पाहिलीं. कोणी पाहुणा येणार आहे, याची आगाऊ बातमी न दिल्यामुळे मला लोकांची खरीखुरी स्थिति व नित्याची राहणी पहावयाला सांपडली.

मळ्याच्या भागामध्यें कुटुंबांतील सर्व मंडळी साधारणपणें एकाच खोलींत निजत असत. आणि केव्हांकेव्हां कांहीं पाहुण्यांचा समावेशहि यांतच होई. पुष्कळदां मी निजण्यासाठीं घराच्या बाहेर जात असें, आणि केव्हांकेव्हां तर सर्व मंडळी झोंपीं गेल्यावर मी निजत असें. जमीनीवर किंवा दुसऱ्या कोणाच्यातरी अंथरुणाच्या एका बाजूला माझी निजण्याची सोय ते करीत. हातपाय धुण्याकरितांसुद्धां झोंपडींत क्वचितच सोय केलेली असे. पण घराबाहेर अंगणांत त्याची कांहींतरी व्यवस्था ते अवश्य करीत.

लोकांचें नेहमींचें अन्न डुकराचें मांस व बाजरीची भाकरी, हें असे. पुष्कळ वेळां मीं खोपींमध्यें बाजरीची भाकर नुसत्या पाण्यांत उकडलेल्या काळ्या वाटाण्यांबरोबर खाल्लेली आहे. मांसावर व बाजरीवर - निर्वाह करण्याशिवाय लोकांनां दुसरी कांहीं कल्पनाच नव्हती. मांस व बाजरीचें पीठ गांवांतील मोठ्या दुकानांतून विकत आणीत. देशांत उत्पन्न होणारा कोणताहि भाजीपाला मळ्याभोंवतीं उत्पन्न करितां येण्याजोगा असूनहि त्यांचें तिकडे लक्ष्य जात नसे. कापूस पेरण्याखेरीज त्यांनां दुसरें कांहीं सुचत नव्हते, आणि कांहींकांहीं ठिकाणीं तर झोपडीच्या दरवाज्यापर्यंत जिकडेतिकडे कापूसच लावलेला असे.

सात डालर किंमत देऊन किंवा हप्तेबंदीनं घेतलेली शिवण्याची यंत्रे, आणि बाराचौदा डालरचीं भपकेदार घड्याळें, या झोपड्यांतून मला आढळलीं. एका प्रसंगीं, मी एकाच्या घरी जेवावयाला गेलो होतों. घरचे चार असामी आणि मी, असे सर्वजण मेजावर जेवावयाला बसलों. तरी आह्मां सर्वांकरितां एकच कांटा होता. यामुळे मला तिष्ठत बसावें लागलें. त्या घरांत समोरच्याच कोपऱ्यांत एक बाजाची पेटी होती. याविषयीं घरच्या मंडळीनें सांगितलें, कीं, या पेटीची किंमत साठ डालर असून ही किंमत आह्मी हप्त्यानें देत आहों. एक कांटा व साठ डालरची बाजाची पेटी ! पुष्कळ ठिकाणीं शिवण्याचें यंत्र उपयोगांत आणिलें जात नसे, व घड्याळे इतकीं गचाळ होतीं, कीं, तीं बरोबर चालत नसत, आणि जरी त्यांपैकी कांहीं बरोबर चालळीं, तरी घरांतील दहांपैकी नऊजणांनां किती वाजले हें सांगतां येत नसे, आणि बाजाची पेटी वाजविण्याच्याऐवजीं तशीच पडून राहिलेली होती !

वर निर्दिष्ट केलेल्या घरी माझा मान करण्याकरितां आपली नेहमींची पद्धत सोडून टेबलावर जेवण्याची व्यवस्था केली होती. बहुतेक ठिकाणी मंडळी सकाळीं निजून उठल्यावर घरधनीण तव्यावर एकादा मांसाचा तुकडा ठेवी, आणि मळलेल्या पिठाचा गोळा दुसऱ्या भांड्यांत घालून ठेवी. हीं दोन्ही भांडीं विस्तवावर थोडा वेळ ठेविलीं, कीं, सकाळचे जेवण तयार होत असे. नेहमीं हातांत भाकरी आणि मांस घेऊन घरधनी रस्त्यानें खातखात शेताला जाई. मग घरधनीण एका कोप-ऱ्यांत बसून एकाद्या ताटांतून किंवा भांड्यांतून न्याहारी करी, आणि मुलें अंगणांत इकडून तिकडे पळत असतांना आपल्या वांटणीचे भाकरीचे तुकडे व मांस खात. वर्षामध्यें जेव्हां कांहीं ऋतूंत मांस महाग होई, तेव्हां शेतांत काम न करणाऱ्या लहान मुलांनां मांस कचित्च मिळे.

सकाळची न्याहारी आटोपल्यावर घरांतील व्यवस्थेकडे बिलकूल लक्ष्य न देतां सर्व कुटुंब कापसाच्या शेताकडे नेहमीं जाई. खोरें किंवा कुदळ न झेंपणाऱ्या लहान मुलांनांहि शेतांत काम करावयाला लावीत, आणि—-

-तान्ह्या मुलांनां-हें एकादें तरी नेहमी असेच कापसाच्या एका रांगेच्या कडेला ठेविलेलें असे, व या रांगेची कापणी झाल्याबरोबर त्या मुलाची आई त्याला पाजावयाला घेई. सकाळच्या न्याहारीप्रमाणेच दोनप्रहरचें आणि संध्याकाळचें जेवण होई.

शनिवार व रविवार खेरीजकरून कुटुंबाचे सर्व दिवस बहुतेक एकाच क्रमाने जात असत. शनिवारीं सर्व मंडळी अर्धा दिवस किंवा - कधीकधीं सर्व दिवस शहरांत घालवी. शहरांत जाण्याचा त्यांचा उद्देश बहुतकरून बाजार करण्याचा असावा. कुटुंबाला लागणारे सर्व जिन्नस कोणालाहि दहा मिनिटांत खरेदी करितां आले असते. तथापि सर्व मंडळी दिवसभर शहरांत रस्त्यावर ठिकठिकाणीं उभे राहण्यांत घालवीत असे, आणि बायकाहि कोठेतरी बसून तंबाखू किंवा तपकीर सपाटून ओढीत. रविवारी मंडळी सभेला जात असे. कांहीं अपवाद खेरीजकरून बहुतेक पिकें गहाण टाकलेलीं असून बहुतेक काळे शेतकरी कर्जबाजारी असत. प्रांतिक सरकार खेड्यापाड्यांत सर्वत्र शाळा उभारण्याला असमर्थ होतें, आणि यामुळे बहुतेक शाळा देवालयांत किंवा लांकडांच्या झोंपडींत भरत असत. माझ्या प्रवासांत न मला पुष्कळदां असें आढळून आलें आहे, कीं, हिंवाळ्यांत शाळेची इमारत गरम ठेवण्याची कांहीं तजवीज केलेली नसे, आणि यामुळे अंगणांत विस्तव पेटवावा लागे, व शिक्षक आणि विद्यार्थी शेकण्यासाठी - बाहेर येतजात असत. या खेड्यापाड्यांच्या शाळेतील शिक्षक शिकविण्याच्या कामांत कुचकामाचे असत, आणि नीतिमत्तेनेंहि ते चांगले नसत. तीन ते पांच महिने शाळा भरत असे. शाळेत एका का जाड खरबरीत काळ्या फळ्याशिवाय दुसरी कोणतींहि उपकरणें नसत-मला एक असा प्रसंग आठवतो, कीं, मी एकदां एका जुन्या लांकडाच्या झोंपडींतील शाळेत गेलों असतां, तेथे पांच विद्यार्थी एकाच पुस्तकांतून धडा शिकत होते. या मुलांपैकी पहिल्या बांकावरील दोन विद्यार्थ्यांनीं आपल्यामध्यें तें पुस्तक धरिलें होतें व त्या दोघांच्या—

खांद्यांवरून वांकून पाहणारे दोन विद्यार्थी त्यांच्यामागे होते, आणि चौघांच्याहि मागे चौघांच्याहि खांद्यावरून वांकून पहाणारा एक छोटा विद्यार्थी उभा होता !

या शाळेच्या आणि शिक्षकांच्या स्थितीविषयी जें कांहीं वर वर्णन केले आहे. ते सर्व देवालये आणि पाद्री उपदेशक यांनां बरोबर लागू पडेल.

माझ्या प्रवासांत मला कांहीं विलक्षण व्यक्ति भेटल्या. खेडवळ लोकांच्या मनाची विचारसरणी कशी होती, हें खालील उदाहरणावरून आधिक स्पष्ट होईल, मी एका साठ वर्षांच्या काळ्या (नीग्रो) मनुष्याला त्याचा इतिहास सांगण्याला सांगितले, त्यावेळीं तो ह्मणाला "माझा जन्य व्हर्जीनियांत झाला, आणि १८४५ या साली मला अलाबामामध्ये विकले," त्यावेळी आणखी कितीजण विकले गेले, असें मी त्याला नंतर विचारले, तो ह्मणाला "आह्मी पांचजण मी, माझा भाऊ आणि तीन खेचरें "!

टस्केजीच्या आजूबाजूच्या प्रदेशांतील माझ्या प्रवासांतील वर्णनासंबंधी वर सांगितलेल्या परिस्थितीला चांगले व बरेच अपवाद होते, ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यास मी वाचकांनां सुचवितों. टस्केजीच्या आणि इतर संस्थेच्या कार्यामुळे आमच्या समाजांत पुढे ज्या कांहीं चांगल्या सुधारणा झाल्या आहेत, त्यांकडे चांगलें लक्ष्य वेधावें, ह्मणून माझ्या प्रवासांत जें कांही मी पाहिले, तें मीं स्पष्टपणे सांगितलें आहे.

प्रकरण आठवें.

तबेल्यांत आणि खुराड्यांत शाळा.

माझ्या एका महिन्याच्या प्रवासांत मी जें कांही निरीक्षण केलें, माझी छाती दडपून गेली,असें मी ह्मणतो. या लोकांची उन्नति करण्याचे काम बहुतेक अशक्यच होय, असे वाटले. माझ्या एकट्याच्या किंचित् प्रयत्नाने फारसे यश येणार नाही, असे मला स्पष्ट दिसू लागले. इतकेच नव्हे, तर माझ्या हातून हे कार्य होईल किंवा नाही, व असा प्रयत्न करणे वाजवी आहे किंवा कसे, याचीहि मला शंका बाई लागली. नीग्रो लोकांची खरी स्थिति पाहण्यांत एक महिना घालविल्यानंतर एका गोष्टीविषयी माझी खातरी झाली; आणि ती ही, की, त्यांच्या उन्नतीसाठी त्यावेळी प्रचलित असलेल्या अमेरिकेतील शिक्षणाहून कांही अधिक केलें पाहिजे. जनरल आर्मस्ट्रांग यांनीं हाम्पटन येथे मुरू केलेल्या पद्धतींतील चातुर्य मला पूर्वीपेक्षा अधिक कळून आले. मी ज्या लोकांमध्ये एक महिनाभर फिरलों, त्यांच्या मुलांनां शाळेत घेऊन रोज कांहीं जास्त पुस्तकी-शिक्षण देणें, ह्मणजे वेळेचा अपव्ययच करणे होय, असें मला वाटूं लागलें.

टस्केजी येथील रहिवाशांचा विचार घेऊन १८८१ च्या जुलईच्या ४थ्या तारखेला चर्चमध्ये आणि त्याजवळील पडक्या घरांत शाळा सुरू करण्याचे मी नक्की ठरविलें. नवीन शाळा सुरू करण्यांत काळ्यागोऱ्या दोन्ही लोकांचे लक्ष्य एकसारखें लागून राहिले होतें; आणि याविषयीं पुष्कळ खल होऊन शाळा सुरू होण्याचा दिवस केव्हां उगवेल, याची सर्वजण मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. ही योजना न आवडणारे बरेच लोक टस्केजीच्या आसपास होते. काळ्या लोकांनां याचा कांहीं उपयोग होणार नाहीं, अशी त्यांनी शंका प्रदर्शित केली, आणि जातीजातींमध्यें या योजनेनें कांहीं बिघाड उत्पन्न होईल, असेंहि त्यांनां वाटलें. ज्या मानानें नीग्रोंनां शिक्षण मिळेल, त्या मानानें संस्थानांत—--

- त्यांची सांपत्तिक दृष्ट्या किंमत कमी होईल, असें कांहींनां वाटलें. कारण, या लोकांनां अशी शंका आली, कीं, शिक्षण मिळाल्यावर नीग्रो लोक शेतीभाती सोडून जातील, आणि घरकामाकरितां ते लोक आपणांला मिळणें कठिण होईल.

ही नवीन शाळा सुरू करण्याच्या उपयुक्ततेविषयीं शंका वाटणाऱ्या गोऱ्या लोकांच्या मनांत असें येई, कीं, शिक्षण मिळाल्यावर नीग्रो उंच उभी टोपी घालील, नकली सोन्याचे चष्मे वापरील, भपकेदार काठी हातांत घेईल, करडाच्या चामडीचे हातमोजे, नानातऱ्हांचे ऐटबाज बूट आणि सर्व कांहीं वापरूं लागेल; थोडक्यांत सांगावयाचें, ह्मणते तो आपल्या बुद्धीनें सर्व कांहीं करूं लागेल. शिक्षणानें याशिवाय दुसऱ्या तहेचा नीग्रो कसा तयार होईल, हें समजणें या लोकांनां कठिण होतें !

शाळा सुरू करण्यांत आलेल्या अडचणींमध्यें, आणि त्यानंतर पुढे एकोणीस वर्षामध्ये आह्मांला टस्केजी येथील पुष्कळ गृहस्थांनीं मदत केली आहे. त्यांपैकीं दोघांजणांचा सल्ला मी नेहमीं घेत असे, आणि त्यांच्या देखरेखीखालीं सर्व कारभार करीत असें. मी कांहींहि त्यांना विचारावयाला गेलों, आणि त्या दोघांनीं नाहीं ह्मटलें, असें केव्हांच घडलें नाहीं. या कामांत मला जें कांहीं यश आलें, त्याचें श्रेय बहुतेक त्या दोघांनां आहे. हे दोघे नमुनेदार गृहस्थ होते. यांपैकीं एक गोरा असून पूर्वी तो गुलामांचा व्यापार करीत असे. त्याचें नांव मिस्टर जार्ज डब्ल्यू क्यांबेल. दुसरा काळा असून तो पूर्वी गुलाम होता, आणि त्याचें नांव मिस्टर लेविस ॲडम्स. या दोघां गृहस्थांनींच शिक्षक पाठवावा, ह्मणून जनरल आर्मस्ट्रांग यांनां लिहिलेलें होतें.

मिस्टर क्यांबेल हा व्यापारी व पेढीवाला आहे. त्याला शिक्षणविषयक बाबतींत फारच थोडा अनुभव आहे. मिस्टर ॲडम्स हा शिल्पी आहे. जोडे शिवणें, घोड्याचें सामान करणें आणि कथीलगाराचें काम, हें तीन धंदे तो गुलामगिरीच्या दिवसांत शिकला होता. तो कधीं एक दिवससुद्धां शाळेला गेला नाहीं, तरी कसेंबसें करून

तबेल्यांत आणि खुराड्यांत शाळा.

–तो लिहिणेंवाचणें शिकला. प्रथमपासून माझी शिक्षणाची सर्व योजना त्या दोघांजणांनीं नीट पाहिली. त्यांनां ती आवडल्यामुळे माझ्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांनी दुजोरा दिला. शाळेला पैशाची अत्यंत अडचण असलेल्या दिवसांत आह्मी मिस्टर क्यांबेल यांच्यापाशी गेलों, आणि त्यांनीं शक्य तितकी मदत केली नाहीं, असें केव्हांच झालें नाहीं. टस्केजी येथील शाळेची सुधारणा आणि व्यवस्था करण्याच्या कामीं या दोघांजणांशिवाय दुसऱ्या कोणाहि गृहस्थाचा सल्ला व विचार घ्यावा, असें मला वाटलें नाहीं.
गुलामगिरीच्या दिवसांत तीन धंदे चांगले अवगत करून घेत असतांना हातांनां मिळालेल्या शिक्षणापासून मिस्टर अॅडम्सला विलक्षण मानसिक सामर्थ्य प्राप्त झालें असावें, असें मला नेहमी वाटतें. आज जर कोणी दक्षिणेंतील कोणत्याहि शहरांत जाईल, आणि तेथील लोकांमध्यें अत्यंत विश्वासू व मुख्य असा कोणी नीग्रो आहे कीं नाहीं याची चौकशी करील, तर त्याला गुलागिरीच्या दिवसांत एकादा धंदा चांगला शिकलेला असा कोणी तरी नीग्रो, दहांत पांच या हिश्श्यानें दाखविला जाईल.
शाळा उघडलेल्या दिवशीं सकाळीं, तीस विद्यार्थी दाखल करून घेण्यांत आले. तेव्हां मीच काय तो एकटा शिक्षक होतों. या तीसांपैकी पंधरा विद्यार्थिनी होत्या. बहुतेक विद्यार्थी मॅकन प्रांतांतील होते. टस्केजी हैं याच प्रांतांचें मुख्य ठाणें होतें. आणखी बरेच विद्यार्थी दाखल होऊ पहात होते; पण, वयानें पंधरा वर्षावर असलेल्या व पूर्वी कांहीं थोडेंसें शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांनांच घ्यावें, असें ठरलेलें होतें. या तीस विद्यार्थ्यांपैकी बरेचजण सार्वजनिक शाळेतील शिक्षक होते, व कांहींजणांचें वय सुमारें चाळीस वर्षांचे होतें. या शिक्षकांबरोबर त्यांचे पूर्वीचें कांहीं शिष्यहि आले. गंमत अशी झाली, कीं, प्रवेशपरीक्षेत शिष्यच शिक्षकांपेक्षां हुषार ठरले, आणि त्यांनां शिक्षकांपेक्षां वरच्या वर्गात घालण्यांत आलें. आपण किती मोठीं पुस्तकें वाचलीं आहेत, आणि किती मोठमोठे विषय हस्तगत केले आहेत,--

आत्मोद्धार,

–असें त्यांपैकी कित्येकांनां सांगत असतांना पाहून फार मौज वाटे. जितकें मोठें पुस्तक आणि जितकें एकाद्या विषयाचे मोठें नांव, तितकी त्यांनां कृतकृत्यता वाटे. कांहींजणांनी लॅटिन भाषेचा अभ्यास केला होता, आणि एकादोघांनां ग्रीकभाषा येत होती. याकरितां आपणांला विशेष मान मिळावा, असें त्यांनां वाटत होतें.

खरोखर, मी वर सांगितलेल्या एक महिन्याच्या प्रवासांत मी एक मोठी खेदजनक गोष्ट पाहिली; ती ही, की, एका हायस्कूलांत शिकलेला एक तरुण मुलगा एका खोपट्यांत बसला होता. त्याच्या कपड्यांवर तेलकट डाग होते, त्याच्या भोवतालीं सर्व घाण पसरलेली होती, अंगणांत व बागेत रानगवत खूप वाढलें होतें, आणि ही स्वारी फ्रेंच व्याकरण वाचीत बसली होती !

प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांनां व्याकरण आणि गणित या विषयांतील लांब आणि अवघड नियम पाठ करण्याचा शोक दिसला; पण, हे तोंडपाठ केलेले नियम आपल्या नित्याच्या व्यवहारांत उपयोगांत आणण्याचा विचार किंवा कल्पना त्यांच्या मनांत नव्हती. ते मला सांगत असत, की, गणितांतील पेढी आणि कटमिती (Banking and discount) हे विषय आपण शिकलेलों आहों, आणि या विषयावरच बोलणें त्यांनां आवडत असे. पण, त्यांनीं किंवा त्यांच्यापैकी कोणींहि आपल्या आसपासच्या कोणत्याहि ब्यांकेंत रक्कम ठेविली नाहीं, असें मला आढळून आलें, विद्यार्थ्यांची नांवें रजिस्टर करतांना प्रत्येकाच्या नांवामध्ये एक किंवा दोन अक्षरें आहेत, असें मला आढळून आलें. 'जॉन जे. जेम्स' या नांवांत 'जे' हें अक्षर कशाकरितां आहे, असे विचारतां हें एक पदव्यांपैकींच कांहीं भाग आहे, असें मला सांगण्यांत आलें. शाळेत शिक्षक झाल्यानें बराच पैसा मिळवितां येईल, असें वाटल्यावरून शिक्षण मिळावें अशी पुष्कळांनां इच्छा झाली.

या बाबतीत त्यांच्यासंबंधानें माझा वरीलप्रमाणें अभिप्राय असला, तरी या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यासारखी उत्सुक आणि कळकळीची—



ऑलिव्हिया डेव्हिडसन वॉशिंग्टन.

–मंडळी मीं केव्हांहि पाहिलेली नाहीं. बरोबर काय आहे, हें दाखवून दिलें, ह्मणजे तें कळकळीनें शिकण्यास ते सर्व तयार असत. त्यांनां पुस्तकी ज्ञान पायाशुद्ध आणि पूर्ण द्यावें, असा मी निश्चय केला. ज्या मोठ्या विषयांचे ज्ञान आपल्याला अवगत झालें आहे अशी ते फुशारकी मारीत होते, त्या विषयांचे त्यांचें ज्ञान फारच तुटपुंजें होतें, असे मला आढळून आलें. नकाशावर साहाराचें अरण्य किंवा चायनाची राजधानी विद्यार्थिनी बरोबर दाखवीत असत; पण जेवणाच्या मेजावर सुऱ्या आणि कांदे बरोबर कोठें ठेवावे, किंवा भाकर आणि मांस कोणत्या ठिकाणी वाढावें, हें त्यांनां माहीत नव्हतें !

एक विद्यार्थी घनमूळ व पेढी आणि कटमिती शिकत होता, त्याला तूं प्रथम अकरकी चांगल्या रीतीनें घटीव, असें मला मोठ्या कष्टानें सांगावें लागलें.

विद्यार्थ्यांची संख्या दर आठवड्याला वाढत गेली, आणि पहिल्या महिन्याच्या शेवटीं ती पन्नास झाली. तथापि त्यांपैकी पुष्कळजणांनी आपणांला फक्त दोनतीन महिने राहतां येईल, आपणांला वरच्या वर्गात प्रविष्ट करावें, आणि शक्य असेल तर पहिल्याच वर्षों डिप्लोमा द्यावा, असें मला सांगितलें.

दीड महिन्यानंतर एक उत्तम व्यक्ति, शिक्षक या नात्यानें शाळेत आली. या व्यक्तीचें नांव मिस ऑलिव्हिया ए. डेव्हिडसन असे होते. पुढें ऑलिव्हिया माझी बायको झाली. मिस डेव्हिडसन ही ओव्हिओ संस्थानांत जन्मलेली होती, आणि त्या संस्थानच्या सार्वजनिक शाळेत तिचें प्राथमिक शिक्षण झालें होतें. ती थोडीशी मोठी झाल्यावर दक्षिणेत शिक्षकांची बाण आहे, असें तिच्या कानावर आले. पुढें मिसिसिपी संस्थानांत जाऊन ती तेथे शिकवू लागली. नंतर ती मैंफिस संस्थानांत शिकवीत होती. मिसिसिपी येथे शिकवीत असतांना तिच्या एका विद्यार्थ्याला देवीचा आजार आला. त्यावेळी ज्ञातीतील सर्व लोक इतके घाबरून गेले, कीं, त्या मुलाची शुश्रूषाहि कोणी करीना, मिस डेव्हिडसननें—

–_आपली शाळा बंद केली, आणि तो मुलगा बरा होईपर्यंत ती त्याच्या शुश्रूषेसाठी अहोरात्र त्याच्याजवळ राहिली. सुटीत ती आपल्या ओव्हिओ येथील घरी गेली असतां मेंफिस येथे 'यलो फीवर' नांवाच्या तापाची भयंकर सांथ सुरू झाली. अशी सांथ दक्षिणेंत केव्हां आली नव्हती. जेव्हां तिनें हें ऐकिलें, तेव्हां, जरी आपल्याला अशा तऱ्हेच्या तापाची सांथ ऐकून माहीत नाहीं, तरी देखील आपण या सांथीत दाईचें काम करण्याला तयार आहों, अशा आशयाची तार तिनें मेंफिसच्या शेरिफला दिली.

मिस डेव्हिडसनला दक्षिणेंत जो कांहीं अनुभव आला, त्यावरून लोकांनां पुस्तकीज्ञानापेक्षां कांहीतरी अधिक पाहिजे आहे, असे तिला दिसून आले. हाम्पटन येथील शिक्षणपद्धतीविषयी तिनें ऐकिलें, आणि दक्षिणेंत चांगलें काम करितां येण्याची पात्रता अंगी येण्याला अशा शिक्षणाचीच जरूर आहे, असें तिनें आपल्या मनाशीं ठरविलें. बोस्टन येथील मिसेस मेरी हेमेनवे या बाईचे लक्ष्य तिच्या असाधारण बुद्धिमत्तेकडे गेलें, आणि तिनें कृपाळूपणानें व औदार्यानें हिला मदत केल्यामुळे हिचा हाम्पटन येथील शिक्षणक्रम पुरा झाला. तसेंच फ्रामिंगहॅम येथील 'मॅसॅच्युसेटस नॉर्मल स्कूल' येथील दोन वर्षांचा शिक्षणक्रमहि संपविण्याची तिला संधि मिळाली.

फ्रामिंगहॅम येथे जाण्यापूर्वी तिला कोणी एकानें सुचविलें, को, तूं वर्णानें गोरी असल्यामुळे मॅसॅच्युसेटस येथील शाळेत आपण नीग्रो नाहीं असा लोकांचा समज करूं देणें तुझ्या फायद्याचें होईल. तिनें एकदम उत्तर दिलें, कीं, "कोणत्याहि सबबीवर व कसाहि प्रसंग आला असतां आपल्या ज्ञातीसंबंधानें आपण कोणाला फसविणार नाहीं!"

फ्रामिंगहॅम येथील शिक्षणक्रम संपल्यावर मिस डेव्हिडसन ही टस्केजीला आली. तिनें आपल्याबरोबर शिक्षणविषयक उत्तम पद्धतीचे अमोलिक ज्ञान, असाधारण नीतिमत्ता आणि निःसीम स्वार्थत्याग या गोष्टी आणिल्या. टस्केजी संस्थेच्या हातून जी कांहीं यशस्वी कामगिरी —---

—झाली, तिचा पाया घालण्यांत मिस ओलिव्हिया ए. डेव्हिडसनसारखी दुसऱ्या कोणीहि मदत केली नाही. मिस डेव्हिडसन आणि मी दोघेहि प्रथमपासून शाळेचे पुढे काय होईल, याचा विचार करूं लागलों. विद्यार्थी पुस्तकीज्ञान भराभर संपादन करून आपल्या मनाचा विकास करूं लागले; पण आमच्या विद्यार्थ्यांचे काही कायमचे कल्याण आमच्या हातून व्हावें असें असेल, त्यांनां निवळ पुस्तकीज्ञान देण्यापेक्षां अधिक कांहीतरी शिकविले पाहिजे, असे आह्मांला स्पष्ट दिसून आलें. आपल्या शरीराची जोपासना कशी करावी, याविषयी स्वतःच्या घरी कांहीं माहिती न मिळालेले बरेच विद्यार्थी येथे आले होते. टस्केजी येथील विद्यार्थ्यांची बहुतेक वसतिगृहे त्यांच्या स्वतःच्या घराहून फारशी चांगलीं नव्हती. स्नान कसें करावे, दांत आणि कपडे स्वच्छ कसे ठेवावे, हें शिकवावें असे आह्मांला - वाटत होते. काय खावें आणि तें योग्य रीतीनें कसें खावें, आणि - आपल्या खोल्या स्वच्छ कशा राखाव्या, हें आह्मी त्यांनां शिकविणार - होतो. याशिवाय त्यांनां कोणत्याहि एका उद्योगधंद्याचे असे व्यावहारिक - शिक्षण द्यावयाचें, आणि उद्योग, काटकसर, नीटनेटकेपणा यांची - अशी सवय लावून द्यावयाची, कीं, आमची संस्था सोडून गेल्याबरोबर त्यांनां या जगांत आपला उदरनिर्वाह चांगला करितां यावा. नुसतें - पुस्तकीज्ञान देण्यापेक्षां सर्व वस्तूंचे यथार्थ ज्ञान त्यांनां यावें, अशी आमची इच्छा होती.

शेतकीवरच मुख्यतः अवलंबून असलेल्या खेड्यापाड्यांमधून आमचे रहुतेक विद्यार्थी येत असत, असें आह्मांला आढळून आलें. गल्फ स्टेटमधील सुमारें शेंकडा पंचाऐशीं काळे लोक शेतकीवरच आपला निर्वाह - करीत, असें आह्मांला समजलें. अशी वस्तुस्थिति असल्यामुळे, शेतकी-पासून विद्यार्थ्यांनां परावृत्त करणारें शिक्षण दिल्यामुळे खेड्यापाड्यां कडील त्यांचा ओढा नाहींसा होऊन तो शहराकडे लागावा, आणि - यांनी शहरांतच आपल्या हिंमतीनें राहण्याच्या मोहाला बळी पडावें,

-असा प्रकार न होऊ देण्याबद्दल आह्मी फार जपत होतों. विद्यार्थ्यांपैकी बऱ्याचजणांनां पुढें शिक्षक होतां यावें आणि परत आपल्या मळ्याच्या प्रदेशाकडे जातां यावें, आणि शेतकी व त्या लोकांची बौद्धिक, नैतिक आणि धार्मिक रहाणी यांमध्ये नवा जोम आणि नवे विचार कसे घालाचे हें तेथील लोकांनां दाखवितां यावें, अशा त-हेचें शिक्षण त्यांनां देण्याचे आमच्या मनांत होतें.

या सर्व कल्पना आणि गरजा यांचे महत्त्व आह्मांला इतकें भासू लागले, कीं, त्यांच्या ओझ्यांखालीं आह्मी दडपून जाऊं, असे आह्मांला वाटलें. काय करावें हें कांहीं आह्मांला सुचेना. शाळेतील वर्गाच्या सोईसाठीं टस्केजी येथील काळ्या लोकांनीं दिलेली ती जुनी मोडकी तोडकी झोंपडी आणि जुनें देवालय इतकीच जागा आह्मांला होती. विद्यार्थ्यांची संख्या तर दिवसेंदिवस वाढूं लागली. आह्मीं त्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करूं लागलों, आणि जसजसा आह्मी खेड्यापाड्यांतून प्रवास करू लागलों, तसतसें विद्यार्थ्यांनां शिक्षण देऊन आणि शिक्षक या नात्यानें त्यांनां पाठवून त्यांच्याद्वारें ज्यांची आह्मी उन्नति करणार होतों, अशा लोकांच्या विद्यमान गरजांपैकी फारच थोड्या आमच्चा प्रयत्नानें निभावल्या जात, असें आह्मांला दिसून आलें.

त्या संस्थानांतील ठिकठिकाणांहून येणाऱ्या विद्यार्थ्यांशी जोजो आह्मी संभाषण करावें, तोंतों हातानें यापुढें काम करण्याची जरूर लागूं नये असे शिक्षण मिळावें, अशी बहुतेक विद्यार्थ्यांची इच्छा होती असें आह्मांला आढळून आलें.

अलाबामा येथील एका नीग्रोच्या गोष्टीवरून हें चांगलें सिद्ध होते हा जुलैंत एका उन्हाळ्याच्या दिवशीं कापसाच्या शेतांत काम करीन असतांना एकदम थांबला आणि आकाशाकडे पाहून ह्मणाल "हे परमेश्वरा ! कापसांत इतकें कांहीं रान वाढलेले आहे, आणि माझे काम इतकें कांहीं कठिण आहे, कीं, मला आतां तुझा धांवा केल्य वांचून राहवत नाहीं."

तबेल्यांत आणि खुराड्यांत शाळा.

शाळा सुरू झाल्यानंतर तीन महिन्यांनीं आह्मी आमच्या कामाविषयी फार काळजीत असतां, टस्केजी गांवाहून एक मैल असलेला एक जुना पडीत मळा मालकानें विकावयाला काढला. गुलामगिरीच्या दिवसांत मालक स्वतः रहात असलेलें मोठें घर जळून खाक झाले होतें. ही जागा तपासून पाहतां आह्मांला आढळून आलें, कीं, आमचे कार्य चांगलें चालण्याला आणि चिरस्थायि होण्याला हेंच स्थळ योग्य आहे.

पण हें ठिकाण आह्मांला कसें मिळावें? या जागेची किंमत फारच थोडी सांगत होते. फक्त पांचशें डालर. परंतु, आमच्याजवळ मुळींच पैसा नव्हता, आणि आह्मी परकी असल्यामुळे आमची पतहि नव्हती. आह्मी अडीचशें डालर रोख मोजावे, आणि बाकीचे अडीचशें डालर एका वर्षात द्यावे, या शर्तीवर मालक ती जागा आमच्या ताब्यांत देण्यास - तयार होता. पांचशें डालरला ही जागा फार स्वस्त होती खरी; पण ज्याच्यापाशीं कांहींच पैसा नाहीं, त्याला ही रक्कम फार मोठी होती.

अशा अडचणींमध्यें असतां मीं पुष्कळ धैर्य अंगीं आणून माझे मित्र, हाम्पटन संस्थेचे खजिनदार जनरल जे. एफ्. बी. मार्शल यांनां एक पत्र लिहिलें. त्यांत मीं सर्व परिस्थिति त्यांच्यापुढें ठेविली, आणि माझ्या स्वतःच्या जबाबदारीवर अडीचशें डालर उसने द्यावे, अशी विनंति केली. "हाम्पटन संस्थेचा पैसा उसना देण्यास आपणाला अधिकार नाहीं; पण आपल्या खासगी शिलकेंतून ही रक्कम मोठ्या आनंदानें आपण उसनी देऊं," असें थोड्या दिवसांत त्यांचें उत्तर आलें.

- अवचित अशा रीतीनें ही रक्कम मिळाल्यामुळे मला आश्चर्य वाटलें, व आनंदहि झाला. आतांपर्यंत शंभर डालरइतकी रक्कम माझ्या हातीं केव्हांहि आली नव्हती, आणि यामुळे जनरल मार्शलकडे उसनी मागितलेली रक्कम मला फारच मोठी वाटली. इतक्या मोठ्या रकमेच्या फेडीची जबाबदारी माझ्यावर आहे, या गोष्टीनें माझी छाती दडपून गेली.

नवीन जागेत शाळा नेण्याची तयारी मी फार जारीने चालविली. आम्ही ही जागा ताब्यात घेतेवेळी तेथे भोजनाची खोली, जुने स्वयंपाकघर आणि एक जुने खुराडे (कोबड्यांबदकांचे पर) अशा चार इमारती होता. एकदोन आठवड्यांतच आम्ही या इमारतो उपयोगांत आणिल्या .तबेल्याची दुरुस्ती करून तेथे धडे पाठ ह्मणण्याच वर्ग ठेवण्यांत आला आणि नंतर खुराड्याचीहि तशीच व्यवस्था करण्यांत आली .

मला आठवते की, एके दिवशी सकाळी माझ्या एका जवळच्या मदत करणाऱ्या निग्रो मित्राला मी सांगितले, की, "आमची शाळा इतकी वाढली आहे की, खुराड्याचाहि शाळेच्या कामाला उपयोग करावा लागेल, आणि ते दुसऱ्या दिवशी साफ करण्याकरितां तुझी मदत पाहिजे आहे." तेव्हां तो मोठ्या कळकळीने ह्मणाला "महाराज आपले काय म्हणणे आहे ?काय दिवसा तुह्मी ते कोंबडीचे घर खचित स्वच्छ करणार ह्मणतां ?

दुपारी शाळा सुटल्यावर नवीन जागा शाळेच्या कामाकरितां तयार करण्याचे बहुतेक काम विद्यार्थ्यांनीच केले. खोल्या तयार झाल्य बरोबर एकादें पीक पेरतां यावें, ह्मणून कांही जमीन साफसूफ करण्याचाहि मी निश्चय केला. माझा बेत तरुण मंडळीला फारस रुचला नाही, असे मला दिसून आले. जमीन साफसूफ करणें आणि शिक्षण, या दोहोंमधील संबंध समजणे यांना फार कठिण होते; शिवाय, त्यापैकी पुष्कळजण शिक्षक होते, व जमीन साफसूफ करण्याचे आपली इभ्रत काय राहील, असा त्यांनी प्रश्न केला.त्यांनां पेचांत घालू नये,, ह्मणून प्रत्येक दिवशी शाळा सुटल्यावर हातांत कुन्हाड घेऊन मी जंगलाकडे जाऊं लागलो. मी काम करण्याला भीत नाहीं किंवा लाजत नाही, असे पाहून तेहि अधिक उत्साहाने मला मदत करू लागले. रोज दोनप्रहरी आह्मी काम करून सुमारे वीस एकर जमीन साफसूफ केली, आणि त्यांत पीक पेरिलें .

–मध्यंतरीं कर्ज कसें फेडावें, याबद्दल मिस डेव्हिडसनचे बेत चालले होते. तिचा पहिला प्रयत्न ह्मणजे जत्रा भरविणे हा होय. तिनें टस्केजी शहरांतील गोऱ्या आणि काळ्या कुटुंबांत स्वतः जाऊन खटपट केली, आणि जत्रेत विकतां येण्याजोग्या वस्तु, केक (खाण्याचा पदार्थ) कोंबडीं, भाकर किंवा 'पाय' (एक पक्कान्न) इत्यादि कांहीं पदार्थ देण्याचें त्यांच्याकडून अभिवचन घेतलें. काळे लोक आपल्या हातून देववेल ती वस्तु आनंदानें देत असतच; पण मला येथें हें सांगितले पाहिजे, कीं, मिस डेव्हिडसननें एकाद्या गोऱ्या कुटुंबाकडे विनंति केली आणि त्यांच्याकडून तिला कांहींच मिळालें नाहीं, असा प्रकार घडलाच नाहीं ! अशा रीतीने गोऱ्या कुटुंबांनींहि शाळेविषयीं आपली कळकळ नानातऱ्हांनीं व्यक्त केली.

असे पुष्कळ बाजार भरविण्यांत आले, आणि त्यांयोगें थोडीशी रक्कमहि जमली. उभयज्ञातींच्या लोकांकडून रोख रक्कम मिळावी ह्मणून प्रयत्न करण्यांत आले, आणि विनंति केलेल्या बहुतेक लोकांनीं - लहानलहान रकमा दिल्या. आपल्या आयुष्याचे उत्तम दिवस गुलामगिरींत काढलेल्या वृद्ध नीग्रोंकडून आलेल्या देणग्या हृदयद्रावक होत्या. कित्येकदां ते पांच, तर कधींकधीं पंचवीस सेंटस् देत असत; केव्हांकेव्हां चादर देत व केव्हांकेव्हां तर ऊंस देत. ही रक्कम जमा करीत असतांना - एक सत्तर वर्षाची ह्मातारी नीग्रो बाई मला भेटण्याला आलेली आठवते. काठी टेंकीतटेंकीत मी बसलेल्या खोलींत ती बाई लंगडत आली. तिच्या अंगावर चिंध्या होत्या, पण त्या स्वच्छ होत्या. ती मला ह्मणाली "वॉशिंग्टन ! माझ्या आयुष्यांतील उत्तम दिवस गुलामगिरीत गेले, हे ईश्वराला माहीत आहे. तसेंच मी अज्ञानी आणि गरीब आहे, हेंहि त्याला ठाऊक आहे. पण, तूं आणि मिस डेव्हिडसन काय करीत आहां, हेंहि मी जाणत आहें. तुह्मीं आमच्या जातींत उत्तम पुरुष आणि क उत्तम बायका तयार करण्याची खटपट चालविली आहे. मजजवळ तर पैसा नाहीं; परंतु मीं जमविलेली ही सहा अंडीं तूं घ्यावींस आणि—--

–या मुलांमुलींच्या शिक्षणाकडे त्यांचा विनियोग करावास, अशी माझी इच्छा आहे."

टस्केजी येथील शाळा सुरू झाल्यापासून त्या संस्थेच्या हितार्थ पुष्कळ देणग्या स्वीकारण्याचा सुयोग मला प्राप्त झाला आहे; परंतु दुसऱ्या कोणत्याहि देणगीनें या देणगीइतकें माझें अंतःकरण सद्गदित केलें नाहीं !

प्रकरण नववें.

दगदगीचे दिवस आणि निद्रारहित रात्री.

अलाबामा संस्थानांत येऊन राहिल्यावर पहिल्या नाताळांत लोकांच्या 'राहणीची खरी माहिती मिळण्याची संधि पुनः आह्मांला मिळाली. मुलांचे घोळके येऊन 'नाताळच्या देणग्या द्या ! नाताळच्या देणग्या या !' असें ह्मणत पहांटे आमच्या दरवाज्यावर थापा मारूं लागले. सकाळी दोन ते पांचच्या दरम्यान आमच्या दरवाज्यावर निदान पन्नास तरी तडाके बसले असावेत. दक्षिणेच्या या भागांत आजसुद्धां ही चाल आढळून येते.

गुलामगिरीच्या दिवसांत दक्षिणेंतील सर्व संस्थानांत काळ्या लोकांनां नाताळांत एक सबंध आठवडा सुटी देण्याची वहिवाट होती. नीग्रो ज्ञातींतील पुरुषमंडळी आणि बहुतेक बायकामंडळीहि या सुटींत झिंगलेली असे. टस्केजी गांवांत आणि आजूबाजूला नाताळच्या पूर्व-दिवशीं काळे लोक काम बंद करीत, आणि त्या दिवसापासून नवें वर्ष सुरू होईतोंपर्यंत कसलेंहि काम करण्यास कोणीहि मनुष्य मिळत नसे. बाकीच्या दिवसांत दारूला न शिवणारे लोकहि या नाताळाच्या आठवड्यांत कडक व जालीम मद्य यथेच्छ सेवन करीत. जिकडेतिकडे लोक दारू वगैरे पिऊन चैन करीत, व बंदुका, पिस्तुलें व बंदुकीची दारू यांचा बेफाम उपयोग करीत. या सणाची पवित्रता बहुतेक विसरून गेल्यासारखीच होती, असें ह्मणण्याला हरकत नाहीं.

पहिल्या नाताळच्या सुटींत एका मोठ्या मळ्यांतील लोकांनां भेटण्याला मी गांवाहून कांहीं अंतरावर गेलों. बहुतेक भागाला अत्यंत प्रिय आणि पवित्र असलेल्या या सणांत हे गरीब आणि अज्ञानी लोक चैन मारण्यासाठी धडपडत असलेले पाहून मला त्यांची कींव येत असे. एका झोंपडींत मला असें आढळून आलें, कीं, ख्रिस्तजयंतीची आठवण होण्यास एकच फटाक्यांचा पुडा होता, व तो झोंपडीतील पांच मुलांनी —-

आपापसांत वांटून घेतला. दुसऱ्या एका झोपडीत निदान अर्धा डझन लोक होते आणि त्यांच्याजवळ सुमारें पांच आणे किंमतीचीच जिंजरकेक होती, व त्यांनी ती आदल्या दिवशी छापाच्या दुकानांतून विकत आणिली होती. दुसऱ्या एका कुटुंबांत उंसांच्या कांही थोड्या कांड्या होत्या. आणखी एका झोंपडीत स्वस्त व हलकी व्हिस्की असलेली एक सुरई मला आढळली. त्या झोंपडींतील इसम जरी पाद्री होता, तरी तो आपल्या बायकोसह ती व्हिस्की यथेच्छ पीत असे. कांही थोड्या ठिकाणीं लोकांनां, जाहिरातीसाठी तयार केलेली कांही रंगीत कार्डे मिळाली, आणि ते या कार्डांचेंच मोठे कौतुक करीत होते, असे मला आढळले. दुसऱ्या कांहीं कुटुंबांतील कित्येकांनी पिस्तुले विकत आणिली होती. शेतांतील काम बंद करून लोक आपल्या घरी लोळत पडले होते. या गोष्टीशिवाय ख्रिस्तजयंतीचे दुसरे स्मारक बहुतेक ठिकाणी नव्हतें. नाताळच्या आठवड्यांत रात्री लोक मळ्यांतील खोलीत एक तऱ्हेचा नाच नाचत असत. ते घरीच व्हिस्की पीत, आणि पिस्तुलें व हत्यारे घेऊन दंगा करीत असत.

नाताळांत याप्रमाणे मी लोकांच्या भेटीला गेलों असतां मला तेथील उपदेशकांपैकी एक वृद्ध नीग्रो भेटला. नंदनवनांत ॲडमला आलेल्या अनुभवावरून त्यानें माझी अशी खात्री करण्याचा प्रयत्न केला, की, ईश्वरानें सर्व तऱ्हेच्या उद्योगाला निंद्य मानिलें आहे, आणि यास्तव मनुष्यानें उद्योग करणें हें पाप आहे. या मनुष्यानें होतां होईलतों कमी काम करण्याची खटपट चालविली होती. त्यावेळीं तो अत्यंत सुखी दिसला. कारण, पापरहित असा एक आठवडा तरी रहावयाला मिळाला, असें तो ह्मणत असे.

शाळेमध्यें नाताळ ह्मणजे काय आहे हें शिकविण्याची, आणि तो कसा पाळावा हे समजून सांगण्याची आह्मीं विशेष खटपट केली. आणि यांत आह्मांला इतकें यश आलें, कीं, टस्केजीच्या आसपासच नव्हे, तर जेथे जेथें आमचे ग्रॅज्युएट लोक गेले आहेत, तेथेहि आतां—-

दगदगीचे दिवस आणि निद्रारहित रात्री.

—या सणाचा अर्थ बदलला आहे, असें सांगण्यास मला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. हल्लीं, दुसऱ्यांच्या विशेषतः अभागी लोकांच्या सुखाकडे व सोयींकडे लक्ष्य देण्यांत आमचे ग्रॅजुएट आणि विद्यार्थी हे स्वार्थत्यागानें आणि उदारपणानें आपली सुटी खर्च करितात, हेंच एक नाताळाचें आणि इतर सणांचे प्रमुख अंग झालें आहे. थोड्या दिवसांपूर्वी आमच्या तरुण विद्यार्थ्यांपैकीं कांहींजणांनी एका वृद्ध पाऊणशें वर्षांच्या अनाथ बाईची झोंपडी बांधून देण्यांत आपली सुटी खर्च केली. दुसऱ्या एका प्रसंगी एका रात्री भजनमंदिरांत एका गरीब विद्यार्थ्याला कोट नसल्यानें त्याला थंडीचा विकार जडलेला आहे असें मीं सर्वांना सांगितलें, तो दुसऱ्या दिवशीं त्या मनुष्यासाठीं माझ्या ऑफिसांत दोन कोट पाठवून देण्यांत आले.

टस्केजी गांवच्या आणि त्याच्या आसपासच्या गोऱ्या लोकांचा कल शाळेला मदत करण्याचा होता, हे मीं वर सांगितलेंच आहे. ही शाळा त्या भागांतील सर्व लोकांची आहे, असें त्यांनां भासू देण्याचा मीं प्रथमपासून बेत ठेवला. ही परकीयांनीं स्थापन केलेली शाळा आहे, आणि त्या शाळेविषयीं आपली कांहीं जबाबदारी किंवा हितसंबंध नाहीं, असें कोणाएकालाहि वाटूं न देण्याचा मीं निश्चय केला. शाळेच्या जागेसाठीं सर्वांनीं वर्गणी द्यावी, अशी त्यांनां विनंति केल्यामुळे ही शाळा बहुतेक आपल्या सर्वांची आहे, असा त्यांचा समज होऊ लागला आहे, असें मला दिसून आलें. ही संस्था सर्व लोकांची आहे, व बोस्टनमध्यें जसे आह्मी गोऱ्या लोकांची मैत्री संपादन करण्याची खटपट करीत होतों, तसेच टस्केजींतीलहि गोऱ्या लोकांची मैत्री आह्मांला हवी आहे, आणि या शाळेचा सर्व लोकांनां खरा उपयोग होणार, हें सर्व जेव्हां आह्मीं त्यांनां जाणवू लागलों, तेव्हां सर्व लोकांचें शाळेविषयीं मत फार अनुकूल झालें.

कदाचित् येथे मला हे सांगावें लागेल-मी हें विधान पुढें सिद्ध करीन कीं, टस्केजी येथील आणि अलाबामा संस्थानांतील संबंध दक्षिणेंतील—----

—गोऱ्या लोकांसारखे, सांप्रत टस्केजीच्या शाळेला कळकळीनें व उत्साहानें मदत करणारे मित्र दुसरे कोणी आहेत, असें मला वाटत नाहीं. आपल्या शेजाऱ्याशीं, मग तो काळा असो वा गोरा असो, सरळ आणि दिलदार अंतःकरणानें मैत्री करावी, असें मी दक्षिणेंतील लोकांनां पहिल्यापासून सांगत आलों आहें. तसेंच, जेथें कांहीं तत्त्वाला बाध येत नसेल, तेथें स्थानिक हितसंबंध पाहून त्याप्रमाणें आपल्या मित्रांनां मत देण्याचा सल्ला द्यावा, असेंहि मीं सांगितलें आहे.

शाळेच्या जागेची रक्कम जमविण्याचें काम कित्येक महिने एकसारखें चाललें. तीन महिन्यांनंतर जनरल मार्शलचे अडीचशें डालर फेड करून टाकण्याइतकी पुरेशी रक्कम जमली, आणि पुढें दोन महिन्यांच्या आंत पांचशें डालर ही रक्कम जमून गेली, आणि शंभर एकर जमिनीचें आमच्या नांवें खरेदीपत्रहि झालें. या गोष्टीनें आह्मांला फार आनंद झाला. शाळेला कायमची जागा मिळाली, एवढी एकच समाधानाची गोष्ट नव्हे, तर जमलेल्या रकमेपैकी बहुतेक पैसा टस्केजी येथील काळ्यागोऱ्या लोकांकडूनच मिळालेला होता, हीहि गोष्ट तितक्याच समाधानाची होती. यापैकी बहुतेक रक्कम जत्रा,जलसे व बैठकी आणि लहानसहान देणग्या अशा उपायांनीं मिळविलेली होती.

आमचा दुसरा प्रयत्न ह्मणजे जमिनीचे पीक वाढवून त्यापासून कांहीं पैसा कमवावा, आणि त्याबरोबरच विद्यार्थ्यांनांहि शेतकीचें शिक्षण द्यावें, हा होता. त्याप्रयाणें टस्केजी येथील उद्योगधंदे स्वाभाविक आणि योग्य क्रमानें, तेथील लोकांच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेला अनुसरून सुरू केले आहेत. शेतकीपासून प्रथमच आह्मीं आरंभ केला. कारण, उदरनिर्वाहाची तजवीज अगोदर करणें हें केव्हांहि जरूर आहे.

पुष्कळ विद्यार्थ्यांनां शाळेत थोडेच आठवडे राहतां येत असे. कारण, आपला भोजनखर्च देण्याला त्यांच्याजवळ फारच थोडा पैसा उरे. विद्यार्थ्यांनां कामाच्या मोबदला पैसे मिळून नऊ महिने शाळा चालू—--

दगदगीचे दिवस आणि निद्रारहित रात्री.

–असतांना राहतां यावें, हा एक औद्योगिक शिक्षण सुरू करण्यांत हेतु होता.

शाळेतील पहिलें जनावर ह्मणजे टस्केजी येथील एका गोऱ्या नागरिकानें दिलेला जुना आंधळा घोडा होय. हल्ली या संस्थेत दोनशें घोडे, शिंगरें, खेंचरें, गाई-वांसरें, बैल व सुमारें सातशें डुकरें आणि याशिवाय बऱ्याच मेंढ्या व बकरी आहेत.

शाळेतील मुलांची संख्या एकसारखी इतकी वाढू लागलीं, कीं, जागेची किंमत देऊन शेतकी सुरू केल्यावर आणि खोल्यांची कांहीं दुरुस्ती केल्यावर एक मोठी बळकट इमारत बांधण्याकडे आह्मीं आमचें लक्ष्य वळविलें. या गोष्टीविषयीं आह्मीं बराच विचार करून सुमारें सहा हजार डालर लागणाऱ्या इमारतीचे नकाशे तयार करविले. ही रक्कम आह्मांला अतिशय मोठी वाटली; पण शाळेची प्रगति तरी झाली पाहिजे किंवा अवनति तरी झाली पाहिजे. कारण, विद्यार्थ्यांच्या राहणीवर आमची - पूर्ण देखरेख असल्याशिवाय आमचे प्रयत्न कधींहि सफल होणार नाहींत, - हें आह्मी जाणून होतों.

या सुमाराला घडून आलेल्या एका गोष्टीनें मला मोठें समाधान आणि आश्चर्य वाटलें. एक नवीन मोठी इमारत बांधण्याविषयी आमची वाटाघाट चालली आहे, असें जेव्हां गांवांत समजलें, तेव्हां टस्केजी-जवळच काम करीत असलेला लांकडाचा एक गोरा कारखानदार मजपाशीं आला आणि ह्मणाला, की, "नवीन इमारतीकरितां लागणारे सर्व लांकडीसामान मी येथे आणून उभें करितों, व त्याबद्दल पैसा मिळेल त्यावेळीं देईन-इतकें आपले वचन मला मिळालें ह्मणजे बस्स आहे, त्याखेरीज मला कोणतीहि ग्यारंटी हमी नको आहे!" जरूर असलेल्या रकमेपैकी तूर्त आमच्या हातीं एकहि डालर नाही, असें मी त्याला स्पष्ट सांगितलें. तथापि, लांकडीसामान आणून उभे करतोंच, असा त्यानें आग्रह चालविला. कांही पैसा जमविल्यावर आह्मी त्याला तसें करूं दिलें.

–टस्केजी येथील आणि आसपासच्या काळ्यागोऱ्या लोकांकडून नव्या इमारतीकरितां लहानलहान वर्गण्या अनेक तऱ्हांनीं जमविण्याचे काम मिस् डेव्हिडसन्नें पुनः सुरू केलें. या भावी इमारतीबद्दल काळ्या लोकांनां जितका आनंद झाला, तितका दुसऱ्या लोकांनां कोणत्याहि गोष्टीनें झाला असल्याचे मीं पाहिलें नाहीं. एके दिवशी ही नवीन इमारत बांधण्याचा फंड कसा जमवावा, याविषयीं सभा भरविली असताना एक फार वृद्ध काळा मनुष्य बारा मैलांवरून आला, आणि आपल्या खटारगाडींतून त्यानें एक मोठा डुक्कर आणिला. सभा चालली असतांना तो मध्येच उठून ह्मणाला, कीं, माझ्याजवळ देण्यास कांहीं पैसा नाहीं, पण मीं दोन चांगले डुक्कर पाळलेले असून त्यांपैकी इमारत-खर्चाकरितां वर्गणी ह्मणून मीं एक येथे आणलेला आहे. शेवटी तो असें ह्मणाला, कीं, ज्या नीग्रोला आपल्या ज्ञातीविषयीं कांहीं प्रेम असेल आणि स्वतःविषयीं कांहीं अभिमान असेल, तो दुसऱ्या सभेला एक डुक्कर आणल्यावांचून राहणार नाहीं! दुसऱ्या पुष्कळ लोकांनीं इमारत खर्चासाठीं आपलें कांहीं दिवसाचें काम देण्याचे कबूल केलें.

टस्केजी येथे शक्य तितकी मदत मिळाल्यावर अधिक फंड जमविण्याकरितां मिस डेव्हिडसनने उत्तरेकडे जाण्याचा निश्चय केला. कित्येक आठवडे तिनें पुष्कळांच्या भेटी घेतल्या, आणि देवालयें, रविवारच्या शाळा व दुसऱ्या संस्था येथे भाषणें केलीं. हें काम मोठे अवघड आणि त्रासदायक होतें. शाळेची माहिती फारशी कोणाला नव्हती; पण उत्तरेकडील चांगल्याचांगल्या लोकांचा तिच्यावर विश्वास बसण्याला फार काळ लागला नाहीं.

उत्तरेकडील मनुष्यांकडून प्रथम देणगी मिळाली, ती न्यूयॉर्कमधील एका स्त्रीकडून होय. ही बाई, प्रथम मिस डेव्हिडसन् उत्तरेकडे जात असतां तिला आगबोटींत भेटली. आगबोटींत दोघीजणींचें भाषण सुरू झालें, आणि टस्केजी येथे चाललेले प्रयत्न ऐकून त्या बाईला इतकें कौतुक बाटलें, कीं, तिनें जातेवेळीं मिस डेव्हिडसनच्या हातांत पन्नास डालरचा—

—एक चेक दिला. आमचे लग्न होण्यापूर्वी कांहीं दिवस, आणि लग्न झाल्यावरहि, पत्रद्वारा माहिती पाठवून आणि स्वतः भेट घेऊन दक्षिण व उत्तरअमेरिकेंत वर्गणी गोळा करण्याचे काम मिस डेव्हिडसननें चालू ठेविलें. पण त्याबरोबरच ती टस्केजी शाळेत लेडी प्रिन्सिपालचे आणि अध्यापिकेचें कामहि करीत असे. याशिवाय टस्केजींतील आणि आसपासच्या वृद्ध लोकांतहि ती काम करी, आणि गांवांत रविवारच्या शाळेतील एक वर्ग शिकवी. ती फार सशक्त नव्हती, तरीपण आपल्या आवडत्या संस्थेविषयीं सर्व शक्ति खर्च करीत असल्याशिवाय तिला चैन पडत नसे. टस्केजी संस्थेकडे लोकांचें चित्त वेधण्यासाठीं दिवसभर ती दारोदार हिंडून इतकी दमून जाई, कीं, रात्रीं तिला आपला पोषाख उतरतां येत नसे. बोस्टनमध्यें मिस डेव्हिडसन् ही ज्या एका बाईला भेटावयाला गेली होती त्या बाईनें मला नंतर सांगितलें कीं, "मिस डेव्हिडसन् भेटावयास आली होती, त्यावेळी आपण कामांत असल्यामुळे तिला दिवाणखान्यांत कांहीं वेळ तिष्ठत बसावें लागलें, आणि आपण येऊन पहातों, तों मिस डेव्हिडसन् थकल्यामुळे झोपी गेलेली होती."

ब्रुकलीन (न्यूयॉर्क) येथील ए. एच. पोर्टर नांवाच्या सद्गृहस्थानें बरीचशी रक्कम दिल्यामुळे आह्मीं आमच्या पाहिल्या इमारतीचें नांव 'पोर्टर हॉल' असें ठेविलें. या इमारतीचे बांधकाम चालू असतां आह्मांला पैशाची नड फार भासली. मीं एका सावकाराला अमुक दिवशीं चारशें डालर देईन असें वचन दिलें होतें. तो दिवस उजाडतां आमच्याजवळ एकहि डालर नव्हता. दहा वाजतां शाळेकडे टपाल आले आणि मिस्र डेव्हिडसन्नें बरोबर चारशें डालरचा चेक पाठविलेला आह्मांला मिळाला! अशा त-हेचीं पुष्कळ उदाहरणें सांगतां येतील. हे चारशें डालर बोस्टन येथील दोन स्त्रियांनीं दिले होते. दोन वर्षांनंतर टस्केजी येथील काम बरेंच वाढल्यावर आह्मांला पैशाची इतकी निकड लागलौ, की, आह्मी बहुतेक निराश झालों, व पुढचा मार्ग आह्मांला दिसेना ! अशा प्रसंगीं बोस्टनच्या या दोन्ही स्त्रियांनीं सहा हजार डालर आह्मांला—-

–पाठविले ! या देणगीनें आह्मांला जें आश्चर्य वाटलें आणि उत्तेजन मिळालें, त्याचे वर्णन करणें अशक्य आहे. येथे मला हेहि सांगितलें पाहिजे, की, याच मैत्रिणींनी दर वर्षास सहा हजार डालरप्रमाणें चौदा वर्षे आह्माला मदत केली.

नव्या इमारतीचा नकाशा तयार झाल्यावर, विद्यार्थी, शाळेचे वर्ग संपल्यानंतर रोज पाया खणू लागले. हातांनीं काम करणें योग्य नाही, त्यांची समजूत अद्याप गेली नव्हती. कारण, त्यांच्यापैकी एकाने ह्मटल्याप्रमाणें 'काम करण्याकरितां नव्हे, तर शिकण्याकरितां' ते आहे ते. हळुहळू हें त्यांचे मत बदलत चाललें, आणि काम करण्याकडे त्यांची वृत्ति होऊं लागली, हें पाहून मला समाधान वाटलें. कांहीं आठवडे कसून काम केल्यावर पाया तयार झाला, आणि कोनशिला बसविण्याचा दिवस मुक्रर करण्यांत आला.

गुलामगिरीचें केंद्रस्थान असलेल्या दक्षिणेच्या या भागांत कृष्णकटिबंधांत या इमारतीची मुख्य शिला बसविण्यांत आली. गुलामगिरी बंद होऊन अवघीं सोळा वर्षे झालीं होतीं. सोळा वर्षांपूर्वी कायद्याचा दंड आणि लोकांची अवकृपा झाल्याशिवाय कोणाहि शिक्षकाला नीग्रोनां शिकवितां येत नसे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां, टस्केजी येथे वसंतऋतूंत त्यादिवशीं जो देखावा दृष्टीस पडला, तो अपूर्व होता! असा देखावा पाहण्याचे भाग्य जगांतील फार थोड्या शहरांच्या वांट्यास आलें असेल, असे मला वाटतें.

या प्रांतांतील शिक्षणखात्याचे सुपरिंटेंडंट ऑनरेबल वाडी थामसन् यांनीं मुख्य भाषण केलें. शिक्षक, विद्यार्थी, त्यांचे आईबाप व मित्र, प्रांतांतील गोरे कामगार, आसपासचे मुख्यमुख्य सर्व गोरे लोक, आणि ही वर्षांपूर्वी हेच गोरे लोक ज्यांनां आपल्या मालमत्तेप्रमाणें समजत असे बरेचसे काळे स्त्रीपुरुप, इतकी मंडळी कोणशिलेभोंवतीं जमली होती. दोन्ही ज्ञातींचे लोक कोणशिळेजवळ आपली कांहींतरी आठवण किंवा खूण ठेवण्याला फार उत्सुक दिसले.

दगदगीचे दिवस आणि निद्रारहित रात्री.

–इमारत पुरी होण्यापूर्वी आमच्यावर कांहीं कठिण प्रसंग आले. पुष्कळ वेळां बिलांचे पैसे चुकते करण्याला कांहीं पैसा शिल्लक नसल्यामुळे आह्मांला फार दुःख झाले. शाळेकरितां इमारती बांधावयाच्या; पण खर्चाचा पैसा कोठून भरणा करावयाचा हे माहीत नसावयाचे, असा अनुभव ज्याला वारंवार आलेला नाहीं, त्याला आमच्या अडचणी काय होत्या, याची योग्य कल्पना करितां येणार नाहीं! टस्केजी येथे पहिल्या वर्षी पैशाच्या टंचाईमुळे मी किती काळजींत आणि चिंतेत होतों, व त्यामुळे रोज रात्रीं मला झोप न येतां बिछान्यावर इकडून तिकडे कसा लोळत असें, हें मला चांगले आठवतें. एक मोठी शिक्षणविषयक संस्था स्थापन करणें व तिची नीट व्यवस्था नीग्रोंच्या हातून होणें शक्य आहे किंवा नाहीं, हा बिकट प्रयोग आह्मी करून पहात होतों, हें मी जाणून होतो. आह्मांला जर यांत अपयश आलें तर सर्व ज्ञातीचें मोठें नुकसान होईल, असें आह्मांला वाटलें. लोकानुमान व लोकमत आमच्याविरुद्ध होतें, हे मला माहीत होतें. गोऱ्या लोकांनीं असें साहसाचें काम सुरू केले असतां त्यांत त्यांनां यश येणारच असें लोकांनां वाटणार, आणि आह्मांला त्यांत जर यश आलें, तर मात्र लोकांनां मोठें आश्वर्य वाटणार, हें मला ठाऊक होतें. या सर्व गोष्टींचें ओझें, एका चौरस इंचाला हजार पौंड याप्रमाणें आह्मांला खालीं दडपीत होतें.

आमच्या या सर्व अडचणींमध्यें आणि चिंतेमध्यें, टस्केजी गांवांत मी एकाद्या गोऱ्या अगर काळ्या मनुष्याकडे मदतीकरितां गेलों, आणि त्यानें शत्क्यनुसार मला मदत केली नाहीं, असें केव्हांच घडले नाहीं ! पुष्कळदां, बारांपेक्षां अधिक वेळां, जेव्हां शेंकडों डालरच्या बिलांचे पैसे देण्याचा प्रसंग येई, तेव्हां मी टस्केजींतील पांचसहा गोऱ्या लोकांकडून थोडीथोडी रक्कम कर्जाऊ घेत असे. एका गोष्टीविषयीं मात्र मी प्रथमपासून जपत असे; आणि ती ही, कीं, शाळेची पत चांगली उच्च ठेवावयाची. आणि ती पत आह्मीं या सर्व वर्षात चांगली राखिली आहे,

—-असें सांगितलें असतां आत्मश्लाघेचा दोष आह्मांला लागणार नाहीं, असें मला वाटतें.

ज्या गोऱ्या गृहस्थानें टस्केजीस मला पाठवावें ह्मणून जनरल आर्मस्ट्रांग यांनां लिहिले होतें, त्यानें, ह्मणजे मिस्टर जार्ज डब्ल्यु. क्यांबेल यांनी मला जो कांहीं थोडा उपदेश केला होता, तो मी कधींहि विसरणार नाहीं! टस्केजी येथे मीं काम सुरू केल्यावर मिस्टर क्यांबेल यांनीं मला पित्याप्रमाणें प्रेमानें सांगितलें, कीं, "वाशिंग्टन ! पत हेंच भांडवल आहे, हें नेहमीं ध्यानांत ठेव. "

एकदां पैशाकरितां आमचे अतिशय हाल झाल्यावर मीं सर्व गोष्ट जनरल आर्मस्ट्रांग यांनां मोकळ्या मनानें कळविली. तेव्हां जितके कांहीं पैसे त्यांनीं खानगीसाठीं जमविले होते, त्या सर्वांचा चेक त्यांनी माझ्या हातीं देऊन टाकिला. याप्रमाणें जनरल आर्मस्ट्रांग यांनीं अनेकदां टस्केजी संस्थेला मदत केली आहे. ही गोष्ट यापूर्वी कोणाला मीं सांगितलेली नव्हती, असें मला वाटतें.

शाळेचे पहिल्या वर्षाचें काम संपल्यावर, १८८२ च्या उन्हाळ्यांत माल्डनची मिस फॅनी ए. स्मिथ इच्याशीं माझें लग्न झालें. शरद्दतूंत टस्केजी येथे आह्मीं स्वतंत्र संसार करूं लागलों. शाळेत यावेळीं चार शिक्षक होते, त्यांनांहि आमच्या घरीं राहण्यास मिळालें. माझी पत्नी ही हाम्पटन संस्थेची ग्रॅज्युएट होती. शाळेच्या हितार्थ आस्थेनें सतत काम करून आणि घरादाराची चांगली व्यवस्था ठेवून, माझी पत्नी १८८४ च्या मे महिन्यांत निवर्तली. पोर्शिया एम्. वाशिंग्टन नांवाची एक मुलगी आह्मांला झाली होती.

प्रथमपासून माझी बायको शाळेविषयींच नेहमीं विचार करी, आणि शाळेच्या हितार्थ आपला वेळ आस्थेनें खर्च करी. तिचे माझे हित-संबंध, महत्त्वाकांक्षा अगदीं एकच होत्या; पण शाळेचें पुढे काय होणार आहे, हे पाहण्यास मिळण्यापूर्वीच ती इहलोक सोडून गेली !

प्रकरण दहावें.

तव्याशिवाय पोळ्या भाजण्याहूनहि अवघड काम !

टस्केजी येथे प्रथमपासून विद्यार्थ्यांनी शेतकीचें आणि घरगुती काम करण्यास शिकावयाचें, इतकेंच नव्हे, तर त्यांनी आपल्या इमारतीहि स्वतः उभारावयाच्या, असा मीं निश्चय केला. माझा बेत असा होता, कीं, हीं कामें करीत असतांना त्यांनां काम करण्याच्या उत्तम आणि अलीकडच्या पद्धति शिकवावयाच्या, ह्मणजे त्यायोगें त्यांच्या श्रमाचा फायदा शाळेला मिळेल; एवढेच नव्हे, तर त्यांनां श्रमाचीं उपयुक्तता, त्याचें महत्त्व, व त्यांतील आनंद या गोष्टीहि कळू लागतील;. आणि कोणतेंहि काम काबाडकष्ट असें न समजतां कामाकरितांचा कामावर प्रेम ठेवणें हें तत्त्वहि त्यांनां शिकविले जाईल. जुन्या पद्धतीनें काम न शिकवितां हवा, पाणी, वाफ, विद्युत्, अश्वबल इत्यादि निसर्गाच्या शक्तींचा आपल्या कामीं कसा उपयोग करून घ्यावा, हें शिकविण्याचा मी विचार केला.

विद्यार्थ्यांच्या श्रमांनीं इमारती बांधू नयेत, असा प्रथम मला पुष्कळानीं उपदेश केला; पण मीं माझा विचार सोडावयाचा नाहीं असाच निश्चय केला माझी योजना नापसंत असणारांनां मीं असें सांगितले की, "बाहेरच्या कसलेल्या मजुरांनी बांधल्याप्रमाणें आमच्य पहिल्या इमारती सोयीवार आणि परिपूर्ण होणार नाहींत, हें मला पक्के माहीत आहे. पण विद्यार्थ्यांनीं इमारती बांधल्या असतां सोयींत आणि सफाईंत होणारी उणीव, शिक्षण, आत्मप्रयत्न आणि आत्मविश्वास या गोष्टींनीं सहज भरून निघून, उलट अधिक फायदा होईल."

-माझ्या योजनेबद्दल शंका घेणारांनां मी आणखी असें सांगितलें की,"आमचे बहुतेक विद्यार्थी गरीब असून ते दक्षिणेंतील कापूस ऊंस आणि तांदूळ विकणाऱ्या मळ्यांतील झोपड्यांतून आलेले आहेत आणि त्यांनां एकदम सुंदर हवेल्यांत ठेविलें असतां फार आनंद होईल,----

—हे मला माहीत आहे; पण आपल्या स्वतःच्या इमारती कशा बांधाव्या हें त्यांनां शिकविणें ह्मणजे अधिक स्वाभाविक रीतीने त्यांच्या मनाचा विकास -त्यांची वाढ करणें होय, अशी माझी खात्री आहे. चुका होतील हे मला माहीत आहे; पण या चुका पुढें आह्मांला फार अमोलिक शहाणपण शिकवितील !"

शाळेच्या एकोणीस वर्षांच्या अस्तित्वामध्ये विद्यार्थ्यांकडूनच इमारती बांधवून घेण्याचा बेत कायम ठेविलेला आहे. या मुदतींत लहान-मोठ्या अशा चाळीस इमारती बांधलेल्या आहेत. यांपैकी चार खेरीज करून बाकीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या श्रमाचें फल होत. याचा दुसरा एक असा फायदा आहे, कीं, या इमारती कशा बांधाव्या हें शिक्षण मिळत असतांना ज्यांनां शिल्पशास्त्राचे ज्ञान मिळाले, असे शेंकडों लोक आज दक्षिणेंत पसरलेले आहेत. याप्रमाणें विद्यार्थ्यांच्या एका कंपूपासून दुसऱ्या कंपूला ज्ञान आणि कौशल्य यांची परंपरा मिळत आहे, आणि शेवटीं अशी स्थिति प्राप्त झालेली आहे, कीं, दुसऱ्या कोणाहि एका मजुराची मदत घेण्यासाठीं बाहेर न जातां इमारतीचा नकाशा काढण्यापासून तों विजेचे दिवे बसविण्यापर्यंत, पाहिजे त्या प्रकारची अगर आकाराची इमारत आमचे शिक्षक आणि विद्यार्थी तयार करूं शकतात.

पुष्कळदां जेव्हां एकादा नवीन विद्यार्थी पेन्सिलीनें अगर चाकूने एकादी इमारत नासवून टाकूं पाहतो, त्यावेळीं जुना विद्यार्थी त्याला असे सांगत असतांना मीं ऐकिलें आहे, की, "बाबारे, असें करूं नकोस ! ही आमची इमारत आहे, आणि ही बांधण्यास मीं मदत केली आहे."

शाळेच्या प्रारंभींच्या दिवसांत विटा करण्याच्या कामी आह्मांला फार निकराचे अनुभव आले. शेतकीचें काम चांगलेंसें सुरू झाल्यावर आम्हीं आमचे लक्ष्य विटा करण्याकडे वळविलें. आमच्या इमारती बांधण्यासाठीं आह्मांला विटा हव्या होत्या. याशिवाय हा धंदा स्थापन करण्याचें दुसरे एक कारण होतें. गांवांत विटांचा कारखाना नव्हता, आणि आमच्या गरजेशिवाय बाजारांत विटांनां बरीच मागणी होती.

अवघड काम

इस्त्राएलच्या वंशजांनां गवताशिवाय विटा कराव्या लागल्यामुळे मला त्यांची नेहमीं कींव येत असे; पण, पैसा आणि अनुभव यांच्या अभावी आमचे विटा करण्याचें काम त्याहून कठिण होतें !.

प्रथम हें काम कठिण व घाणेरडें असल्यामुळे विद्यार्थी मदतीला मिळण्याची मोठी पंचाईत पडे. विटा करण्याचा प्रसंग जेव्हां आला, तेव्हां पुस्तकीज्ञान संपादण्याचें सोडून हातांनीं काम करण्याची त्यांची नावड स्पष्ट दिसून आली. गुडघ्यापर्यंत चिखलांत उभे राहून तासचे तास काम करणें कोणालाहि सुखावह वाटलें नाहीं. पुष्कळ विद्यार्थ्यांनीं कंटाळून शाळाहि सोडून दिली.

पुष्कळ जागा पाहून शेवटीं विटांच्या मातीकरितां आम्हीं एक -खांच-खळगा तयार केला. विटा करण्याचें काम फार सोपें आहे, असें मी यावेळपर्यंत समजत होतों; पण, कटुतर अनुभवानें लवकरच असें रुळून आलें, कीं, या धंद्यांतहि विशेषतः विटा जाळण्यांत विशेष ज्ञान व विशेष कसब यांची आवश्यकता आहे. बराच प्रयत्न करून आम्हीं सुमारें पंचवीस हजार विटा तयार केल्या, आणि त्या जाळण्यासाठीं एका भट्टीत घातल्या. या भट्टीची रचना बरोबर नसल्यामुळे म्हणा, किंवा तिला बरोबर जाळ न मिळाल्यामुळे म्हणा, आमचें सारें ओम्फस झालें ! नंतर आम्हीं दुसरी भट्टी तयार केली. कांहीं कारणामुळे या भट्टींतहि आम्हांला यश आले नाहीं. यामुळे विद्यार्थी मदतीला मिळण्याची फारच पंचाईत पडूं लागली. तथापि, हाम्पटन येथें धंदेशिक्षणांत शिकून तयार झालेले कांहीं शिक्षक मदतीला आले, आणि आम्हीं तिसऱ्या भट्टीची जुळवाजुळव केली. भट्टी जळण्यास एक आठवडा लागे. चार पांच दिवस गेल्यावर हजारों विटा लवकरच आमच्या हातीं येणार, असे आम्ही मनांत मांडे खाऊं लागलों; इतक्यांत एका मध्यरात्रीं भट्टी कोसळली. अशा रीतीनें तिसऱ्या खेपेलाहि आमचें सारें फिसकटलें.

तिसरी भट्टी बिघडल्यानंतर पुनः प्रयत्न करून पहावा, तर माझ्यापाशीं एक डालरहि शिल्लक राहिला नव्हता. विटा करण्याचा नाद सोडून–९

–द्यावा असा बहुतेक शिक्षकांनीं उपदेश केला. या संकटामध्यें असतां बऱ्याच वर्षांपूर्वी माझ्या हातीं आलेल्या एका घड्याळाची मला आठवण झाली, व जवळच्या मांटगामरी शहरांतील एका दुकानांत मी हें घड्याळ गहाण टाकिलें, आणि पुनः विटांचा प्रयोग करून पाहण्या-साठीं पंधरा डालर त्यावर काढिले. टस्केजीला येऊन या पंधरा डालरच्या जोरावर हताश आणि नाउमेद झालेल्या मंडळींत पुनः हुरूप आणून, मीं चवथ्या भट्टीची जमवाजमव केली. सांगण्याला आनंद वाटतो, की, या खेपेला मात्र आह्मांला यश आलें. माझ्या हातीं पैसे येण्यापूर्वीच घड्याळ सोडवून घेण्याची मुदत निघून गेली. पुनः तें घड्याळ माझ्या दृष्टीला पडलें नाहीं; पण त्याबद्दल मला केव्हांहि वाईट वाटलें नाहीं !

आमच्या संस्थेत आतां विटा तयार करण्याचें एक स्वतंत्र महत्त्वाचे उद्योगधंद्याचें खातेंच झालेलें आहे. पाहिजे त्या बाजारांत खपण्याजोग्या, पहिल्या नंबरच्या बारा लाख विटा गेल्यावर्षी विद्यार्थ्यांनीं तयार केल्या. याशिवाय, हातांनीं आणि यंत्रांनी विटा तयार करण्याच्या धंद्यांत पुष्कळ तरुण मंडळी पूर्ण वाकबगार झाली आहे, आणि त्यांनीं हा धंदा दक्षिणेतील पुष्कळ भागांत सुरू केला आहे.

दक्षिणेतील दोन्ही ज्ञातींच्या नात्याविषयीं, विटा तयार करण्याच्या कामानें मला एक महत्त्वाचा धडा शिकविला आहे. शाळेशीं कांही संबंध किंवा सहानुभूति नसलेले गोरे लोक, आमच्या विटा चांगल्या असतात ह्मणून त्या खरेदी करण्याला येऊं लागले. लोकांची एक खरीखुरी गरज आम्ही भागवू लागलों, असे त्यांनां आढळून आलें. शिक्षणानें नीग्रो कुचकामाचा होत नाहीं, व आमच्या संस्थेत विद्यार्थ्यांनां दिलेल्या शिक्षणानें समाजाचें धन व सुख यांत भर पडत आहे, अशी आमच्या विटांमुळे आसपासच्या गोऱ्या लोकांची खात्री होत चाळली. आसपासचे लोक विटा खरेदी करण्याकरितां आमच्याकडे येऊ लागल्यामुळे आमची त्यांची ओळख झाली, व त्यांचा आमचा—

अवघड काम.
–व्यवहार होऊं लागला. त्यांनां हवी असलेली वस्तु आमच्यापाशीं मिळू लागली, आणि आह्मांला हवा असलेला जिन्नस त्यांच्यापाशीं मिळू लागला. याप्रमाणें परस्परांचे हितसंबंध परस्परांच्या व्यवहारांत मिसळू लागले. दक्षिणेतील या भागांत किंबहुना सबंध दक्षिणअमेरिकेंत आमच्या लोकांत जो कांहीं चांगला भाव आढळून येतो, त्याचा पाया घालण्यास बहुतेक या गोष्टीनें-विटा करण्याच्या धंदेशिक्षणानें मदत केली, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.
दक्षिणेंत जेथेंजेथे आमचा एकादा विटा करणारा विद्यार्थी गेला आहे, तेथेंतेथें त्यानें समाजाचें कांहींनाकांहीं तरी हित साधलें आहे, व त्या समाजाला असें वाटावयाला लाविलें आहे, कीं, याच्यावर कांहीं अंशीं आपलें सुख अवलंबून असल्यामुळे याचे आपण तितक्या अंशानें ऋणी झालों आहों. अशा रीतीनें दोन्ही ज्ञातींतील संबंध चांगले राहण्यास फार मदत झालेली आहे, असें आह्मांला आढळून आलें आहे.
मानवीस्वभावांत असें कांहीं आहे, कीं, त्याच्यायोगानें त्याला गुणांची -ते गुण कोणत्याहि वर्णाच्या मनुष्यांत असोत-पारख आणि चहा करितां येते, असा माझा अनुभव आहे. तसेंच, आपण जें कांहीं प्रत्यक्ष करून दाखविलें आहे, त्यानें गैरसमजहि बरेच दूर होतात, असें मला आढळून आलें आहे. एकाद्या नीग्रोनें बांधिलेलें पहिल्या प्रतीचें उत्तम घर, हें, नीग्रोनें घर कसें बांधावें अगर त्याला घर कसें बांधितां येतें, या विषयावर कित्येक पानें लिहिलेल्या लेखापेक्षां दसपट अधिक खात्री करून देणारें आहे.

औद्योगिक शिक्षणाचें हेंच तत्त्व आमच्या गाड्या, खटारे आणि बग्या तयार करण्यांत प्रथमपासून अमलांत आणलेलें आहे. आमच्या शेतीच्या आणि शाळेच्या कामासाठीं आमच्या बऱ्याच गाड्या आह्मीं उपयोगांत आणितों. पण, यांपैकी प्रत्येक गाडी आमच्या विद्यार्थ्यांच्या हातांनीं तयार केलेली आहे. याशिवाय, आह्मीं तयार केलेल्या गाड्या विक्रीसाठीं बाजारांतहि पाठवितों. लोकांनां विटांचा पुरवठा केल्यानें जो कांहीं—--

—-परिणाम झाला, तसाच गाड्यांचाहि पुरवठा केल्यानें झालेला आहे; आणि आमच्या संस्थेत गाडी तयार करण्यास शिकलेला विद्यार्थी जेथे-जेथे' गेला आहे, तेथेंतेथे दोन्ही ज्ञातींच्या लोकांनी त्याला समाजाचा हितकर्ता असें मानिलें आहे. ज्या लोकांत आमचा विद्यार्थी जाऊन राहतो आणि काम करितो, त्या लोकांनां याला सोडून देणें कठिण वाटतें.

लोकांनां ज्या गोष्टी पाहिजे असतात, त्या ज्याला करितां येतात असा मनुष्य-मग त्याची जात कोणती का असेना-पुढे मजल मारणारच ! ग्रीकवाक्यमीमांसा शिकविण्याला समर्थ असणारा असा कोणी इसम एकाद्या समाजांत जावो; पण त्या समाजांतील लोक ग्रीक-वाक्यमीमांसा शिकण्यास तयार नसतील, किंवा ती शिकणें त्यांनां जरूर वाटणार नाहीं; पण विटा, घरे आणि गाड्या यांची नड त्यांनां भासणार, हें मात्र खरें. आणि जर कोणाला या वस्तूंचा पुरवठा करितां येत असेल, तर पहिल्या पदार्थाविषयीं (विटांविषयीं) मागणी आधीं केली जाईल, आणि मागणीबरोबर त्या पदार्थाचें महत्त्व जाणण्याची आणि त्यांपासून आपला फायदा करून घेण्याची पात्रता अंगीं येईल.

विटा भाजण्यांत आह्मांला प्रथम यश आलें, त्यावेळीं काम शिकण्यास लावू नये, या विद्यार्थ्यांच्या आक्षेपाशीं आह्मांला बरीच टक्कर द्यावी लागली. या सुमाराला या संस्थानांत सर्वांनां असे जाहीर झालें होतें, की, विद्यार्थी कितीहि श्रीमंत असेना, तो टस्केजी संस्थेत दाखल झाला, की, त्याला कांहींतरी उद्योगधंदा शिकलाच पाहिजे. शाळेत शिकत असतां आपल्या मुलांनां काम करण्यास लावू नये, अशा अर्थाचीं पत्रे बऱ्याच आईबापांकडून आलीं; आणि कित्येक आईबाप स्वतः शाळेत येऊन याविषयीं तक्रार करूं लागले. आपल्या मुलांनां पुस्तकांशिवाय दुसरें कांहीं शिकवू नये, असा आपल्या आईबापांचा लेखी अगर तोंडी निरोप बहुतेक नव्या विद्यार्थ्यांनीं आणिला. जितकींजितकीं पुस्तकें मोठीं आणि अधिक असावीं, त्यांचीं नांवें जितकींजितकीं लांब असावीं,----

अवघड काम.

—तितकातितका अधिक आनंद विद्यार्थ्यांनां आणि त्यांच्या आईबापांनां होत असावा, असें दिसले.

मी या सर्व ओरडीकडे फारसे लक्ष्य दिलें नाहीं. मात्र संधि मिळे तेव्हां आईबापांची समजूत घालण्यासाठीं, व औद्योगिक शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनांत बिंबविण्यासाठी, संस्थानच्या बऱ्याच भागांत मी वारंवार हिंडत असे. याशिवाय नेहमी मी विद्यार्थ्यांनां या विषयावर पुष्कळ सांगत असें. औद्योगिक शिक्षणाची लोकांनां नावड होती, तरी विद्यार्थ्यांची संख्या एकसारखी इतकी वाढू लागली, की, दुसऱ्या वर्षी सहा महिन्यांच्या आंतच अलाबामा संस्थानांतील सर्व भागांतील आणि दुसऱ्या संस्थानांतील मिळून एकंदर दीडशें विद्यार्थी हजिरीपटावर होते.

१८८२ च्या उन्हाळ्यांत मिस डेव्हिडसन आणि मी, नवी इमारत पुरी करण्याच्या खर्चाकरितां वर्गणी गोळा करण्याच्या हेतूनें उत्तरेकडे गेलों. कांहीं वर्षांपूर्वी थोडीशी ओळख झालेल्या एका मिशनरी संस्थेच्या कामगाराकडून शिफारसपत्र घ्यावे, ह्मणून मी वाटेंत न्यूयार्क येथे थांबलों-या मिशनऱ्यानें पत्र तर मला दिलेंच नाहीं; उलट मी एकदम घरचा मार्ग सुधारावा, पैसा मिळविण्याची खटपट करूं नये, कारण वाटखर्चीला पुरेल इतकी रक्कमहि जमणार नाहीं, असा त्यानें मोठ्या कळकळीने मला उपदेश केला. याबद्दल मी त्याचे आभार मानिले आणि पुढे आमच्या प्रवासाला निघालो.

उत्तरेंत मी प्रथम नारर्देम्पटन (मॅसॅच्युसेटस) येथे गेलों. कोणत्याहि हॉटेलांत मला घेणार नाहींत, या शंकेने माझी भोजनाची सोय होईल असें एकादें नीग्रो कुटुंब शोधून काढण्यांत अर्धा दिवस मी घालविला. एका हॉटेलांत माझा प्रवेश होण्यास कांहीं त्रास पडणार नाहीं, असे समजल्यावर मला मोठें आश्चर्य वाटले.

आह्मांला पैसा बराच मिळाला, आणि इमारत पुरी झाली नव्हती, तरी या वर्षाच्या आभार मानण्याच्या दिवशीं परमेश्वराचे आभार मानण्याकरितां

पोर्टरहालच्या भजनमंदिरांत आह्मीं आमची पहिली उपासना व प्रार्थना केली. परमेश्वराचे आभार मानण्याकरितां उपासना कोणीं चालवावी याचा शोध करीत असतां माझ्या सुदैवानें आह्मांला एक अत्युत्तम व्यक्ति सांपडली. ही व्यक्ति ह्मणजे रेव्हरंड रॉबर्ट सी. बेडफर्ड हे होत. हे मूळचे विसकानसीन येथील गोरे मनुष्य असून अलाबामा संस्थानांतील मांटगामरी येथील काळ्या लोकांच्या एका लहान चर्चमध्यें धर्मोपदेशक होते. यापूर्वी मीं मिस्टर बेडफर्डचें नांव केव्हांहि ऐकिलें नव्हतें. त्यांनींहि माझें नांव ऐकिलें नव्हतें. टस्केजी येथे येऊन उपासना चालविण्याचें त्यांनीं मोठ्या आनंदानें कबूल केलें. काळ्या लोकांनीं पाहिलेली अशा त-हेची ही पहिलीच उपासना होय, आणि त्यांनां ती कितीतरी आवडली. नवीन इमारतीचा देखावा, ती उपासना आणि तो दिवस ते लोक कधींहि विसरणार नाहींत.

मिस्टर बेडफर्ड यांनी संस्थेचे एक ट्रस्टी होण्याचें कबूल केलें. या नात्यानें, आणि संस्थेकरितां अन्य तन्हेनें काम करण्याचा संबंध त्यांनीं संस्थेशीं अठरा वर्षे ठेविला आहे. या अवधींत संस्थेविषयीं त्यांनी अहोरात्र आपल्या अंतःकारणांत चिंता वाहिली आहे. संस्थेसाठीं कितीहि लहान काम असेना, तें करण्यांत त्यांनां फार आनंद वाटतो. ते प्रत्येक गोष्टींत मीपणा पूर्ण विसरून जातात, आणि जिच्याकडे दुसऱ्या कोणाचें मन ओढवणार नाहीं अशी अप्रिय सेवाहि करण्यास फार तत्पर असतात. मला जो कांहीं त्यांचा अनुभव आला आहे, त्यावरून सर्वांमध्यें त्यांचा स्वभाव प्रभूसारखा असावा, असें मला वाटतें.

कांहीं दिवसांनंतर आमच्या संस्थेंत एक नवीन तरुण मनुष्य दाखल झाला. हा हाम्पटनमधून नुकताच बाहेर पडला होता. याच्या मदती-शिवाय आमची संस्था आतां आहे त्याप्रमाणें खचित सुधारली नसती. याचें नांव मिस्टर लोगन. हे सतरा वर्षेपर्यंत संस्थेचे खजिनदार आणि माझ्या गैरहजिरींत प्रिन्सिपाल, हीं कामें पहात आहेत. हे इतके स्वार्थत्यागी आहेत, कामधंद्यांत इतके युक्तिवान् आहेत, आणि यांची—-

—बुद्‌धि इतकी तरतरीत आहे, कीं, मी कितीहि दिवस गैरहजर असलों, तरी यांनों संस्थेची व्यवस्था चोख ठेविली आहे. संस्थेला कितीहि पैशाच्या अडचणी असल्या, तरी पुढील यशाविषयीं त्यांची श्रद्‌धा आणि त्यांचें धैर्य हीं नाहींशीं झालीं नाहींत !

दुसऱ्या वर्षाच्या मध्याच्या सुमारास पहिली इमारत बहुतेक पुरी झाली, आणि तिचा बराचसा भाग आह्मांला वापरतां येऊ लागल्यामुळे आह्मीं एक भोजनवसतिगृह उघडलें. विद्‌यार्थी फार लांबून येऊं लागले आणि त्यांची संख्या इतकी वाढू लागली, कीं, त्यांच्या अंतःस्थितीवर व राहणीवर आमचा ताबा नसल्यामुळे आह्मी त्यांची नुसती वरवर देखरेख करीत आहों, असें आह्मांला वाटलें.

भोजनवसतिगृह सुरू करण्यास विद्‌यार्थी व त्यांची भूक, यांशिवाय आमच्याजवळ दुसरें कांहीं साधन नव्हतें! नवीन इमारतींत स्वयंपाकघर आणि भोजनाची खोली यांची कांहीं सोय केलेली नव्हती. इमारतीच्या खालची बरीचशी माती खणून काढिली असतां, स्वयंपाकघर आणि जेवणाची खोली यांकरितां तळमजल्यावर साधारण प्रकाश असलेली अशी खोली तयार होईल, असें आह्मांला दिसून आलें. तळमजल्याच्या खालची माती खणून काढण्याला विद्‌यार्थ्यांनीं मदत करावी, असें मी सुचविलें. त्यांनीं हें काम केलें, आणि थोड्या आठवड्यांत ओबडधोबड व साधारण सोयीची अशी स्वयंपाक करण्याची आणि जेवणाची जागा तयार झाली. आतां ही जागा कोणीं पाहिल्यास, पूर्वी ही भोजनाची खोली होती, असें त्याला वाटणारहि नाहीं !

सामान वगैरे कांहीं नसतां आणि जिन्नस विकत घेण्याला जवळ पैसा नसतां भोजनवसतिगृह कसें चालू करावें, हा सर्वांत बिकट प्रश्न होता. गांवांतील व्यापारी आह्मांला लागतील ते जिन्नस उधार देण्याला तयार असत. माझा स्वतःचा माझ्यावर जितका विश्वास होता, त्यापेक्षां लोकांचा विश्वास माझ्यावर अधिक दिसून येई. या गोष्टीनें पहिल्या-पहिल्या वर्षी मी खरोखर फार गोंधळून गेलों. स्टोव्हाशवाय स्वयंपाक—

करणें हें फार कठिण होतें, आणि ताटांशिवाय जेवणें हें फार गैरसोयीचे होते. प्रथमप्रथम स्वयंपाक बाहेर जुन्या पद्धतीनें चुलीवर ठेविलेल्या भांड्यांत करीत असत. इमारतीच्या बांधकामी उपयोगांत आणिलेल्या सुतारांच्या बांकांचा मेजांऐवजी उपयोग करण्यांत आला. ताटें इतकी थोडी होती, की, त्यांचे वर्णन करून वेळ घालविणें योग्य वाटत नाही.

दररोज जेवण नियमित वेळीं वाढलें पाहिजे, अशी कल्पना भोजन -वसतिगृहाशी संबंध असलेल्या कोणालाहि नव्हती. यामुळे बराच त्रास होऊं लागला. प्रत्येक गोष्ट इतकी अव्यवस्थित आणि गैरसोयीची असे, कीं, पहिले दोन आठवडे प्रत्येक जेवणाच्या वेळीं कांहींतरी चूक खात्रीनें होत असे. पदार्थ चांगले शिजलेले नसत, अगर करपलेले असत, अथवा ते अळणीच वाढीत किंवा केव्हांकेव्हां चहा देण्यास विसरत !

एके दिवशी सकाळीं जेवणाच्या खोलीच्या दरवाज्यापाशीं मी विद्यार्थ्यांच्या तक्रारी ऐकत उभा राहिलों होतों. त्यादिवशीं जेवणाची घडी अगदींच बिघडल्यामुळे त्यांच्या तक्रारी बऱ्याच असून जोरांत होत्या. कांहींच खाण्याला न मिळालेली अशी एक मुलगी बाहेर आली, आणि जेवणाचें काम पाण्यावरच भागवावें ह्मणून ती विहिरीकडे पाणी ओढण्याला गेली. विहिरीचा दोर तुटलेला असल्यामुळे त्या बिचारीला पाणीहि मिळालें नाहीं! विहिरीकडून ती परतली, आणि मी जवळच असून मला ऐकावयाला येईल हे तिला माहीत नसल्यामुळे, ती मोठ्या निराशेनें ह्मणाली, की, "या शाळेत आह्मांला पिण्याला पाणीसुद्धां मिळत नाहीं!" याच्यासारखें नाउमेद करणारें दुसरें कोणतेंहि वचन माझ्या कानावर आलेलें नाहीं !

दुसऱ्या एकावेळीं, संस्थेचे दूस्टी आणि हितचिंतक मिस्टर बेडफर्ड हे शाळा पाहण्याला आले होते. रात्रीं त्यांची निजण्याची सोय जेवणाच्या खोलीच्या वरच्या बाजूला करण्यांत आली. जेवणाच्या खोलीत कडाक्याने चाललेल्या दोघां मुलांच्या तंट्यानें मोठ्या पहांटे ते जागे झाले. सकाळी—-

अवघड काम

काफीचा प्याला कोणी वापरावा, याबद्दल त्यांचा वाद चालला होता ! एकसारखे तीन दिवस आपणाला प्याला वापरावयाला मिळाला नाहीं, असे एका मुलानें सिद्ध करून तो वाद जिंकला !

पण हळुहळू, धीरेधीरे कसून प्रयत्न केल्यावर, हा सर्व घोंटाळा मोडून आह्मीं सर्व व्यवस्था बरोबर लाविली. कोणतीहि गोष्ट जर आह्मी नेटानें, शहाणपणानें आणि खऱ्या कळकळीनें करूं लागलों, तर आह्मांला यांतहि असेंच यश येईल !

त्यावेळच्या झगड्याकडे आतां पाहतां, आह्मीं तसा झगडा केला याबद्दल मला बरें वाटतें. आह्मीं त्या सर्व गैरसोयी व त्रास सोसले याबद्दल मला आनंद होतो. स्वयंपाकघर आणि जेवणाची खोली यांकरितां विद्यार्थ्यांनां जागा खणून तयार करावी लागली. आमचें पहिलें भोजनगृह त्या दमट, कोंदट अंधारकोठडींत होतें, या गोष्टींबद्दल मला आतां आनंद होतो. सुंदर, रम्य आणि सोयीवार अशा खोलींत आमचें भोजनगृह आह्मीं सुरू केलें असतें, तर मला वाटतें, आमचीं डोकीं फिरून जाऊन आह्मीं फुगून गेलों असतों. आपण स्वतः उभारलेल्या पायावरच कोणतेंहि काम सुरू करणें, हें फार महत्त्वाचें आहे, असें मला वाटतें.
आतां जेव्हां आमचे जुने विद्यार्थी वारंवार टस्केजीला येतात, आणि - आमच्या विशाल, रम्य, हवाशीर आणि सुप्रकाशित अशा भोजन-- शाळेत जाऊन विद्यार्थ्यांनींच तयार केलेल्या पदार्थांचीं गोडगोड पक्वान्ने पाहतात, पक्ष्यांचीं गाणीं ऐकितात, मेजें, मेजावरील कपडे, फुलांचे तुरे ठेविलेलीं कांचपत्रे, तोंडपुसणीं इत्यादि व्यवस्थित रीतीनें मांडलेलीं पहातात, आणि सर्व पदार्थ नीट व्यवस्थेनें, नियमितपणें, आणि शेंकडों मनुष्यांपैकी कोणाकडूनहि तक्रार न येतां वाढिले जातात हे पाहतात, तेव्हां "आह्मीं अशी सुरुवात केली, आणि हळूहळू, स्वाभा-विक अशा वाढीनें, वर्षानुवर्षे एकसारखी आमची सुधारणा करून घेतली, याबद्दल आह्मांला आनंद होतो !" असें तेहि मला नेहमीं ह्मणत असतात.

प्रकरण अकराव.

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी.

कांहीं दिवसांनंतर संस्थेच्या इतिहासांतील महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे हाम्पटन संस्थेचे खजीनदार जनरल जे. एफ. बी. मार्शल यांनीं आह्मांला दिलेली भेट होय. याच गृहस्थांनीं आमच्यावर विश्वास ठेवून शाळेकरितां जागा घेण्यासाठीं प्रथम अडीचशें डालर दिले होते आमच्याबरोबर एक आठवडा राहून प्रत्येक गोष्ट त्यांनीं नीट तपासून 'पाहिली. आमची सुधारणा पाहून ते फार खूष झालेसे दिसले,आणि हाम्पटनला त्यांनीं आमच्या संस्थेविषयीं उत्तम रिपोर्ट करून पाठविले यानंतर कांहीं दिवसांनीं मिस मेरी एफ. मॅकी ही अध्यापिका आली याच बाईनें हाम्पटन येथे माझा प्रवेश होतेवेळीं खोली झाडण्याच्या कामीं माझी परीक्षा घेतली होती. पुढें कांहीं दिवसांनीं जनरल आर्मस्ट्रांग हे स्वतः आले.

हाम्पटनचे हे मित्र भेटीला आल्यावेळीं टस्केजी संस्थेत शिक्षकांच संख्या बरीच वाढली होती, आणि नवीन शिक्षकमंडळीपैकी बहुतेक हाम्पटन संस्थेचे ग्रॅज्युएट होते. हाम्पटनच्या मित्रांचें, विशेषतः जनरल आर्मस्ट्रांग यांचें आह्मीं मनापासून स्वागत केलें. इतक्या थोड्या अवधीत आह्मीं इतका पल्ला गांठला, हें पाहून त्या सर्वांनां आश्चर्य वाटून आनंद झाला. काळ्या लोकांनीं जनरल आर्मस्ट्रांगविषयीं पुष्कळ ऐकिलेलें होता त्यामुळे त्यांनां एकदां तरी पहावें ह्मणून पुष्कळ लोक फार लांबून आले. माझ्या ज्ञातीचे लोक आणि दक्षिणेंतील गोरे लोक, या उभयतांनींहि त्यांचे सारखेंच स्वागत केलें.

जनरल आर्मस्ट्रांगच्या या पहिल्या भेटीत त्यांच्या स्वभावाची खरी खुरी माहिती होण्याची अपूर्व संधि मला मिळाली. उदाहणार्थ, दक्षिणे तीलगोऱ्या लोकांविषयींची त्यांची कळकळ होय. यापूर्वी माझी अश कल्पना होती, कीं, जनरल आर्मस्ट्रांग हे दक्षिणेंतील गोऱ्या लोकां विरुद्ध लढल्यामुळे त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेष असावा, आणि दक्षिणें-

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी.

-तील काळ्या लोकांनांच मदत करण्याकडे त्यांचें लक्ष्य असावें; परंतु, या सत्पुरुषाच्या मनाचे मोठेपण आणि औदार्य यांची मला पुरी ओळख नव्हती, असें मला या भेटींत कळून आले. दाक्षणेंतील गोऱ्या लोकांच्या भेटी व त्यांच्याशीं झालेलीं संभाषणे यांवरून मला असें कळून आलें, कीं, गोऱ्या आणि काळ्या अशा दोन्ही ज्ञातींच्या कल्याणाविषयीं आणि भरभराटीविषयीं ते सारखेच उत्सुक होते. दक्षिणेतील लोकांविषयीं त्यांच्या मनांत अगदीं द्वैतभाव नव्हता, आणि त्यांच्या-विषयीं सहानुभूति दाखविण्याचा प्रसंग आला ह्मणजे त्यांनां मोठें समाधान होत असे. दक्षिणेतील गोऱ्या लोकांच्याविरुद्ध, लोकांसमोर अगर एकांतीं एकहि वाईट शब्द बोलतांना मीं जनरल आर्मस्ट्रांगला केव्हांहि ऐकिलें नाहीं! या बाबतींत त्यांच्या उदाहरणावरून मी हे शिकलों, की, थोर पुरुष सर्वांवर प्रेम करतात आणि क्षुद्रजन मनांत द्वेषभाव बाळगतात. अशक्तांनां मदत केली असतां मदत देणाराच अधिक सशक्त होतो; आणि हतभाग्यांनां छळल्यानें छळणारा अशक्त होतो, हेंहि तत्त्व मी त्यांच्यापासूनच शिकलो.

जनरल आर्मस्ट्रांग यांच्यापासून मीं हें शिकून बरेच दिवस झाले आणि मीं तेव्हांपासून असा निश्चय केला आहे, कीं, कोणत्याहि वर्णाचा मनुष्य कां असेना, त्याच्याविषयीं मनांत द्वेषभाव बाळगून माझी अवनति मी करून घेणार नाहीं! दक्षिणेतील गोऱ्या मनुष्यानें माझ्या ज्ञातीवर अन्यायानें कांहीं जुलूम केला असल्यास त्याच्याविषयीं माझ्या मनांत ईश्वराच्या कृपेनें कोणताहि वाईट भाव राहिला नाहीं, अशी माझी खात्री आहे. माझ्या ज्ञातीच्या लोकांची सेवा करण्यांत किंवा दक्षिणेतील गोऱ्या लोकांची सेवा करण्यांत मला सारखाच आनंद होतो. कोणत्याहि ज्ञातीविषयीं द्वेषभाव मनांत बाळगण्याची सवय असलेल्या अभाग्याची मला मनापासून कींव येते !

जोंजों याविषयी अधिक विचार करावा, तोंतों माझी अधिकाधिक अशी खात्री झाली आहे, कीं, नीग्रोंच्या मतांचा कांहीं उपयोग—

—होऊं नये, ह्मणून दक्षिणेंतील कांहीं भागांतील लोक जी खटपट करितात, तिच्यायोगानें नीग्रोंचा तोटा होतो, इतकेंच नव्हे, तर गोऱ्या लोकांच्या नीतिमत्तेलाहि धक्का बसतो. नीग्रोंचा तोटा क्षणिक असतो; पण गोऱ्या मनुष्याची नीतिमत्ता कायमची खराब होते. मीं पुष्कळदां असें पाहिलें आहे, की, नीग्रोंच्या मतांचा कांहीं फायदा होऊं नये, ह्मणून खोटी शपथ घेण्यास तयार होणारा एकादा मनुष्य पुढेहि नीग्रोशींच नव्हे, तर गोऱ्या मनुष्यांशीहि आयुष्याच्या इतर व्यवहारांत लबाडीने वागण्याला शिकतो. नीग्रोला फसविणारा गोरा मनुष्य पुढे दुसऱ्या गोऱ्या मनुष्याला ठकविण्यालाहि मागेपुढें पहात नाहीं. कायद्याचा अवलंब न करितां नीग्रोला शिक्षा ठोठावणारा गोरा मनुष्य पुढें प्रसंग आला ह्मणजे दुसऱ्या गोऱ्या मनुष्याला तसेंच वागविण्याच्या मोहाला बळी पडतो. या सर्व गोष्टींवरून मला असें दिसतें, कीं, दक्षिण अमेरिकेवरील अज्ञानपटल नाहींसें करण्यास सर्व राष्ट्रानें मदत करणे, हें फार महत्त्वाचे आहे.

जनरल आर्मस्ट्रांग यांच्या शिक्षणविषयक कल्पनांचा प्रसार दक्षिण अमेरिकेंत काळ्या लोकांतच नव्हे, तर गोऱ्या लोकांतहि दिवसेंदिवस अधिक होत चालला आहे, हेंहि लोकांच्या नजरेला चांगलें येत आहे. आपल्या गोऱ्या मुलांमुलींकरितां औद्योगिक शिक्षणाची कांहींतरी तरतूद न करणारें असें एकहि संस्थान हल्लीं दक्षिण अमेरिकेत आढळणार नाहीं; आणि या बाबतींत झालेल्या बहुतेक प्रयत्नांचें श्रेय जनरल आर्मस्ट्रांग यांनांच आहे, असें चौकशीअंती सहज कळून येणार आहे.

आमचें साधें भोजनवसतिगृह सुरू केल्याबरोबर विद्यार्थ्यांची संख्या भराभर एकसारखी वाढूं लागली. आमच्याजवळ कांहीं पैसा नव्हता, तरी कित्येक आठवडे विद्यार्थ्यांची जेवण्याची व निजण्याची सोय आह्मांला कशीतरी करावी लागली. याकरितां शाळेजवळ असलेल्या कांहीं खोल्या आह्मीं भाड्याने घेतल्या. या खोल्या मोडकळीला आलेल्या असल्यामुळे त्यांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांनां हिंवाळ्यांत–

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी.

–थंडीपासून फार त्रास सोसावा लागला. भोजनखर्चाबद्दल आह्मी विद्यार्थ्यांकडून दरमहिना आठ डालर घेत होतों. हीच रक्कम देणें विद्यार्थ्यांनां फार जड जाई. भोजनखर्चाशिवाय खोलीभाडें, जळण, धुणावळ इत्यादि खर्चाचा या रकमेत समावेश होत असे. संस्थेला उपयुक्त असें कांहींहि काम विद्यार्थ्यांनीं केल्यास त्याबद्दल योग्य रकम त्यांच्या नांवें आह्मी जमा करीत होतों. शिक्षणाची फी प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षाला पन्नास डालर होती, आणि हल्लींप्रमाणें त्यावेळींहि मिळेल त्याच्याकडून ही रक्कम आह्मीं वसूल करीत होतों.

या लहानसहान रकमांनीं भोजनवसतिगृह सुरू करण्याजोगें भांडवल आमच्याजवळ जमलें नाहीं. दुसऱ्या वर्षी हिंवाळ्यांत थंडी फारच कडक होती. विद्यार्थ्यांनां पुरेशीं गरम पांघरुणें आमच्यापाशीं नव्हती. कांहीं कालपर्यंत खरोखर कसल्याहि खाटा किंवा चटयासुद्धां आह्मांला सर्व विद्यार्थ्यांनां देतां आल्या नाहींत. अतिशय थंडीच्या रात्रीं विद्यार्थ्यांनां इतके कांहीं क्लेश होत असत, कीं, त्यामुळे मला स्वतःला झोंप येत नसे. विद्यार्थ्यांचें सांत्वन करण्यासाठी मध्यरात्रीं मी त्यांच्या पडक्या खोल्यांकडे पुष्कळदां जात असें. कांहीं विद्यार्थी आह्मी दिलेले ब्लांकेट गुंडाळून घेऊन विस्तव पेटवून त्याभोंवतीं शेकत बसलेले आढळून येत, व कांहीं विद्यार्थी सबंध रात्रभर निजतच नसत ! एका रात्री थंडी फार कडाक्याची पडली होती. दुसऱ्या दिवशीं, "थंडीपासून ज्यांनां विशेष त्रास झाला आहे त्यांनीं हात वर करावे," असें मी प्रार्थनामंदिरांत सागतांच सर्वांनीं आपले हात वर केले. याप्रमाणें आह्मांला अनुभव आले, तरी विद्यार्थ्यांकडून बहुतेक तक्रार येत नसे. आमच्या हातून होईल तितकें विद्यार्थ्यांचं कल्याण करण्याचे प्रयत्न आम्ही करीत होतों, हें त्यांनां माहीत होतें. आपली स्थिति सुधारण्याकरितां मिळालेली कोणतीहि संधि साधून घेण्यांत त्यांनां मोठा आनंद वाटे. शिक्षकांचे ओझे कमी होण्याकरितां आम्हीं काय करावें, अशी ते नेहमीं पृच्छा करीत.

काळ्या लोकांपैकी एकाद्याला श्रेष्ठ अधिकार दिला असतां त्याच्या हाताखालील दुसरे लोक त्याची आज्ञा पाळीत नाहीत, आणि परस्परांशीं चांगल्या रीतीने वागत नाहींत, अशीं पुष्कळ विधानें मीं उत्तर व दक्षिण अमेरिकेत अनेकदां ऐकिलेली आहेत. या सार्वत्रिक समजाविषयी आणि विधानांविषयीं माझा तर अनुभव असा आहे, की, टस्केजी येथे एकोणीस वर्षात कोणाहि विद्यार्थ्यानें अगर संस्थेतील कोणत्याहि कामगारानें शब्दांनी किंवा कृत्यांनीं माझा केव्हांहि अपमान केलेला नाहीं. उलट त्या सर्वांनीं बुद्धया माझ्यावर उपकार करून मला पुष्कळदां आपला ऋणी केलें आहे. शाळेतील जागेत एकादें मोठे पुस्तक, पिशवी अगर दुसरी कोणतीहि अवघड वस्तु मीं हातांतून घेऊन जाणें विद्यार्थ्यांनां आवडत नाहीं. अशा वस्तु नेण्याचा मला प्रसंग आला ह्मणजे बरेच विद्यार्थी पुढे येऊन माझ्या हातांतून त्या वस्तु काढून घेतात आणि त्या आपण नेतात. पाऊस पडत असतां मी माझ्या ऑफिसाच्या बाहेर पडलों आणि अशावेळीं एकाद्या विद्यार्थ्यानें माझ्यापाशी येऊन माझ्यावर छत्री धरण्याबद्दल परवानगी देण्याची विनंति केली नाही, असें केव्हांच घडलें नाहीं.

या विषयासंबधीं लिहितांना, दक्षिणेंतील गोऱ्या लोकांशीं झालेल्या माझ्या सहवासांत माझा स्वतःचा एकादांसुद्धां अपमान झालेला नाहीं, हे सांगण्याला मला आनंद वाटतो. हरएक प्रकारानें शक्य तितका मला मान देण्यांत, विशेषतः टस्केजी गांवांतील आणि आसपासच्या गोऱ्या लोकांनां मोठा अभिमान वाटतो.

थोड्या दिवसांपूर्वी मी डालास (टेक्सास) आणि हाऊस्टन यांमध्यें प्रवास करीत होतों. मी आगगाडींत आहे हे लोकांनां आगाऊ कसें तरी समजे, व प्रत्येक स्टेशनावर अनेक गोरे लोक, बहुतेक ठिकाणीं गांवचे गोरे कामगारलोक येऊन माझी ओळख करून घेत, आणि दक्षिणेत मीं आरंभिलल्या कामगिरीबद्दल माझे मनापासून आभार मानून अभिनंदन करीत.

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी

दुसऱ्या एका प्रसंगीं आगस्टाहून (जॉर्जिया) अटलांटा येथे जातः असतां पुष्कळ प्रवास करून दमल्यामुळे मी पुलमन स्लीपरच्या (झोपेची व्यवस्था असलेल्या मोठ्या) डब्यांत गेलों. तेथें जातांच बोस्टनच्या माझ्या चांगल्या ओळखीच्या दोन बाया मला आढळल्या. दक्षिणेंतील रूढि त्या बायांनां अगदीं माहीत नव्हती, असें मला दिसले. कारण, मी त्यांच्या डब्यांत बसावें, असा त्यांनी मला मोठ्या उदार मनानें आग्रह केला. कांहीं आढेवेढे घेऊन शेवटीं मी त्यांचें ह्मणणें कबूल केलें. कांहीं मिनिटें मी तेथें बसल्यावर एका बाईनें मला नकळत आह्मां तिघां करितां जेवण मागविलें. याच्यायोगानें तर माझा पुराच घोंटाळा उडाला-कारण, आगगाडींत दक्षिणेतील गोरे लोक बरेच होते, आणि त्यांपैकी बहुतेकांचें लक्ष्य आमच्यावर होतें. जेवण मागविलेलें मला जेव्हां समजले, तेव्हां कांहींतरी सबब सांगून निसटावें, असा मीं प्रयत्न केला; पण, आपल्याबरोबर मीं जेवावें असा त्यांनीं आग्रह धरला, शेवटीं उसासा टाकून मी माझ्या जाग्यावर बसलों आणि माझ्याशींच ह्मणालों "आतां मी येथें अडकलों तर खरा !"

परिस्थिति अधिक बिकट होण्याचें दुसरें एक कारण असें घडून आलें, कीं, मेजावर जेवण वाढल्यावर एका बाईला आपल्याजवळ पिशवींत उत्तम चहा असल्याची आठवण झाली, आणि तो चहा तयार करून जेवतांना वाढावा असें तिच्या मनांत आलें. नोकराला हा चहा उत्तम रीतीनें तयार करितां यावयाचा नाहीं, ह्मणून तिनें तो स्वतः तयार करून वाढला. सरतेशेवटीं जेवण एकदांचें आटोपलें, आणि या जेवणाला जणू काय युगच लागलें, असें मला वाटलें ! जेवण आटोपल्यावर या संकटांतून निसटण्यासाठीं तंबाखू ओढण्याच्या डब्यांत जाण्याचा मी विचार केला. बहुतेक लोक यावेळीं तेथील सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठीं या डब्यांत आले होते. मध्यंतरी मी कोण आहे, हें गाडींतील सर्वांनां कसेतरी समजळें. मी त्या डब्यांत गेल्यावर माझ्या आयुष्यांतील एक अति आश्चर्यकारक देखावा माझ्या दृष्टीस पडला. त्या डब्यातील प्रत्येक-

जण-यांपैकी बहुतेक जॉर्जियाचे रहिवासी होते-माझ्यापाशीं आला, आणि हरएकानें माझी ओळख करून घेतली. त्यांपैकी प्रत्येक व्यक्ति दक्षिणेसाठीं चाललेल्या माझ्या प्रयत्नाबद्दल मोठ्या कळकळीनें माझे आभार मानूं लागली. ही कांहीं खुशामत नव्हे. कारण, माझी स्तुति केल्यानें कोणाला कांहीं मिळणार नाहीं, हें प्रत्येकाला माहीत होतें.

टस्केजी येथील संस्था ही माझी नव्हे, किंवा त्या संस्थेच्या कामगारांची नव्हे, तर ती विद्यार्थ्यांची आहे; आणि ट्रस्टींचा (पंचांचा) व शिक्षकांचा या संस्थेशीं जेवढा संबंध आहे, तेवढाच विद्यार्थ्यांचाहि पण आहे. ही गोष्ट त्यांच्या मनांवर बिंबविण्याचा प्रयत्न मीं पहिल्यापासून केला आहे. मी संस्थेत त्यांचा मित्र आणि सल्लागार या नात्यानें आहे. त्यांच्यावर देखरेख ठेवणारा नव्हे, असें त्यांनां भासविण्याची मीं खटपट केली आहे. संस्थेच्या स्थितीविषयीं कांहीं सांगावयाचें असल्यास विद्यार्थ्यांनीं स्वतः येऊन उघडपणे सांगावें, अशाविषयीं माझा कटाक्ष असे. संस्थेच्या कोणत्याहि गोष्टीसंबंधानें तक्रारी किंवा सूचना करून मला पत्र लिहावें, असें मी वर्षातून दोनतीनदां विद्यार्थ्यांनां सांगत असे. त्यांनीं अशीं पत्रे पाठविलीं नाहींत, तर मी त्या सर्वांनां प्रार्थनामंदिरांत शाळेच्या चालचर्येसंबंधानें मन मोकळे करून बोलण्यासाठीं जमवीत असें. अशा तऱ्हेच्या विद्यार्थ्यांच्या सभा मला अधिक आवडत, आणि पुढील बेत करण्यामध्यें मला त्यांचा अतिशय उपयोग होई. संस्थेशी संबंध असणाऱ्या सर्व गोष्टींचें मर्म समजण्याला अशा सभांनीं फार मदत होते. एकाद्याला जबाबदारीचे काम सांगणे आणि आपण त्याच्यावर विश्वास ठेवितों असें दर्शविणों, याच्यायोगाने त्याला जेवढी मदत होते, तितकी दुसरी कशानेंहि होत नाहीं. मजूर लोक आणि त्यांचे धनी, यांमध्ये झालेले तंटे मी ज्यावेळीं वाचतों. तेव्हां मला असें वाटतें, कीं, जर धन्यांनीं आपल्या मजुरांच्या पोटांत शिरून त्यांची सल्लामसत घेतली असती, आणि आपले दोघांचे हितसंबंध एकच आहेत असें त्यांनां भासविलें असतें, तर कितीतरी—--

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी.

–संप व दंगेधोपे टळले असते. एकाद्या मनुष्यावर आह्मीं विश्वास ठेविला म्हणजे तोहि मनुष्य आमच्यावर विश्वास ठेवितो, आणि हा नियम इतर जातींप्रमाणें नीग्रोंनांहि लागू आहे. तुम्हीं त्यांचें निरपेक्षपणें हित करितां असें त्यांनां एकदां समजूंद्या, ह्मणजे मग तुम्हीं त्यांनां पाहिजे तसें वळवाल !

विद्यार्थ्यांनीं टस्केजी येथे स्वतःच्या इमारती बांधाव्या, एवढेच नव्हे, तर होतां होईलतों आपलें सामानहि त्यांनीं तयार करावें, असें माझें पहिल्यापासून धोरण असे. कसलेंहि एकादें खाटलें अगर कोणत्याहि प्रकारच्या चटया तयार होईतोंपर्यंत जमिनीवर निजण्यांत विद्यार्थ्यांनीं जी सहनशीलता दाखविली, ती पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

प्रथमप्रथम फारच थोड्या विद्यार्थ्यांनां सुताराचीं हत्यारें वापरतां येत असत; आणि त्यांनीं केलेलीं खाटलीं तर फारच ओबडधोबड व लेचींपेचीं असत. सकाळीं विद्यार्थ्यांच्या खोलींत गेल्यावेळीं एकदोन खाटा जमिनीवर अस्ताव्यस्त पडलेल्या मीं पुष्कळदां पाहिलेल्या आहेत. सर्व विद्यार्थ्यांनां चटया कशा पुरवाव्या, हा कठिण प्रश्न आमच्यापुढें होता. याविषयीं आह्मीं विचार करून एक तोड काढिली. एक तऱ्हेचें स्वस्त कापड विकत घेऊन त्याच्या आह्मीं मोठ्या पिशव्या तयार केल्या, आणि जवळच असलेल्या अरण्यांतील देवदार वृक्षांच्या बारीक व पातळ सालपटांनीं त्या भरल्या. यानंतर हळुहळू चटया करण्याचा धंदा वाटूं लागला, आणि क्रमाक्रमानें त्यांत इतकी सुधारणा झालेली आहे, कीं, आतां आमच्या संस्थेंत तो एक महत्त्वाचा धंदा होऊन बसला आहे. हल्लीं मुलींनां या धंद्यांत पद्धतशीर शिक्षण दिलें जातें, आणि टस्केजीच्या कारखान्यांतून तयार होणाऱ्या चटया कोणत्याहि दुकानांत मिळणाऱ्या चटयांप्रमाणें चांगल्या असतात.

भोजनवसतिगृह उघडल्यानंतर बरेच दिवस विद्यार्थ्यांच्या खोल्यांत किंवा भोजनगृहांत खुर्चा नव्हत्या. लांकडाच्या तीन फळ्यांनां खिळे मारून तयार केलेलीं स्टुलें खुर्च्यांऐवजीं आह्मी वापरीत होतों. टस्केजी –

येथे प्रारंभींच्या दिवसांत विद्यार्थ्यांच्या खोलींत असणारें सामान ह्मणजे एक बिछाना, कांहीं स्टुलें आणि विद्यार्थ्यांनीं बनविलेलें एक ओबडधोबड मेज, एवढेच असे. सामान विद्यार्थ्यांकडून तयार करवून घेण्याचें धोरण अद्याप चालू आहे; पण आतां त्यांच्या खोलींतल्या वस्तु बऱ्याच वाढल्या आहेत, आणि आतां सुतारकामांत इतकी सुधारणा झालेली आहे. की, विद्यार्थ्यांनी बनविलेल्या सामानांत फारच थोडी चूक आढळून येईल. टस्केजी येथें प्रत्येक गोष्टींत व प्रत्येक ठिकाणीं पूर्ण स्वच्छता राखिली पाहिजे, असा माझा प्रथमपासून कटाक्ष आहे. आह्मीं गरीब आहों, आह्मांपाशीं सुखाचीं व सोयीची साधनें नाहींत, याबद्दल लोक आमची गय करितील; पण घाणीबद्दल ते आह्मांला केव्हांहि क्षमा करणार नाहींत, असें मीं पूर्वी विद्यार्थ्यांनां निक्षून सांगितलें आहे, आंणि आतांहि तेंच सांगत आहें.

याप्रमाणेंच आमच्या संस्थेत बरेंच महत्त्व दिली जाणारी दुसरी एक गोष्ट ह्मटली म्हणजे दांत घासणाऱ्या कुंचल्याचा-टूथब्रशाचा-उपयोग ही होय. जनरल आर्मस्ट्रांग यांच्या म्हणण्याप्रमाणें 'टूथ-ब्रशाचा उपयोग-the gospel of the tooth-brush' हें एक आमच्या संस्थेचें विशिष्ट मतच (क्रीड) झालें आहे. टूथब्रश बाळगून जो विद्यार्थी त्याचा उपयोग करीत नाहीं, त्याला आमच्या संस्थेंत ठेवून घेण्यांत येत नाहीं. अलीकडे टूथब्रशाशिवाय दुसरें कोणतेंहि सामान बरोबर न आणिलेले असे बरेच विद्यार्थी आमच्या संस्थेत दाखल होण्याला आलेले आहेत. टूथब्रशाच्या उपयोगाविषयीं आमचा कटाक्ष आहे, असे दुसऱ्या विद्यार्थ्यांकडून ऐकून, आपल्याविषयीं चांगला ग्रह व्हावा या हेतूनें त्यांनीं फक्त टूथब्रशच आपल्याबरोबर आणिला. एके सकाळीं लेडी प्रिन्सिपालबरोबर विद्यार्थिनींच्या खोल्या तपासण्याला मी गेलों होतों. एका खोलींत नवीन आलेल्या तीन मुली होत्या. टूथ-ब्रश आहेत काय, असें मीं त्यांनां विचारतां त्यांपैकी एकीनें उत्तर दिले, कीं, "महाराज, हा पहा आमचा टूथब्रश. तो आम्हीं तिघींनीं मिळून—

निजण्याच्या आधीं बिछान्याची तयारी.

–कालच विकत घेतला." प्रत्येकीचा टूथब्रश निराळा असणें चांगलें, हे शिकण्याला त्यांनां फारसा वेळ लागला नाहीं.

टूथब्रशाच्या उपयोगानें विद्यार्थ्यांमध्यें कशी उत्तम सुधारणा झाली आहे, हे पाहणें फारच मनोरंजक आहे. कांहीं अपवाद खेरीजकरून मला असें दिसून आलेले आहे, कीं, जर एका विद्यार्थ्याचा एकादा दुसरा टूथब्रश हरवला आणि त्यानें आपण होऊन नवीन दूथब्रश आणला, तर तो पुढें नांवालौकिकाला चढलाच पाहिजे. विद्यार्थ्यांनीं आपले शरीर पूर्ण स्वच्छ ठेवावें या गोष्टीकडे प्रथमपासून आमच्या स़स्थेत फार लक्ष्य दिलें जातें. भोजनाप्रमाणें स्नानहि नियमित वेळीं करण्याला विद्यार्थ्यांनां शिकविलेलें आहे. स्नानगृहाची व्यवस्था होण्यापूर्वीच आम्ही हें त्यांनां शिकवू लागलों. बरेच विद्यार्थी मळ्यांच्या भागांतून आलेले असल्यामुळे निजावें कसें, चादरी कशा घालाव्या, पाघरुणें कशी घ्यावीं, वगैरे सर्व कांहीं त्यांनां आम्हांला शिकवावें लागलें. श्रीच्या झग्याचेंहि महत्त्व त्यांनां समजावून सांगावें लागलें.

अंगरख्याला सर्व बटन (बंद) बरोबर असणें, कपडे फाटके नसणें, वा त्यांवर कांहीं तेलकट डाग नसणें, या गोष्टी विद्यार्थ्यांनां शिकविणे प्रथम कांहीं दिवस आह्मांला बरेंच जड गेलें. पण मला सांगण्याला आनंद वाटतो, कीं, स्वच्छतेचा हा धडा विद्यार्थी इतका चांगला शिकले आहेत, आणि पुढील विद्यार्थ्यांनीं परंपरेनें मागील विद्यार्थ्यांकडून गुण इतका चांगला उचलला आहे, कीं, आतां जेव्हां रोज संध्याकाळी विद्यार्थी प्रार्थनामंदिरांतून बाहेर पडतात आणि त्यांच्या पोषाखांची तपासणी केली जाते, तेव्हां कोणाच्याहि कोटाला एकादें बटन नाहीं असें बहुतेक आढळून येत नाहीं.

प्रकरण बारावें.

पैसा जमविणें.

जनवसतिगृह उघडल्यावर आमच्या पहिल्या इमारतीच्या म्हणजे पोर्टर हालच्या वरच्या मजल्यावरील खोल्यांत कांहीं मुलींची राहण्याची सोय आम्हीं केली; पण मुलांमुलींची संख्या एकसारखी वाढूं लागली. तरुण मुलांनां राहण्याकरितां शाळेच्या जागेबाहेर कांही खोल्या मिळत असत; पण मुलींनां तेथें ठेवणें आम्हांला सुरक्षित वाटलें नाहीं. लवकरच अधिक मुलींकरितां राहण्याची सोय करण्याचा आणि सर्व विद्यार्थ्यांकरितां मोठें भोजनवसतिगृह सुरू करण्याचा कठिण प्रश्न आमच्यापुढें आला. मुलींनां राहण्याकरितां खोल्या व सर्वांकरितां भोजनवसतिगृह यांचा समावेश होईल, इतकी दुसरी मोठी इमारत बांधविण्याचें आम्हांला ठरवावें लागलें.

या नवीन इमारतीचा कच्चा नकाशा काढून पाहतां या कामाला दहा हजार डालर खर्च येईल, असा आम्हीं अंदाज केला. इमारत बांधण्याचे काम सुरू करण्याला आमच्यापाशीं पैसा तर कांहीं नव्हता, तरी आम्हांला अत्यंत जरूर असलेल्या या इमारतीला नांव देण्याचें आम्हीं ठरविले इमारत बांधण्याचीं सर्व साधनें मिळण्याची आम्हांला बरीच शंका होती. इमारतीचें नांव ठेवण्याला आम्हांला कशाचीहि जरूरी नव्हती, हें आम्हांला माहीत होतें. आम्हीं ज्या संस्थानांत काम करीत होतों त्या संस्थानला मान द्यावा, म्हणून भावी इमारतीचें नांव 'अलाबामा हॉल असें ठेवण्याचें आम्हीं ठरविलें. टस्केजींतील आणि आसपासच्य भागांतील काळ्या गोऱ्या लोकांची सहानुभूति आणि मदत मिळविण्याच खटपट पुनः मिस डेव्हिडसननें सुरू केली, आणि लोकांनीहि आपापल्या शक्तीप्रमाणें मदत केली. पूर्वी पोर्टर हाल बांधतेवेळ मदत केल्याप्रमाणें विद्यार्थ्यांनीं आतांहि पाया घालण्याला मदत व्हाव म्हणून माती खणून काढण्याला सुरुवात केली.

पैसा जमविणे.

पैसा मिळविण्याचे आमचे सर्व उपाय बहुतेक थकल्यावर, जनरल आर्मस्ट्रांग हे मनानें किती मोठे व उदार होते, आणि साधारण मनुष्यांपेक्षां ते कितीतरी पटीनें श्रेष्ठ होते, हें चांगल्या रीतीनें सिद्ध करून दाखविणारी एक गोष्ट घडून आली. नवीन इमारतीसाठीं पैसा कसा जमवावा, या मोठ्या चिंतेंत आम्ही असतांना, जनरल आर्मस्ट्रांग यांच्याकडून एकदम मला एक तार आली. "उत्तर अमेरिकेंत आपल्याबरोबर एक महिना मला प्रवास करण्याचे जुळेल काय ? जुळत असल्यास मीं ताबडतोब हाम्पटनला निघून यावें," असा त्यांचा संदेश होता. अर्थात् मला तें आमंत्रण स्वीकारावें लागलें, आणि मी लगेच हाम्पटनला चालता झालों. तेथे गेल्यावर गवयांची चौकडी घेऊन उत्तरेकडे जावयाचें, आणि तेथील मोठमोठ्या शहरांत सभा भरवून त्यांनीं आणि मी भाषणें करावयाचीं, असा जनरल आर्मस्ट्रांगनीं बेत केला आहे, असें मला कळलें. या सभा व हे सर्व प्रयत्न हाम्पटनसंस्थेकरितां नसून टस्केजीसंस्थेच्या हितार्थ आहेत, आणि सर्व खर्चाबद्दल हाम्पटनसंस्था जबाबदार राहील, असें पुढें जेव्हां मला जनरल आर्मस्ट्रांग यांनीं सांगितलें, तेव्हां मला किती आश्चर्य वाटलें असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

जनरल आर्मस्ट्रांग यांनीं जरी मला प्रत्यक्ष सांगितलें नाहीं, तरी उत्तरेकडील प्रमुख गृहस्थांनां माझी अशा रीतीनें ओळख करून द्यावी,तसेंच 'अलाबामा हाल' या इमारतीला लागणारा पैसा ताबडतोब कांहीतरी जमवावा, हाच त्यांचा मुख्य हेतु होता, असें मला आढळून आलें. अशा रीतीनें टस्केजीसंस्थेला मिळालेला पैसा हा वस्तुतः हाम्पटन संस्थेच्या पैशांतून घेतल्यासारखाच होय, असा कोणीहि क्षुद्र व कोत्या बुद्धीचा मनुष्य तर्क लढवील. पण असे स्वार्थी अगर कोते विचार जनरल आर्मस्ट्रांगच्या मनांत केव्हांहि आले नाहींत. ते मनानें इतके मोठे व उदार होते, कीं, असले क्षुद्र विचार त्यांच्या मनांत येणे कधींच शक्य नव्हतें. उत्तरेकडील लोकांनीं जो कांहीं पैसा दिला,----

—तो कोणत्याहि एका शाळेला पुढें आणण्याकरितां नसून, सर्व नीग्रो ज्ञातीची उन्नति व्हावी ह्मणून दिला आहे, हें ते जाणत होते. दक्षिणेंतील सर्व नीग्रो ज्ञातीचा प्रश्न सोडविण्याच्या कामी त्यांची उन्नति करण्याच्या कामी, निष्काम आणि उदार प्रयत्नांचें मुख्य केंद्र होण्यांतच हाम्पटनसंस्थेची बळकटी आहे, हेंहि त्यांनां चांगलें अवगत होते.

उत्तरेकडील शहरांत मी जीं भाषणें करणार होतों, त्याविषयीं जनरल आर्मस्ट्रांग यांनीं केलेला एक उपदेश मला आठवतो. ते ह्मणाले "प्रत्येक शब्दाबरोबर लोकांनां एकेक कल्पना द्या!" या उपदेशांत कांही सुधारणा करणें फार कठिण होईल, आणि हा उपदेश सर्व सार्वजनिक भाषणांनां लागू पडेल, असें मला वाटतें. तेव्हांपासून आतांपर्यंत हा त्यांचा उपदेश नेहमीं ध्यानांत ठेवण्याचा मीं प्रयत्न केलेला आहे.

न्यूयॉर्क, ब्रुकलिन, बोस्टन, फिलाडेल्फिया आणि दुसऱ्या मोठमोठ्या शहरांत आह्मीं सभा भरविल्या, आणि जनरल आर्मस्ट्रांग व मी दोघांनी मिळून हाम्पटनसंस्थेकरितां नव्हे, तर टस्केजीसंस्थेसाठीं मदत मागितली. या सभांमध्ये 'अलाबामा हॉल' बांधण्याकरितां पैसा जमविण्याचे आणि संस्था सर्व लोकांच्या नजरेसमोर आणण्याचे आह्मी विशेष प्रयत्न केले, आणि या दोन्ही कामांमध्यें आह्मांला बरेंच यश आले.

माझी अशाप्रकारें ओळख झाल्यावर मी उत्तरेकडे फंड जमविण्या-साठीं एकटाच जाऊं लागलों. गेलीं पंधरा वर्षें संस्थेच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठीं पैसा गोळा करण्याकरितां शाळा सोडून बरेंच लांब मला हिंडावें लागलें आहे, आणि माझा बराच वेळ या कामांत खर्च झालेला आहे. पैसा गोळा करण्याच्या प्रयत्नांमध्यें मला आलेले अनुभव वाचकांनां खरोखर चित्ताकर्षक वाटतील. योग्य कामीं पैसा खर्च करण्यास समर्थ असलेल्या श्रीमंत लोकांकडून सहानुभूति आणि मदत मिळविण्यांत मीं कोणकोणत्या नियमांचें अवलंबन केलें आहे, असा प्रश्न परोपकारी कृत्यांसाठीं पैसा जमविण्याची खटपट करणाऱ्या गृहथांकडून—

पैसा जमविणे.

— मला वेळोवेळी विचारण्यांत आला आहे. 'भिक्षांदेही'च्या किंवा झोळीच्या शास्त्रांत जर कांहीं नियम करणें शक्य असेल, तर खालील दोनच नियम करतां येतील असें मी सांगेन.

(१) व्यक्तीनां व संस्थांनां आपल्या कामगिरीची पूर्ण माहिती देण्यांत यत्किंचिहि कसूर न करणें.

(२) परिणामाविषयीं बेफिकीर असणे.

यांपैकी दुसऱ्या नियमाबरहुकूम वागणें मला फार कठिण गेले आहे. अन्य उपयुक्त कामीं लावितां येण्याजोगी शारीरिक आणि मानसिक शक्ति चिंतेच्या योगानें निरर्थक भस्म होऊन जाते, हें तत्त्व दिवसेंदिवस मला अधिक चांगलें कळत आहे. तरी, बिले चुकतीं करायाचीं असली आणि त्यांची फेड करावयाला हातीं पैसा नसला, ह्मणजे निश्चित किंवा बेपर्वा राहणें फारच कठिण आहे. पुष्कळ श्रीमंत नामांकित गृहस्थांच्या सहवासांतील अनुभवानें मला असें आढळून आले आहे, कीं, जे कोणी शरीर व मन आपल्या कह्यांत ठेवितात, क्षुब्ध होत नाहींत, ज्यांचें आत्मसंयमन कोणत्याहि प्रसंगीं नाहींसें होत नाहीं, आणि जे कोणी शांत, स्वस्थ, सोशीक आणि नम्र असतात, असे लोक फार मोठे यश आणि नांवलौकिक मिळवितात. अशा तऱ्हेचें मी पाहिलेले उत्तम उदाहरण म्हणजे प्रेसिडेंट वुइल्यम मॅक् किनले हेच होत.

माझ्या मतें हाती घेतलेल्या कोणत्याहि कामांत यश येण्याची गुरुकिल्ली म्हटली म्हणजे आपला स्वतःचा पूर्ण विसर-महत्कार्यामध्ये पूर्ण गढून जाणें-हीच होय. ज्या मानानें अंगीकृत कार्यात याप्रमाणें आपण लीन होऊन जातों, त्या मानानें त्या कार्यापासून आपणांला उत्तम सुखाची प्राप्ति होते.

श्रीमंत लोक श्रीमंत आहेत म्हणून, आणि ते धर्मकृत्यांकडे अधिक खर्च करीत नाहीत म्हणून, त्यांनां कोणी दोष देतांना मीं पाहिलें, कीं, टस्केजीसंस्थेकरितां पैसा गोळा करण्याच्या कामी आलेला अनुभव मला स्वस्थ बसू देत नाहीं. प्रथम असा जे कोणी दोषारोप करितात,--

–त्यांनां हें माहीत नसतें, कीं, जर श्रीमंतांनी आपल्या संपत्तीचा बराच मोठा भाग दानधर्माकडे एकदम खर्च केला, तर त्यांनी चालविलेला उद्योगधंदा बसेल, हजारों लोकांवर उपासमाराची पाळी येईल, आणि कितीतरी अनर्थ ओढवेल. दुसरें, श्रीमंत लोकांजवळ मदतीसाठीं नेहमी कितीतरी अर्ज येतात, याची कल्पना फारच थोड्याजणांनां असते. रोज मदतीविषयीं निदान वीस मागण्या ज्यांच्यामागें आहेत, असे श्रीमंत लोक मला माहीत आहेत. पुष्कळदां मी श्रीमंत लोकांच्या ऑफिसांत गेल्यावर तेथें पांचसहा मंडळी एकाच कार्यासाठीं ह्मणजे पैसे मागण्याविषयीं त्यांची वाट पहात बसलेली आहे, असें मला आढळून आलेले आहे. हा लोकांचा स्वतः येऊन मागणी करण्याचा प्रकार झाला. याशिवाय टपालांतून मदतीसाठीं किती अर्ज येत असतील, कोण जाणे ! उजव्या हातानें दिलेलें दान डाव्या हाताला समजू न देणाऱ्या, आपलें नांव प्रगट न करणाऱ्या अशा दात्यांकडून किती पैसा दानधर्माकडे खर्च होतो, याची कल्पना फारच थोड्यांनां असेल. दरवर्षी हजारों डालर गुप्तपणें दान करणारे असे कांहीं सज्जन मला माहीत आहेत. पण, हे कांहींच दानधर्म करीत नाहींत, असा त्यांच्यावर दोषारोप होत असलेला मी ऐकिलेला आहे. उदारहणार्थ, न्यूयॉर्कमध्ये दोन बाया आहेत. यांचीं नांवें वर्तमानपत्रांत कचितच प्रसिद्ध होत असतात. पण, याच बायांनीं आठ वर्षांत तीन मोठ्या आणि महत्वाच्या हवेल्या बांधण्याला पुरेसा पैसा आह्मांला गुप्तपणें दिला आहे. याशिवाय यांनीं संस्थेला दुसऱ्या उदार देणग्याहि दिलेल्या आहेत. या उदार स्त्रिया टस्केजीसंस्थेला मदत करितात, इतकेंच नव्हे, तर दुसऱ्या योग्य कार्याला मदत करण्याची संधिहि त्या नेहमीं शोधीत असतात.

टस्केजी येथील कार्याकरितां जरी लाखों डालर सुदैवाने माझ्यामार्फत जमा झालेले आहेत, तरी जग ज्याला 'भिक्षा' ह्मणतें, तो प्रकार मीं टाळलेला आहे. मी पैशाविषयीं भीक मागितलेली नाहीं,---

पैसा जमविणे.

—आणि मी भिकारी नाहीं असें मी पुष्कळदां लोकांनां सांगतों. पैशासाठीं श्रीमंतांचा एकसारखा पिच्छा पुरविला, तर मदत मिळत नाहीं, अशी माझी अनुभवानें खातरी झालेली आहे. ज्यांनां पैसा मिळविण्याची अक्कल असते, त्यांनां आपण मिळविलेल्या पैशाचा उपयोग कसा करावा, हें चांगलें समजतें, या तत्त्वावर मी नेहमीं चाललों आहे; आणि नुसत्या 'भिक्षांदेहि' पेक्षां टस्केजी संस्थेविषयीं माहिती, विशेषतः तेथील ग्रॅज्युएटांच्या कामांची माहिती देण्यानेंच अधिक मदत मिळालेली आहे. सर्व गोष्टींची आणि कार्याची हकीगत गौरवानें निवेदन करणें या याचनेचीच श्रीमंत लोक अपेक्षा करितात, असें मला वाटतें.

दारोदार हिंडण्याचें आणि त्याचप्रमाणें ऑफिसांतूनहि हिंडण्याचें काम फार कठिण, त्रासदायक आणि शारीरिक शक्ति क्षीण करणारें आहे; तरी पण याचाहि कांहीं मोबदला मिळतो. अशा त-हेच्या कामानें मानवी स्वभावाचें नीट निरीक्षण करण्याची संधि मिळते. तसेंच जगांतील कांहीं उत्तम माणसांच्या सर्वात उत्तम पुरुषांच्या असेंच ह्मणणें यथार्थ होईल-भेटीचा सुयोग प्राप्त होतो. जो कोणी एकाद्या देशाचें स्थूलमानानें निरीक्षण करतो, त्याला असें आढळून येईल, कीं, सर्व लोकांनां सुधारण्याकरितां अस्तित्वांत आलेल्या संस्थांबद्दल जे अतिशय कळकळ दाखवितात, तेच लोक त्या देशांत सर्वांत अधिक उपयोगी आणि वजनदार असतात.

एकदां बोस्टन येथे एका श्रीमंत बाईच्या घरीं मी भेटावयाला गेलों आणि ओटीवर जाऊन मीं माझ्या नांवाची चिठी आंत पाठविली. तेथें उत्तराची वाट पहात मी राहिलों असतां त्या बाईचा नवरा झटकन् बाहेर आला आणि "काय पाहिजे?" असें एकदम मला विचारूं लागला.

तेव्हां मी त्याला माझ्या भेटीचा उद्देश सांगण्याचा प्रयत्न केला; पण तो गृहस्थ अधिकच असभ्यपणानें बोलूं लागला, आणि शेवटीं इतका कांहीं चिडला, की, त्या बाईच्या उत्तराची वाट न पहातां मला तें घर सोडावें लागलें. नंतर या घरापासून जवळच असलेल्या एका गृहस्थाला

— मी भेटावयाला गेलों; त्यानें माझें उत्तम रीतीनें व मनापासून स्वागत केलें, आणि एक मोठ्या रकमेचा चेक माझ्या नांवें लिहून दिला. याबद्दल मी त्याचे आभार मानणार, तोंच तो म्हणाला "मिस्टर वाशिंग्टन ! तुह्मी या सत्कार्यात मदत करण्याची मला संधि दिलीत, याबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. अशा सत्कृत्यांनां हातभार लावणें हा एक मोठा मानच आहे. आमच्याकडून असें काम करून घेतल्याबद्दल आह्मी बोस्टनचे रहिवासी आपले फार ऋणी आहों." पैसे गोळा करण्याच्या कामी आलेल्या अनुभवानें माझी अशी खातरी झाली आहे, कीं, वरील पहिल्या नमुन्याचा मनुष्य दिवसेंदिवस कमीकमी होत चालला आहे, आणि दुसऱ्या नमुन्याचे मनुष्य वाढत आहेत. अन्य प्रकारानें हें सांगावयाचें
ह्मटलें, ह्मणजे योग्य कार्याकरितां मदत मागण्याला येणाऱ्या स्त्रीपुरुषांनां, श्रीमंत लोक भिकाऱ्याप्रमाणे न लेखतां, आपलेंच काम करणारे हे एजंट किंवा प्रतिनिधि आहेत, असें मानितात.

बोस्टन शहरांत मी एकाद्याच्या घरीं पैसा मागण्याकरितां गेलो आणि पैसे मिळाल्यावर मीं त्यांचे आभार मानण्यापूर्वीच अशी मदत मागितल्याबद्दल उलट त्यांनीं माझे आभार मानिले नाहींत, असें केव्हांच घडलेलें नाहीं. आपल्याकडून मदत घेतली असतां त्यांत विशेष आपलाच व मान होतो, असें त्या शहरांतील दात्यांनां वाटतें ! जरी इतर गांवांत मला कांहीं चांगलीं उदाहरणें आढळलीं आहेत, तरी बोस्टन शहरांतील लोकांसारखा उदार आणि दयाळू स्वभाव मला दुसरीकडे कोठें आढळला नाहीं. लोकांची प्रवृत्ति दिवसेंदिवस दानाकडे होत आहे, असें मला वाटतें. एकंदरींत श्रीमंत लोकांनां सत्कार्यी मदत करूं देण्याची संधि देण्याला बिलकूल कसूर न करणें, या मुख्य नियमानें-धोरणानें मी पैसे गोळा करीत होतों व आहे, असें मी पुनः सांगतों.

टस्केजीसंस्थेच्या प्रारंभींच्या वर्षांमध्ये कित्येक दिवस एक डालरहि न मिळतां उत्तरेकडील शहरांत आणि खेड्यापाड्यांत मी भटकलों आहे.

पुष्कळदां असे घडलेलें आहे, कीं, एकाद्या आठवड्यांत बरीच मदत मिळेल अशी अपेक्षा असलेल्या गृहस्थांकडून कांहींच मदत न मिळाल्यामुळे मी निराश व खिन्न झालों असतांना, ज्याच्याकडून कांहीं मिळेल अशी आशाहि नव्हती अशा गृहस्थांकडून केव्हांकेव्हां मोठी मदत मिळालेली आहे.

कानेक्टिकट संस्थानांतील स्टैंफर्ड गांवाहून दोन मैल दूर राहत असलेल्या एका गृहस्थाला टस्केजी संस्थेची परिस्थिति आणि गरजा यांविषयीं माहिती दिली, तर तो आह्मांला कांही मदत करील, अशी बातमी मला एकदां लागली. तेव्हां एका अतिशय कडाक्याच्या थंडीच्या आणि तुफानाच्या दिवशीं मी त्या गृहस्थाला भेटण्याला गेलो, आणि कांहीं खटपट करून मी त्याची भेट घेतली. त्यानें माझें ह्मणणें लक्ष्यपूर्वक ऐकून घेतलें, पण त्यानें कांहींएक दिलें नाहीं. त्याला भेटण्याकरितां खर्च केलेले माझे तीन तास व्यर्थ गेले, असें मला कांहीं अंशीं वाटल्यावांचून राहिले नाही. तथापि, माझें कर्तव्यकर्म करण्याचा नियम मी पाळला. मी त्याला जर भेटलों नसतों, तर माझें कर्तव्यकर्म मी बरोबर न केल्याबद्दल मला हुरहुर लागली असती.

या भेटीनंतर दोन वर्षांनीं याच गृहस्थाकडून टस्केजी येथे पुढील आशयाचे पत्र आलें:- "तुमच्या संस्थेच्या कामासाठीं दहा हजार डालरची हुंडी मीं या पत्रासोबत पाठविली आहे. मीं ही रक्कम माझ्या मृत्युपत्रांत तुमच्या संस्थेला देऊं केली होती; पण, ती आतांच जीवंतपणी देऊन टाकणें हें बरें, असें मला वाटतें. दोन वर्षांपूर्वी झालेल्या आपल्या भेटीचे स्मरण होऊन मला फार आनंद होत आहे !"

या हुंडीपासून खरोखर मला जितका कांहीं आनंद झाला, तितका दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें झाला नसेल. संस्थेला त्यावेळीं मिळालेली सर्वांत मोठी रक्कम हीच होय. कांहीं थोडे पैसे मिळून त्यानंतर बरेच दिवस तसेच गेले होते. पैशाच्या टंचाईमुळे आह्मी मोठ्या काळजींत होतों, आणि आमच्या मनाला बराच त्रास झाला होता. एकादी मोठी संस्था—-

—चालविणें व त्यासंबधी पुष्कळ बिलें द्यावयाचीं शिल्लक असणें, तसेंच दरमहिना हीं बिलें चुकतीं करण्याला पैसा कोठून आणावा हे माहीत नसणें, याहून अधिक बिकट परिस्थिति दुसरी कोणती असेल असें मला वाटत नाहीं.

आमच्याविषयीं ह्मणाल, तर माझ्यावर दुप्पट जबाबदारी होती, आणि यामुळे माझी चिंता दुणावली होती. संस्था जर गोऱ्या लोकांनी चालविली असती आणि त्यांत जर त्यांनां अपयश आलें असतें, तर नीग्रोंच्या शिक्षणाची हानि झाली असती; पण, नीग्रोंनीं चालविलेली आमची ही संस्था बुडाली असती, तर एका शाळेचा तोटा झाला असता, एवढेच नव्हे, तर सबंध ज्ञातीच्या कर्तृत्वाविषयीं लोकांचा विश्वास उडाला असता. अशा परिस्थितींत ही दहा हजार डालरची हुंडी मिळाल्यामुळे बरेच दिवसांचें माझ्या छातीवरचें ओझें-दडपण नाहींसें झालें.

संस्थेचें अंतरंग जितकें स्वच्छ, पवित्र व उपयुक्त ठेवावें, तितका तिला अधिक लोकाश्रय मिळणार, असें टस्केजी येथें आमचें काम सुरू झाल्यापासून तों आतांपर्यंत मला वाटत आहे; आणि आमच्या शिक्षकांच्या मनांत ही कल्पना ठसविण्याची कोणतीहि संधि मी वायां जाऊं देत नाहीं.

परलोकवासी सुप्रसिद्ध रेल्वे सावकार कॉलीस पी. हटींगटन यांची मीं जेव्हां प्रथम भेट घेतली, तेव्हां त्यांनीं आमच्या संस्थेसाठीं दोनच डालर दिले. त्यांच्या मृत्यूच्या पूर्वी कांहीं महिने मी त्यांची शेवटची भेट घेतली, त्यावेळीं त्यांनीं आमच्या संस्थेच्या कायमच्या फंडासाठीं पन्नास हजार डालर दिले ! या दोन देणग्यांच्या दरम्यान प्रतिवर्षी मिस्टर व मिसेस हटींगटन यांच्याकडून बऱ्याच मोठ्या रकमा येत असत.

आह्मांला पन्नास हजार डालरची मोठी देणगी मिळाली हें टस्केजी संस्थेचें नशीब होय, असें कांहीं लोक ह्मणतील. छे, हें भाग्य किंवा नशीब नव्हे. सतत उद्योग-अविरत उद्योग, याचें हें फल होय !

पैसा जमविणें.

दीर्घोद्योग केल्यावांचून कोणाला कांहीं महत्त्वाचा लाभ होत नाहीं.

मिस्टर हटींगटननीं मला प्रथम दोन डालर दिल्या वेळीं त्यांनीं अधिक रक्कम दिली नाहीं ह्मणून मीं त्यांनां दोष दिला नाहीं. पण कांहींतरी करणी करून आह्मी अधिक मोठ्या देणग्यांनां योग्य आहों अशी त्यांची खातरी करण्याचा मीं निश्चय केला. आमच्या कार्याचे महत्त्व त्यांच्या मनांत भरविण्याला मीं बारा वर्षे एकसारखी खटपट केली. संस्थेची उपयुक्तता जसजशी वाढू लागली, तसतशा त्यांच्या देणग्याहि वाढूं लागल्या, असें मला आढळून आलें. मिस्टर हटींगटनपेक्षां आमच्या संस्थेविषयीं अधिक सहानुभूति आणि कळकळ दाखविणारा दुसरा कोणीहि गृहस्थ मला भेटला नाहीं. त्यांनीं आह्मांला भरपूर पैसा दिला; एवढेच नव्हे, तर संस्थेचा एकंदर वर्तनक्रम कसा असावा, याविषयीं पित्याप्रमाणें मला उपदेश करण्यांत त्यांनीं आपला अमूल्य वेळहि खर्च केला.

उत्तरेकडे पैसा गोळा करीत असतां मी पुष्कळदां मोठ्या अडचणींत सांपडलों होतों. लोकांचा विश्वास बसणार नाहीं ह्मणून खालीं दिलेला प्रसंग मीं कोणाला सांगितला नाहीं. एका सकाळीं ऱ्होड बेटांत प्राव्हिडेन्स येथे आल्यावर माझ्या खिशांत जेवणासाठीं अर्धा आणाहि नव्हता. पण एका बाईकडून कांहीं रक्कम मिळेल अशी मला आशा होती. तिला भेटण्यासाठीं रस्ता ओलांडून जात असतां, रस्त्यांत गाड्यांच्या मार्गावर मला पंचवीस सेंट्स् चे (साडेबारा आण्यांचें) नाणें सांपडलें. भोजनासाठीं हे पंचवीस सेंटस् तर मला मिळालेच, शिवाय थोड्याच मिनिटांनीं भेटावयाला गेलेल्या बाईकडून एक देणगीहि मिळाली.

आमच्या संस्थेच्या पदवीदानाच्या एका प्रसंगीं, बोस्टनचे रेव्हरंड मिस्टर विंचेस्टर डोनाल्ड, ट्रिनिटी चर्चचे रेक्टर यांनीं मुख्य भाषण करावें, असें मी त्यांनां आमंत्रण देण्याचें धाडस केलें. भाषण ऐकावयाला–

– येणाऱ्या सर्व मंडळीला पुरेशी जागा आमच्यापाशीं नसल्यामुळे, फळ्या व झाडांच्या फांद्या यांचा एक लतामंडप व्याख्यानासाठीं आह्मी तयार केला. डॉक्टर डोनाल्ड यांचें भाषण सुरू होतें न होतें तोंच पाऊस जोरानें पडूं लागला. यामुळे त्यांनां भाषण बंद करावें लागलें आणि त्यांच्यावर छत्री धरावी लागली.

ट्रिनिटी चर्चचे रेक्टर त्या प्रचंड श्रोतृसमुदायासमोर एका जुन्या छत्रीखालीं उभे आहेत, व पाऊस बंद होऊन आपलें भाषण केव्हां सुरू होतें याची वाट पहात आहेत, असें चित्र माझ्या नजरेला पडेतोपर्यंत मीं काय धाडस केलें आहे, याची मला स्पष्ट कल्पना नव्हती !

लवकरच पाऊस थांबला आणि डॉक्टर डोनाल्ड यांनीं आपले भाषण आटोपलें. हवा प्रतिकूल होती, तरी त्यांचें व्याख्यान चांगले वठलें. आपल्या खोलींत जाऊन भिजलेले कपडे सुकविल्यानंतर डॉक्टर डोनाल्ड सहज म्हणाले "टस्केजी येथें एक भलें मोठें प्रार्थनामंदिर उभारल्यास, तें अस्थानीं होणार नाहीं." त्यावेळीं इटालींत प्रवास करीत असलेल्या दोघां बायांकडून "टस्केजी येथें जरूर असलेल्या मोठ्या प्रार्थनामंदिराचा सर्व खर्च देण्याचा आह्मीं निश्चय केला आहे," अशा मजकुराचें पत्र दुसऱ्या दिवशींच आह्मांला आलें !

कांहीं दिवसांपूर्वी मिस्टर अँड्र्यू कार्नेजी यांच्याकडून नवीन लायब्ररीच्या इमारतीसाठीं आह्मांला वीस हजार डालर मिळाले. आमचें पूर्वीचे वाचनालय एका पडक्या खोपटीच्या कोपऱ्यांत होतें आणि त्याने ५×१२ फूट एवढीच जागा अडविली होती. मिस्टर कार्नेजींची सहानुभूति आणि मदत मिळविण्याला मला दहा वर्षे खटपट करावी लागली. दहा वर्षांपूर्वी पहिल्या भेटीच्या वेळीं त्यांनीं आमच्या संस्थेकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं. पण, त्यांच्या मदतीला आह्मी लायक आहों असे त्यांनां दाखविण्याचा मी निश्चय केला. दहा वर्षे कसून काम केल्यावर मीं त्यांनां खालीं दिल्याप्रमाणें पत्र लिहिलें: -

पैसा जमविणे..

"१९ दिसेंबर, १९००,

मिस्टर अँड्यु कार्नेजी,

५ डब्ल्यू. ११ स्ट्रीट, न्यूयॉर्क, यांस-

प्रिय महाशय !

कांहीं दिवसांपूर्वी आपल्या घरीं झालेल्या भेटींत सुचविल्याप्रमाणें आमच्या संस्थेच्या लायब्ररीच्या इमारतीसाठीं आपल्यापाशीं आह्मी लेखी विनंति करीत आहों.

आमच्या संस्थेत ११०० विद्यार्थी, ८६ कामगार आणि शिक्षक, कुटुंबासहित आहेत. शिवाय शाळेजवळच सुमारें २०० काळे लोक राहतात. या सर्व लोकांनां लायब्ररीच्या इमारतीचा उपयोग होईल.

आमच्यापाशीं १२००० पुस्तकें, मासिके वगैरे मित्रांकडून आलेल्या देणग्या आहेत. यांनां योग्य अशी जागा आमच्यापाशीं नाहीं, आणि चांगलें वाचनालयहि नाहीं.

आमच्या संस्थेंतील ग्रॅजुएट दाक्षणेतील प्रत्येक भागांत काम करण्याला जातात. यास्तव वाचनालयांत मिळणाऱ्या ज्ञानामुळे सर्व नीग्रो जातीच्या उन्नतीला मदत होईल, यांत शंका नाहीं.

आह्मांला हवी असलेली इमारत बांधण्याला वीस हजार डालर लागतील. या इमारतीचीं सर्व कामें ह्मणजे विटा तयार करणें, गवंडी, सुतार व लोहार यांचीं कामें वगैरे सर्व विद्यार्थीच करितील. आपण द्याल त्या पैशानें आह्मांला इमारत मिळेल इतकेंच नव्हे, तर इमारत बांधिली जात असतां, इमारती बांधण्याला लागणारे पुष्कळ धंदे शिकण्याला विद्यार्थ्यांनां संधि मिळेल, आणि काम करून मिळविलेल्या पैशानें त्यांनां शाळेत शिकतां येईल. इतक्या रकमेनें दुसऱ्या कोणत्याहि सबंध ज्ञातीची अशी उन्नति होईल, असें मला वाटत नाहीं. आपणाला कांहीं विशेष माहिती हवी असल्यास, ती मोठ्या खुषीनें मी देईन.

आपला नम्र,
बुकर टी. वाशिंग्टन,
प्रिन्सिपाल."

आत्मोद्धार.

या पत्राचें उलट डांकेनें खालीं दिल्याप्रमाणें उत्तर आलें:

"लायब्ररीच्या इमारतीप्रीत्यर्थ वीस हजार डालरपर्यंत बिलें जस जशी येत जातील, तस तशीं तीं मी फार खुषीनें देत जाईन. आपलें हें उदार कार्य मला किती पसंत आहे, हें दाखविण्याची संधि मिळाल्यामुळे महा फार आनंद होत आहे. "

सर्व कारभार चोख आणि टापटिपीनें ठेविला असतां श्रीमंत लोकांची सहानुभूति व मदत बहुतेक मिळते, असें मला आढळून आहे आहे. टस्केजीसंस्थेच्या पैशासंबंधींचा आणि इतर सर्व व्यवहार न्यूयार्क मधील कोणत्याहि पेढीला पसंत होईल, अशा पद्धतशीर रीतीनें ठेवण्याचा प्रयत्न मी नेहमीं करीत असतों.

संस्थेला मिळालेल्या मोठ्या देणग्यांबद्दल मीं वर सांगितलेलें आहे. पण, आमची संस्था उभारण्यासाठीं लागलेल्या पैशांपैकी बराच मोठा भाग साधारण मनुष्यांच्या लहानसहान देणग्यांनींच जमलेला आहे. खरी कळकळ आणि सहानुभूति दर्शविणाऱ्या शेंकडों दात्यांच्या लहानसहान देणग्यांवरच कोणतेंहि परोपकाराचें कृत्य बहुतेक अवलंबून असतें. पैसे गोळा करीत असतां धर्मोपदेशकांच्या मागें मदतीकरितां सर्व बाजूंनीं मागण्या अहोरात्र कशा असतात, हे मीं पाहिलेलें आहे, आणि त्यांची कळकळ व सहनशीलता पाहून मला नेहमीं फार आश्चर्य वाटतें. दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीच्या विचाराने खिस्ताप्रमाणें उदार व परोपकारी जीविताचें महत्त्व माझ्या मनांत बिंबलें नसतें, तरी आज पसतीस वर्षे काळ्या लोकांच्या उन्नतीसाठी अमेरिकेतील सर्व पंथांचें सार्वजनिक ख्रिस्तीचर्च जें पवित्र काम करीत आहे, तें पाहून मी ख्रिस्ती झालों असतों. रविवारच्या शाळा, खिश्चन एन्डेव्हर सोसाटय्या, मिशनरी संस्था आणि खुद्द सार्वजनिक चर्च यां सर्वांपासून मिळणाऱ्या, पै, पैसा, आणा, अशा लहान देणग्यांमुळेच नीग्रोंची उन्नति इतक्या झपाट्यानें होत आहे.

पैसा जमविणे.

या लहान देणग्यांविषयीं सांगतांना मला असें आठवतें, कीं, टस्केजीचे फारच थोडे ग्रॅजुएट्स् आपली वार्षिक वर्गणी पाठवून देण्याला चुकतात. पंचवीस सेंट्स्पासून दहा डालरपयर्त या वर्गण्या असतात.

तिसऱ्या वर्षाचे काम सुरू झाल्यापासून आह्मांला दुसऱ्या तीन ठिकाणांहून अकस्मात् मदत मिळू लागली, आणि ती आतांपर्यंत एक-सारखी आह्मांला मिळत आहे. (१) अलाबामा संस्थानच्या सरकारानें - राज्यव्यवस्थानियामकसंस्थेनें) आपली वार्षिक देणगी दोन हजार डालरची तीन हजार डालर केली; पुढें कांहीं दिवसांनंतर त्यांनी ती रक्कम - साडेचार हजार डालरपर्यंत वाढविली. टस्केजी येथील राज्यव्यवस्था-नियामक संस्थेचे सभासद आनरेबल एम.एफ. फास्टर यांनी ही रक्कम वाढविण्याकरितां फार खटपट केली. (२) जॉन. एफ स्लेटर फंडातून आह्मांला दरवर्षी अकरा हजार डालर मिळतात. (३) तिसरी देणगी पीबाडी फंडातून मिळाली. प्रथम पांचशें डालरच मिळाले. नंतर वाढत वाढत ही रक्कम आतां पंधराशें डालरपर्यंत गेली आहे.

स्लेटर आणि पीबाडी या दोन फंडांतील मदतीसाठीं खटपट करितांना दोन अत्युत्तम मनुष्यांशी माझा सहवास घडला. या दोघांनीं नीग्रोंच्या शिक्षणाला चांगलें वळण लाविलें. हे दोघे ह्मणजे वाशिंग्टनचे के. एल. एम. करी (हे दोन्ही फंडांचे ट्रस्टी आहेत) आणि न्यूयॉर्कचे मिस्टर मॉरिस के. जेसप हे होत. डॉक्टर करी हे दक्षिणेकडचे रहिवासी असून पूर्वी संयुक्त सैन्यांत सोल्जर होते. तथापि नीग्रोंच्या कल्याणाविषयीं अशी कळकळ बाळगणारे, किंवा वर्णद्वेषापासून यांच्याप्रमाणें मुक्त असणारे, या देशांत दुसरे कोणी मिळतील असें मला वाटत नाहीं. काळ्या लोकांचा आणि दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा यांच्यावर सारखा न विश्वास आहे, हा एक यांच्यामध्यें विशेष गुण आहे. यांची माझी पहिली भेट मी केव्हांहि विसरणार नाहीं! त्यावेळी रीचमंड शहरांत त्यांच्या घरीं मी गेलो होतों. त्यापूर्वी त्यांच्या चांगुलपणाविषयीं मीं पुष्कळ ऐकिलेहें होतें. तरीपण मी तरुण व अननुभवी असल्यामुळे त्यांच्यासमोर जातांना—

—मला भीतीनें कंप सुटला. तेव्हां त्यांनी मोठ्या प्रेमाने माझा हात धरिला व माझ्याशी त्यांनीं इतकें गोड व उत्तेजक भाषण केलें, आणि मी काय करावें याविषयीं त्यांनी मला इतका कांहीं चांगला उपदेश केला, की. मानवजातीच्या कल्याणाकरितां सतत निष्काम प्रयत्न करणारांपैकी ते एक आहेत, अशी माझी तेव्हांच खात्री पटली, आणि नंतरहि माझा हा समज दृढ होत गेला.

मिस्टर मॉरिस के. जेसप हे स्लेटरफंडाचे खजीनदार आहेत. नीग्रोंची उन्नति कोणत्या योग्य मार्गानें होईल या विषयाकडे आपला वेळ व पैसा खर्च करणारा मिस्टर जेसपसारखा श्रीमान् आणि उद्योगी असा दुसरा गृहस्थ मीं पाहिला नाहीं. गेल्या थोड्या वर्षांत औद्योगिक शिक्षणाला जें कांहीं महत्त्व प्राप्त झालें आहे, आणि त्या शिक्षणाचा जो कांहीं मजबूत पाया घातला गेला आहे, त्याचें बहुतेक श्रेय मिस्टर जेसप यांनां असून त्यांच्याच प्रयत्नांमुळे व वजनामुळे हैं सर्व शक्य झालें आहे.

प्रकरण तेरावें.

पांच मिनिटांच्या भाषणासाठीं दोन हजार मैलांचा प्रवास.

आमचें भोजनवसतिगृह उघडल्याबरोबर बरेच लायक, पण शाळेचा कोणताहि खर्च देण्याला असमर्थ असलेले विद्यार्थी वसतिगृहांत आपल्याला घेण्यांत यावें ह्मणून अर्ज पाठवू लागले या अर्जदारांत स्त्री व पुरुष दोघेहि होती. या अर्जदारांनां नकारार्थी उत्तर देणे आमच्या जीवावर आलें, आणि १८८४ मध्यें कांहीं थोड्याजणांची तरी सोय हावी, ह्मणून आह्मीं एक रात्रीची शाळा स्थापन केली.

हाम्पटन येथील शाळेप्रमाणेंच येथील रात्रीच्या शाळेची बहुतेक व्यवस्था होती. प्रथम या शाळेत बाराच मुलें होतीं. नेहमींच्या दिवसाच्या शाळेत ज्यांनां भोजनखर्चाचा कांहींहि भाग देण्याची शक्ति नव्हती, अशा विद्यार्थ्यांनांच रात्रीच्या शाळेत घेण्यांत आलें. त्यांनीं दिवसा कोणत्याहि उद्योगधंद्यांत दहा तास काम केलें पाहिजे, आणि संध्याकाळीं दोन तास पाठशाळेत शिकलें पाहिजे, असा नियम होता. पण हा नियम पहिल्या एकदोन वर्षानांच लागू असे. भोजनखर्चा शिवाय त्यांनां कांहीं अधिक मोबदला मिळत असे, आणि थोडी रक्कम खेरीजकरून त्यांची बाकीची शिल्लक संस्थेच्या खजीन्यांत जमा होत असे; आणि ते दिवसाच्या शाळेत जाऊं लागले ह्मणजे त्या शिलकेचा विनियोग त्यांच्या भोजनखर्चाकडे होत असे. अशाप्रकारें सुरू केलेली रात्रीची शाळा इतकी वाढली, कीं, आतां त्या शाळेतच साडेचारशें विद्यार्थी आहेत.

संस्थेच्या या शाखेपेक्षां विद्यार्थ्यांच्या योग्यतेची अधिक कठिण पोटी दुसरी क्वचितच असेल. तेथे विद्यार्थ्यांच्या करारीपणाची पारख करण्याला चांगली संधि मिळते, ह्मणून आमच्या रात्रीच्या शाळेला मी इतकें महत्त्व देतों. संध्याकाळीं पाठशाळेत दोन तास शिकतां यावें म्हणून–

— ह्मणून जो विद्यार्थी-मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो-विटांच्या कारखान्यांत अगर धोबीखान्यांत रोज दहा तासप्रमाणें एक-दोन वर्षे काम करण्याला तयार असतो, त्याच्या अंगीं पुढे शिक्षण संपादन करण्याला पुरेसा दम असतो, हें सिद्ध होतें.

रात्रीच्या शाळेतील शिक्षण पुरें झाल्यावर विद्यार्थी दिवसाच्या शाळेत दाखल होतो. तेथें त्याला आठवड्यांतून चार दिवस शिक्षण मिळतें, आणि उरलेले दोन दिवस तो आपल्या धंद्यांत खर्च करितो. याशिवाय उन्हाळ्याचे तीन महिने तो आपल्या धंद्यांतच घालवितो. साधारणपणें एकादा विद्यार्थी रात्रीच्या शाळेतून बाहेर पडला, ह्मणजे औद्योगिक आणि मानसिक शिक्षणक्रम सर्व पुरा करण्याला त्याला सहज मार्ग मिळतो. विद्यार्थी कितीहि श्रीमंत असला तरी त्याला या संस्थेत हातानें काम केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. आतां खरोखर इतर शिक्षणाप्रमाणें औद्योगिक शिक्षणहि फार प्रिय झालेले आहे. या संस्थेतून ग्रॅजुएट झालेल्या कांहीं नामांकित व यशस्वी स्त्रीपुरुषांनी रात्रीच्या शाळेत शिकण्यापासून आरंभ केला होता.

टस्केजी येथें औद्योगिक शिक्षणावर विशेष जोर दिला जातो, तरी धार्मिक किंवा आध्यात्मिक बाजूकडे यत्किंचितही दुर्लक्ष्य केले जात नाहीं. शाळा कोणत्याहि एका विशिष्ट सांप्रदायाची नाहीं; तरीपण ती पूर्ण धार्मिक आहे. आमच्या उपासना, प्रार्थनासभा, रविवारच्या शाळा, ख्रिश्चन एन्डेव्हर सोसायटी, यंग मेन्स ख्रिश्चन असोशिएशन आणि दुसऱ्या मिशनरी संस्था इत्यादि सर्व वरील विधानाची साक्ष देतात.

शाळेच्या प्रारंभींच्या वर्षामध्यें पुष्कळ खटपट करून बरेंच यश मिळविलेली मिस ऑलिव्हिया डेव्हिडसन हिच्याशीं माझें १८८५ साली लग्न झालें. लग्नानंतर तिनें आपली शक्ति आणि वेळ हीं आमच्या गृहाच्या आणि संस्थेच्या कामासाठीं खर्च केलीं. शाळेत काम करण्याचे तिनें चालू ठेविलें, एवढेंच नव्हे, तर फंड जमविण्यासाठीं उत्तरेकडे जाण्याची वहिवाटहि तिनें चालू ठेविली. चार वर्षे संसारसुखाचा चांगला—--

- अनुभव घेऊन, आणि आठ वर्षे संस्थेकरितां मोठ्या आनंदानें सततउद्योग करून १८८९ सालीं ती इहलोक सोडून गेली! स्वतःला अत्यंत प्रिय असलेल्या अशा कार्याकरितां प्रयत्न करण्यामध्ये तिनें आपला देह झिजविला ! आह्मांला दोन तरतरीत आणि सुंदर मुलगे झाले. यांची नांवें बेकर टॅलिफेरो आणि अर्नेस्ट डेव्हिडसन अशी असून त्यांपैकी वडील मुलगा बेकर यानें टस्केजी येथे विटा तयार करण्याचा धंदा चांगला अवगत करून घेतला आहे.

मीं वक्तृत्वाचा अभ्यास कसा सुरू केला, असें मला पुष्कळदां विचारण्यांत आलेलें आहे. सार्वजनिक व्याख्यानांत माझ्या आयुष्याचा बराच मोठा भाग खर्च करावा, असें मीं केव्हांच योजिलेलें नव्हतें, हें मी आधींच सांगतों. आपण काय करणार आहों बोलून दाखविण्यापेक्षां तें करून दाखविणें हें मला अधिक आवडते. जेव्हां जनरल आर्मस्ट्रांगबरोबर उत्तरेकडे गेलों आणि मोठमोठ्या शहरी सभा भरवून व्याख्यानें दिली, तेव्हां न्याशनल एज्युकेशन असोशिएशनचे अध्यक्ष ऑनरेवल थॉमस. डब्ल्यू. विकनेल यांनी एका सभेला हजर राहून माझें भाषण ऐकिलेसें दिसतें. कांहीं दिवसांनी एज्युकेशनल असोशिएशनच्या सभेत भाषण करण्याला त्यांनीं मला आमंत्रण दिलें. ही सभा माडीसन (विसकान्सीन) येथे भरणार होती. मीं तें आमंत्रण स्वीकारिलें. एकाअर्थी हाच माझ्या वक्तृत्वाच्या कारकीर्दीचा प्रारंभ होय.

या संस्थेसमोर मीं भाषण केल्यावेळीं सुमारे चार हजार लोक हजर होते. अलाबामा संस्थानांतून बरेच लोक आणि टस्केजी येथील काही लोक आलेले होते, हें मला माहीत नव्हतें. "दक्षिणेतील आह्मां लोकांनां बरीच पुष्पांजलि मिळणार या अपेक्षेने आह्मी सभेला गेलों होतो; पण आपल्या भाषणांत एक देखील वाईट शब्द आला नाहीं, पाहून आह्मांला फार आश्चर्य वाटलें !" असें या गोऱ्या लोकांनीं पुढे मला उघडपणे सांगितलें. उलट दक्षिणेंतील लोकांनीं जे कांहीं—-

—स्तुत्य प्रयत्न केले, त्यांबद्दल त्यांनां श्रेय देण्यांत आलें. "टस्केजी-संस्था सुरू करण्यांत गोऱ्या लोकांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांनां श्रेय देण्यांत आलेले पाहून आपणाला फार आनंद झाला व आश्चर्य वाटलें," असें टस्केजीमधील एका कॉलेजांतील गोऱ्या अध्यापिकेनें तेथील वर्तमानपत्रांत लिहिलें. ज्ञातीच्या सर्वसाधारण प्रश्नांविषयीं कांहीसे विवेचन केलेले असे हें माझें पहिलेंच भाषण होय. माझ्या भाषणाचा साधारण रोख पाहून आणि माझें भाषण ऐकून श्रोते बरेच खूष झाले.

मी टस्केजीला प्रथम आलों, तेव्हां या गांवीं आपलें घर करण्याचा मी निश्चय केला. गांवांतील लोकांच्या सत्कृत्यांविषयीं योग्य अभिमान आणि त्यांच्या दुष्कृत्यांविषयीं किंषा अन्यायांविषयीं तिटकारा गांवच्या गोऱ्या रहिवाशांप्रमाणें मला वाटूं लागला. दक्षिणेत मी जें कांहीं सांगण्यास तयार नाहीं, तें उत्तरेकडील माझ्या सार्वजनिक भाषणांत कधीहि न सांगण्याचा मीं निश्चय केला. एकाद्या व्यक्तीला शिव्या देऊन त्याचें मन सन्मार्गाकडे लावणें फार कठिण आहे. त्याच्या दोषांकडेच सर्व लक्ष्य देण्यापेक्षां त्यानें केलेल्या स्तुत्य कृत्यांबद्दल त्याचा गौरव करण्यानेंच त्याची सुधारणा लवकर होते, हैं तत्त्व मी लवकरच शिकलों.

या तत्त्वाप्रमाणें वागत असतांना, दक्षिणेंतील लोकांनी केलेल्या अन्यायाविषयीं योग्य वेळीं आणि योग्य रीतीनें टीका करण्यास मीं कांहीं मागेपुढे पाहिलें नाहीं. अन्यायाच्या किंवा चुकीच्या धोरणाविषयी सरळ व प्रामाणिक टीका केली असतां, दक्षिणेंतील बऱ्याच लोकांनां ती आवडते, असें मला आढळून आलें आहे. साधारणपणें दक्षिणेंतील लोकांविषयी टीका करण्याचें योग्य स्थळ दक्षिणेतील एकादें शहर होय, बोस्टन हें नव्हे. बोस्टनच्या लोकांविषयीं टीका करावयाची असतां, बोस्टनच्या मनुष्यानें अलाबामा येथे येऊन टीका करण्यापेक्षां बोस्टनमध्येंच ती केली असतां अधिक फायदा होण्याचा संभव आहे.

माडीसन येथील भाषणांत मीं हा मुद्दा सांगितला, कीं, योग्य व सरळ उपायांनीं दोन्ही ज्ञातींमधील दळणवळण अधिक वाढेल, आणि वरस्परांमध्ये द्वेषभावाच्याऐवजीं सलोखा राहील असें धोरण सर्वांनीं ठेवावें. मीं आणखी असें सांगितलें, कीं, आपण ज्या समाजांत राहत आहों, त्याचेंच अधिकाधिक हित पाहून नीग्रोनें आपलें मत द्यावें. हजारों मैल दूर राहत असलेल्या कोणाहि गृहस्थाला खूप करण्याकरितां आपलें मत पाहिजे तसें देऊ नये.
या भाषणांत मीं असेंहि सांगितलें, कीं, नीग्रोंचा सर्व भविष्यकाल एका प्रश्नावर अवलंबून आहे, आणि तो प्रश्न, समाजाचें आपल्याशिवाय कांहीं चालावयाचें नाहीं इतकें आपलें महत्त्व एकादा नीग्रो स्वतःचें कौशल्य व बुद्धिमत्ता, आणि शील यांच्यायोगें समाजाला भासवितो कीं नाहीं, हाच होय ! दुसऱ्यापेक्षां कोणतीहि गोष्ट अधिक चांगली करण्याला जो कोणी शिकला, साधीच गोष्ट पण ती अलौकिक रीतीनें करण्याची कला ज्यानें साधिली, त्यानें-मग त्याचा वर्ण कसाहि असो- हा प्रश्न सोडविला, आणि लोकांनां अवश्य असलेल्या वस्तु पैदा करण्याला एकादा नीग्रो जसजसा समर्थ होईल, तसतशी त्याची इभ्रत बाढत जाईल, असेंहि मीं प्रतिपादन केलें.

याचें मीं एक उदाहरण सांगितलें. पूर्वी दर एकराला ४९ बुशेल* रताळीं जेथें पैदा होत असत, तेथें आमच्या संस्थेच्या एका ग्रॅज्युएटानें दरएकरी अडीचशें बुशेल रताळीं पैदा करून दाखविलीं. शेतकीच्या सुधारलेल्या पद्धतीच्या आणि शेतकीसंबंधीं रसायनशास्त्राच्या ज्ञानामुळे त्याला असें करतां आलें. आसपासच्या गोऱ्या शेतकऱ्यांनीं त्याला मान दिला, आणि रताळ्यांच्या पिकांविषयीं कांहींतरी शिकावें, ह्मणून ते त्याच्यापाशी आले. आपल्या ज्ञानानें व कौशल्यानें त्यानें समाजाच्या वित्तांत व सुखांत भर घातली, ह्मणून गोऱ्या शेतकऱ्यांनीं त्याचा गौरव केला. नीग्रोंच्या शिक्षणाविषयीं माझी कल्पना ह्मणजे—--

---

* बुशेल - आठ ग्यालनांचे माप.

—त्यानें उत्तम रताळीं पैदा करावी, त्यानें नेहमी स्वतःला शेतांतच कोंडून घ्यावें, एवढी आकुंचित नाहीं. पण यासारख्या कोणत्याहि धंद्यांत त्यानें चांगलें यश मिळविलें, तर त्यानें घातलेल्या या पायावरच त्याचे पुत्रपौत्र याहून अधिक गोष्टी संपादन करण्याला समर्थ होतील, असें मीं समजावून सांगितलें.

दोन्ही ज्ञातींच्या संबंधाविषयीं अशा त-हेच्या कांहीं मुद्यांचे माझ्या पहिल्या भाषणांत मीं समर्थन केलें. त्या वेळेपासून यांपैकी कोणत्याहि मुद्यावरील माझे विचार बदलण्याजोगें कांहीं कारण मला आढळले नाहीं.

नीग्रोविषयीं द्वेषबुद्धीनें कोणी कांहीं कडक बोलला, किंवा काळ्या लोकांनां जाचणारे अगर सर्व बाजूंनी होणाऱ्या त्यांच्या उन्नतीला आड येणारे उपाय जर कोणी सुचविले, तर त्याच्याविषयीं पूर्वी तरुणपणीं माझ्या मनांत वाईट विचार येत असत; पण आतां दुसऱ्या कोणाच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या उपायांचें समर्थन करतांना मीं कोणाला ऐकिलें, कीं, मला त्याची मोठी कींव येते. स्वतःची उच्च प्रकारची उन्नति करून घेण्याची संधि न मिळाल्यामुळे तो अशी चूक करितो, हें मला माहीत आहे. जगाची लोकांची प्रगति थांबविण्याची तो व्यर्थ खटपट करीत आहे, आणि मानवजातीची वाढ एकसारखी होत असल्यामुळे त्याला आपल्या क्षुद्र व कोत्या कल्पनेची पुढें लाज वाटेल, हें सर्व मला ठाऊक असल्यामुळे त्याची मला फार कींव येते. अधिक ज्ञान, सुधारणा (संस्कृति), कौशल्य. स्वातंत्र्य, परस्परांविषयीं सहानुभूति आणि बंधुप्रेम, इत्यादि गोष्टींत मानवजातीची जी उन्नति व वाढ होत आहे, ती थांबवू पहाणें, हें एकाद्यानें रुळावर आडवें पडून मोठ्या आगगाडीचा वेग बंद करण्यासारखेंच आहे !

माडीसन येथे न्याशनल एज्युकेशनल संस्थेसमोर झालेल्या माझ्या भाषणानें उत्तर अमेरिकेंत माझी बरीच प्रसिद्धि झाली, आणि तेथे श्रोतृगणासमोर व्याख्यानें देण्याचे प्रसंग मला येऊ लागले.

खुद्द दक्षिणेंतील सर्व वर्गाच्या गोऱ्या लोकांपुढें भाषण करण्याचा मार्गहि खुला होईल, अशी मला मोठी उत्सुकता वाटूं लागली. अशा प्रकारची थोडीशी संधि १८९३ सालीं मला मिळाली. या सालीं सर्व राष्ट्रांतील ख्रिस्ती कामकऱ्यांची -मिशनऱ्यांची सभा अटलांटा येथे भरली होती. मला या सभेला हजर राहून भाषण करण्याचें आमंत्रण आल्यावेळी मी बोस्टन येथे दुसऱ्या कामांत गुंतलो होतों. अटलांटा येथे जाऊन भाषण करणे जवळजवळ अशक्यच आहे, असें मला वाटूं लागलें. तरी कामाच्या जागा व वेळा (तारखा) लक्ष्यपूर्वक तपासून पहातां मला असें दिसून आलें, कीं, बोस्टनहून अटलांटा येथे माझ्या भाषणाच्या पूर्वी अर्धातास आधीं मला जातां येईल, आणि परत बोस्टनला येणाऱ्या आगगाडींत बसण्यापूर्वी सुमारें एक तास मला तेथे रहातां येईल. पांच मिनिटांत मीं माझें भाषण आटपावें, असें आमंत्रणचिठींत सुचविलें होतें. इतक्या लांबच्या प्रवासाचा त्रास सोसण्याइतकें महत्त्वाचें पांच मिनिटांच्या भाषणांत मला कांहीं सांगतां येईल कीं नाहीं, एवढाच आतां प्रश्न राहिला.

गोऱ्या स्त्रीपुरुषांपैकी बरीच भारदस्त व वजनदार मंडळी श्रोतृसमाजांत असणार, आणि टस्केजी येथे आह्मी काय करीत आहों, याची माहिती देण्याची व ज्ञातींच्या संबंधाविषयीं त्यांनां दोन शब्द सांगण्याची अमोलिक संधि हीच आहे, हें मला माहीत असल्यामुळे मीं तो लांबचा प्रवास करण्याचे ठरविलें. दक्षिणेंतील व उत्तरेकडील गोऱ्या लोकांच्या सुमारें दोन हजार श्रोतृसमूहापुढें मीं पांच मिनिटें भाषण केलें. माझें भाषण त्यांनां आवडून त्यांच्या अंगांत आनंदाचें भरतें आलें. दुसऱ्या दिवशीं अटलांटा येथील वर्तमानपत्रांत माझ्या भाषणाविषयीं अनुकूल अभिप्राय आले, आणि देशांत निरनिराळ्या ठिकाणीं त्याविषयीं बरीच चर्चा झाली. दक्षिणेतील श्रेष्ठ व सत्ताधारी वर्गाला माझें भाषण ऐकवि-ण्याची संधि मला मिळाली, आणि कांहीं अंशीं माझा हेतु सिद्धीला गेला, असें मला वाटूं लागलें.

मला माझ्या लोकांकडून आणि उत्तरेकडील गोऱ्या लोकांकर सार्वजनिक व्याख्यानांविषयीं एकसारखीं आमंत्रणे येऊ लागली. टस्केजी येथे जरूरीचं काम करून उरलेला वेळ मीं या व्याख्यानांत घालविला. संस्थेच्या साहाय्यार्थ फंड जमविण्यासाठींच मी उत्तरेकडील प्रदेशांन अनेक व्याख्यानें दिली. काळ्या लोकांसमोर दिलेल्या व्याख्यानांचा मुख्य हेतु, धार्मिक आणि बौद्धिक शिक्षण, तसेंच औद्योगिक आणि शिल्पकलाशिक्षण यांचे महत्त्व त्यांच्या मनांत चांगले बिंबवावें, हा होता.
आतां माझ्या आयुष्यांतील एका मोठ्या प्रसंगाकडे मी वळतो.या प्रसंगानें लोकांत बरीच चळवळ उडवून दिली, आणि एकाअर्थी माझी कीर्ति सर्व राष्ट्रभर पसरली. हा प्रसंग ह्मणजे अटलांटा येथील सार्वराष्ट्रीय प्रदर्शनांत, ता. १८ सप्टेंबर १८९९ इसवी रोजी झालेले माझें भाषण होय.

या प्रसंगाविषयीं इतका कांहीं खल झाला आहे, आणि या माझ्या भाषणाविषयीं इतके कांहीं प्रश्न मला विचारण्यांत आले आहेत, की, त्याविषयीं थोडीशी सविस्तर माहिती देणें क्षम्य होईल, असे मला वाटतें. बोस्टनहून अटलांटा येथे येऊन दिलेलें पांच मिनिटांचे भाषण हेच बहुतकरून माझ्या अटलांटा येथील दुसऱ्या भाषणाचें मुख्य कारण असावें. अटलांटा येथे भरणाऱ्या प्रदर्शनाला सरकारची मदत मिळविण्याकरितां कांग्रेसकमिटीकडे वाशिंग्टन येथे गांवांतील पंचांबरोबर जाण्यासाठीं अटलांटामधील प्रमुख गृहस्थांकडून १८९९च्या वसंतऋतूंत मला तार आली. पंचायतींत जॉर्जिया येथील प्रमुख श्रीमंत असे पंचवीस गोरे लोक होते. बिशप ग्रांट, बिशप गेनिस, मी, अशा तिघांखेरीज पंचायतींतील सर्व लोक गोरे होते. शहरचे मेअर (शेरीफ) व दुसरे शहरचे व संस्थानचे कामगार हे कमिटीसमोर बोलले. त्यांच्यामागून दोघां काळ्या बिशपांचीं भाषणे झाली. त्यांच्या यादींत माझें नांव शेवटचें होतें. अशा कमिटीपुढे पूर्वी कधीं हजर झालों नव्हतों, आणि राजधानींत मीं केव्हांहि—

–भाषण केलें नव्हतें. मी काय बोलावें आणि माझ्या भाषणाचा काय परिणाम होईल, याविषयीं माझ्या मनांत बऱ्याच शंका उद्भवल्या. माझें सविस्तर भाषण आतां मला आठवत नाहीं; तरी दक्षिणेंतील लोकांनी हा ज्ञातिविषयक प्रश्न सोडवावा, आणि दोन्ही ज्ञातींत सलोखा व्हावा अशी जर कांग्रेसची इच्छा असेल, तर कांग्रेसनें दोन्ही ज्ञातींच्या सांपत्तिक व बौद्धिक वाढीला हरएक योग्य मार्गानें उत्तेजन द्यावें, असें शक्य तितक्या सोप्या आणि कळकळीच्या भाषेनें कांग्रेसच्या मनांत बिंबविण्याचा मीं प्रयत्न केला. दास्यविमोचनानंतर दोन्ही ज्ञातींनीं आपापली किती प्रगति केलेली आहे, हें दाखविण्याची संधि, व त्याबरोबरच याहून अधिक उन्नति करण्याला उत्तेजन अटलांटा प्रदर्शनाच्यायोगें मिळेल, असें मीं सांगितलें.

नीग्रोंचा मत देण्याचा अधिकार कपटानें किंवा लबाडीनें नाहींसा करूं नये, तथापि राजकीय चळवळीनेंच त्यांचा उद्धार होणार नाहीं, मत देण्याच्या हक्कामागें मिळकत, उद्योग, कौशल्य, काटकसर, बुद्धिमत्ता आणि शील या सर्वांचा दुजोरा पाहिजे, आणि या गोष्टींशिवाय कोणत्याहि ज्ञातीचें कायमचें कल्याण होणार नाहीं, हें मी ठांसून सांगण्याचा प्रयत्न केला. मागणी केलेली रक्कम मंजूर केल्यास कांग्रेसने दोन्हीं ज्ञातींचे खरेखुरें व कायमचें हित केल्यासारखें होईल, आणि सिव्हिल वार संपल्यापासून लोकांनां मिळालेली अशा तऱ्हेची ही पहिली संधि होय, असेंहि मीं सांगितलें.

मी पंधरावीस मिनिटें बोललों; आणि माझें भाषण आटोपल्यावर जॉर्जियाच्या पंचायतीनें आणि हजर असलेल्या कांग्रेसच्या सभासदांनीं माझे मनःपूर्वक अभिनंदन केलें, हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. कमिटीनें एकमतानें अनुकूल रिपोर्ट केला, आणि थोड्याच दिवसांत त्यांनी केलेली सूचना कांग्रेसनें पास केली. यामुळे अटलांटा प्रदर्शनाच्या
यशाला बहुतेक निश्चित स्वरूप आले.

वाशिंग्टनचा प्रवास आटोपल्यावर, स्वातंत्र्य मिळाल्यापासून नीग्रोंची उन्नति कशी होत गेली हें दाखविण्यासाठीं एक मोठी व मोहक हवेली प्रदर्शनांत बांधावी, ह्मणजे त्या ज्ञातीचा योग्य मान केल्यासारखे होईल, असा प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांनीं लवकरच निश्चय केला. या इमारतीचा नकाशा नीग्रोंनींच काढावा आणि इमारतहि त्यांनींच बांधावी, असें ठरविण्यांत आलें. ही योजना अमलांत आणिली. रचना, सौंदर्य व सफाई इत्यादि गोष्टींत नीग्रोंची इमारत, प्रदर्शनांतील इतर इमारतींसारखीच होती.

नीग्रोंचा वस्तुसंग्रह निराळाच ठेवावा असें ठरविण्यांत आल्यावर, त्यावर देखरेख कोणाची असावी, असा प्रश्न उद्भवला. मी ती जबाबदारी घ्यावी, अशी प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांची उत्सुकता दिसली; पण टस्केजीसंस्थेला यावेळी माझी शक्ति व वेळ यांची अपेक्षा असल्यामुळे मी हा मान नाकारिला. बहुतकरून माझ्या सूचनेवरून, लिंचबर्गचे मिस्टर आय्. गार्लंड पेन यांनां नीग्रोंच्या वस्तुसंग्रहावर मुख्य नेमण्यांत आलें. मी त्यांनां शक्य तितकी मदत केली. नीग्रोंचा वस्तुसंग्रह बराच मोठा व प्रेक्षणीय होता. हाम्पटनच्या व टस्केजीच्या संस्थांनी पाठविलेल्या दोन वस्तूंकडे तर सर्वांचे लक्ष्य अतिशय वेधलें गेलें. नीग्रोंचा वस्तुसंग्रह पाहून दक्षिणेतील गोऱ्या लोकांनां अतिशय आनंद झाला व आश्चर्य वाटलें.

प्रदर्शन उघडण्याचा दिवस जवळ येऊं लागल्यावर व्यवस्थापक मंडळी सुरुवातीचा कार्यक्रम तयार करूं लागली. कार्यक्रमाविषयीं नित्य वाटाघाट चालू असतां, ज्याअर्थी प्रदर्शनांत महत्त्वाचा भाग नीग्रोंनां घेण्याला सांगितलें आहे, त्याअर्थी सुरुवातीच्या दिवशीं त्यांपैकी कोणाएकाला एकादें भाषण करावयाला सांगणें इष्ट आहे की नाहीं, असा प्रश्न आला. अशा रीतीनें त्यांनां मान दिला असतां, दोन्ही ज्ञातींतील सलोखा चांगल्या रीतीनें दर्शविला जाईल, असेंहि—

—सांगण्यांत आलें. नीग्रोंनां असा मान देण्याच्या विरुद्ध कांहीं लोक होते; तरी व्यवस्थापकमंडळींत दक्षिणेंतील पुष्कळ उत्तम व प्रगमनशील लोक असल्यामुळे त्यांनीं प्रारंभींच्या दिवशीं एक भाषण करण्यास नीग्रोला आमंत्रण देण्याचे ठरविलें. नीग्रोजातीच्या तर्फे कोणाला हा मान द्यावा, हा दुसरा प्रश्न विचारासाठीं पुढें आला. पुष्कळ दिवस याविषयीं वाद-विवाद झाल्यावर व्यवस्थापकांनीं एकमतानें मला सुरुवातीच्या दिवसाचें एक भाषण करण्याला सांगण्याचे ठरविलें, आणि थोड्याच दिवसांत मला योग्य अधिकाऱ्यांमार्फत आमंत्रणहि आलें.

या आमंत्रणानें माझ्यावर किती जबाबदारी येऊन पडली, याची, माझ्यासारख्या परिस्थितीत नसलेल्या मनुष्याला कल्पना होणें फार कठिण आहे ! आमंत्रण आल्यावर माझ्या मनांत कोणते विचार घोळत होते ! मी गुलाम होतों, माझे बालपणाचे दिवस अत्यंत दारिद्र्यांत व अज्ञानांत गेले होते, अशा जबाबदारीच्या कार्यासाठी स्वतःला तयार करण्याची फारच थोडी संधि मला मिळालेली होती, हें सर्व मला आठवलें. थोड्या वर्षापूर्वी श्रोतृवृंदापैकी कोणीतरी, 'आपला गुलाम' ह्मणून माझ्यावर हक्क सांगितला असता, आणि यावेळीं माझ्या पूर्वीच्या धन्यांपैकीं कांहींजण माझें भाषण ऐकण्याला हजरहि रहाण्याचा संभव होता.

कोणत्याहि महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रयोजनामध्यें दक्षिणेतील गोऱ्या स्त्रीपुरुषांसमोर एकाच व्यासपीठावर मला भाषण करूं देण्याचा नीग्रोंच्या इतिहासांतील हा पहिलाच प्रसंग होय, हेंहि मी जाणत होतों. माझ्या पूर्वीच्या धन्यांचे प्रतिनिधि (वंशज) असे दक्षिणेंतील सुशिक्षित विद्वान् व श्रीमंत अशा श्रोत्यांसमोर मला आतां भाषण करावयाला सांगितलें होतें. श्रोतृसमूहांत बराच भाग दक्षिणेतील गोऱ्या लोकांचा असणार; तथापि उत्तरेकडील बरेच गोरे लोक आणि माझ्या ज्ञातीचेहि बरेच स्त्रीपुरुष हजर राहणार, हें मला समजलें होतें.

मला माझ्या अंतःकरणापासून जें कांहीं खरें आणि बरोबर वाटत नाहीं, अशा तऱ्हेचें कांहींहि सांगावयाचें नाहीं, असा मीं निश्चय–

—केला. आमंत्रण देतांना मी काय बोलावे किंवा काय बोलू नये, याविषयीं कांहींएक सूचना मला नव्हती. यांत व्यवस्थापक मंडळीने माझा गौरव केला, असें मला वाटलें. एकाच वाक्यानें मी प्रदर्शनाच्या यशाचा बहुतेक भंग करून टाकिला असता, हे त्यांना माहीत होते. माझ्या भाषणांत इमानीपणानें माझ्या ज्ञातीची बूज मला राखिली पाहिजे होती, तरी माझें भाषण अप्रासंगिक झाल्यास पुढे कित्येक वर्षे कोणाहि काळ्या मनुष्याला असें आमंत्रण मिळणार नाहीं, हेंहि मी दुःखानें जाणत होतों. उत्तरेकडील लोकांविषयीं, तसेच दक्षिणेंतील चांगल्याचांगल्या लोकांविषयीं सर्व कांहीं खरेखुरें सांगावयाचें, असा मीं निश्चय केला.

उत्तरेकडील व दक्षिणेकडील वर्तमानपत्रांत माझ्या भावि भाषणा-विषयीं चर्चा सुरू झाली, आणि भाषणाचा दिवस जवळ येऊ लागतांच ती सर्वत्र पसरली. दक्षिणेंतील बरींच गोरीं वर्तमानपत्रे मी भाषण करावें या कल्पनेच्या विरुद्ध होतीं. मी काय बोलावें याविषयीं माझ्या ज्ञातीकडून बऱ्याच सूचना आल्या. माझ्या भाषणाची मीं शक्य तितकी तयारी केली; पण, सप्टेंबरची अठरावी तारीख जस जशी जवळ येऊ लागली, तसतसें, माझा प्रयत्न फसून सर्व निराशा होईल, असें मला वाटू लागून माझें अंतःकरण अधिक खचूं लागलें.

आमंत्रण आल्यावेळीं संस्थेचा वर्षारंभ असल्यामुळे मी शाळेच्या कामांत चूर होतों. विशेष महत्त्वाची भाषणे माझ्या पत्नीला मिसेस वाशिंग्टनला मी वाचून दाखवीत असें, त्याप्रमाणें हें भाषण तयार झाल्यावर मीं तें तिला वाचून दाखविलें. तें तिनें पसंत केलें. अटलांटा येथे निघण्याच्या पूर्वदिवशीं ह्मणजे ता० १६ सप्टेंबर रोजीं टस्केजी संस्थेतील बऱ्याच शिक्षकांनीं माझें भाषण पहाण्याची इच्छा प्रदार्शत केल्यामुळे मीं तें सर्व शिक्षकांनां वाचून दाखविलें. त्यांची टीका ऐकिल्यावर माझे हृदय थोडेसें हलकें व शांत झालें. कारण, माझें भाषण त्या सवानां आवडलें.

दोन हजार मैलांचा प्रवास-

ता. १७ सप्टेंबर दिवशी सकाळी माझी पत्नी आणि तीन मुले यांसहित मी अटलांटाला निघालों. वधस्तंभाकडे नेणाऱ्या मनुष्या-प्रमाणें बहुतेक माझी स्थिति झाली. टस्केजी गांवांतून जात असतां, जवळ खेड्यांत राहणारा एक गोरा शेतकरी मला भेटला आणि ह्मणाला "वाशिंग्टन ! उत्तरेकडील गोऱ्या लोकांपुढें, दक्षिणेंतील नीग्रोंपुढें, आणि खेड्यापाड्यांतील माझ्यासारख्या दक्षिणेतील गोऱ्या लोकांपुढें तू भाषण केलेले आहेस; पण, उद्यां अटलांटा येथे उत्तरेकडील गोरे लोक,दक्षिणेतील गोरे लोक आणि नीग्रो हे सर्व तुझें भाषण ऐकण्यास जमतील. तूं बऱ्याच पेंचांत सांपडला आहेस असें मला वाटतें." वा गोऱ्या शेतकऱ्यानें माझ्या अंतःस्थितीची पारख बरोबर केली; पण, त्याच्या स्पष्टोक्तीनें माझ्या मनाला कांहीं धीर आला नाहीं.

टस्केजीहून अटलांटा येथे जात असतां वाटेंत ठिकठिकाणी काळे गोरे लोक आमच्या डब्याकडे येऊन माझ्याकडे बोट दाखवीत, आणि इद्यां काय होणार, याविषयीं मला ऐकू येईल अशी वाटाघाट करीत. अटलांटा येथे एक कमिटी आह्मांला सामोरी आली. गाडींतून उतरतांच जवळच उभा राहिलेल्या एका काळ्या मनुष्याच्या तोंडांतून, पुढे दिलेले शब्द प्रथम माझ्या कानावर आले. "उद्यां प्रदर्शनांत भाषण करणारा आमच्या ज्ञातीचा मनुष्य तो हाच ! मी त्याचें भाषण ऐकण्यास वाचित जाणार !"

देशांतील सर्व भागांतून आलेले लोक, परदेशीय सरकारचे प्रतिनिधि, नागरिक आणि लष्करी संस्था या सर्वांनीं अटलांटा गांव खेंचून भरला होता. दुसऱ्या दिवशीं काय काय घडणार याविषयीं संध्याकाळच्या पत्रांत मोठमोठे मथळे असलेले लेख आले होते. या सर्वांनी माझ्या छातीवरील ओझ्याचा भार अधिकच होत चालला. त्या रात्री मला स्वस्थशी झोंप आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझें भाषण मी पुनः काळजीनें तपासिलें. गुडघे टेंकून मी परमेश्वराची प्रार्थना केली. आणि माझ्या प्रयत्नाला यश द्यावें असा मी त्याचा आशीर्वाद मागितला...

आत्मोद्धार.

येथे मला हे सांगितलें पाहिजे, की, परमेश्वराची माझ्या भाषणावर कृपा व्हावी अशी त्याची आधी प्रार्थना केल्याशिवाय कोणत्याहि प्रसंगों श्रोतृसमाजापुढें जावयाचें नाहीं, असा माझा नियम आहे.

प्रत्येक भाषणाची मी नेहमी विशेष तयारी करतों. कारण, दोन श्रोतृ-समाज केव्हांच अगदी सारखे नसतात. आपल्या प्रिय मित्राला जसे आह्मी आपले सर्व हितगुज सांगतों, त्याप्रमाणें श्रोतृसमाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या हृदयाशी जाऊन भिडण्याचा माझा नेहमीं उद्देश असतो. मी एकाद्या श्रोतृसमाजासमोर बोलत असतां, माझे भाषण वर्तमानपत्रांत कसें दिसेल, दुसऱ्या श्रोत्यांनां किंवा व्यक्तींनां तें कसें आवडेल याची मी कांहींच पर्वा करीत नाहीं. माझी सहानुभूति, माझे विचार माझी शक्ति, इत्यादि सर्व कांहीं त्यावेळीं समोर असलेल्या श्रोत्यांत गर्क होऊन जातें.

त्यादिवशीं लवकरच प्रदर्शनांत माझ्या जागी मला सन्मानानें नेण्या करितां एक कमिटी माझ्याकडे आली. या मिरवणुकीत पुष्कळ प्रमुख नीग्रो गृहस्थ गाड्यांत बसून जात होते, आणि पुष्कळ लष्करी नीग्रो संस्थाहि बरोबर होत्या. मिरवणुकीत काळ्या लोकांनां योग्य स्थान दिलेलें आहे कीं नाहीं, आणि त्यांनां योग्य रीतीनें वागविले जात आहे कीं नाहीं, याबद्दल प्रदर्शनाचे अधिकारी विशेष खबरदारी घेत होते. असें मला आढळून आलें. प्रदर्शनाच्या जागीं जाऊन पोहोंचेतोंपर्यंत मिरवणुकीला तीन तास लागले. इतका सारा वेळ उन्हाचा असत्य मारा आह्मांला सहन करावा लागला. प्रदर्शनाच्या जागीं गेल्यावर, उन्हाचा त्रास व मानसिक व्यथा (चिंता) यांनी मी इतका जेरीला आलों, कीं, माझा आतां एकदम शक्तिपात होतो की काय, असे मला वाटूं लागलें. दिवाणखान्यांत जातांच, सर्व दिवाणखाना खालीं वर मनुष्यांनी गच्च भरून गेला आहे, आणि आंत शिरकाव न झाल्यामुळे हजारों लोक बाहेर उभे आहेत, असें मला दिसून आलें.

दिवाणखाना फारच प्रशस्त होता. वक्तृत्वाला ही जागा योग्य होती. श्री आंत जातों, तोंच काळ्या लोकांनी टाळ्यांचा गजर मोठ्या जोरानें केला, आणि कांहीं गोऱ्या लोकांकडूनहि मंद घोष आला. पूर्वदिवशीं अटलांटा येथें मला असें सांगण्यांत आलें होतें, कीं, बरेच गोरे लोक मजेखातर माझें भाषण ऐकण्यास येणार आहेत, व माझ्याविषयीं सहानुभूति असलेले कांहीं लोक हजर राहणार आहेत; पण यांहून बरेच अधिक श्रोते, मी माझ्या मूर्खपणाचें प्रदर्शन कसें करतों किंवा निदान कांहीं वेडगळ गोष्टी कशा बडबडतों, तें ऐकून 'आह्मीं असें भविष्यच केलें होतें !' असे, मला आमंत्रण देणाऱ्या व्यवस्थापकांनां टोचून बोलण्याकरितांच, देणार होते.

टस्केजीसंस्थेचे एक ट्रस्टी, तसेच माझे स्वतःचे मित्र, त्यावेळचे क्षिणेतील रेल्वेचे मॅनेजर, मिस्टर विल्यियम. एच बाल्डविन हे त्या दिवशीं अटलांटा येथे आले होते. माझें स्वागत कसें होईल, माझ्या भाषणाचा काय परिणाम होईल, याविषयीं ते इतके साशंक व भयभीत झाले,की त्यांनां आंत येण्याचें धैर्य होईना, आणि सुरुवातीचा कार्यक्रम आटोपेपर्यंत ते बाहेरील मैदानांत इकडेतिकडे फिरत राहिले.

प्रकरण चवदावें.

अटलांटा प्रदर्शनांतील भाषण.

नीग्रो ज्ञातीच्या तर्फे अटलांटा प्रदर्शनांत भाषण करण्याला मला आमत्रंण दिलें होतें, हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. गव्हरनर बुलक यांनीं थोडेसें प्रास्ताविक भाषण करून हें प्रदर्शन उघडिलें. जॉर्जियाचे बिशप नेल्सन यांची प्रार्थना, आलबर्ट हावेल यांचें स्तोत्र, प्रदर्शनचे अध्यक्ष व स्त्रीमंडळाची अध्यक्ष मिसेस जोसेफ थामसन यांचीं भाषणें, इत्यादि कार्यक्रम आटोपल्यावर गव्हरनर बुलक यांनी माझी श्रोत्यांनां ओळख करून देतांना सांगितलें, कीं, "नीग्रो संस्कृति आणि नीग्रो साहसप्रीति यांचे प्रतिनिधि आज आह्मांबरोबर आहेत. हे आतां भाषण करितील."

मी जेव्हां बोलावयाला उठलों, तेव्हां बराच टाळ्यांचा गजर विशेषतः काळ्या लोकांकडून, झाला. दोन्ही ज्ञातींमध्यें सलोखा रहाव आणि त्यांच्यामध्यें चांगलें सहकारित्व असावें, असें कांहीं तरी मी सांगावे हीच कल्पना त्यावेळीं माझ्या मनांत होती, असें मला आतांहि आठवतें. बाहयपरिस्थितीविषयीं आतां मला इतकेंच आठवतें, कीं, मी जेव्हा बोलावयाला उभा राहिलों, तेव्हां हजारों नेत्र माझ्या तोंडाकडे टकमक पाहूं लागले, असें मला दिसले. त्यावेळचें तें माझें भाषण पुढे दिल्याप्रमाणे होतें:-

"मान्यवर अध्यक्ष, व्यवस्थापकमंडळांतील गृहस्थ आणि नागरिका जन हो ! दक्षिणेतील लोकसंख्येचा एकतृतीयांश नीग्रो ज्ञातीचा आहे. दक्षिणेंतील लोकांचें सांपत्तिक, सामाजिक व नैतिक कल्याण करूं इच्छिणाऱ्या कोणत्याहि अंगीकृत कार्याला लोकसंख्येच्या या भागाकडे दुर्लक्ष्य करून पूर्ण यश मिळवितां येणार नाहीं. या भव्य प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांनीं पदोपदीं नीग्रोंचा पराक्रम आणि त्यांचें महत्त्व यांनां----

–जसा योग्य आणि उदार मान दिला आहे, तसा दुसऱ्या कोणीहि दिला नाहीं, अशी माझ्या ज्ञांतीची समजूत असून, ती मी, अध्यक्षसाहेब व व्यवस्थापक मंडळींनों ! आपल्यापुढें मांडतों. आह्मांला स्वतंत्रता मिळाल्यापासून दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीपेक्षां आह्मांला मिळालेल्या या मानानें दोन्ही ज्ञातींचें सख्य अधिक चांगलें राहील, असे मला वाटतें.

"याशिवाय येथें आह्मांला मिळालेली संधि आमच्यामध्यें औद्योगिक प्रगतीचा नवीन शक सुरू करील. स्वतंत्रता मिळाल्यावर नवीन जीवनक्रमाच्या प्रारंभींच्या पहिल्यापहिल्या वर्षी आह्मी अज्ञानी व अननुभवी असल्यामुळे 'आधीं कळस आणि मग पाया' अशी आमची उलटी स्थिति झाली, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मालमत्ता किंवा औद्योगिक प्रावीण्य यांपेक्षां कांग्रेसमधील किंवा कायदेकानू करणाऱ्या संस्थेतील जागा मिळविण्याकडे लोकांची प्रवृत्ति होऊं लागली ! दूध-दुभत्याचा कारखाना किंवा भाजीपाल्याच्या मळ्याचे काम सुरू करण्यापेक्षां राजकीय सभा व चव्हाट्यावरील भाषणें हींच लोकांनां अधिक प्रिय वाटू लागलीं !

"एकदां समुद्रांत कित्येक दिवस वाट चुकलेल्या एका जहाजाला दूसरें एक स्नेही जहाज दृष्टीला पडलें. त्यावेळीं 'पाणी, पाणी, आह्मीं तहानेनें मरत आहों !' अशा दीन स्थितीचें सूचक निशाण त्या अभागी जहाजावर फडकू लागलें. 'तुझी आहांत तेथेंच डोल सोडा,' असें त्या स्नेही जहाजानें उत्तर दिलें. पुनः दुसऱ्या खेपेला 'पाणी पाहिजे, पाणी पाठवा !' अशी खूण पहिल्या जहाजानें केली. तेव्हांहि 'आहांत तेथेंच डोल टाका,' असेंच त्याचें उत्तर मिळालें. तिसऱ्या व चवथ्या निशाणीलाहि पुनः तेंच उत्तर आलेलें पाहून त्या सूचनेप्रमाणें पहिल्या जहाजाच्या कप्तानानें डोल खालीं सोडला आणि तो वर ओढून पहातो, तों अमेझान नदीच्या मुखांतलें स्वच्छ, गोड व ताजें पाणी त्यांत भरून आलें ! माझ्या ज्ञातीपैकीं जे लोक दक्षिणेंतील—--

—गोऱ्या लोकांशी सख्य करणें हें कमी महत्त्वाचें आहे असें समजतात, किंवा परदेशीं गेल्यानेंच आमची स्थिति सुधारेल असें सांगतात, त्यांनां मी असें सांगतों, कीं, तुझीं आहांत तेथेंच आपला डोल टाका, तुझीं ज्या समाजांत रहात आहां त्या समाजाच्या सर्व लोकांशीं मानानें सख्य करण्यांत तुह्मी आपला डोल सोडा !

"शेतकी, शिल्पशास्त्र, व्यापार, गृहकृत्यें (सेवा) आणि इतर धंदे यांत तुझी आपला डोल टाका. याविषयीं हें लक्ष्यांत असावें, की, दक्षिणेंतील लोकांचीं इतर पापें कांहींहि असोत, जेव्हां केवळ व्यवहाराचाच प्रश्न येतो, तेव्हां नीग्रोंनां व्यापारधंद्यांत पुढें येण्याची संघि दक्षिणेंतच दिली जाते, आणि हीच गोष्ट या प्रदर्शनांत फार चांगल्या तऱ्हेनें दृष्टोत्पत्तीला येत आहे. आह्मांला असा एक मोठा धोका आहे, कीं, दास्याच्या पंकांतून एकदम स्वातंत्र्याच्या प्रकाशांत आल्यामुळे आमच्यापैकी बहुतेक लोकांनां हातानें श्रम करून उदरनिर्वाह करणे भाग आहे या गोष्टीकडे आह्मी कानाडोळा करूं; तसेंच नित्याच्या श्रमाची महती आणि मानमरातब जितका आह्मी वाढवू व आयुष्यांतील साध्या उद्योगधंद्यांत डोकें घालून जितकें अधिक कौशल्य संपादन करूं, तितकी अधिक आमची भरभराट होईल; त्याचप्रमाणें दिखाऊ, वरपांगी व भपक्याचा जीवितक्रम, आणि खरा, उपयुक्त जीवितक्रम, जितका आह्मी ओळखण्याला शिकू, तितके आह्मी पुढें जाऊं, या गोष्टी आह्मी विसरून जाऊं. एकादें सुंदर काव्य लिहिण्यांत आणि शेत नांगरण्यांत सारखाच मान आहे असें समजून येईपर्यंत कोणत्याहि ज्ञातीची भरभराट होणार नाहीं ! आयुष्यांत आह्मीं खालून सुरुवात केली पाहिजे, वरून सुरुवात करूं नये. तसेंच आमच्या दुःखामुळे व तक्रारीमुळे आह्मांला मिळालेल्या संधीचे महत्त्व आह्मीं कमी मानतां कामा नये.

"दुसऱ्या देशांत जन्मलेले, निरनिराळ्या भाषा बोलणारे, निरनिराळ्या प्रकृतीचे मजूर लोक आणिले असतां दक्षिणेची भरभराट होईल, असे समजणाऱ्या गोऱ्या ज्ञातीच्या लोकांनां, -ते माझें ऐकून घेतील तर-

मी असेंच सांगेन, कीं, तुम्ही आहांत तेथेंच डोल टाका ! ज्या लोकांची आदत तुह्मांला माहीत आहे, थोडासा दगा दिला असता तर तुमचीं घरें धुळीला मिळाली असती अशा आणीबाणीच्या प्रसंगीहि ज्यांचा इमानीपणा आणि ज्यांची स्वामिभक्ति यांची तुह्मीं पारख केलेली आहे, अशा ऐशीं लक्ष नीग्रो लोकांमध्ये तुह्मी आपला डोल टाका! संप, दंगेधोपे वगैरे न करितां ज्यांनीं तुमचीं शेतें नांगरिलीं आहेत, तुमचीं जंगलें तोडून साफ केलीं आहेत, तुमचे आगगाडीचे रस्ते व शहरें बांधिलीं आहेत, आणि अशा रीतीनें दक्षिणेची भरभराट दाखविणारें हें प्रदर्शन भरविण्याला ज्यांनीं मदत केली आहे, अशा लोकांमध्यें तुझीं आपला डोल सोडा ! जर तुह्मी त्यांच्यामध्यें डोल टाकून, या प्रदर्शनाच्या जागीं त्यांनां मदत करून जसें उत्तेजन देत आहां तसें देत जाल, व कर्मेन्द्रियें, ज्ञानेंद्रियें आणि अंतःकरण यांचें शिक्षण देण्याला त्यांनां साहाय्य कराल, तर तुमची रिकामी पडलेली अधिक जमीन ते विकत घेतील, तुमच्या पडीत जमिनीची ते चांगली मशागत करितील, आणि तुमचे कारखाने उत्तम चालवितील. हें सर्व घडून येत असतां, पूर्वीप्रमाणेंच पुढेहि, जगांतील अत्यंत सोशीक, विश्वासू, कायदा पाळणारे आणि शांत असे हे लोक तुह्मांभोंवतीं व तुमच्या कुटुंबांभोंवतीं खचित राहतील. तुमच्या मुलांबाळांचें जतन करण्यांत, तुमच्या आजारी मातापित्यांची जागून शुश्रूषा करण्यांत आणि त्यांच्या मृत्युसमयीं शोकानें व्याप्त होऊन त्यांच्या मागें स्मशानापर्यंत रडत जाण्यांत व आणखी अशाच कांहीं गोष्टींत पूर्वी आह्मीं आमचा इमानीपणा दाखविला आहे. आतां यापुढेंहि, दुसऱ्या परकीय लोकांनां बरोबरी करितां न येण्यासारख्या स्वामिभक्तीनें व नम्रतेनें आह्मी तुह्मांलाच चिकटून राहूं, आणि प्रसंग पडल्यास आमचे प्राणहि तुमच्याकरितां वेंचूं ! आमचे औद्योगिक, व्यावहारिक आणि धार्मिक हितसंबंध, हे, दोन्ही जातींचे हितसंबंध एकच होतील अशा रीतीनें तुमच्यांत मिळवून टाकू. निवळ सामाजिक अशा सर्व बाबतींत आह्मी बोटांप्रमाणें अलग राहूं; पण परस्परांच्या प्रगतीला अवश्य असलेल्या सर्व गोष्टींत हाताप्रमाणें एक होऊं.

"आह्मां सर्वांची उन्नति आणि वाढ झाल्याशिवाय कोणालाहि निर्भयता आणि बचावाचें साधन मिळणार नाहीं. नीग्रोंच्या पूर्ण वाढीला प्रतिबंधक असे प्रयत्न कोठे चालू असतील, तर ते बदलून टाका, आणि उत्तेजन व धीर देऊन त्यांनां अतिशय उपयुक्त व हुषार असें नागरिक बनवा. अशा प्रकारच्या उद्योगाचें किंवा प्रयत्नाचें फळ हजारों पटीनें अधिक येईल. हा उद्यम, देणाऱ्या घेणाऱ्या अशा उभयपक्षांनां कल्याणकारक आशीर्वादाप्रमाणें सुमंगल होय !

"मानवी किंवा दैवी कायद्यानें अपरिहार्य गोष्टींपासून सुटका होत नाहीं.

" केव्हांहि न बदलणाऱ्या अशा सृष्टीच्या कायद्यानें-सनातन धर्मानें जुलूम करणारा व ज्याच्यावर जुडूम केला जातो असे दोघेहि अगदीं बांधले जातात, आणि पाप आणि दुःख यांच्या जोडीप्रमाणें आह्मी (छळणारे व छळिले जाणारे) नियतीकडे मृत्यूकडे बरोबरीनें, खांद्याला खांदा लावून धांव घेत असतो.

"सुमारे एक कोटि साठ लक्ष हात, ओझें वर नेण्यास तुह्मांला मदत करतील किंवा तुमच्या इच्छेविरुद्ध ओझें खालीं 'खेंचतील. दक्षिणेतील आमचा एकतृतीयांश भाग अज्ञान व गुन्हा यांत बुडून राहील, किंवा त्या भागाची उन्नति होऊन त्याची बुद्धिमत्ता वाढेल. दक्षिणेतील व्यापाराच्या आणि उद्योगधंद्याच्या भरभराटीला एकतृतीयांश हिश्शानें आह्मी मदत करूं किंवा एकंदर समाजाच्या उन्नतीच्या आड येऊन त्याला खालीं ओढून त्याचा उत्साहभंग करणारा असा एक आह्मी गतिरहित-निर्जीव, प्रत्यक्ष मुडदाच होऊन जाऊं !

"प्रदर्शनांतील सभ्य गृहस्थांनों ! आमची प्रगति कशी झाली आहे, हें दाखविण्याचा प्रदर्शनांत आह्मी नम्रपणे प्रयत्न केला आहे. याहून अधिक तुह्मी आमच्याविषयीं आशा करूं नये. तीस वर्षांपूर्वी, प्रथम सुरुवातीच्या वेळीं (ह्मणजे स्वातंत्र्य मिळाल्यावर) मोठ्या कष्टानें ठिकठिकाणांहून मिळविलेल्या बिछान्याच्या चादरी, भोंपळे आणि—-

—कोंबडी इत्यादि जिनसांवरचं आमची मालकी होती. अशा स्थितीपासून तों शेतकीचीं आऊतें, बग्या, वाफेचीं एंजिनें, वर्तमानपत्रे, पुस्तकें, मूर्ति घडविणें, कोरीव काम, चित्रकला इत्यादि गोष्टी तयार करण्यापर्यंत आणि त्यांत नवीन शोध लावण्यापर्यंत उन्नतीचा मार्ग, दुःख आणि कष्ट सोसल्याशिवाय आम्ही आक्रमिलेला नाहीं, हें ध्यानांत ठेवा. प्रदर्शनांत मांडलेल्या वस्तु आह्मीं आमच्या स्वतःच्या प्रयत्नानें, तयार केल्या आहेत, याबद्दल आह्मांला योग्य अभिमान वाटतो. तरी दक्षिणेंतील संस्थानांनीं आणि उत्तरेकडील दानशूर गृहस्थांनी आमच्या शिक्षणाला वेळोवेळीं जी मदत केली आंणि जें उत्तेजन दिलें, त्यांवांचून आमचा प्रदर्शनांतील भाग बराच फिका पडला असता, हें आह्मी केव्हांहि विसरणार नाहीं !

"माझ्या ज्ञातींतील शहाणे लोक असें समजतात, कीं, सामाजिक समतेबद्दल चळवळ करणे हा निवळ मुर्खपणा आहे, आणि आह्मांला मिळणारे सर्व हक्क आमच्यावर कृत्रिमपणानें लादले जाण्यापेक्षां, ते दृढ आणि सतत प्रयत्न करून मिळविणें हें फार बरें. जगाच्या पेठेंत आपल्या वांट्यापुरती भर घालणारी - माल पैदा करणारी कोणतीहि ज्ञात फार वेळ वाळींत टाकिली जाणार नाहीं, व मागें राहणार नाहीं, हें खास ! कायद्यानें दिलेले सर्व हक्क आह्मांला मिळणें हें योग्य आणि रास्त आहे; पण त्या हक्कांचा योग्य उपयोग करण्याला आह्मी तयार होणें, हे त्याहून फार महत्त्वाचें आहे. एकाद्या कारखान्यांत काम करून एक डालर मिळविण्याची संधि, नाटकगृहांत एक डालर खर्च करितां येण्याच्या संधीपेक्षां तूर्त फार महत्वाची आणि मौल्यवान झाली आहे.

“शेवटी, मी आपणांला इतकेंच सांगतों, कीं, या प्रदर्शनानें मिळा-लेल्या संधीपेक्षां दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें आह्मांला इतकी आशा व उत्तेजन दिलें नाहीं, आणि तुह्मां गोऱ्या लोकांच्या इतकें जवळ आह्मांला आणिलें नाहीं. तीस वर्षापूर्वी तुमच्या व माझ्या ज्ञातींनीं प्रथम रिक्तहस्तें प्रयत्न करण्याला सुरुवात केली. या तीस वर्षांत दोन्ही ज्ञातींनां—--

—आलेलें फल या वेदीसमोर दृष्टोत्पत्तीला येत आहे. अशा या पवित्र वेदीपुढें नम्रपणें वांकून मी असें जाहीर करतों, कीं, जो मोठा आणि गूढ प्रश्न ईश्वरानें दक्षिणेंतील लोकांच्या पदरीं बांधिलेला आहे, तो सोडविण्याच्या कामीं माझ्या ज्ञातीची सहानुभूति आणि मदत तुह्मांला नेहमीं मिळत जाईल. पण नेहमीं हें ध्यानांत ठेवा, कीं, या इमारतींत मांडलेल्या शेतें, जंगलें, खाणी, कारखाने, वाङ्मय, कला इत्यादिकांच्या वस्तूंपासून बराच फायदा होणार हैं खरें, तरी कायद्याप्रमाणे सर्वांनां राजीखुषीनें योग्य न्याय मिळू देण्याच्या निश्चयानें सर्व जातिद्वेष आणि परस्परांविषयीं भेदभाव आणि शंका इत्यादि प्रकार नाहींसे केले असतां, ईश्वराच्या कृपेनें वर दिलेल्या भौतिक फायद्यापेक्षां सर्वांचे कितीतरी पटीनें कल्याण होईल ! जातिद्वेष समूळ नाहींसा करणें, आणि भौतिक भरभराट, या गोष्टींनीं आमचा प्रिय दक्षिण भाग नंदनवनच होऊन जाईल, यांत शंका नाहीं. "

माझें भाषण संपल्यावर पहिली गोष्ट मला ही आठवते, कीं, गव्हर्नर बुलक हे प्लॅटफार्मवर चढून आले आणि त्यांनीं माझ्या हातांत हात घातला, आणि दुसऱ्यांनींहि तसेंच केलें. बहुतेक लोक मनापासून माझें इतकें अभिनंदन करूं लागले, कीं, इमारतीच्या बाहेर जाणें मला बरेंच कठिण गेलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी गांवांतील बाजारांत जाईतोंपर्यंत माझ्या भाषणाचा लोकांच्या मनावर काय परिणाम झाला, याची फारशी कल्पना मला नव्हती. मी कोण आहे हें समजतांच माझ्याभोंवतीं बरेच लोक जमले, आणि माझ्याशीं शेकह्यांड करूं लागले. मी ज्या ज्या रस्त्यावर गेलों, तेथेंतेथें असाच प्रकार होऊं लागला. यामुळे मी इतका गोंधळून गेलों, कीं, मला लागलीच घरी परत यावें लागलें. दुसऱ्या दिवशी सकाळीं मी टस्केजीला जावयाला निघालों. अटलांटा स्टेशनवर आणि पुढें ज्या ज्या स्टेशनवर गाडी थांबे, तेथेंतेथें लोकांचा समुदाय माझ्याशीं शेकह्मांड करण्याला उत्सुक दिसला.

अटलांटा प्रदर्शनांतील भाषण-

अमेरिकेतील सर्व भागांतील वर्तमानपत्रांनीं माझें समग्र भाषण प्रसिद्ध केलें, आणि पुढें कांहीं महिने माझ्या भाषणाविषयी अनुकूल संपादकीय लेख त्यांत येऊ लागले. 'अटलांटा कानस्टिट्यूशन' पत्राचे संपादक मिस्टर क्लार्क हॉवेल यांनीं न्यूयॉर्कच्या एका पत्राला अशी तार केली, की, "दक्षिणेतील श्रोत्यांसमोर झालेल्या आजपर्यंतच्या व्याख्यानांत प्रोफेसर बुकर. टी. वाशिंग्टन यांचें कालरोजीं झालेलें भाषण फारच उत्कृष्ट आणि संस्मरणीय झालें. तसेंच त्यांचे स्वागतहि अपूर्व झालें. वा विधानांत अतिशयोक्तीचा कांहीं भाग नाहीं. त्यांच्या भाषणांपासून आह्मांला बऱ्याच गोष्टींचें ज्ञान झालें. काळ्यागोऱ्या लोकांची त्यांनीं आपल्या भाषणांत योग्य बोळवण केली होती. "

'बोस्टन ट्रान्सस्क्रिप्ट' नांवाच्या वर्तमानपत्रांत असा संपादकीय लेख आला, की, अटलांटा प्रदर्शनांत या आठवड्यांत बुकर. टी. वाशिंग्टन यांच्या भाषणांपुढें प्रदर्शनांतील सर्व कार्यक्रम आणि खुद्द प्रदर्शनहि फिके पडलें. इतकी चळवळ दुसऱ्या कोणत्याहि भाषणानें वर्तमानपत्रांत झालेली नव्हती.

लवकरच व्याख्यानें करविणाऱ्या संस्था, वर्तमानपत्रे व मासिकें यांचे संपादक यांच्याकडून मीं व्याख्यानें देण्याला सुरू करावें आणि लेख लिहावे, अशा नानातऱ्हांच्या सूचना मजकडे येऊ लागल्या. "तुझी जर कांहीं कालपर्यंत व्याख्यानें देण्याचें कबूल कराल, तर तुह्माला आह्मीं पन्नास हजार डालर देण्याचें किंवा दर रात्रीला दोनशें डालर आणि तुमचा खर्च देण्याचें कबूल करूं," असें एका संस्थेनें सुचविलें होतें. पण या सर्व सूचनांनां मीं असें उत्तर दिलें, कीं, माझ्या आयुष्यांतील मुख्य काम टस्केजी येथेंच आहे, आणि मी टस्केजीसंस्थेच्या व माझ्या ज्ञातीच्या हितार्थच भाषण करीत असतों. यास्तव माझ्या कामगिरीचें नुसत्या पैशानें मोल ठरविणारी कोणतीहि व्यवस्था मला पसंत नाहीं !"

आत्मोद्धार.

माझें भाषण झाल्यावर कांहीं दिवसांनी मी त्याची एक प्रत अमेरिकेचे प्रेसिडेंट ऑनरेबल ग्रोव्हर क्लेव्हलंड यांच्याकडे पाठविली. त्यांच्या स्वदस्तुरचें उत्तर खाली दिल्याप्रमाणें आलें.-

"ग्रे गेबल्स, बझाईस् बे,
मॅसॅच्युसेटस
६अक्टोबर, १८९५.

बुकर टी. वाशिंग्टन, एस्कायर, यांस -

प्रिय महाशय- अटलांटा प्रदर्शनांत झालेल्या भाषणाची एक प्रत मला पाठविल्याबद्दल मी आपला फार आभारी आहें.

आपण असें भाषण केल्याबद्दल मी आपले उत्साहानें अभिनंदन करितों. मी आपलें भाषण फार लक्ष्यपूर्वक वाचिलें आहे, आणि आपल्या भाषणाशिवाय प्रदर्शननें दुसरें कांहींहि करविलें नसते तरी तें योग्य झालें असतें, असें मला वाटतें. आपल्या ज्ञातीचें कल्याण इच्छिणाऱ्या सर्वांनां आपल्या भाषणापासून आनंद व उत्तेजन मिळाल्याशिवाय रहावयाचें नाहीं. आपल्या भाषणानें आमच्या काळ्या देशबंधूनां त्यांनां मिळालेल्या नागरिकत्वाच्या हक्कापासून शक्य तितका फायदा करून घेण्याचा निश्चय व नवीन आशा करितां येणार नाहीं, तर ती खरोखर नवलाचीच गोष्ट समजली पाहिजे.

आपला खरा हितचिंतक
ग्रोव्हर क्लेव्हलंड."

प्रेसिडेंट या नात्यानें पुढें जेव्हां मिस्टर क्लेव्हलंड अटलांटा प्रदर्शन पाहण्याला आले, तेव्हां त्यांची व माझी प्रथम भेट झाली. माझ्या व दुसऱ्या मंडळीच्या विनंतीवरून नीग्रो इमारतींत काळ्या लोकांनीं मांडडेल्या वस्तु पहाण्यासाठीं व हजर असलेल्या नीग्रो लोकांनां आपल्याशीं शेकहयांड करण्याची संधि देण्यासाठीं एक तास खर्च करण्याचें त्यांनी कबूल केलें. मिस्टर क्लेव्हलंडची व माझी भेट झाल्याबरोबर त्यांचा साधेपणा, त्यांचा मोठेपणा आणि त्यांचा जोरदार प्रामाणिकपणा यांची—

M

अटलांटा प्रदर्शनांतील भाषण.

–मला खात्री पटली. यानंतर सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी आणि प्रिन्सटन येथे त्यांच्या घरीहि, माझी व त्यांची पुष्कळदां भेट झालेली आहे, आणि त्यांनां मी जितका अधिक पाहतों, तितका त्यांनां अधिक चाहतों. अटलांटा प्रदर्शनांतील नीग्रो इमारतींत जेव्हां ते गेले, तेव्हां त्यांनीं एक तासभर नीग्रो लोकांसाठीं स्वतःला वाहून घेतलें आहे, असें दाखविलें. चिंध्या गुंडाळलेल्या अशा एका काळ्या वृद्ध आजीबाईशी शेकहॅयांड करण्यांत त्यांनीं इतकी काळजी आणि कळकळ दाखविली, की, जणू काय ते एकाद्या कोट्यधीशाचेंच स्वागत करीत होते ! पुष्कळ काळ्या लोकांनी या संधीचा फायदा घेऊन आपले नांव त्यांच्या स्मरण-वहींत किंवा दुसऱ्या कागदावर त्यांच्याकडून लिहविलें, आणि त्यांनीं हे काम इतक्या काळजीनें व समाधानीनें केलें, कीं, जणूं काय राज्याच्या काद्या महत्त्वाच्या कागदावरच ते सही करीत होतेसे दिसले !

मिस्टर क्लेव्हलंड यांनीं पुष्कळ खासगी तऱ्हांनी त्यांचा माझ्याशीं असलेला स्नेहभाव व्यक्त केला आहे. इतकेंच नव्हे, तर आमच्या संस्थेविषयीं मी सांगेन तें करण्याचें त्यांनी नेहमीं कबूल केलें आहे. त्यांनी आमच्या संस्थेला स्वतः देणग्या दिल्या आहेत, आणि इतरांकडूनहि त्या देवविण्यांत त्यांनी आपलें वजन खर्च केलें आहे. माझा जो त्यांच्याशीं परिचय झाला आहे, त्यावरून पहातां त्यांनां वर्णद्वेष असावा, असें मला वाटत नाहीं. ते इतके मोठे आहेत, कीं, वर्णद्वेषा-सारखी क्षुद्र गोष्ट त्यांच्या मनांत येणें अशक्य आहे. पुष्कळ लोकांशीं झालेल्या संघटनामुळे मला असें आढळून आलें आहे, की, साधारणपणे क्षुद्र व कोते लोकच स्वतःकरितां जगतात, चांगले ग्रंथ वाचीत नाहींत, प्रवास करीत नाहींत, दुसऱ्या आत्म्यांशी जगांतील मोठमोठ्या लोकांशीं-आपला परिचय करून घेत नाहींत. वर्णद्वेषानें संकुचित झालेल्या दृष्टीला जगांत उच्च व श्रेष्ठ असें कांहींच दिसणार नाहीं. पुष्कळ ठिकाणीं प्रवास करून अनेक लोकांचा परिचय झाल्यावर मला असें आढळून आलें आहे, की, दुसऱ्यांकरितां जे अतिशय—--

–प्रयत्न करितात, ते सर्वात सुखी होत, आणि दुसऱ्यांकरितां जे कांहींच करीत नाहींत ते सर्वात दुःखी होत! जातिद्वेषाइतकी एकाद्याला अंघ व आकुंचित करणारी दुसरी गोष्ट क्वचित्च सांपडेल, असेंहि मला कळून आलें आहे. रविवारी संध्याकाळीं प्रार्थनामंदिरांत विद्यार्थ्यांना उपदेश करितांना मी नेहमीं असें सांगतों, की, मी जसजसा मोठा व वृद्ध होत चाललों आहे, आणि जसजसा जगाचा अनुभव मला अधिक येत आहे, तसतशी माझी अशी अधिकाधिक खात्री पटत चालली आहे कीं, जिच्याकरितां आह्मी जगावें आणि प्रसंग पडल्यास प्राणहि वेंचाचे अशी एकच गोष्ट आहे; आणि ती ह्मटली ह्मणजे 'दुसऱ्या कोणालाहि अधिक उपयुक्त आणि सुखी करण्याचा सुयोग अथवा संधि मिळणे ही होय.*

माझें भाषण आणि त्याचें झालेलें स्वागत या गोष्टींनीं काळे लोक आणि त्यांचीं वर्तमानपत्रे यांनां प्रथम फारच आनंद झाला, असें दिसलें पण त्यांचा पहिला उत्साह निवाल्यावर जेव्हां ते माझें छापलेले, थंड झालेलें भाषण वाचू लागले, तेव्हां आपण भुलून गेलों, असें त्यांच्या पैकीं कांहीजणांनां वाटूं लागलें. दक्षिणेतील गोऱ्या लोकांविषयी बोलतांना मी फारच उदारपणा दाखविला आहे, पण स्वज्ञातीच्या हक्कांचे प्रतिपादन मीं जोरानें केलें नाहीं, असें ते ह्मणू लागले. माझ्या ज्ञातीच्या कांहीं मंडळींत कांहीं दिवस ही प्रतिक्रिया सुरू झाली; पण पुढे त्यांचें मत बदलून ते माझ्या विचारांनां आणि कार्याला अनुकूल झाले

लोकमताच्या झालेल्या या फेरफाराविषयीं सांगतांना मला दुसरी एका गोष्ट आठवते. टस्केजीची शाळा सुरू झाल्यावर दहा वर्षांनीं मला जो एक अनुभव आला, तो मी केव्हांहि विसरणार नाहीं! प्लीमौथ चर्चचे पॅस्टर (मेंढपाळ) आणि 'औटलुक' पत्राचे संपादक, डॉक्टर लीमन अ‍ॅबट यांनीं, दक्षिणेतील काळ्या धर्मोपदेशकांच्या मानसिक—-

---

* श्लोकार्थेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः । परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ॥

अटलांटा प्रदर्शनांतील भाषण.

—नैतिक स्थितीविषयीं माझ्या जें कांहीं अवलोकनांत आलेलें आहे, त्याविषयी माझा अनुभव लिहून आपल्या वर्तमानपत्रांत मी एक पत्र लिहावे, अशी मला विनंति केली, व त्याप्रमाणें माझ्या नजरेला आल्या तशा खऱ्या गोष्टी देऊन मीं एक पत्र लिहिलें. मीं काढिलेलें ते चित्र काळेच होतें कारण मी कृष्णवर्णी आहे तर तें चित्र गोरें कोठून येणार- थोड्या वर्षांपूर्वी दास्यांतून मुक्त झालेल्या, आणि योग्य धर्मोपदेशक तयार करण्याची संधि व वेळ न मिळालेल्या अशा ज्ञातीचें त्यावेळचे हें चित्र योग्यच होतें.

देशांतील प्रत्येक नीग्रो धर्मोपदेशकानें माझें पत्र वाचलें असावें, असें वाटते; कारण मला दोष देणारी अशी बरीच पत्रे मला आलीं. माझें पत्र प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षपर्यंत कोणत्याहि धार्मिक संस्थेची सभा आली, कीं, मला नांवें ठेवणारा किंवा दूषण देणारा ठराव, अगर माझें विधान मी परत घ्यावें किंवा त्यांत फेरफार तरी करावा अशी मला सूचना करण्याच्या ठराव, त्या सभेत पास झाल्याशिवाय राहिला नाहीं!

टस्केजी येथे आपल्या मुलांनां पाठवू नये, असें आईबापांनां सल्ला देणारे ठरावहि बऱ्याच संस्थांनीं पास केले. मुलांनां टस्केजी संस्थेत पाठवू नये असा लोकांनां उपदेश करण्याकरितां एका संस्थेनें तर एक मिशनरी नेमला. या मिशनऱ्याचा एक मुलगा आमच्या शाळेत होता ! दुसऱ्या लोकांनां या मिशनऱ्यानें कांहीं जरी उपदेश केला असला, तरी त्याने आपला मुलगा कांहीं आमच्या शाळेतून काढून घेतला नाहीं, असें मला दिसून आलें. नीग्रो लोकांच्या पुष्कळ वर्तमानपत्रांनी मला दूषण देण्याचे किंवा मी माझें विधान परत घ्यावें ह्मणून सूचना करण्याचें सर्व-
-साधारण व्रतच चालू ठेविलें.

याप्रमाणें आरडाओरड, चळवळ आणि टीका चालू असतां, खुलासा करावा ह्मणून एक शब्दहि मी उच्चारिला नाहीं, किंवा माझें विधान मी परत घेतले नाहीं. माझें ह्मणणें बरोबर होतें, आणि लोकांनीं पुनः नीट विचार केल्यास कांहीं कालानंतर माझें विधान—-

—-खरे ठरणार, हे मला माहीत होतें. थोड्या दिवसांनंतर बिशप व इतर धर्माधिकारी, धर्मोपदेशकांची स्थिति नीट तपासून पाहूं लागले, तो माझे विधान बरोबर आहे, असें त्यांनां आढळून आले. मेथाडिस्ट चर्चमधील एका वृद्ध आणि वजनदार विशपने तर मी फारच सौम्य शब्द वापरले आहेत, असें बोलून दाखविलें. उवकरच धर्मोपदेशकांची सुधारणा अवश्य झाली पाहिजे, असें लोकमत बदलत चालले. अद्याप धमर्मोपदेशकांची व्हावी तशी चांगली सुधारणा झाली नाही, तरी मी आत्मश्लाघा न करितां हें सांगतों, कीं, -आणि पुष्कळ वजनदार धर्मोपदेशकांनींहि मला असेच सांगितलें आहे माझ्या शब्दांमुळे-टीकेमुळे व्यासपीठावर उच्च दर्जाचे लोक असले पाहिजेत असें लोकांना वाटू लागले. मला पूर्वी दूषण देणाऱ्या बऱ्याच लोकांनीं नंतर माझ्या स्पष्टोक्तीबद्दल माझे मनापासून आभार मानिले, हें पाहून मला फार समाधान वाटलें.

नीओ धर्मोपदेशकांचे तर आतां माझ्याविषयीं मत इतकें पक्के बदलून गेले आहे, कीं, आतां धर्मोपदेशकांत माझे जितके चांगले स्नेही आहेत, तितके दुसऱ्या कोणत्याहि वर्गात नाहींत. नीग्रो धर्मोपदेशकांच्या आचरणांत व शीलांत झालेली सुधारणा हे ज्ञातीच्या प्रगतीचें समाधानकारक लक्षण आहे. धर्मोपदेशकांविषयीं आणि माझ्या आयुष्यांतील इतर गोष्टींविषयीं आलेल्या अनुभवानें माझी अशी खात्री झाली आहे, कीं, जेव्हां आपण एकादी योग्य गोष्ट बोलून गेलों आहों किंवा केली आहे असें आपणाला वाटतें, आणि लोक जेव्हां त्याबद्दल दोष देऊ लागतात, तेव्हां त्यावर योग्य तोड ह्मणजे त्यांनां कांहीं उत्तर न देतां स्वस्थ बसणे हीच होय ! आपलें ह्मणणें किंवा कृत्य योग्य असेल, तर कांहीं कालानंतर ते तसें सिद्ध होईलच !

अटलांटा येथील माझ्या भाषणाविषयी चर्चा चालू असतां, जान्स हापकिन्स युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष डॉक्टर गिलमन यांचे मला खालीं

—दिलेले पत्र आहें. डॉ. गिलमन यांनां प्रदर्शनांतील बक्षीसकमिटीचे अध्यक्ष नेमण्यांत आलें होतें.

"जान्स हापकिन्स युनिव्हर्सिटी,
बाल्टीमोर, प्रेसिडेंटची कचेरी,
३० सप्टेंबर १८९१.

प्रिय महाशय वाशिंग्टन !

अटलांटा येथील प्रदर्शनांतील शिक्षणखात्याविषयीं बक्षीसकमिटीपैकी एक पंच होणे आपणाला आवडेल काय? आवडत असल्यास आपले नांव मी कमिटीत दाखल करितों. तारेनें उत्तर यावें.

आपला खरा हिंतचिंतक,

डी. सी. गिलमन."

अटलांटा प्रदर्शनाच्या आरंभी भाषण करण्याच्या आमंत्रणापेक्षां या आमंत्रणानें मला कितीतरी अधिक आश्चर्य वाटलें. आतां पंच या नात्यानें नीग्रोंच्या नव्हे, तर गोऱ्यांच्या शाळेतील प्रदर्शनांत मांडलेल्या वस्तूंविषयी अभिप्राय देणें हें माझें कर्तव्यकर्म झालें. मी आमंत्रण स्वीकारून माझे कर्तव्यकर्म करण्यांत अटलांटा येथे एक महिना घालविला. पंचांची कमिटी बरीच मोठी ह्मणजे साठ जणांची होती. यांपैकी बहुतेक निम्मा भाग दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा आणि दुसरा अर्धा भाग उत्तरेकडील गोऱ्या लोकांचा होता. या मंडळींत कॉलेजचे प्रेसिडेंट, प्रमुख शास्त्रज्ञ, बडेबडे विद्वान् आणि निरनिराळ्या विषयांतील वाकबगार असे बरेच लोक होते. आमची पंचकमिटी व्यवस्था करण्याला जमली, तेव्हां मिस्टर थॉमस नेलसन पेज नांवाच्या एका पंचानें मला शिक्षणाच्या भागाचे सेक्रेटरी नेमावें, अशी सूचना आणली, आणि ती एकमतानें पसार झाली. आमच्या भागांतील निम्मे लोक दक्षिणेतील गोरे होते. गोऱ्या लोकांच्या शाळेतील वस्तु तपासण्याचें कर्तव्यकर्म करीत असतां माझा प्रत्येक बाबतींत आदर करण्यांत आला, आणि–

आत्मोद्धार.

–काम संपल्यावर माझ्या साथीदार पंचांनां सोडून परत जातांना मला फार दुःख वाटलें.

माझ्या ज्ञातीची राजकीय स्थिति आणि तिचें राजकीय भविष्य यांविषयीं मी आपले मत अधिक स्पष्टपणें सांगावें, असे मला पुष्कळदा सुचविण्यांत आलेलें आहे. त्यामुळे अटलांटा येथील माझ्या अनुभवाच्या आठवणींवरून माझें ह्मणणें मी थोडक्यांत सांगतों. माझे मत असे आहे, कीं, मीं हें कधीं बोलून दाखविलें नाहीं-दक्षिणेतील नीग्रोला, त्याची योग्यता, त्याचें शील, त्याची मालमत्ता यांनां अनुरूप असे सर्व राजकीय हक्क मिळण्याची वेळ येणार आहे. या राजकीय हक्कांचा उपभोग करूं देणारी संधि बहुतकरून कृत्रिमपणे किंवा बाहेरच्या दुसऱ्या कोणाकडून मिळणार नाहीं, तर दक्षिणेंतील गोरे लोकच अशी संधि नीग्रोला देतील, आणि त्याच्या हक्कांचे संरक्षण करितील, असे मला वाटतें. आपणांला इष्ट नाहीं अशी गोष्ट बाहेरचे दुसरे लोक करवीत आहेत, ही दक्षिणेतील लोकांची जुनी कल्पना नाहींशी होऊं लागल्याबरोबर मी वर दर्शविलेला प्रकार घडून येऊं लागेल. हा प्रकार कांहीं थोड्या अंशीं सुरू झाला आहे, अशी तूर्त तरी कांहीं चिन्हें दिसतात.

माझें ह्मणणें अधिक स्पष्ट करून सांगतों. समजा, अटलांटा प्रदर्शन उडण्यापूर्वी कांहीं महिने दक्षिणेच्या वर्तमानपत्रांत व सभांत सुरुवातीच्या कार्यक्रमांत एकाद्या नीग्रोला घालावें आणि बक्षीस कमिटीत एकाद्या नीग्रोला पंच नेमावें अशी सर्वत्र ओरड झाली असती, तर आमच्या ज्ञातीला कांहीं मान मिळाला असता काय ? मिळाला असता, असे मला तरी वाटत नाहीं. अटलांटाप्रदर्शनांतील व्यवस्थापकांनी एवढी जी मजल मारिली, त्याचें कारण हें होतें, की, नीग्रोज्ञातींत आढळून येणाऱ्या गुणांला योग्य मान देणें, हें त्यांनां एक गोड कर्तव्यकर्म वाटलें. तुझी काहींहि म्हणा, मानवी स्वभावांत कधींहि पुसून न टाकितां येण्याजोगें असें कांहीं आहे, की, त्याच्यायोगे—-

अटलांटा प्रदर्शनांतोल भाषण

—-वर्ण, जाति इत्यादि गोष्टीकडे लक्ष्य न देतां एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्यांमधील गुणांची शेवटीं पारख होऊन त्याला त्याचें चोज करितां येतें.

राजकीय हक्कांविषयीं आपली वागणूक नीग्रोनें अधिक विनयशील ठेवावी, असे माझे मत आहे. याप्रमाणें बहुतेक नीग्रो लोक वागत आहेत, ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. त्यांनी, मालमत्ता, बुद्धिमत्ता आणि उत्तम शील या गोष्टी संपादण्यावरच सर्व राजकीय हक्क हें फार चांगलें. सर्व राजकीय हक्कांचा उपभोग घेण्याला सांपडणें, ही गोष्ट क्रमाक्रमाने होणाऱ्या स्वाभाविक वाढीवरच अवलंबून आहे. भोपळ्याच्या वेलाप्रमाणें लवकर वाढणारी ही गोष्ट नव्हे, असें मला वाटतें ! हमणून नीग्रोनें मत देण्याचें बंद करावें असें माझें मत आहे, असें समजू नये. कारण, पाण्यांत पडल्याशिवाय जसें मुलाला पोहतां येणार नाहीं, तसे मत देत गेल्याशिवाय कोणालाहि स्थानिक स्वराज्याचा उपभोग देतां येणार नाहीं. पण मत देतांना नीग्रोनें आपल्या शेजारच्या बुद्धिवान् व शीलवान् अशा लोकांचाच अधिकाधिक सल्ला घ्यावा हें बरें, असे मला वाटतें.

दक्षिणेतील गोऱ्या लोकांच्या उत्तेजनानें, सल्ल्यानें व मदतीनें हजारों डालर किंमतीची मालमत्ता मिळविलेले कांहीं नीग्रो लोक मला माहीत आहेत; पण मत देण्याचा प्रसंग आला हमणजे हे काळे लोक आपलें कल्याण करणाऱ्या त्या गोऱ्या लोकांकडे, कसें मत द्यावें याविषयीं सल्ला घ्यावयाला जावयाचे नाहींत. हा प्रकार गैर व मूर्खपणाचा आहे, आणि तो लवकर बंद झालेला बरा, असे मला वाटते. नीग्रोनीं हांजीहांजी करावी अगर तत्वांनीं प्रेरित होऊन मत देऊ नये, असें माझें हमणणें नाहीं. कारण तत्त्व बाजूला ठेवून ते मत देऊ लागले, हमणजे दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचा त्याविषयीं विश्वास आणि आदर नाहींसा होतो.

आत्मोद्धार.

अशिक्षित आणि गरीब अशा गोऱ्या मनुष्याला मत देण्याचा अधिकार यावा, आणि त्याच स्थितीतील काळ्या मनुष्याला तो नसावा, असा कायदा कोणत्याहि संस्थानानें करावा असे मला वाटत नाही. असा कायदा अन्यायाचा आहे, एवढेच नव्हे, तर सर्व अन्यायी कायद्यां प्रमाणे यापासूनहि प्रतिक्रिया होऊं लागेल. कारण या कायद्याचा परिणाम असा होईल, की, नीग्रोला शिक्षण व मालमत्ता मिळविण्यास आणि गोऱ्या मनुष्यांला अज्ञानांत व दारिद्यांत राहण्यास उत्तेजन मिळेल. ज्ञान आणि परस्पर ज्ञातींमधील सख्य यांच्या वाढीमुळे मतें गोळा करतांना दक्षिणेंत चाललेली लबाडी लवकरच बंद होईल, असें मला वाटते. जो गोरा मनुष्य नीग्रोला फसवून त्याचें मत बुचाडून घेतो, तो आपल्या गोऱ्या बंधूला चकविण्याला लवकर शिकतो, आणि याच्या लबाडीच्या कारकीर्दीचे पर्यवसान चोरी किंवा तसाच दुसरा मोठा गुन्हा यांत होते, यांत शंका नाहीं. दक्षिण आपल्या सर्व लोकांनां मत देण्यास उत्तेजन देईल, असा काल लवकरच येणार आहे, असे मला वाटतें. स्थानिक स्वराज्यांत अर्ध्या भागाला कांही हिस्सा न दिल्यामुळे किंवा त्याचा त्यांत कांहीं हितसंबंध न ठेविल्यामुळे, उत्पन्न होणाऱ्या राजकीय कोंडमाऱ्यापेक्षां सर्वानां सारखे हक्क देऊन सवीचे राजकीय जीवन निरोग व जोरदार करणें, हें प्रत्येक दृष्टीने फार फायद्याचे आहे, असें दक्षिणेला लवकरच कळून येईल.

साधारणपणे सर्वांनां मत देण्याचा सारखा हक्क असावा, असे माझे मत आहे. पण दक्षिणेंतील कांही संस्थानांमध्ये अशी कांहीं स्थिति आहे की, तेथे कांहीं कालपर्यंत शिक्षणाच्या अगर मालमत्तेच्या किंवा दोहोंच्या मिळून, लायकीशिवाय मत देण्याचा हक्क असू नये असें मला वाटतें. पण कोणत्याहि अटी ठेविल्या, तरी त्या दोन्ही ज्ञातीन सारख्या व योग्य न्यायानें लागू कराव्या, हें बरें.

प्रकरण पंधरावें.

वक्तृत्वांतील यशाचे रहस्य.

प्रदर्शनांतील दिवाणखान्यांत श्रोत्यांनां माझें भाषण कसें आवडले हें मी स्वतः सांगण्यापेक्षां सुप्रसिद्ध लष्करी बातमीदार मिस्तर क्रीलमन यांच्या शब्दांनीं सांगतों. मिस्तर क्रीलमन हे माझ्या भाषणाच्या वेळीं हजर होते व त्यांनीं 'न्यूयॉर्क वर्ल्ड'ला खालील हकीगत तारेनें पाठविली:-

"अटलांटा, १८ सप्तंबर, १८९५.

प्रेसिडेंट क्लीव्हलंड हे ग्रेगेबल्स येथे अटलांटाप्रदर्शन सुरू करावें ह्मणून तार देण्यास उभे असतां, गोऱ्या लोकांच्या श्रोतृवृंदापुढें एका नीग्रो मोझेसनें वक्तृत्वपूर्ण भाषण केलें. हें भाषण ह्मणजे दक्षिणेच्या इतिहासांतील पहिलाच प्रसंग होय. आणखी एक महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे जॉर्जिया व लुसियाना येथील नागरिकांसह नीग्रो टोकांची टोळी मिरवत गेली. या दोन गोष्टींच्या महत्त्वाबद्दल हल्ली गांवांत जिकडेतिकडे चर्चा सुरू आहे. न्यूयॉर्क येथील न्यूइंग्लंड सोसायटीपुढें झालेल्या हेनरी ग्रेडीच्या संस्मरणीय भाषणानंतर दक्षिणेंत या प्रदर्शनाइतकी उत्साहदर्शक महत्त्वाची दुसरी गोष्ट कोणतीहि घडलेली नाहीं.

टस्केजी येथील काळ्या लोकांच्या शाळेचे प्रिन्सिपाल प्रोफेसर बुकर. टी. वाशिंग्टन दिवाणखान्यांतील प्लॅटफॉर्मवर उभे राहिले,तेव्हां त्या दिवाणखान्याच्या खिडक्यांतून आंत शिरू पाहणारीं संध्याकाळच्या समयाच्या झकझकीत सूर्याचीं कोमल किरणें श्रोत्यांच्या मस्तकांवरून त्यांच्या मुखकमलावर चमकू लागलीं, आणि त्यायोगे यांच्या चर्येवर एक प्रकारचें दिव्यतेज झळकूं लागलें. त्यासमयीं हेनरी ग्रेडीच्या जाग्यावर त्यांच्यानंतर आलेले क्लार्क हॉवेल हे मला ह्मणाले, या मनुष्याचें भाषण ह्मणजे अमेरिकेंतील नैतिक क्रांतीचा प्रारंभ होय !

आत्मोद्धार.

गोऱ्या स्त्रीपुरुषांच्या श्रोतृसमुदायापुढें दक्षिणेंत कोणत्याहि महत्त्वाच्या प्रसगी एकाद्या नीग्रोनें भाषण केल्याची ही पहिलीच वेळ होय. या भाषणानें श्रोतृसमूह चकित होऊन गेला, आणि सर्वांनी मोठ्या जोरानें आपला आनंद प्रदर्शित केला.

मिसेस टॉमसन या बाईचे भाषण संपतांच सर्वांचे लक्ष्य,प्लॅटफॉर्मवर पहिल्या रांगेत बसलेल्या एका उंच, कपिल वर्णाच्या नीग्रोकडे गेलें. हे नीग्रो ह्मटले ह्मणजे टस्केजी येथील संस्थेचे मुख्य पुरुष बुकर टी. वॉशिंग्टन होत. या वेळेपासून अमेरिकेत नीग्रोजातीमध्ये हे अग्रगण्य आहेत, असें मानिलें पाहिजे. या सुप्रसंगीं बँडवर निरनिराळ्या राष्ट्रीय गीतांचे मधुर गान चाललें होतें, आणि तेणेंकरून लोकांच गलबला कमी झालेला होता.

हजारों लोकांचे नेत्र त्या नीग्रो वक्त्याकडे एकसारखे लागून राहिले. कारण, एक अपूर्व गोष्ट घडून यावयाची होती. ती ही, कीं, एक काळा मनुष्य आपल्या लोकांच्या हितासाठीं निर्भीडपणें भाषण करणार होता. तो मनुष्य ह्मटला ह्मणजे प्रोफेसर वॉशिंग्टन होय. हे प्रोफेसरसाहेब जेव्हां प्लॅटफॉर्मच्या कडेनें प्लॅटफॉर्मवर भाषण करण्यासाठीं येऊं लागले, तेव्हां खिडक्यांतून प्रविष्ट होणारे, अस्ताचलाला जाणाऱ्या सूर्याचे आरक्त किरण त्यांच्या तोंडावर चमकूं लागले, आणि त्यावेळीं लोकांनी टाळ्यांच्या गजरानें त्यांचें स्वागत केलें. आपल्या डोळ्यांवरील किरणांचा ताप चुकविण्यासाठीं त्यांनीं आपलें तोंड थोडें बाजूला वळविले आणि ते प्लॅटफॉर्मवर जरासे इकडेतिकडे फिरूं लागले; व नुकतेच अस्ताचलावर विराजमान झालेल्या सूर्याकडेच एकसारखी नजा रोखून त्यांनीं आपल्या भाषणाला सुरुवात केली.

त्यांच्या देहाची ठेवण विलक्षण होती. उंच, सडपातळ व सिऑक्स सरदाराप्रमाणें ताठ; विशाल भाळ, सरळ नासिका, रुंद मुखवटा, निश्चयी चेहरा, पांढरेशुभ्र मोठे दांत, पाणिदार डोळे आणि भव्य आकृति असे ते होते. त्यांच्या तांबूस मानेवरील शिरा दिसत होत्या.

पेन्सिल मुठींत घट्ट दावून धरलेला आपला पिळदार बाहु त्यांनीं वर उभारला होता. आपले भरभक्कम जोरदार पाय टांचेला टांच लावून, पण पायाचे चवडे अलग ठेवून ते प्लॅटफॉर्मवर रोवल्यासारखे उभे राहिले होते. त्यांचा आवाज जोरदार आणि खणखणीत होता. ते प्रत्येक मुद्दा श्रोत्यांच्या मनांवर बिंबवून नंतर पुढे भाषण करीत. त्यांचें भाषण सुरू झाल्यापासून दहा मिनिटांच्या आंत श्रोतृगणांत उत्साहाचें वारें शिरलें-हातरुमाल जिकडेतिकडे हालू लागले, काठ्यांची हालवा-हालव आनंदभरांत सुरू झाली, आणि टोप्या वर उडूं लागल्या; जॉर्जियाच्या सुंदर स्त्रिया उभ्या राहून आनंदानें टाळ्या पिटूं लागल्या; जणूं काय वक्त्यानें त्यांनां भारूनच टाकिलें होतें! वक्त्यानें आपल्या हाताची बोटें पसरून आपला काळसर हात डोक्याच्या वर उंच धरिला आणि आपल्या ज्ञातीच्या वतीनें दक्षिणेंतील गोऱ्या लोकांनां उद्देशून ते ह्मणाले ' निव्वळ सामाजिक बाबतींत आह्मीं बोटांप्रमाणें पृथक् पृथक् असावें; पण परस्परांच्या प्रगतीला अवश्य असलेल्या सर्व बाबतींत आह्मीं हाताप्रमाणें एक असलें पाहिजे, 'त्यावेळीं त्यांचे हे शब्द चोहोंकडे जाऊन आदळतांच श्रोतृगण उभा राहून आनंदानें वेडावून जाऊन एक-सारख्या टाळ्या पिटूं लागला! तत्काळ मला हेनरी ग्रेडीनें डेलमॉनिकोच्या दिवाणखान्यांत तंबाखूच्या धुरांत उभे राहून 'मी राउंडहेड्समध्ये कॅव्हे-लीयर आहे,' असें ह्यटलेल्या प्रसंगाची आठवण झाली.

मीं पुष्कळ देशच्या वक्त्यांचीं भाषणें ऐकिलीं आहेत; पण या नीग्रो वक्त्यानें सूर्याच्या आरक्त किरणांत उभे राहून आपल्या ज्ञातीला दास्यांत ठेवण्याकरितां लढलेल्या लोकांच्या समुदायांत, जसें आपल्या पक्षाचें पूर्ण कौशल्यानें समर्थन करून भाषण केलें, तसें ग्लॅडस्टनला देखील करितां आलें नसतें ! लोकांच्या आनंदाच्या गर्जना कितीहि झाल्या तरी त्यांच्या उत्सुक चेहऱ्यावरील छटा यत्किंचिन्हि बदलली नाहीं.

तेथेंच बाजूला जमिनीवर बसलेला एक दांडगट काळा गरीब नीग्रो लोकांच्या आनंदाच्या उकळ्या फुटेतोंपर्यंत वक्त्याच्या तोंडाकडे एक—--

–सारखा पहात होता, आणि शेवटीं वक्त्याच्या भाषणाच्या परिणामाने त्याच्या डोळ्यांतून अश्रु येऊ लागले. त्यावेळीं श्रोतृसमुदायांतील बहुतेक नीग्रोलोकांचीहि गत तीच झाली.

वक्त्याचे भाषण संपतांच गव्हरनर बुलक प्लॅटफॉर्मकडे धांवले आणि त्यांनी वक्त्याचा हात धरिला. त्यासरशीं लोकांच्या पुनः टाळ्या झाल्य मग कांही वेळ ते दोघेहि हातांत हात घालून समोरासमोर उभे राहिलेले दिसले. "

अटलांटा येथे माझें भाषण झाल्यावर पुढें टस्केजी संस्थेचे जरूरीचे काम करून फुरसत मिळाल्यावेळीं लोकांकडून आलेल्या कांहीं आमंत्रणांचा मी स्वीकार केला. विशेषतः टस्केजी संस्थेला मदत मिळेल अशा ठिकाणीच जाऊन भाषण करण्याचें मी कबूल करीत असें. माझ्या आयुष्यांतील मुख्य कामाविषयीं आणि माझ्या ज्ञातींतील लोकांच्या गरजांविषयीं बोलण्याला मला पूर्ण मुभा असावी, असें मी आधींच ठरवून घेत असें. धंद्याच्या दृष्टीनें किंवा केवळ फायद्यासाठींच मी भाषण करणार नाहीं, असे मी लोकांनां बजावून सांगत असें.

सार्वजनिक प्लॅटफॉर्मवरील माझीं भाषणें ऐकण्यास लोक कां येतात याचें कोडें अद्याप मला समजलें नाहीं; आणि हा प्रश्न मी नेहम स्वतःला करीत असतों; पण हा मला केव्हांच सुटत नाहीं. माझ्य व्याख्यानाच्या जागीं पुष्कळ स्त्रीपुरुषांनां जात असतांना, रस्त्यावर उभे राहून पाहिलें, ह्मणजे मी या सर्वांचा एक मौल्यवान् तास खर्च् करण्यास कारणीभूत झालों, असा विचार माझ्या मनांत येऊन मला लाज वाटू लागते. कांहीं वर्षापूर्वी माडिसन येथें एका साहित्यसंस्थेसमो माझें भाषण होणार होतें. त्यापूर्वी एक तास, एक मोठें जोराचे बर्फयुक्त तुफान झालें, आणि बरेच तास तें जोरांत होतें. माझें भाषण ऐकण्यास कोणी जमणार नाहींत, आणि मला बोलावें लागणार नाही. असें मला वाटलें. तथापिं कर्तव्य ह्मणून मी चर्चमध्ये गेलों, तो तेथे—-

—लोकांची अतिशय गर्दी झाली आहे, असें मला दिसून आलें. हा समुदाय पाहून माझ्या मनाला जी एक धास्ती वाटली, तिचा जोर त्या सबंध दिवसांत कमी झाला नाहीं !

भाषण करण्यापूर्वी माझी घाबरगुंडी उडते काय, असे लोक मला नेहमीं विचारतात; किंवा अनेकदां भाषण करण्याचा प्रसंग आल्यामुळे मला संवय झाली असेल, असेंहि ते ह्मणतात. या प्रश्नाचे उत्तर मी असें देतों, की, भाषण करण्यापूर्वी मी नेहमीं फार घाबरतों. बरेचदां महत्त्वाचे भाषण करण्यापूर्वी मी इतका त्रस्त झालों आहे, की, पुनः लोकांसमोर भाषण ह्मणून करावयाचे नाहीं, असा कैकवेळां मला निश्चय करावा लागलेला आहे. भाषणाच्यापूर्वी मी घाबरतों, इतकेंच नव्हे, तर भाषण झाल्यावर, एकादी अत्यंत महत्त्वाची अगर मुद्याची गोष्ट सांगण्यास मी कदाचित् विसरलों असेन, असें वाटून मला कित्येकदां दुःखहि होते.

पण माझ्या भाषणाच्या पूर्वी उत्पन्न होणाऱ्या भीतीची भरपाई मला पुढें चांगली मिळते. दहा मिनिटें मी बोलूं लागल्यावर श्रोतृगण माझ्या ताब्यांत येत चालला आहे, व त्यांचें माझें पूर्ण ऐक्य होत चाललें आहे, असें मला वाटूं लागतें. एकादा मोठा श्रोतृसमाज आपल्या पूर्ण कह्यांत येत चालला आहे, हे पाहून व्याख्यात्याला जितका शारीरिक व मानसिक आनंद होतो, तितका दुसऱ्या कोणत्याहि प्रयत्नानें होत नसेल, असें मला वाटतें. पूर्ण सहानुभूति व ऐक्य यांचा धागा व्याख्याता आणि श्रोतृगण यांनां जोडून टाकितो आणि हा धागा एकाद्या दृश्य व मूर्त वस्तुप्रमाणें बळकट असतो. हजारों लोकांमध्ये जर एकादा कोणी उत्साहशून्य, साशंक, दोषदर्शी असला, किंवा माझ्या विचारांशी त्याची पूर्ण सहानुभूति नसली, तर मी त्याला सहज शोधून काढितों, आणि त्याच्याकडे मी एकदम वळतों त्यानंतर तो कसा विरघळत जातो हे पाहणें मोठें मौजेचें असतें. अशा मनुष्यावर झटकन् लागू पडणारें रामबाण औषध झटलें ह्मणजे एकादी—-

आत्मोद्धार.

—लहानशी चटकदार गोष्ट सांगणे, हेच होय. पण निव्वळ गोष्टी सांगण्या करितांच मी केव्हांहि गोष्ट सांगत नाहीं. हा प्रकार (फक्त गोष्टीच सांगणे) वायफळ व पोकळ आहे, असे मला वाटतें, आणि लवकरच खरा प्रकार श्रोत्यांच्या नजरेला आल्याशिवाय रहात नाही.

जेव्हां फक्त कांहीतरी बोलावें ह्मणून जो कोणी भाषण करितो तेव्हां तो स्वतःचा आणि श्रोत्यांचा गुन्हा करितो, असे मला वाटते. लोकांनां कांहीं संदेश सांगितला पाहिजे अशी आपल्या अंतःकरणार पुरी खात्री पटल्याशिवाय कोणीहि भाषण करूं नये, असे माझे मत आहे. आपल्या शब्दांनी एकाद्या व्यक्तीला अगर कार्याला कांही मदत होईल असें कोणाला पूर्णाशानें वाटत असल्यास त्यानें भाषण करावे आणि अशा तऱ्हेचे भाषण करितांना वक्तृत्वाचे कृत्रिम नियम कांहीं उपयोगी पडतील असे मला वाटत नाहीं. विसांवा, श्वासोश्वास, स्वर चढविणें इत्यादि गोष्टी जरी महत्त्वाच्या आहेत, तरी भाषणांतील 'राम' (मर्म अथवा गुह्य) या गोष्टींनीं साधणार नाहीं. मला जेव्हां भाषण करावयाचे असते, तेव्हां इंग्रजी भाषेचे नियम, अलंकारशास्त्राचे नियम हें सर्व कांहीं मी विसरतों, आणि श्रोत्यांनींहि हें सर्व विसरून जावे हें मला इष्ट वाटतें.

मो भाषण करीत असतां मध्येंच कोणी उठून खोलीतून बाहेर गेल्यास माझ्या मनाची समता एकदम बिघडून जाते; पण असें होउं नये ह्मणून साधारणपणे माझें भाषण होतांहोईलतों चित्ताकर्षक करण्याचा आणि मध्येच कोणी उठून जाऊं नये ह्मणून एकामागून एक चांगल्या गोष्टी -उत्तम विचार श्रोत्यांनां सांगण्याचा मी निश्चय करितो. साधारण श्रोत्यांनां सामान्य तत्त्वें किंवा उपदेश यांपेक्षां गोष्टीच अधिक आवडतात, असें मला आढळून आलें आहे. सर्व गोष्टी श्रोत्यांपुढें योय रीतीनें मांडिल्या असतां त्यांपैकी बहुतेकांनां त्यांवरून योग्य अनुमान काढितां येतें, असे मला वाटतें.

वक्तृत्वांतील यशाचें रहस्य-

कोणत्या श्रोत्यांपुढे भाषण करणें मला अधिक आवडतें असें विचारल्यास, बोस्टन, न्यूयॉर्क, शिकागो, बुफालो येथील हुशार, मजबूत, व्यवहारचतुर व्यापाऱ्यांचा, श्रोत्यांत पहिला नंबर लागेल. यांच्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्याहि लोकांना कोणतीहि गोष्ट इतक्या लवकर समजत नाहीं, आणि त्यांच्याकडून इतक्या लवकर प्रत्युत्तर मिळत नाहीं. गेल्या कांहीं वर्षांमध्यें युनायटेड स्टेट्समधील मोठ्या शहरांत अशा लोकांच्या मुख्यमुख्य संस्थेसमोर भाषण करण्याचा सुयोग मला प्राप्त झाला आहे. अशा व्यवहारचतुर व्यापाऱ्यांच्या मुख्य संस्थांनां पकडण्याची आपल्या कह्यांत ठेवण्याची उत्तम वेळ ह्मटली ह्मणजे एकाद्या चांगल्या मेजवानीनंतरचाच समय होय. तथापि मला असें वाटतें, की, वेदनेचे किंवा यातनेचे सर्वात वाईट यंत्र किंवा साधन ह्मणजे चवदा कोर्सचे (पक्वानांचे) भोजन आटोपेपर्यंत वक्त्याला वाट पहात बसण्याची, आणि हा सर्व वेळ आपलें भाषण ऑफस् होऊन श्रोत्यांची निराशा होणार असा विचार करीत बसविण्याची चाल होय.

या मोठ्या मेजवानींत मी क्वचित् च सामील होतों. कारण, या मेजवान्या पाहून माझ्या बाळपणांतील, आठवड्यांतून एकदा मळ्यांत काकवी खाण्याच्या प्रसंगाची मला आठवण होते. पूर्वी मळ्यांत आमचे नेहमींचे अन्न बाजरीची भाकर व डुकराचे मांस हें असे; पण तीन मुलांकरितां माझ्या आईला रविवारी सकाळीं धन्याच्या मोठ्या घरांतून थोडीशी काकवी मिळे, आणि ही काकवी मिळाली ह्मणजे प्रत्येक दिवस रविवारच असता तर किती बरें झालें असतें, असें मला वाटे. माझें कथलाचे ताट मी काकवीसाठी वर धरून डोळे मिटून बसत असें. नंतर डोळे उघडून इतकी पुष्कळ काकवी मला मिळाली आहे, हे पाहून मला मोठा आनंद होई. ताट इकडून तिकडे हालवून काकवी सर्व ताटभर पसरविल्यावर मला असे वाटे, कीं, काकवी बरीच वाढलेली आहे, व ती बराच वेळ पुरेल ! माझ्या बालपणीच्या रविवारच्या त्या मेजवानीचे संस्कार इतके प्रबल आहेत, की, ताटभर पसरलेली काकवी—-

–ताटाच्या एका कोनाला अगर बाजूला घातलेल्या काकवीपेक्षां अधिक नाहीं, अशी कोणाच्यानेंहि माझी खात्री करविली नसती ! काकवी किंवा सरबत ताटाच्या कोपऱ्यांत घालितां किंवा ठेवितां येईल, असे मला वाटत नाहीं. माझ्या वांट्याला काकवीचे दोन मोठे चमचे येत असता आणि माझ्या भाषणाच्या पूर्वीच्या चवदा पक्वान्नांच्या मेजवानीपेक्ष हे दोन चमचे मला अधिक गोड वाटत होते !

व्यवहारचतुर मंडळीच्यानंतर दक्षिणेतील दोन्ही ज्ञातींच्या लोकांपुढे मिळून किंवा पृथक् पृथक् भाषण करणें मला आवडतें. त्यांचा उत्साह आणि त्यांचे प्रत्युत्तर पाहून मला नेहमी आनंद होतो. काळ्य लोकांच्या 'तथास्तु' व 'हेंच सत्य' या शब्दांनीं कोणत्याहि वक्त्याल उत्तेजन येईलच. यानंतर कॉलेजांतील तरुण मंडळीपुढें भाषण करणे मला आवडेल. हारवर्ड, येल, वुइल्यम्स, ॲमहर्स्ट, पेनसिलव्हॅनिया मिचिगान येथील युनिव्हर्सिट्यांत व नॉर्थ कॅरोलिना येथील ट्रिनिट कॉलेजांत व आणखी अशाच कांहीं प्रमुख ठिकाणीं भाषण करण्याच मला सुयोग प्राप्त झाला आहे.

माझें भाषण झाल्यावर पुष्कळ लोक माझ्यापाशीं येऊन शेकह्यांड करितात आणि ह्मणतात, कीं, "एकाद्या नीग्रोला 'मिस्तर' असे ह्मणण्याची ही पहिलीच खेप आहे ! " हा प्रकार पाहून मला मोठी मौज वाटते.

टस्केजीसंस्थेच्या हितार्थ भाषण करावयाचे झालें, ह्मणजे मी अगोदर मुख्यमुख्य ठिकाणीं सभा भरविण्याची व्यवस्था करून ठेवितो. याप्रसंगी मला देवालयें, रविवारच्या शाळा, ख्रिश्चन एंडेव्हर सोसायटी, स्त्रीपुरुषांचे निरनिराळे क्लब, इत्यादि ठिकाणीं जावें लागतें, आणि केव्हां केव्हां केव्हां एका दिवसांत चार निरनिराळ्या संस्थांसमोर भाषण करण्या मला प्रसंग येतो.

तीन वर्षापूर्वी, मिस्तर मारिस के. जेसप व डॉक्टर जे. एल. एम. करी या दोन सद्गृहस्थांच्या सूचनेवरून जॉन. एफ. स्लेटर फंडाच्या—--

पंचांनीं पूर्वी गुलामगिरीची कैंद्रे असलेल्या मोठमोठ्या शहरी सभा भरविण्यासाठीं माझा व मिसेस वॉशिंग्टनचा खर्च भागावा ह्मणून कांहीं रक्कम मंजूर केली. गेल्या तीन वर्षातील प्रत्येक वर्षाचे कांहीं आठवडे आम्हीं या कामी खर्च केले आहेत. आमचा असा बेत ठरलेला असे, की, सकाळीं धर्मोपदेशक, शिक्षक आणि धंदेवाले यांच्यासमोर मींऐऐ भाषण करावें; दुपारी बायकांनां मिसेस वाशिंग्टननीं चार शब्द सांगावे, आणि संध्याकाळीं मीं सर्व लोकांनां जमवून मोठी सभा भरवून व्याख्यान द्यावें. काळे लोकच या सभांनां येत असत, एवढेच नव्हे, पण गोरे लोकहि हजर रहात. उदाहरणार्थ, चटनुगा येथील सभेत तीन हजार लोकांमध्यें सुमारें आठशें लोक गोरे असावेत. हें सभांचें काम मला फारच आवडलें व यापासून बरेंच हित झालेलें आहे.

या सभांमुळे आह्मांला, लोकांनां त्यांच्या घरीं, देवालयांत, -रविवारच्या शाळांत, काम करण्याच्या जागीं, तुरुंगांत आणि इतर गुन्ह्यांच्या ठिकाणीं भेटण्याची संधि मिळाल्यामुळे त्यांची खरीखुरी - प्रत्यक्ष रहाणी आमच्या नजरेला आली आहे. या सभांमुळे दोन्ही ज्ञातींचा परस्परांशीं असणारा संबंधहि आह्मांला चांगला कळून आला आहे. अशा सभांत काम केल्यानंतर आमच्या ज्ञातीच्या उन्नतीबद्दलची माझी आशा दुणावते. अशा प्रसंगीं बराच वरपांगी आणि भ्रामक भाग दृष्टोत्पत्तीला येतो खरा, पण अशा भपक्यानें भुलून न जाण्याइतका अनुभव मला आलेला आहे. शिवाय, वस्तुस्थितीच्या मुळाशीं जाऊन खरीखुरी माहिती काढण्याचा मीं बराच प्रयत्न केलेला आहे.

आपण काय बोलतों याचें ज्ञान आपणाला आहे, अशी शेखी मिरविण्याऱ्या एका गृहस्थानें असे उद्गार काढतांना मीं ऐकिलें आहे, की

-"सबंध नीग्रोज्ञात पहातां तीपैकीं शेंकडा ९० स्त्रिया सदाचरणी—-

–नसतात." एका सबंध ज्ञातीसंबंधानें असे नीच, खोटें किंवा पुराव्यानें सिद्ध करितां न येण्याजोगे दुसरे कोणतेंहि विधान आढळणार नाही !

नीग्रो ज्ञात हळुहळू, सांपत्तिक स्थितीत, शिक्षणांत आणि नीतिमत्तेत एकसारखी पुढे पुढें खात्रीनें जात आहे, अशी दक्षिणभागच्या मध्यभागी माझ्याप्रमाणें, त्या ज्ञातीशीं बीस वर्षे संबंध असलेल्या दुसऱ्या कोणाचीहि खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. न्यूयॉर्कमधील सर्वात खालच्या दर्ज्याच्या लोकांची रहाणी घेऊन एकाद्याला गोऱ्या लोकांविरुद्ध पाहिजे तें सिद्ध करून दाखवितां येईल; पण ही खरी पारख नव्हे, असें कोणीहि समंजस मनुष्य कबूल करील.

बोस्टनमध्ये रॉबर्ट गोल्ड शॉ यांच्या स्मारकाच्या प्रसंगी मीं भाषण करावें, असें आमंत्रणादाखलचें पत्र मला सन १८९७ सालच्या आरंभीं एके दिवशीं आलें. मीं हें आमंत्रण स्वीकारिलें. रॉबर्ट गोल्ड शॉ हे कोण होते आणि यांनीं काय कामगिरी केली, हें येथे सांगण्याची जरूरी आहे असे मला वाटत नाहीं. यांचे स्मारक, बोस्टन कॉमनच्या तोंडापाशीं स्टेट हाउसच्या समोर आहे. हें स्मारक (पुतळा) ह्मणजे देशांत सर्वोत्कृष्ट कलाकुसरीचे काम आहे, असे समजण्यांत येतें.

हें स्मारक उघडण्याचा समारंभ बोस्टन येथे म्युझिक हॉलमध्ये मोठ्या थाटानें झाला. सर्व दिवाणखाना खालींवर श्रेष्ठ दर्ज्याच्या श्रोत्यांनी गच्च भरून गेला. श्रोतृमंडळांत पूर्वी गुलामगिरीच्या विरुद्ध असणारे बरेच लोक होते. परलोकवासी ऑनरेबल रोजर वोलकॉट मॅसॅच्युसेटसचे गव्हरनर, हे अध्यक्षस्थानीं होते, आणि त्यांच्याबरोबर प्लॅटफॉर्मावर दुसरे बरेच कामगार लोक आणि इतर बडीबडी मंडळी होती. माझ्या शब्दांपेक्ष बोस्टन 'ट्रन्सक्रिप्ट' पत्रांत आलेल्या मजकुरानें याविषयीं हकीगत अधिक चांगली कळेलः -

"म्युझिक हॉलमध्यें विश्वबंधुत्वाच्या सन्मानार्थ काल दुपारीं भरलेल्या सभेचा मुख्य भाग ह्मटला ह्मणजे टस्केजी संस्थेचे अध्यक्ष यांच उत्तम भाषण होय. गव्हर्नर वोलकॉट ह्मणाले, बुकर. टी. वॉशिंग्टन–

—यांनां हारवर्ड युनिव्हर्सिटीची ए. एम्. पदवी गेल्या जूनमध्ये मिळाली, | आणि या देशांतील सर्वात जुन्या विश्वविद्यालयाकडून आपल्या ज्ञातीच्या नेतृत्वाबद्दल सन्माननीय पदवी मिळालेले नीग्रो ज्ञातीतील हे पहिलेच ना गृहस्थ होत. जेव्हां मिस्तर वॉशिंग्टन, बावट्यांनी गजबजलेल्या म्युझिक हॉलच्या तेजोमय वातावरणांत उभे राहिले, तेव्हां मॅसॅच्युसेटसच्या लोकांच्या गुलामगिरी बंद करण्याच्या कामाचे ते मूर्तस्वरूपच दिसूं लागले. त्यांच्या अंगीं मॅसॅच्युसेटसची जुनी आणि अचल श्रद्धा व्यक्त होत होती. त्यांच्या जोरदार विचारांत आणि उज्ज्वल भाषणांत पूर्व-कालीन घनघोर युद्धाचे वैभव दिसून आले. सर्व देखावा ऐतिहासिक सौंदर्यानें भरलेला व अतिशय महत्त्वाचा होता. निरुत्साही बोस्टन आपल्या अंतःकरणांतील सत्य आणि नेकी यांच्या अग्नीनें-तेजानें पेटून गेलें होतें. कोणत्याहि सार्वजनिक प्रसंगी दृष्टीला न पडणारे असे लोकांचे थवेच्या थवे, सणाच्या दिवशीं घर सोडून गांवाबाहेर जाणारी अनेक कुटुंबें, यांनीं हा हॉल गच्च भरून गेला होता. शहराला ललामभूत झालेले शेकडों नेत्रीपुरुष सजून आल्यामुळे शहरच जणू काय आपला जन्ममहोत्सव करीत आहे असें दिसलें.

लष्करी गाण्यानें सर्व प्रदेश भरून राहिला होता. कर्नल शॉ यांचे नी मित्र व कामगार, शिल्पकार, सेंट गॉडन्स, स्मारक कमिटी, गव्हरनर व त्याचे सल्लागार आणि मॅसॅच्युसेटसच्या चौपन्नाव्या पलटणीचे पलटणीचे नीग्रो शिपाई, इत्यादि मंडळी दिवाणखान्यांत येऊन प्लॅटफॉर्मवर चढूं लागतांच प्रचंड जयघोष आणि टाळ्यांचा गजर सुरू झाला. गव्हरनर अॅन्ड्र्यूच्या जुन्या सल्लागार मंडळींतील त कर्नल हेनरी ली यांनीं कमिटीच्या वतीनें भाषण केलें, आणि त्यांच्या पूर्वी काम करीत असलेले जॉन. एम. फॉर्ब्स यांची त्यांनीं फार स्तुति या केली. गव्हरनर वोलकॉट यांनीं एक छोटेसें पण संस्मरणीय भाषण केलें आणि असें सांगितलें, कीं, "वॉगनर किल्याच्या प्रसंगापासून या ज्ञातीच्या इतिहासांत नवीन शक सुरू होतो, आणि या ज्ञातीचे

शैशव नुकतेच संपून तारुण्य सुरू झाले आहे. बोस्टन विजयस्तंभ मेयर क्केन्सीला मिळाला. कर्नल शा आणि त्याच्या काळ्या पलटणीची कृत्ये मोठ्या दिलदार शब्दांत सांगण्यांत आली,

Mine eyes have seen the glory of the coming of the Lord,"

हें गाणे ह्मणून झाल्यावर बुकर वॉशिंग्टन अगदी योग्य समयाला भाषण करावयाला उठले. लोकांची शांतवृत्ति बदलून ते आवेशाने हलू लागले. त्यावेळी सर्व लोक त्यांचा जयघोष करण्यास आणि त्यांना धन्यवाद देण्यास बारा वेळां एकदम उठले. जेव्हां हा सुशिक्षित, खणखणीत आवाजाचा बोलू लागला, आणि जेव्हां त्यानें स्टर्न्स आणि ॲन्ड्यू यांची नांवें घेतली तेव्हां लोकांच्या उत्साहाचा पारा वर चढत चालला. सोल्जरांच्या आणि नागरिकांच्या नेत्रांतून अश्न चमकू लागले.वक्ते प्लॅटफॉर्मवरील काळ्या शिपायांकडे, विशेषतः जखमी झालेल्या वेळीहि ज्यानें बावटा खालीं न करितां आनंदानें वर धरिला त्या निशाणवाल्याकडे वळले आणि ह्मणाले " चौपनाव्या पलटणींतील बाकी उरलेल्या शूर शिपायांनों ! तुझीं मोकळ्या अस्तनीने आणि मोडक्या पायानें येथे येऊन आजचा प्रसंग साजरा केला आहे. अशा तुह्मांला तुमचा सेनापति मेलेला नाहीं असें मी सांगतों. आता बोस्टन शहरानें जरी त्यांचें स्मारक उभारिलें नाहीं, आणि इतिहासाने जरी त्यांचा उल्लेख केला नाहीं, तरी तुह्मांमध्ये आणि तुह्मी ज्या ज्ञातीचे प्रतिनिधि आहांत अशा इमानी जातीमध्ये तुमचे सेनापती रार्बट गोल्ड शॉ यांचें अक्षय्य स्मारक झालें असतें !" असे वक्त्याचे उद्‌गार निघाल्यावेळीं उत्साहाचा अगदीं कडेलोट झाला. लोकांच्या सहानुभूतीचे प्रतिनिधि आणि मुख्य अधिकारी ह्मणजे मॅसॅच्युसेटम गव्हरनर रोजर वोलकॉट हे एकदम उठले आणि मोठ्याने ओरडले बुकर टी. वॉशिंग्टन यांचा त्रिवार जयजयकार असो .

प्लॅटफार्मवर बसलेल्या मंडळींत फोर्ट वागनर येथें अमेरिकेचें निशाण धरणारे न्यू बेडफर्ड (मॅसॅच्युसेटस) चे काळे आफिसर, सार्जट वुइल्यम कारने हे बसलेले होते. आपल्या फलटणीतील बरेच लोक मारले गेल्यावर त्यांनी आपली सुटका करून घेतली आणि लढाई संपल्यावर ते ह्मणाले. "अमेरिकेचा जुना बावटा जमीनीला केव्हांहिं लागला नाहीं!"

हातांत हा बावटा धरून सार्जेंट कारनें प्लॅटफॉर्मावर बसले होते; आणि मी जेव्हां काळ्या फलटणींतील शेष राहिलेल्या मंडळीस उद्देशून बोललों आणि सार्जेंट कारने यांचा उल्लेख केला, तेव्हां ते स्वाभाविकपणें उठले आणि त्यांनीं आपल्या हातांतील बावटा वर केला. माझ्या सार्वजनिक भाषणांत श्रोत्याच्या चित्तवृत्तीचें समाधानकारक व उत्तेजक असें आविष्करण पुष्कळदां पाहण्याचा मला सुयोग आला आहे; पण या खेपेला जो कांहीं देखावा दृष्टीला पडला, तसा मीं पूर्वी कधींहि पाहिला नाहीं व अनुभविलाहि नाहीं. पुष्कळ मिनिटें सर्व श्रोते आनंदातिशयानें अनावर झालेले दिसले.

स्पॅनिश-अमेरिकन युद्ध आटोपल्यावर सर्व देशभर आनंदोत्सव सुरू झाले, आणि मोठमोठ्या शहरांत तहाप्रीत्यर्थ समारंभ होऊं लागले. शिकागो युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट वुइल्यम आर. हारपर यांनां तेथील उत्सव कमिटीचे चेअरमन निवडण्यांत आलें. त्यांनी या समारंभांत मला एक व्याख्यान द्यावयाला सांगितलें. मीं या आमंत्रणाचा स्वीकार केला, आणि त्या जुबिलीच्या (आनंदोत्सवाच्या) आठवड्यांत दोन व्याख्यानें दिलीं. त्यांपैकीं माझें पहिले व मुख्य भाषण १६ आक्टोबर, रविवारी संध्याकाळीं सभामंदिरांत झालें, व यावेळेइतका श्रोतृसमूह पूर्वी या देशांतील कोणत्याहि भागांत माझें भाषण ऐकण्यास जमला नव्हता. शहराच्या दुसऱ्या भागांतहि त्याचदिवशीं दोन प्रचंड श्रोतृसमुदायासमोर मी व्याख्यानें दिलीं.

त्यावेळीं सभामंदिरांत सुमारें सोळा हजार लोक जमले असावेत, असें 'ह्मणतात; आणि बाहेरहि तितकेच लोक आंत शिरण्याकरितां खटपट—---

—करीत होते, असें मला दिसले. त्या समयास पोलीसच्या मदतीशिवाय प्रवेशद्वारापर्यंत जाणें अगदी अशक्य झालें होतें. प्रेसिडेंट वुइल्यम मॅकिनले, त्यांचें मंत्रिमंडळ, परराष्ट्राचे बरेच प्रतिनिधि, नुकत्याच संपलेल्या युद्धांत नांवलौकिक संपादन केलेले बरेच लष्करी आणि आरमारावरील कामदार वगैरे लोक या सभेला हजर होते. माझ्याशिवाय रॅबी एमिल.जी. हर्श; फादर थॉमस पी. हाडनेट, आणि डॉक्टर जॉन एच्. बॅरोज आदिकरून वक्त्यांचींहि भाषणे त्या दिवशीं झाली.

या सभेविषयीं वर्णन देतांना, शिकागो 'टाइम्स हेरल्ड' या पत्रांत माझ्या भाषणाविषयीं खालीं दिलेला मजकूर आला.

" नाशापेक्षां नीग्रोला गुलामगिरीच पसंत आहे, असें त्यांनीं सांगितलें. काळ्या अमेरिकनांनीं दास्यांत रहावें आणि गोऱ्या अमेरिकनांनी मुक्त व्हावें ह्मणून राज्यक्रांतीच्या वेळीं क्रिसपस अटक्स यांनीं आपले प्राण खर्च केले, याची आठवण त्यांनीं दिली. न्यू आरलीन्स येथे जॅकसन बरोबर नीग्रो लोकांनीं कसें वर्तन केलें, याचा त्यांनीं अनुवाद केला. दक्षिणेंतील गोरे लोक गुलामगिरी कायम राखावी ह्मणून लढत असतां त्यांचीं कुटुंबें आणि त्यांची घरें इमानीपणानें आणि विश्वासानें नीग्रो गुलामांनीं कशीं राखिलीं, याचें त्यांनीं फार हृदयद्रावक चित्र रेखाटिलें. पोर्ट हडसन, फोर्ट वागनर व फोर्ट पिलो या ठिकाणीं काळ्या पलटणींनीं कशीं शूरपणाचीं कृत्यें केली, हें त्यांनीं सांगितले. शिवाय आपणांला आपल्या देशांत कायद्याच्या आणि रुढीच्या अन्यायानें कसें वागवितात हें सर्व विसरून क्यूबांतील लोकांनां स्वातंत्र्य देण्या-करितां एलकाने व सांशियागो या ठिकाणीं छापा घालतांना काळ्या फलटणींनीं दाखविलेल्या शौर्याची त्यांनीं फार स्तुति केली.

या सर्व गोष्टींत, आपल्या ज्ञातीनें योग्य तेंच केलें आहे असें वक्ते बोलले. नंतर आपल्या वक्तृत्वपूर्ण शब्दांनीं गोऱ्या अमेरिकनांच्या सदसद्विवेकबुद्धीला त्यांनीं अशी विनंति केली, कीं, स्पॅनिश--अमेरिकन—

–युद्धांतील नीग्रो लोकांचीं सर्व शूर कृत्यें जेव्हां तुह्मी ऐकाल, दक्षिणेंतील आणि उत्तरेतील शिपायांच्या तोंडांतून ही सर्व हकीगत ज्यावेळा तुमच्या कानावर पडेल, आणि गुलामगिरी बंद करणारे व पूर्वीचे धनी या दोघांकडून तुह्मांला हे सर्व जेव्हां समजेल, तेव्हां आपल्या देशाकरिती भरण्याला तयार असलेल्या ज्ञातीला आपल्या देशाकरितां जगू देण्याची योग्य संधि यावी किंवा नाहीं, याचा आपल्या अंतःकरणांत नीट विचार करा."

स्पॅनिश-अमेरिकन युद्धांत प्रेसिडेंटनीं नीग्रो लोकांच्या नेमणुकी करून त्यांनां जो मान दिला, त्याबद्दल मी माझ्या भाषणांत प्रेसिडेंटचे आभार मानिले. या माझ्या भाषणानें श्रोत्यांचा आनंद व हर्ष अतोनात वाढला. स्टेजच्या उजव्या बाजूला मुद्दाम राखून ठेविलेल्या जागेंत प्रेसिडेंट बसले होते. त्यांच्याविषयीं उल्लेख करतांना ते बसलेल्या जागेकडे वळून, त्यांनीं दाखविलेल्या औदार्याबद्दल मी त्यांचे आभार मानिले, तेव्हां सर्व श्रोतृगण उभा राहून जयघोष करूं लागला व हातरुमाल, टोप्या, छड्या वगैरे हालवू लागला. शेवटीं या मानाबद्दल प्रेसिडेंटनी आपल्या जाग्यावर उभे राहून प्रणाम केला. तेव्हां तर लोकांच्या उत्साहाला नवीन भर आला, आणि त्यांनीं या उत्साहाचें जें आविष्करण केलें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे !

शिकागो येथील माझ्या भाषणाच्या एका भागाबद्दल दक्षिणेतील कांहीं वर्तमानपत्रांचा बराच गैरसमज झाला, आणि ते त्याबद्दल प्रतिकूल टीका करूं लागले. ही टीका सतत कांहीं आठवडे चालली. शेवटीं या माझ्या भाषणाचा खरा अर्थ काय होता याविषयीं मी पत्र लिहून खुलासा करावा, अशी विनंति अलाबामा संस्थानांतील बरमिंगहॅम शहरच्या 'एज-हेरल्ड' वर्तमानपत्राच्या संपादकानें मला केली. मी त्याप्रमाणे पत्र लिहिले आणि त्यानें माझ्या टीकाकारांचें समाधान झालेंसें दिसले. मी माझ्या पत्रांत असें लिहिलें, की, "दक्षिणेतील श्रोतृसमुदायापुढें मी जें कांहीं सांगणार नाहीं, तें उत्तरेकडील श्रोत्यांपुढें कधींहि न सांगण्याचा—-

आत्मोद्धार,

मी नियम केला आहे. याहून फार लांबलचक खुलाशाची जरूर आहे असे मला वाटत नाहीं. दक्षिणेतील मध्यभागाच्या माझ्या सतरा वर्षांच्या कामगिरीने पुरेशी समजूत झालेली नाहीं, तर आतां शब्दांनी ती कितीशी होणार ! व्यावहारिक आणि नागरिक संबंधांत वर्णद्वेष बिलकूल नसावा, याबद्दल अटलांटा येथील भाषणांत सांगितलेली कारणें मी येथेहि सांगितली. सामाजिक बाबींच्या प्रश्नाबद्दल मी कधीहि चर्चा करीत नाही." याप्रमाणे लिहून या विषयावरील माझ्या अटलांटा भाषणांतील कांही उतारेहि मी माझ्या पत्रांत दिले.

सार्वजनिक संमेलनांत लोकांना भेटण्याचा प्रसंग येतो, तेव्हां एका जातीच्या व्यक्तीविषयी मला भीति वाटते. ही 'विक्षिप्त' व्यक्ति होय. मला तर यांची इतकी चांगली ओळख झाली आहे, कीं, लोकांनां कोपराने दूर सारून माझ्यापाशी येत असतां मी त्यांनां दुरून ओळखतों. साधारणपणे 'विक्षिप्त' व्यक्तीची दाढी लांब, अस्ताव्यस्त असते. तोंड लांबट अरुंद असते. आणि त्यांचा कोट काळा असतो. त्यांच्या कोटाचा व जाकिटाचा पुढचा भाग तेलकट व गुळगुळीत असतो, आणि त्यांची इजार गुडघ्यापाशी घोळ (सैल) असते.

शिकागो येथे माझें एक भाषण झाल्यावर अशी एक व्यक्ति मला भेटली. जगाची सर्व दुःखें नाहींशी करण्याचा तोडगा त्यांच्याजवळ असतो. शिकागोच्या या मनुष्याजवळ अशी एक पेटंट पद्धत होती, की, तिच्यायोगे मक्का तीनचार वर्षे सुरक्षित ठेवितां येतो, असें तो म्हणे. आणि दक्षिणेंतील सर्व नीग्रोंनी आपली पद्धत अमलांत आणिली, तर ज्ञातिविषयक सर्व प्रश्न सोडविल्याप्रमाणें होईल, असें त्याचें मत होतें. एक वर्ष पुरेल इतके धान्य पैदा करण्यास लोकांनां कसे शिकवावें हाच तूर्त आमचा प्रश्न आहे, असे मी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, तरी त्याचे समाधान होईना. शिकागोंती दुसऱ्या एका व्यक्तीचे, सार्वराष्ट्रीय पेढ्या बंद कराव्या असे प्रयत्न चालले होते. मी त्याला या कामीं सामील —-

—व्हावे असे त्याचे म्हणणे असून, सर्व ब्यांका बंद झाल्या तर नीग्रो लोक आपल्या पायांवर उभे राहतील, असेंहि तो म्हणत होता.

एकाद्याची वेळ व्यर्थ घालविण्यास बरेच लोक तयार असतात. एकदां बोस्टन येथे सायंकाळी माझें व्याख्यान झाले. दुसऱ्या दिवशी पहाटेला मला कोणी उठविलें आणि माझ्या हातांत एक चिठ्ठी देण्यांत आली. कांहीतरी महत्त्वाचे काम असेल असें समजून मी मोठ्या घाईनें पोषाख करून खालीं आलों, आणि पाहतों तों एक रिकामा गरीब बापडा माझी वाट पहात उभा आहे. तो शांतपणें म्हणाला " मी कालरात्री आपलें भाषण ऐकिलें व मला तें फार आवडलें. आतां आणखी कांही-तरी अधिक आपल्या तोंडून ऐकावें म्हणून मी येथें आलों आहे. "

संस्थेपासून इतकें दूर राहून सर्व देखरेख मला कशी ठेवितां येते, असे मला पुष्कळदां विचारण्यांत आलेलें आहे. याचें थोडक्यांत उत्तर असे देतों, कीं, "आपणा स्वतःला जें कांहीं करितां येतें तें दुसऱ्यांनां करावयाला लावू नका**,"** या म्हणीकडे मी दुर्लक्ष्य करावयाला शिकलों आहे. उलट माझी म्हण अशी आहे, की, "दुसरे जें कांहीं चांगलें करतील तें आपण स्वतः करूं नये **!"**

टस्केजी संस्थेसंबंधीं ही एक फार समाधानकारक व उत्तेजक गोष्ट आहे, कीं, तेथील व्यवस्था फार चोख व पूर्ण असल्यामुळे, कोणत्याहि का व्यक्तीच्या हजर राहण्यावर संस्थेचा रोजचा कार्यक्रम अवलंबून नाहीं. शिक्षक, कारकून वगैरे सर्व कार्यकारी मंडळीची संख्या तूर्त ८६ आहे. या सर्व मंडळीचीं कामें इतक्या उत्तम रीतीनें एकमेकांवर सोपवून दिलीं आहेत, की, शाळेचें काम घड्याळाप्रमाणें सुरेख चालतें. बहुतेक शिक्षकांनीं बरीच वर्षे शाळेत काढिलीं आहेत, आणि शाळेविषयी माझ्यासारखीच त्यांनां कळकळ वाटते. माझ्या गैरहाजिरींत संस्थेचे खजिनदार या नात्यानें सतरा वर्षे शाळेत काम केलेले सद्गृहस्थ मिस्टर वारन लोगन हे माझें काम पाहतात. त्यांनां मिसेस वाशिंग्टन लाणि माझे विश्वासु सेक्रेटरी मिस्टर एमेट जे. स्कॉट यांची चांगली—

–मदत मिळते. मिस्टर स्कॉट हे माझा सर्व पत्रव्यवहार पाहतात, आणि संस्थेविषयी व दक्षिणेतील आमच्या ज्ञातीविषयी विशेष माहिती मवा कळवितात. त्यांचा उद्योग, त्यांचें चातुर्य आणि काम करण्याची हातोट यांबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहे.

मी टस्केजी येथे असों किंवा नसों, संस्थेचे सर्व विधायक काम एक कार्यकारि मंडळावर सोंपवून दिलेले आहे. हें मंडळ आठवड्यांतून दोन वेळां जमतें, आणि या मंडळांत संस्थेच्या नऊ शाखांवरील नऊ प्रमुना गृहस्थ असतात. उदाहरणार्थ, पूर्वी सीनेटर असलेले मिस्टर ब्रुस यांच विधवा, लेडी प्रिन्सिपाल मिसेस बी. के. ब्रुस ही मंडळांतील एक सभासद आहे, आणि संस्थेतील सर्व मुलींचें हित हीच बाई पहात असते.या कार्यकारि मंडळाशिवाय दुसरी एक पैशाची देवघेव पहाणारी सहाजणांची कमिटी आहे. ही दर आठवड्याला एकदां भरते, आणि आठवड्यांत काय खर्च करावा हें ठरविते. महिन्यांतून एकदां, किंवा जरूर असेल तर अनेकदां, सर्व शिक्षकांची साधारण सभा भरले याशिवाय धार्मिक आणि शेतकीखात्यांतील शिक्षकांच्या पुष्कळ लहान लहान सभा नेहमीं होत असतात.

संस्थेच्या एकंदर कार्यक्रमाची सर्व माहिती मला असावी हमणून रिपोर्टांविषयीं अशी कांहीं व्यवस्था केलेली आहे, कीं, मी देशाच कोणत्याहि भागांत असों, माझ्यापाशी संस्थेची प्रत्येक दिवसाची हकीगत रोज येत असते. कोणत्या विद्यार्थ्यांनां रजा मिळालेली आहे, प्रकृतीच्या नादुरुस्तीमुळे, कीं, इतर कारणामुळे, इत्यादि सर्व गोष्टी मला रिपोर्टावरून कळतात. शाळेचे उत्पन्न काय आहे, डेअरींतून किती गॅलन दूध व किती पौंड लोणी आलें, शिक्षकांचे व विद्याथ्यानचे जेवणाचे पदार्थ कोणकोणते आहेत, कोणतेंहि मांस शिजविले किंवा भाजलें, अथवा कांहीं भाज्या बाजारांतून आणिल्या किंवा आमच्या शेतांतून आणिल्या, हें सर्वकाही रिपोर्टांद्वारे मला समजते. मानवी स्वभाव जगभर कोटेंहि सारखाच आहे, असें मला दिसून येते .

कारण, स्वतः जाऊन, जमिनीतून रताळीं खणून काढून त्यांचें कांहीं खाद्य बनविण्याच्याऐवजी दुकानांतून आणून ठेवलेल्या तांदळाच्या पोत्यांकडे धांव घेण्याचा आणि भातावरच निर्वाह करण्याचा मोह पुष्कळांना सोडवत नाहीं, असे मला आढळून आलें आहे.

माझ्या कामाचा बराचसा भाग लोकांच्या नजरेसमोर येत आहे. शिवाय मी इतर पुष्कळ कामें करीत असूनहि मला विश्रांति विहार वगैरेसाठी वेळ कसा मिळतो, आणि कोणत्या तऱ्हेचे खेळ आवडतात, असें मला पुष्कळदां विचारण्यांत आलेले आहे. याचे उत्तर देणें मला फार कठिण वाटतें. पुष्कळ नेटाचे प्रयत्न करितां यावे, उमेद करून सोडणाऱ्या अत्यंत बिकट प्रसंगांशीं तोंड देतां यावें, ह्मणून शरीर व मज्जातंतु जोरदार, भक्कम आणि मजबूत ठेवणे ज्याच्यात्याच्यावर आणि अंगीकृत कार्यावर अवलंबून आहे, असा माझा ग्रह झाला आहे. शक्य तितकी प्रत्येक दिवसाच्या कामाची योजना मी करून ठेवितों. रोजचें नियमित काम होतां होईल तितकें लवकर आटोपून दुसरें कांहींतरी नवीन काम हाती घेण्याचा मी प्रयत्न करीत असतो. ऑफिस सोडावयाच्या पूर्वी सर्व पत्रव्यवहार आणि टांचणे यांची व्यवस्था मी लावून टाकितों. यामुळे दुसऱ्या दिवशीं मला नवीन कामाला हात घालितां येतो. कामाच्या ताब्यांत जाऊन कामाचा गुलाम होण्याऐवजी मी माझें काम माझ्या पूर्ण ताब्यांत ठेवितों, आणि माझ्या कामालाच माझा दास बनवितों. कामाला पूर्णपणें आपल्या ताब्यांत ठेविल्यानें शारीरिक, मानसिक व अध्यात्मिक आनंद प्राप्त होतो, आणि हा आनंदु फारच समाधानकारक व स्फूर्तिदायक असतो. मी वर सांगितल्याप्रमाणे वागल्यानें कामापासून शरीराला तकवा आणि मनाला प्रसन्नता प्राप्त होऊन मनुष्य निरोगी व बळकट होतो, असा माझा अनुभव आहे. कामावर आपले पूर्ण प्रेम जडले ह्मणजे एक प्रकारची अमोलिक शक्ति प्राप्त होते, नसे मला वाटतें.

पहांटेला मीं काम सुरू केलें, ह्मणजे सर्व दिवस सुखकर आणि यशस्वी होईल असे मला वाटत असतें; पण, अवचित घडून येणाऱ्या—

आत्मोद्धार,

वाईट प्रसंगांविषयी मी माझी तयारी करून ठेवितों. आमच्या संस्थेच्या एकाचा इमारतीला आग लागून ती जळाली आहे, कांहीं इतर अपघात झालेला आहे, अगर कोणीएकानें व्याख्यानांत किंवा वर्तमानपत्रांत मी कांही केले आहे किंवा केलें नाहीं ह्मणून नकळत माझ्या तोडून निघालेल्या कांही उद्गाराबद्दल मला शिव्या दिल्या आहेत, वगैरे गोष्टी ऐकण्यास माझी तयारी असते.

एकसारख्या एकोणीस वर्षाच्या कामामध्यें मी कायती एकदांच सुटी घेतली आहे. हा सुटीचा प्रसंग ह्मटला ह्मणजे दोन वर्षामागें आमच्या कांही मित्रांनी माझ्या हाती रक्कम दिली, आणि मला व मिसेस
वाशिंग्टनला तीन महिने यूरोपांत काढावयाला लाविलें. प्रत्येकानें आपले शरीर सुस्थितीत ठेवावें असें माझें मत आहे. मोठे विकार किंवा रोग जडूं नयेत ह्मणून मी लहानसहान विकारांची काळजी घेतों. मला झोप चांगली येईनाशी झाली, ह्मणजे प्रकृतीत कांहीतरी बिघडलें आहे असे मी समजतो. शरीराचा एकादा भाग अशक्त होऊन तो आपलें काम करीनासा झाला, ह्मणजे मी चांगल्या डॉक्टराचा सल्ला घेतों. पाहिजे या जागीं आणि पाहिजे त्यावेळीं चांगली झोप घेतां येणें हें फार फायद्याचे आहे, असे मला वाटते. पंधरावीस मिनिटें डुलकी घेऊन शरीर व मन ताजे तवानें करण्याची कला मला साधली आहे.

प्रत्येक दिवसाचे काम मी दिवस संपण्यापूर्वीच संपवून टाकितों, असें मी वर सांगितलें आहे; पण, याला एक अपवाद आहे. अंतःकरणांत घोळत राहणारा असा एकादा अत्यंत बिकट प्रश्न सोडवावयाचा असला ह्मणजे मी त्या प्रश्नाचा एकदम निकाल करीत नाहीं; तर त्याविषयी विचार करून एक रात्र जाऊ देतों; किंवा त्याविषयीं माझी पत्नी आणि मित्र यांजबरोबर मी संभाषण करितों व असें करणेंच मला बरें वाटते

चांगले ग्रन्थ वाचावयाला निवांत वेळ मी आगगाडींतून प्रवास करीत असतांना मला मिळतो. वर्तमानपत्रांच्या योगानें मला फार आनंद होतो आणि मौज वाटते; पण, मी पुष्कळशी वर्तमानपत्रे वाचतों हेंच—-

—फार त्रासदायक आहे. कादंबऱ्या मला आवडत नाहींत. बऱ्याचजणांनी शिफारस केलेली एकादी कादंबरी मी फार प्रयासानें वाचतो. चरित्रे वाचणें हें मला सर्वात अधिक आवडते. पण, एकाद्या सत्पुरुषाचें अगर सद्वस्तुचेंच चरित्र मी वाचीत आहे, अशाविषयीं मी खात्री करून घेतों. एब्राहाम लिंकनविषयीं लिहिलेलें प्रत्येक पुस्तक किंवा मासिकांतील लेख मी वाचिला आहे. वाङ्मयामध्ये लिंकन माझा अधिष्ठाता गुरु आहे.

वर्षाच्या बारा महिन्यांपैकी साधारणपणे सहा महिने मी टस्केजीच्या बाहेर काढितों. शाळेपासून दूर असणें हें जरी निःसंशय तोट्याचें आहे, तरी त्याबद्दल कांहीं मोबदला मिळतोच. कामांत फेरपालट झाल्यानें एक प्रकारची विश्रांति मिळते. आगगाडीचा बराच लांबचा सुखकर प्रवास मला चांगला मानवतो. मला आगगाडीत विश्रांति मिळते. केव्हां केव्हां मात्र प्रत्येक आगगाडीत एकादी अशी व्यक्ति भेटते, कीं, ती माझ्याकडे येऊन नेहमींच्या परिचयाच्या शब्दांनीं असें विचारते "बुकर टी. वॉशिंग्टन हमणून हमणतात, ते आपणच काय? मला आपली ओळख करून घ्यावयाची आहे." शाळेपासून दूर राहिल्यानें मला क्षुल्लक बाबींचा विसर पडतो आणि शाळेचें व्यापक व विशददृष्टीनें निरीक्षण करावयाला सांपडतें. शाळेतच राहिल्यानें मला असें निरीक्षण करितां येणें शक्य नाहीं. तसेंच शिक्षणविषयक चाललेले उत्तम प्रयत्न मला इतर ठिकाणीं पहावयाला मिळतात, आणि देशांताल उत्तम शिक्षकांचा सहवास मला घडतो.

सर्वात अत्युत्तम विश्रांतीची आणि करमणुकीची वेळ हमटली हमणजे टस्केजी येथील आमच्या सायंकाळच्या भोजनानंतरची होय. आमची नेहमीं अशी वहिवाट आहे, कीं, सायंकाळीं भोजन झाल्यावर मी, माझी पत्नी, पोर्शिया, बेकर व डेविडसन हीं तीन मुलें अशीं सर्वजण एकत्र बसून आहमी एकादी गोष्ट वाचितों, किंवा आळीपाळीनें सांगतों. तसेंच रविवारी दुपारी त्यांच्यासह जंगलांत फिरावयाला जाणें हें मला फार प्रिय आहे. जंगलांत बराच वेळ आहमांला निसर्गदेवतेच्या अंतराशीं तल्लीन—--

–होतां येतें. तेथें आह्मांला कोणी त्रास देत नाहीं. स्वच्छ हवा, सुंदर वृक्ष, दाट झाडी, नानाविध फुलझाडें आणि पुष्पवृक्षांपासून सर्वत्र पसरणारा सुवास, या सर्वांच्या योगानें मोहित झालेल्या आह्मांला झिल्ली-झंकार आणि पक्ष्यांचें मधुर गान, यांपासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचा उपभोग घ्यावयाला मिळतो. खरी विश्रांति ती हीच !

टस्केजी येथे मी असलों ह्मणजे माझ्या बगीच्यापासून मला विश्रांति व आनंद प्राप्त होतो. कृत्रिम किंवा बनावट नव्हे, तर खऱ्याखुऱ्या निसर्गाशीं संलग्न होणें हें मला नेहमीं फार आवडतें. ऑफिसचें काम संपवून मी तीसचाळीस मिनिटें, जमीन खोदण्यांत, बीं लावण्यांत व रोप्यांची जोपासना करण्यांत घालवितों. हें काम करीत असतां मला असें वाटत असतें, की, अशा एका वस्तूशीं- निसर्गाशीं माझें तादात्म्य घडत आहे, कीं, त्याच्यायोगें बाह्य जगांतील बिकट प्रसंगांशी आणि कर्तव्यांशी तोंड देण्यास मला शक्ति मिळत आहे. ज्यानें निसर्गाचा आनंद उपभोगण्याची व त्यापासून शक्ति व स्फूर्ति प्राप्त करून घेण्याची ही कला कधींहि साध्य करून घेतली नाहीं, त्याची मला फार कींव येते.

संस्थेत बरींच बदकें आणि जनावरें पाळलेलीं आहेत, तरी मी स्वतः कांहीं उत्तम डुकरें आणि बदकें मोठ्या आनंदाने पाळतों, आणि त्यांची चांगली पैदास करतांना मला मोठी मौज वाटते. डुकर हें माझें आवडतें जनावर आहे. माझ्या मतें उत्तम बर्कशायर किंवा पोलंडचायना डुकरापेक्षां जास्त समाधानकारक वस्तु फारच थोड्या आढळतील.

खेळाविषयीं मी फारशी पर्वा करीत नाहीं. फुटबॉलचा डाव मीं केव्हांहि पाहिला नाहीं. पत्ते मला नीट ओळखतां येत नाहींत. केव्हां-तरी माझ्या दोन मुलांबरोबर मी गोट्यांचा खेळ खेळतों, एवढेच कायतें.माझ्या बालपणीं मला खेळाकडे कांहीं वेळ खर्च करतां आला असता, तर आतां त्यांची कांहींशी पर्वा मला वाटली असती, असें मला वाटतें. पण, हें शक्य नव्हतें !



बुकर टी. वॉशिंग्टन आणि त्यांचें कुटुंब.

प्रकरण सोळावें.

यूरोप.

इ.स. १८९३ सालीं मिसिसिपीची रहिवासी व नॅशविल संस्थानांतील १० फिस्क युनिव्हर्सिटीची ग्रॅजुएट, मिस मारगेरेट जेम्स मरे इच्याशीं माझा विवाह झाला. कांहीं वर्षांपूर्वी ही टस्केजी येथें अध्यापिका या नात्यानें आली होती, आणि विवाहसमयीं लेडीप्रिन्सिपालच्या जाग्यावर होती. शाळेच्या सर्व कामांत तिची मला पूर्ण मदत आहे आणि यामुळे माझें ओझें बरेंच हलकें झालेलें आहे. शाळेच्या कामाशिवाय टस्केजी गांवांत ती एक आयांची सभा चालविते, आणि टस्केजीहून आठ मैल दूर असलेल्या एका बऱ्याच लोकसंख्येच्या वसाहतीमध्यें स्त्रीपुरुष, मुलें यांनां ती शेतांतील लावणीचें काम शिकविते. आयांची सभा आणि लावणीचें काम चालू करण्याचा मुख्य हेतु कांहीं विशिष्ट लोकांचा फायदा व्हावा असा नसून, आमच्या संस्थेतील विद्यार्थी तयार होऊन बाहेर जगांत आपापले आयुष्यांतील काम करावयाला लागतील, तेव्हां त्यांनां वस्तुपाठ किंवा अनुभव मिळावा, हाच आहे.

या दोन कामांशिवाय आमच्या संस्थेत एक स्त्रियांचा क्लब आहे, आणि या क्लबाची जबाबदारी मिसेस वाशिंग्टनवरच आहे. या क्लबांत संस्थेत राहणाऱ्या आणि आसपासच्या सर्व स्त्रिया कांहीं महत्त्वाच्या विषयांचा विचार करण्यासाठीं महिन्यांतून दोनदां जमत असतात. याशिवाय ती दक्षिणेंतील काळ्या स्त्रियांच्या क्लबांची अध्यक्ष व काळ्या स्त्रियांच्या राष्ट्रीय क्लबांच्या कार्यकारी मंडळीची चेअरमन आहे.

माझ्या सर्व मुलांपैकीं वडील मुलगी पोर्शिया ही कपडे शिवण्याचें काम शिकली आहे. वादनकलेंत तर तिची बुद्धि अप्रतिम चालते. टस्केजी संस्थेंत स्वतः अभ्यास करून कांहीं वेळ ती शिकविण्याचेंहि काम करिते.

हिच्या पाठीवरील माझे मूल बेकर टेलिफेरो या नावाचे आहे .हा मुलगा वयाने लहान आहे, तरी यानें विटा करण्याचा धंदा चांगला अवगत करून घेतला आहे. बालपणीच यानें हें काम शिकण्याचे सुरू केलें. कांहीं वेळ आपल्या वर्गाचे धडे शिकण्यांत व कांहीं वेळ या धंद्यांत तो खर्च करी. आतां यानें या धंद्यांत बरेंच कौशल्य मिळविलें आहे, आणि हा धंदा त्याला फार आवडूं लागला आहे. आपण शिल्पकार व इष्टिकाकार (गवंडी) होणार, असें तो ह्मणतो. गेल्या उन्हाळ्यांत याच्याकडून मला एक अत्यंत समाधानकारक खालील प्रमाणें पत्र आलें. उन्हाळ्याकरितां घराहून निघतांना अर्धा दिवस धंद्याचे काम करावें आणि राहिलेला अर्धा दिवस पाहिजे तसा खर्च करावा, असें मी त्याला सांगितलें होतें. दोन आठड्यांनंतर त्याच्याकडून खाली दिलेलें पत्र आलें:-

" टस्केजी, अलाबामा.

प्रिय बाबा,

आपण घराहून जाण्यापूर्वी अर्धा दिवस मीं माझ्या धंद्यांत काम करावें असें मला बजाविलें होतें; पण, माझा धंदा मला इतका आवडतो, की, मीं सारा दिवस त्यांत काम करावें असें मला वाटतें. शिवाय मी माझ्या हातून होईल तितका पैसा जमवून ठेवणार आहें. कारण मी असें केलें, ह्मणजे दुसऱ्या शाळेत गेलों असतां माझा खर्च माझ्या पैशांतून मला भागवितां येईल.

आपला पुत्र बेकर."

माझा सर्वात लहान मुलगा अर्नेस्ट डेव्हिडसन वाशिंग्टन हा आपण वैद्य होणार असें ह्मणतो. हा शाळेत जाऊन पुस्तकें वाचतो आणि हातांनींहि काम करितो. शिवाय कांहीं नियमित वेळ आमच्या संस्थे तील वैद्याच्या ऑफिसांत खर्च करितो. तेथील कांहीं लहानसहान कामें करण्यासहि तो शिकला आहे.

—सार्वजनिक कामांसाठी घर सोडून मला बराच वेळ बाहेर रहावें लागते, याबद्दल माझ्या मनाला अत्यंत वाईट वाटते. जगांतील कोणत्याहि ठिकाणापेक्षां मला माझ्या कुटुंबांतच राहणे फार आवडते. रोज संध्याकाळी परत घरी येतां येते असे ज्याचे आयुष्यांतील काम आहे, त्या मनुष्याचा मला हेवा वाटतो. पण ज्यांना हा दुर्मिळ लाभ मिळत आहे, त्यांनां त्याचे फारसे महत्त्व वाटत नाही, असे मला केव्हाकेव्हां वाटतें. लोकांची गर्दी, त्यांच्याशी शेकह्यांड, प्रवास इत्यादि गोष्टींपासून दूर होऊन, अगदी थोडा वेळ का होईना आपल्या घरी येणें, यासारखे श्रमपरिहार करणारे व विश्रांति देणारें दूसरे औषध नाही !

टस्केजी येथील दुसऱ्या एका गोष्टीपासून मला फार सुख व समाधान होतें. ती ही, की, रोज रात्री झोपी जाण्यापूर्वी साडेआठ वाजतां, विद्यार्थी, शिक्षक आणि त्यांची कुटुंबे इत्यादि सर्व मंडळी ईश्वराची प्रार्थना करण्याकरितां प्रार्थनामंदिरांत जमते. व्यासपीठावर उभे राहून आपल्यासमोर अकराशेंबाराशें खऱ्या कळकळीचे स्त्रीपुरुष ईश्वराची प्रार्थना करीत आहेत असा देखावा पाहणें, हे फार स्फूर्तिदायक आहे, आणि या सर्वांचे जीवित अधिक श्रेष्ठ व उपयुक्त करण्याच्या कामी आपण कांहीं अंशीं हातभार लावणे यासारखा जगांत दुसरा मान नाहीं, असे वाटणें साहजिक आहे. नाही का ?

१८९९ च्या वसंतऋतूंत माझ्या आयुष्यांतील एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट घडून आली. बोस्टन येथील कांहीं साध्वी स्त्रियांनी टस्केजी संस्थेच्या हितार्थ हॉलीस स्ट्रीट थिएटरांत एक सार्वजनिक सभा भरविली. बोस्टन येथील दोन्ही ज्ञातींची प्रमुख मंडळी या सभेला आली होती. बिशप लारेन्स हे अध्यक्ष होते. माझें भाषण तर झालेंच. त्याशिवाय मिस्टर पॉल लारेन्स डंबार यांनी आपल्या कांहीं कविता, ब डॉक्टर डब्ल्यू. ई. बी. डुबॉईस यांनी आपले कांहीं वर्णनपर देख वाचून दाखविले.

मी फारच थकूनभागून गेलों आहे, असें सभेला आलेल्या कांहीं मंडळीच्या नजरेला आलें, आणि सभा बरखास्त झाल्यावर कांहीं वेळाने सभेच्या व्यवस्थापकांपैकी एका बाईनें "आपण कधीं यूरोपांत गेला आहां काय ? " असा मला सहज प्रश्न केला. "नाहीं," असें मीं साहजिक उत्तर दिलें. "तेथे कधींतरी जाण्याचा आपला विचार तरी आहे काय?" असे तिनें पुनः विचारिलें. "छे, ते माझ्या आवाक्याबाहेरचें काम आहे," असा मी लगेच जबाब दिला. हे आमचें संभाषण मी लवकरच विसरलो. पण, कांहीं दिवसांनंतर मला असें कळलें, कीं, मिस्टर फ्रांसिस जे. गारिसन इत्यादि बोस्टन येथील मित्रमंडळीनें माझ्या व मिसेल वाशिंग्टनच्या यूरोपच्या तीनचार महिन्यांच्या सफरीच्या खर्चाची रक्कम वर्गणीनें जमा केली आहे. "तुझीं गेलेच पाहिजे!" असें आह्मांला निक्षून सांगण्यांत आलें. शिवाय सफरीला लागणारा खर्च मित्रमंडळीकडून आह्मी जमवितों, असेंहि मला सांगण्यांत आलें. " मी उन्हाळ्यांत विश्रांतीसाठीं यूरोपची सफर करीन," अशी कबूली माझ्याकडून घेण्याचा प्रयत्न एक वर्षामागें मिस्टर गारिसन यांनी केला होता. मला त्यावेळी ही सफर इतकी अशक्य वाटली, कीं, मी त्या गोष्टीकडे फारसे लक्ष्य दिले नाहीं. पण पुढे कांहीं दिवसांनीं मिस्टर गारिसन यांनी मी वर सांगितलेल्या बायांनां आपल्या कटांत सामील करून घेतलें, आणि जेव्हां त्यांनीं आपला बेत मला कळविला, तेव्हां आह्मीं यूरोपांत कोठे कोठें जावें, एवढेच नव्हे, तर कोणत्या आगबोटीनें आह्मीं निघावें, हें सुद्धां त्यांनीं ठरवून ठेविलें होतें, असें मला वाटतें.

ही सर्व योजना इतकी कांहीं गुप्त, बेमालूम व अचानक झाली, कीं, माझें तेथे कांहींएक चालेना. टस्केजी संस्थेचे काम मी एकसारखें अठरा वर्षें करीत आलों, आणि माझें जीवित तेथेच संपविल्याखेरीज माझ्या मनांत दुसरा कांहीं विचार नव्हता. रोजच्या खर्चासाठीं शाळा दिवसेंदिवस माझ्यावर अधिक अवलंबून राहूं लागली. याकरितां माझ्या बोस्टन येथील मित्रांनां मी असे कळविले, की, "आपल्या औदार्याबद्दल

–आणि दूरदर्शीपणाबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. माझ्या गैरहजिरींत शाळेची सांपत्तिक स्थिति चांगली राहणार नाहीं, यासाठीं यूरोपांत मला जातां येणार नाहीं." यावर त्यांनी मला असें कळविलें, की, "मिस्टर हेनरी एल. हिगीनसन आणि आपलीं नांवें प्रसिद्ध होऊं नयेत अशी इच्छा असणारे दुसरे कांहीं सन्मित्र आपल्या गैरहजिरींत शाळा चांगली चालण्यासाठीं एक मोठी रक्कम जमवीत आहेत." हैं ऐकून मला माघार घ्यावी लागली, व त्यांतून बाहेर निसटण्याचा कोणताच मार्ग दिसेना !

माझ्या अंतःकरणांत तर हें सर्व खरें नसून स्वप्नच आहे, असे मला वाटूं लागलें, आणि मी यूरोपची सफर करणार हे कांहीं केल्या मला खरें वाटेना. दास्य, अज्ञान व दारिद्य यांच्या नीच स्थितींत माझा जन्म झाला होता, आणि मी त्यांतच लहानाचा मोठा झालों होतों. लहानपणी मला निजावयाला जागा नव्हती, खावयाला पुरेंसें अन्न नव्हतें, कपडे, घरदार यांची स्थिति अशीच केविलवाणी होती, यामुळे माझे फार हाल झाले. मी बराच मोठा होईपर्यंत मेजावर जेवण्याचा सुयोग मला प्राप्त झाला नव्हता. सुग्रास अन्न, ऐषआराम हें सर्व आमच्या ज्ञातीसाठीं नसून गोऱ्या लोकांकरितांच आहे, असे मला वाटत होतें. यूरोप, लंडन व पारिस यांनां मी स्वर्गच समजत होतो. असे असतां आतां मी यूरोपांत जाणार कसा? असे विचार नेहमी माझ्या मनांत येत.

आणखी दुसऱ्या दोन विचारांनी मला बराच त्रास दिला. मिसेस वाशिंग्टन आणि मी यूरोपला जाणार असें ऐकणाऱ्या लोकांनां सर्व परिस्थिति माहीत नसणार, आणि आम्ही शेंफारून गेलों आहों, आम्ही आतां डौल करूं लागलों, असें त्यांनां वाटणार. आमच्या ज्ञातीच्या लोकांनां कांहीं थोडें यश मिळालें म्हणजे आपण फार श्रेष्ठ झालों असे ते समजत, आणि श्रीमंतांचे अनुकरण करण्यांत त्यांचे डोके फिरून जाई, असें मी लहानपणापासून ऐकत असें, त्याची मला आतां आठवण

–झाली. लोकांनां आमच्याबद्दल असेंच वाटूं लागेल, ही शंका एकसारखी माझ्या पाठीला लागली. शिवाय माझें काम सोडून कांहीं काळ रजा घेतली असतां माझी सदसद्विवेकबुद्धि मला स्वस्थ राहूं देईल, असें मला वाटेना. बरेंच काम करावयाचें शिल्लक राहिलें आहे, दुसरे काम करीत आहेत, आणि मीच तेवढी सुटी घ्यावी, हें मला हलके आणि आप्पलपोटेपणाचें वाटलें. पूर्वीपासून मी एकसारखा काम करीत आहे, आणि आतांच तीनचार महिने कांहीं न करितां कसे काढावे, हें मला समजेना. सुटी कशी खर्च करावी हें मला माहीत नव्हतें, हेंच खरें !

टस्केजी सोडून जाण्याची माझ्यासारखीच अडचण मिसेस वाशिंग्टनलाहि आली. पण मला विश्रांतीची फार जरूरी आहे असे तिला वाटल्यामुळे आपण जावें अशी तिची उत्सुकता दिसली. आमच्या ज्ञातीच्या जीविताविषयीं संबंध असलेल्या कांहीं महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांचा खल यावेळीं चालला होता. यामुळे यूरोपला जाण्याचा निश्चय लवकर करवेना. शेवटीं आह्मी जाण्यास तयार आहों, असें आमच्या बोस्टन येथील मित्रांनां आह्मीं कळविलें. होतां होईल तितकें लवकर आह्मीं निघावें, असा त्यांनीं आग्रह केला. आह्मीं तारीख १० मेला जावयाचे ठरविलें. सन्मित्र मिस्टर गारिसन यांनी आमच्या सफरीला यश यावें, ह्मणून सर्व गोष्टींची व्यवस्था केली. त्यांनी आणि दुसऱ्या मित्रांनीं फ्रान्स व इंग्लंड येथील सद्गृहस्थांनां आमच्याविषयीं मुद्दाम पुष्कळ पत्रे लिहिली आणि परदेशीं आमची सर्व सोय होऊन आह्मांला सुख व्हावें ह्मणून इतर व्यवस्थाहि केली. टस्केजी येथे सर्वांनां भेटून दुसऱ्या दिवशीं आगबोटींतून निघतां यावें ह्मणून तारीख ९ मे रोजीं आह्मी न्यूयॉर्कला आलों. मॅसॅच्युसेटसमधील साउथ फ्रामिंगहम येथे अभ्यासासाठीं राहिलेली आमची मुलगी पोर्शिया ही आह्मांला भेटण्यासाठीं न्यूयॉर्क येथे आली. माझे सेक्रेटरी मिस्टर स्कॉट मी
निघेतोंपर्यंतचें माझें काम करावें ह्मणून माझ्या बरोबर न्यूयॉर्कला आले. दुसरे कांहीं मित्र आह्मांला भेटण्यास न्यूयॉर्क येथे आले.

आगबोटीवर चढण्यापूर्वी आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट घडून आली. जी अशी, कीं, टस्केजी येथे मुलींच्या औद्योगिक शिक्षणासाठीं इमारत उभारण्याचा सर्व खर्च देण्यास आह्मीं कबूल आहों अशा आशयाचें दोन स्त्रियांकडून आलेलें एक पत्र आह्मांला मिळालें.

रेड स्टार लाईन कंपनीच्या फ्रीसलंड नांवाच्या आगबोटीतून आह्मी प्रवास करणार होतों. ही आगबोट कितीतरी सुंदर होती.. आगबोट निघण्यापूर्वी दुपारी आह्मी तेथे गेलों. अशी महासागरांतून जाणारी आगबोट मीं पाहिलीं नव्हती. आणि मी जेव्हां आगबोटीवर गेलों, त्यावेळीं माझ्या मनांत जे कांहीं विचार आले त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे ! मला त्यावेळीं आनंद झाला आणि थोडेंसें भयहि वाटूं लागलें. आगबोटीचे कप्तान आणि दुसरे कामगार यांनां, आह्मीं कोण आहों हें माहीत होतें; इतकेंच नव्हे, तर ते आमची वाट पहात होते. आह्मीं आगबोटीवर येतांच त्यांनीं आमचें स्वागत केलें. हें पाहून आह्मांला फार आश्चर्य वाटलें. न्यूजेरसीचे सीनेटर सेवेल, वर्तमान-पत्राचे बातमीदार एडवर्ड मार्शल इत्यादि बरीच ओळखीची मंडळी आगबोटीवर होती. कांहीं उतारू आह्मांला सभ्यरीतीनें वागविणार नाहींत, अशी मला थोडी शंका वाटत होती. अमेरिकन जहाजांतून प्रवास करितांना आमच्या ज्ञातीच्या कांहीं लोकांनां आलेले कित्येक विषम अनुभव मीं ऐकिलेले होते, त्यामुळे मला ही शंका आली; पण आह्मांला कप्तानपासून तों तहत सर्वात हलक्या नोकरापर्यंत सर्वांनीं मोठ्या ममतेनें वागविलें. सर्व उतारूहि आमच्याशीं मोठ्या प्रेमानेंच वागले. आगबोटीवर दक्षिणेंतील कांहीं गोरे स्त्रीपुरुष होते, त्यांचेंहि वर्तन आमच्याशीं इतरांप्रमाणेंच होतें.

नमस्कारचमत्कार होऊन आगबोट धक्का सोडून निघू लागल्याबरोबर, अठरा वर्षे एकसारखें वाहिलेलें, चिंता, काळजी व जबाबदारी यांचे माझ्या खांद्यावरील ओझें दर मिनिटाला एक पौंडप्रमाणें कमी कमी - होऊ लागले. कांहीं अंशीं तरी मी चिंतेपासून मोकळा झालों, असें या—

–अठरा वर्षात्त मला यावेळी प्रथमच वाटूं लागलें; आणि जो कांहीं आराम मला वाटला, त्याचें वर्णन करणे अशक्य आहे ! याशिवाय यूरोपांत आह्मी लवकरच जाणार, असें वाटून मला एकप्रकारचा आनंद होत होता. पण, हें सर्व खरें नसून स्वप्नच आहे, असें मला दिसूं लागलें,

मिस्टर गारिसन यांनी मोठ्या विचारानें आगबोटीवर आह्मांला एक स्वतंत्र, सोईवार खोली मिळावी अशी व्यवस्था केली होती. दोनतीन दिवसांनंतर मी झोप घेण्यास सुरुवात केली, आणि पुढे दहा दिवसांच्या प्रवासांत दिवसाला पंधरा तास याप्रमाणें मी झोप घेऊं लागों. मी किती थकलेलाभागलेला होतों, हे त्यावेळी मला समजूं लागलें, दुसऱ्या प्रदेशांत उतरल्यावर पुढें एक महिना मी झोपेचें हेंच मान कायम ठेविलें. रोज सकाळी उठावें तों कांहीं कामें नाहींत, आगगाडीनें अमुक वेळेला धांवपळ करण्याची जरूर नाहीं, कोणाच्या भेटीचा संकेत केलेला नाहीं, किंवा अमुक वाजतां माझें भाषण नाहीं, हें पाहून माझ्या मनाला अत्यंत समाधान वाटलें. मागें प्रवासांत केव्हांकेव्हां एकाच रात्रीं तीन ठिकाणी तीन निरनिराळ्या "बिछान्यांत मला निजावें लागलेलें होतें. तो धांवपळीचा अनुभव कोठे, आणि आतांची ही आरामी कोठें !

रविवार येतांच मी उपासना चालवावी असें कप्ताननें मला आमंत्रण दिलें. पण, मी धर्मोपदेशक नसल्यामुळे मीं या आमंत्रणाचा स्वीकार केला नाहीं. प्रवासामध्यें मीं केव्हांतरी भोजनशाळेत भाषण करावें, असा उतारूंनी मला आग्रह केला, आणि मीं हें कबूल केलें. सिनेटर सेवेल हे यावेळी अध्यक्ष होते. मला आगबोट केव्हांहि लागली नाहीं. हवा फार आल्हादकारक असल्यामुळे दहा दिवसांच्या सुखकारक प्रवासानंतर आम्हीं बेलज्यम येथील अंटवर्पनामक जुन्या, महत्त्वाच्या शहरी उतरलों.

दुसऱ्या दिवशीं या गांवीं एक मोठा उत्सव चाललेला होता. हवा फार सुंदर व आल्हादकारक होती. हॉटेलांतील आमची खोली सार्वजनिक चौकासमोर होती. सर्व तऱ्हांचीं सुंदर फुलें घेऊन विकण्या-

–करितां चाललेले लोक, दुधानें भरलेलीं स्वच्छ, चकचकीत भांडी वाहून नेणाऱ्या कुत्र्यांनां घेऊन येणाऱ्या स्त्रिया, देवालयांत जाणारे लोकांचे थवेच्या थवे, वगैरे सर्व तऱ्हांचा देखावा पाहून मला हें फारच अपूर्व वाटलें.

अंटवर्प येथे कांहीं दिवस काढल्यावर, हालंडमध्यें सहासात असामींच्या पार्टीबरोबर सफर करण्याचें आम्हांला आमंत्रण आलें. या पार्टीत आमच्याबरोबरच आगबोटींतून आलेले एडवर्ड मार्शल आणि दुसरे कांहीं अमेरिकन कारागीर होते. आम्हीं हें आमंत्रण स्वीकारिलें, आणि आम्हांला या सफरीपासून फार आनंद झाला. आम्हांला एका जुन्या आणि सावकाश जाणाऱ्या बोटींतून प्रवास करावा लागल्यामुळे ही आमची सफर फारच मौजेची आणि बोधप्रद झाली. खेड्यापाड्यांतील लोकांची खरीखुरी राहणी व स्थिति पाहण्याची संधि आम्हांला मिळाली. आम्ही याप्रमाणें राटरडमपर्यंत गेलों, आणि तेथून पुढे हेगला गेलों. तेथें शांततापरिषदेची बैठक चालली होती. त्यांतील अमेरिकन प्रतिनिधींनीं आमचें चांगलें स्वागत केलें.

हॉलंडमधील शेतकीची परिणत अवस्था व हाल्स्टीन गुरांची उत्कृष्टता यांचा माझ्या मनावर फार उत्तम संस्कार झाला. एका लहानशा जमीनीच्या तुकड्यांतून किती उत्पन्न काढितां येईल याची कल्पना, मी हॉलंड देशांत येईतोंपर्यंत मला नव्हती! जमीनीचा यत्किंचिही भाग ते अगदीं वायां जाऊं देत नाहींत, असें मला दिसलें. अत्यंत हिरव्यागार -. अशा कुरणामध्यें तीनचारशें उत्तम हाल्स्टन गाई चरत असलेला देखावा की पाहण्यासाठींच का होईना, हॉलंडची सफर करणे योग्य आहे, असे मला वाटलें.

हॉलंडहून आम्ही बेलज्यम येथे गेलों, आणि त्या देशांतून घाईनें प्रवास करूं लागलों. ब्रुसेल्स येथे थांबून वॉटरलूची रणभूमि आम्हीं वा पाहिली. बेलज्यमहून आम्ही थेट पारिसला गेलों. तेथे मिसेस एलिझाबेथ की केडी स्टॅनटनच्या मिस्टर थिओडर स्टॅनटन नामक पुत्रानें मेहेरबानीनें - आमची बिऱ्हाडाची सोय करून दिली. तेथे आमची सोय लागते—-

–न लागते, तोच युनिव्हर्सिटीक्लबानें आह्मांला मेजवानीला आमंत्रण दिले. त्यावेळी पारिस येथे असलेले, पूर्वीचे प्रेसिडेंट बेंजामिन हॅरिसन आणि आर्चबिशप आयर्लंड हेहि दुसरे पाहुणे आले होते. अमेरिकेचे प्रतिनिधि जनरल होरेस पोर्टर हे मेजवानीच्या प्रसंगीं अध्यक्ष होते. तेथे मी थोडेंसें भाषण केलें, व तें श्रोत्यांनां आवडलेंसें दिसले. जनरल हॅरसन यांनी माझ्याविषयीं, आणि टस्केजी येथील कामगिरीचा अमेरिकन ज्ञातिप्रश्नावर होणारा परिणाम याविषयीं, आपल्या भाषणांत कांहीं उद्गार काढिले. या मेजवानींतील माझ्या भाषणानंतर मला व्याख्यानांचीं दुसरी आमंत्रणें आलीं. मी ती स्वीकारिली असतीं तर यूरोपच्या सफरीचा उद्देश तडीला गेला नसता, हैं जाणून मीं तीं नाकारिली. तथापि अमेरिकन प्रार्थनामंदिरांत पुढल्या रविवारी भाषण करण्याचे मीं कबूल केलें, आणि याप्रसंगीं जनरल हॅरिसन, जनरल पोर्टर आणि इतर नामांकित गृहस्थ हजर होते.

नंतर अमेरिकन प्रतिनिधीच्या घरीं स्वागताच्या एका प्रसंगी हजर राहण्यास आह्मांला आमंत्रण आलें. याप्रसंगीं, युनायटेड स्टेट्सच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश जस्टिस फुलर आणि जस्टिस हारलन व आणखी बरेच अमेरिकन आह्मांला भेटले. पारिसशहरांत आमच्या एक महिना मुक्काम असतां, अमेरिकन प्रतिनिधि, त्यांची पत्नी आणि इतर अमेरिकन गृहस्थ यांनी आह्मांला फारच प्रेमानें वागविलें.

पारिसमध्यें असतांना सुप्रसिद्ध अमेरिकन नीग्रो चित्रकार मिस्टर हेनरी ओ. टॅनर यांचा आह्मांला विशेष परिचय झाला. पूर्वी अमेरिकेत आह्मांला यांची थोडीशी ओळख झालेली होती. मिस्टर टॅनर हे चित्रकलेत फार प्रख्यात होते, व सर्व जातीचे लोक त्यांनां यामुळेच मानहि देत असत, हैं पाहून आह्मांला फार समाधान वाटलें. लक्झेमबर्ग राजवाड्यांत एका अमेरिकन नीग्रोनें रंगविलेले चित्र आह्मी पाहण्यास जात आहों, असें जेव्हां कांहीं अमेरिकन लोकांनां आह्मी सांगितलें, तेव्हां एकाद्या नीग्रोला असा बहुमान मिळाला असेल हैं त्यांनां खरें वाटेना!

—ते चित्र स्वतः जाऊन पाहीतोंपर्यंत त्यांची खात्री झाली नाही. टस्केजी येथील आमच्या विद्यार्थ्यांच्या आणि आसपासच्या लोकांच्या कानीकपाळी ओरडून सांगत असलेल्या माझ्या तत्त्वाला मिस्टर टनर यांच्या परिचयानें दुजोरा मिळाला. तें तत्व हें, कीं, गोष्ट कितीहि क्षुल्लक कां असेना, ती जो कोणी ज्या मानानें अधिक चांगली-दुसऱ्यापेक्षां -अधिक चांगली - करण्यास शिकतो, त्याची, मग तो कोणत्याहि वर्णाचा कां असेना, त्या मानानें पारख आणि चहा होते. मी सांगितल्याप्रमाणें ज्या मानानें आमची ज्ञात, एकादी साधीच गोष्ट उत्तम -रीतीने करण्यास शिकेल, एकादी गोष्ट इतक्या उत्तम रीतीनें करण्यास - शिकेल, कीं, त्याहून अधिक सुधारणा दुसऱ्याला करितां येणार नाही, व आपलें काम अतिशय महत्त्वाचें व मौल्यवान करील, त्या मानानें तिला यश मिळत जाईल. मला हाम्पटन येथें प्रथम जेव्हां खोली स्वच्छ करण्याची संधि दिली, तेव्हां याच तत्त्वानें प्रेरित होऊन मीं माझा पहिला प्रयत्न सिद्धीला नेला. शाळेची खोली स्वच्छ करण्यावरच माझे पुढील सर्व जीवित अवलंबून आहे असें मला कांहीं अंशी वाटलें, आणि माझ्या व कामांत कोणालाहि दोष काढितां येऊं नये, अशा रीतीनें तें काम करण्याचा मीं निश्चय केला. असो. चित्राकडे पहात असतांना मिस्टर टॅनर नीग्रो चित्रकार आहे, अथवा फ्रेंच किंवा जर्मन चित्रकार आहे, अशी चौकशी करणारा मला फारसा कोणी आढळला नाहीं! जगाला जें कांहीं पाहिजे आहे ते उत्तम चित्र त्याला काढितां येत होतें, इतकेंच कायतें तोकांनां त्याच्याविषयी माहीत होते; त्याचा वर्ण कोणता आहे याची - कल्पनाहि कोणाच्या मनांत आली नाहीं. एकादी नीग्रो मुलगी स्वयंपाक करण्यास, ताटें धुण्यास, शिवणकाम करण्यास, पुस्तक लिहिण्यास शिकते, किंवा नीग्रो मुलगा घोड्यांची चाकरी करण्यास,रताळीं पैदा करण्यास, लोणी काढण्यास, घरें बांधण्यास किंवा रोग बरे करण्यास शिकतो; पण तीं जेव्हां हीं कामें दुसऱ्यांसारखी किंवा त्याच्याहून अधिक चांगलीं करूं लागतील, तेव्हां वर्ण किंवा रंग यांकडे—

–लक्ष्य न देतां लोक त्यांनां अधिक मोबदला देऊं लागतील, शेवटीं सांगावयाचे एवढेच, की, जगाला सर्वांत उत्तम गोष्टी पाहिजेत, आणि त्यामुळे जातिभेद व धर्मभेद किंवा मागील इतिहास या गोष्टी, जगाला पाहिजे असलेल्या वस्तु मिळवू देण्याच्या आड येणार नाहींत.

मला असें वाटतें, की, आमची ज्ञात ज्या गांवी किंवा ज्या संस्थानांत राहते, तेथील समाजाच्या कल्याणाला व सुखाला आमचें अस्तित्व कारणीभूत होतें किंवा नाहीं, या प्रश्नावर माझ्या ज्ञातीचा भविष्यकाल अवलंबून आहे. आपण ज्या ठिकाणी राहतों, त्या ठिकाणच्या लोकांच्या सांपत्तिक, बौध्दिक आणि नैतिक कल्याणांत जर कांही आपण भर घातली, तर त्याचें आपल्यास योग्य बक्षीस मिळाल्यावांचून राहणार नाहीं. केव्हांहि निरर्थक न होणारा हा श्रेष्ठ मानवी कायदा आहे.

फ्रेंच लोकांच्या अंगीं बहुतेक अंशी असलेल्या सुखाच्या आणि चळवळीच्या आवडीनें माझ्या मनावर बराच संस्कार केला. माझ्या ज्ञातीपेक्षा फ्रेंच ज्ञातींत ही आवड अधिक आहे, असें मला वाटतें. नीतिमत्ता किन तीविषयींची कळकळ, या बाबतींत फ्रेंच लोक अमेरिकेंतील माझ्या ज्ञातीहून श्रेष्ठ असतील, असें मला वाटत नाहों. तीव्र जीवनकलह आणि स्पर्धा यामुळे आपलीं कामें अधिक नेटानें करण्यास आणि अधिक काटकसरीने वागण्यास ते लोक शिकले आहेत; पण, कांहीं कालानें माझी ज्ञात त्याच स्थितीला येईल असे मला वाटतें. खरेपणा आणि थोरपणा यांमध्ये साधारण फ्रेंचमन अमेरिकेच्या नीग्रोहून श्रेष्ठ आहे, असें कांहीं मला वाटत नाहीं. मुक्या जनावरांविषयीं प्रेम आणि दया या बाबतीत तर माझी ज्ञात फारच पुढें आहे. खरोखर फ्रान्सहून आह्मी निघते वेळी, अमेरिकेंत नीग्रोच्या भविष्याविषयीं माझ्या मनांतील विश्वास पूर्वीपेक्षां अधिक वाढला.

पारीस सोडून आह्मी लंडनला गेलों आणि तेथें आह्मी जुलै महिन्याच्या प्रारंभीं जाऊन पोहोंचलों. पार्लमेंटची बैठक त्या सुमाराला चाल् असून तेथें बराच उत्सव चालला होता. मिस्तर ग्यारिसन आणि दुसरे —

मित्र यांनी आमच्याजवळ बरीच पत्रे दिली होतीं, आणि आह्मी येणार आहों म्हणून ग्रेटब्रिटनच्या लोकांनां सूचना देऊन ठेविली होती. लंडनला पोहोचल्याबरोबर पुष्कळ कार्यानां आम्ही हजर असावें, म्हणून आम्हांला बरीच आंमत्रणें आली होती; पण मला विश्रांति पाहिजे असल्यामुळे मी त्यांपैकी बरीच नाकारिली. तथापि कांही थोड्या आमंत्रणांचा स्वीकार करणें मला भाग पडले. बोस्टनमध्यें परिचित झालेले रेव्हरंड डॉक्टर ब्रुक हरफर्ड आणि मिसेस हरफर्ड यांनी अमेरिकन प्रतिनिधि ऑनरेबल जोशेफ शोट यांचा सल्ला घेऊन इसेक्स हॉलमध्ये भरणाऱ्या सभेत मी भाषण करावें, असे ठरविले. त्या प्रसंगी मिस्तर शोट यांनी अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे कबूल केलें. सभेला बरेच प्रतिष्ठित लोक हजर असून त्यांत मिस्तर जेम्स ब्राइस व आणखी कांहीं पार्टमेंटचे सभासदहि होते. मिस्टर जेम्स ब्राइस यांनी त्या सभेमध्ये थोडे भाषण देखील केले. माझी ओळख करून देतांना अमेरिकन प्रतिनिधीने केलेले प्रास्ताविक भाषण आणि माझ्या भाषणाचा सारांश, हीं त्या वेळच्या इंग्लंड व अमेरिकेच्या बऱ्याच वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली. डॉक्टर आणि मिसेस हरफर्ड यांनी माझे आणि मिसेस वॉशिंग्टन यांचं स्वागत केले. या प्रसंगी लंडांतील बऱ्याच श्रेष्ट लोकांशी माझी ओळख झाली. लंडनमध्यें रहात असतां अमेरिकन प्रतिनिधि शोट यांनी मनापासून माझी काळजी घेतली. तिनिधींनी केलेल्या स्वागताच्या वेळी मार्कट्वेन यांची माझ्याशी प्रमथच भेट झाली.

रिचर्ड कॉवडेन नामक इंग्रजी मुत्सद्दद्याची मुलगी मिसेस टी. फिशर अनविन हिच्यायेथें पुष्कळ वेळां आह्मी पाहुणे या नात्यानें गेलों मिस्टर आणि मिसेस अनविन या दोघांनी आह्मांला सुख व्हावें ह्मणून आपली पराकाष्ठा केली. नंतर एक आठवडापर्यंत आह्मी जॉन ब्राइट यांची मुलगी, स्ट्रीट गांवची मिसेस क्लार्क हिचे पाहुणे होतों

आणि मिसेस क्लार्क आपल्या मुलीसहित दुसऱ्या वर्षी टस्केजीत येऊन आह्मांला भेटली. बर्मिंगहॅममध्ये आह्मी मिस्टर जोशेफ स्टर्ज यांचे पाहुणे—-

—होतों. यांचे वडील गुलामगिरी रद्द करणारांपैकी एक प्रमुख गृहस्थ असून व्हिटीयर आणि ग्यारिसन यांचे मित्र होते. परलोकवासी वुइल्यम साइड ग्यारिसन आणि ऑनरेबल फ्रेड्रिक डगलस व गुलामगिरी रद्द करणारे दुसरे लोक यांची माहिती असणारे, आणि यांनां मान देणारे, इंग्लंडांतील पुष्कळ लोक मला भेटले, हा एक मी मोठा मान समजतो. या लोकांनां या दोन अमेरिकनांविषयीं बोलतांना कधीहि कंटाळा येत नसे. या लोकांनी गुलामांनां स्वातंत्र्य देण्याच्या कामी जी कांही कळकळ दाखविली, आणि जी कांहीं खरीखुरी मदत दिली, त्याची योग्य कल्पना इंग्लंडला येण्यापूर्वी मला आली नव्हती.

ब्रिस्टल येथे स्त्रियांच्या लिबरल क्लबांत मीं आणि मिसेस वॉशिंग्टन या उभयतांनीं भाषण केलें. आंधळ्यांकरितां काढलेल्या रायल कॉलेजमध्ये पदवीदानाच्या समारंभांत मींच मुख्य भाषण केलें. हा समारंभ क्रिस्टल पॅलेसमध्यें परलोकवासी ड्यूक आफ वेस्टमिनिस्टर यांच्या अध्यक्षते खालीं झाला. हे इंग्लंडमध्ये सर्वांत श्रीमंत होते, अशी त्यांची ख्याति होती. डयुक, त्यांची पत्नी आणि त्यांची मुलगी यांनां माझें भाषण फार आवडले, आणि त्यांनी माझे मनापासून आभार मानिले. मी, माझी पत्नी आणि त्यावेळीं लंडन येथे भरत असलेल्या सर्व राष्ट्रांतील स्त्रियांच्या सभेतील कांहीं स्त्रिया, यांनां, लेडी आबरडीनच्या मेहेरबानीनें वुइंडसर कॅसल येथे राणी व्हिक्टोरिया यांची भेट झाली, आणि पुढे तेथे आम्ही राणीकडे चहापानाला गेलों. आमच्या मंडळींत मिस सुसान बी.ॲन्टनी ही होती. एकाच वेळीं सुसान बी.ॲन्टनी आणि क्वीन व्हिक्टोरिया यांच्यासारख्या अद्वितीय स्त्रियांची भेट घेण्याची संधि एकाद्याला कचित् मिळते, या गोष्टीचा माझ्या मनावर बराच परिणाम झाला.

हाऊस आफ कामन्स येथे आम्ही बरेचदां गेलों. तेथे सर हेनरी एम. स्टानले यांची भेट झाली. आफ्रिका व आफ्रिकेचा अमेरिकन नीग्रो यांशी संबंध, या विषयावर त्यांचें व माझें भाषण झालें. अमेरिकन नीग्रो आफ्रिकेत जाऊन राहिले, तर त्यांची स्थिति सुधारण्याची कांहीं आशा नाहीं, असा त्यांच्या मुलाखतीनंतर माझा ग्रह झाला.

–अनेकदां आम्ही इंग्रज लोकांच्या गांवढ्यांतील घरीं पाहुणे या नात्यानें गेलो होतों. या ठिकाणींच इंग्रज लोकांची उत्तम रहाणी दृष्टीस पडते. निदान एका गोष्टींत तरी इंग्रज लोक अमेरिकनांच्या पुढे आहेत. ती गोष्ट ह्मटली म्हणजे आयुष्यांत अधिक सुख कसें प्राप्त करून घ्यावें, हें त्यांनां चांगलें समजतें. त्यांच्या घरची रहाणी परिणत अवस्थेला पोहोंचली आहे, असें मला वाटतें. यांचे प्रत्येक काम घड्याळाप्रमाणें चालतें. नोकरचाकर आपले धनी व धनीण यांनां फार मान देतात, आणि मोठ्या अदबीनें साहेब,' 'बाईसाहेब,' असें म्हणत असतात. हे शब्द अमेरिकन लोकांनां रुचणार नाहींत. इंग्रज नोकर, नोकरच राहूं इच्छितो, आणि यामुळे तो आपल्या कामांत इतका तरबेज होतो, कीं, कोणत्याहि अमेरिकन नोकराच्या हातून त्याची बरोबरी करवणार नाहीं ! अमेरिकेत नोकर कांहीं वर्षांनीं स्वतःच धनी होऊं इच्छितो. यांतील कोणती पद्धत चांगली, चें उत्तर देण्याचें धाडस मी करूं इच्छीत नाहीं.

इंग्लंडांत दुसऱ्या एका गोष्टीचा माझ्या मनावर चांगला संस्कार झाला. तेथें सर्व लोक कायदा व शिस्त यांनां फारच मान देतात. शिवाय, याठिकाणीं प्रत्येक गोष्ट निश्चितपणें व पूर्णपणें केली जाते. भोजनांत, तसेंच प्रत्येक गोष्टींत इंग्रज लोक बराच वेळ खर्च करितात, पण सरतेशेवटीं धांवपळ करणाऱ्या जोरदार अमेरिकनाएवढे त्यांच्या हातून काम होतें कीं नाहीं, याची मला शंका वाटते.

इंग्लंडांतील अमीरउमरावांविषयीं माझें मत पूर्वीपेक्षां अधिक चांगलें झाले. इंग्लंडांतील साधारण जनसमूह त्यांनां किती मान देतो व त्यांच्यावर किती प्रेम करितो, तसेंच परोपकाराकरितां व सत्कार्याकरितां ते आपला किती वेळ व पैसा खर्च करितात, आणि या कामीं ते कसे मन लावून काम करितात, याची मला कांहीं कल्पना नहव्ती. उलट, ते पाहिजे तसा आपला पैसा उधळतात आणि मजा मारितात, असा माझा ग्रह झालेला होता.

आत्मोद्धार.

इंग्लिश श्रोत्यांपुढे भाषण करून त्यांनां रंजविणें मला फार कठिण गेलें. साधारण इंग्लिशमन इतका गंभीर दिसतो, व प्रत्येक गोष्टीविषयी इतकी आस्था दाखवितो, की, ज्या गोष्टीनें अमेरिकन श्रोत्यांनां मी हंसवून सोडिलें असतें, तीच गोष्ट ऐकून इंग्रजांच्या तोंडावर हास्याची छटा यत्किंचितहि न येतां ते माझ्या तोंडाकडे एकसाखे पाहूं लागले.

एकदां इंग्लिशमनचा दृढ परिचय होऊन मैत्री जमली, ह्मणजे मग तो पोलादी बंधनांनीं तुह्मांला बांधून टाकितो. इंग्लिशमनच्या मैत्रीसारखी टिकाऊ व समाधानकारक दुसरी कोणतीहि मैत्री असेल, असे मला वाटत नाहीं. आतां एका प्रसंगाचें उदाहरण देऊन हें विधान मी अधिक स्पष्ट करतों. लंडन येथील स्टॅफर्डहाऊस नांवाच्या अत्युत्तम वाड्यांत सदरलंडचे ड्यूक व डचेस यांनीं एका स्वागताच्या प्रसंगीं मला व मिसेस वाशिंगटनला आमंत्रण दिलें होतें. सदरलंडची डचेस ही इंग्लंडांतील सर्व स्त्रियांत सुंदर आहे. सुमारें तीनशें लोक या स्वागताच्या वेळीं हजर असावेत. सायंकाळीं दोनदां डचेसनें मंडळींतून संभाषणासाठीं आह्मांला हुडकून काढिलें, आणि आह्मीं परत घरीं गेल्यावर पत्र लिहून 'टस्केजी संस्थेची आपण अधिक माहिती कळवावी,' असें आह्मांला सांगितलें, व मींहि त्याप्रमाणें केलें. नाताळ आल्याबरोबर तिनें आपली सही करून आपला एक फोटो आह्मांला पाठविला. तिचा व आमचा पत्रव्यवहार हली चालू आहे, आणि सदरलंडची डचेस आमच्या उत्तम स्नेह्यांपैकींच एक आहे असें आह्मी समजतों.

तीन महिने यूरोपांत काढिल्यावर 'सेंट लुईस' जहाजांत बसून साऊदम्पटन येथून आह्मी परत निघालों. लुईस शहरच्या नागरिकांनी बक्षीस दिलेलें एक सुंदर वाचनालय जहाजावर होतें. या वाचनालयांत फ्रेडरिक डगलस यांचे चरित्र मला मिळालें. मीं तें वाचण्यास सुरू केलें. इंग्लंडच्या आपल्या पहिल्या व दुसऱ्या सफरींत जहाजावर आपणाला कसें वागविलें, याविषयींचें या पुस्तकांत मिस्तर डगलसनी दिलेलें वर्णन मी काळजीने वाचिलें. आपणाला गलबतावरील खोलीत येऊ देत नसत,---

डेकवरच-नौका पृष्ठावरच - रहावें लागे, असें त्यांनी लिहिलें होतें.

हे वर्णन वाचून झाल्यावर कांहीं मिनिटांनीं बोटावरील स्त्रीपुरुषांची एक कमिटी माझ्यापाशीं आली, आणि कमिटींतील मंडळी संध्याकाळीं होणाऱ्या जलशाच्या वेळीं मीं भाषण करावें, अशाविषयीं मला विनंति करूं लागली. अशी स्थिति असतांहि अमेरिकेंत वर्णद्वेष कमी प्रखर होत चालला नाहीं, असें धाष्टर्थानें ह्मणणारे लोक आहेत ! या जलशाच्या प्रसंगीं, ऑनरेबल बेंजामिन वी. ओडेल, न्यूयॉर्कचे हलींचे गव्हरनर हे अध्यक्ष होते. माझें भाषण दुसऱ्या कुठल्याहि लोकांनीं या येथील लोकांइतकें मनापासून ऐकून घेतलें नसेल! उतारूंपैकीं कांहींनीं टस्केजी संस्थेच्या मदतीसाठीं वर्गणी जमवावी अशी सूचना आणिली, आणि कांहीं स्कालरशिपांची रक्कमहि जमा झाली. पारिसमध्यें असतांना वेस्ट व्हर्जीनियांतील रहिवाशांकडून, आणि जेथें मीं माझे बालपणाचे दिवस काढिले होते त्या शहरच्या लोकांकडून खाली दिलेलें आमंत्रणपत्र आलेलें पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

" चार्ल्सटन, १६ मे, १८९९.

प्रोफेसर बुकर टी. वाशिंगटन, पारिस फ्रान्स, यांसी-

-प्रिय महाशय ! वेस्ट व्हर्जीनियांतील पुष्कळ उत्तमरहिवाशांनीं आपली - योग्यता व कामगिरी याबद्दल आपलें कौतुक व स्तुति केली आहे, आणि आपण यूरोपाहून परत आल्यावर त्यांनां आपले स्फूर्तिदायक शब्द ऐकवून आपल्या आगमनानें धन्य करावें, अशी त्यांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली आहे. आह्मांला ही योजना फार पसंत आहे, आणि चार्ल्सटनच्या नागरिकांतर्फे आह्मी आपणाला असें आमंत्रण देतों, की, आपल्या आयुष्यांतील कामगिरीनें ज्यांनां तुह्मीं बराच मान दिला आहे, त्या आह्मांमध्ये आपलें आगमन झाल्यास आपला योग्य सत्कार करण्याची संधि आह्मांला मिळून आह्मीं कृतार्थ होऊं.

आपले,

चार्ल्सटन शहराचे कॉमन कौंसिल
डब्ल्यू. हरमन स्मिथ, मार्फत."

आत्मोद्धार,

या आमंत्रणपत्राबरोबर खाली दिलेलें पत्रहि होतें:-

"प्रोफेसर बुकर टी. वाशिंगटन, पारिस फ्रान्स, यांसी-

महाशय । आम्ही चार्ल्सटन व वेस्टव्हर्जिनिया येथील रहिवासी आपणाला असें कळवितों, की, आपली कारकीर्द व आपण केलेली कामगिरी यांबद्दल आम्हांला फार अभिमान वाटतो, आणि योग्य रीतीने आमचा अभिमान व सहानुभूति व्यक्त करण्याची संधि आपण आम्हांला यावी, अशी आम्ही आपणापाशी मागणी करितों.

आपण यूरोपास जाण्यापूर्वी आपल्या जुन्या घरी आला होता; पण त्यावेळी आपले चार शब्द ऐकावयाला आणि आपल्या कार्याला कांही योग्य मदत करावयाला संधि मिळाली नाहीं, याबद्दल आम्हांला फार वाईट वाटते.

याकरितां आपण यूरोपहून परत आल्यावर आमच्या शहरवासियांचा पाहुणचार स्वीकारावा, आपलें भाषण आम्हांला ऐकवावें व आपल्या कार्याला समाधानकारक रीतीनें हातभार लावण्याची संधि आम्हांला मिळून आपल्या आगमनापासून व भाषणांपासून आम्हांला योग्य स्फूर्ति व्हावी, म्हणून आम्ही मोठ्या कळकळीने आपणाला आमंत्रण देतो.

आपलें आगमन येथे केव्हां होईल यांविषयींच्या आगाऊ सूचनेचे पत्रोत्तर लवकर आल्यास आपले फार उपकार होतील.

आपले-

चार्ल्सटन डेली गॅझीट; डेली मेल दिब्यून; जी. डब्ल्यु. अटकीनसन, गव्हरनर; इ. एल. बाग्झ, गव्हरनरचे सेक्रेटरी; डब्ल्यु. एम. ओ. डासन, सेकेटरी ऑफ स्टेट; एल. एम. ला फालेटी, आडीटर; जे. आर. ट्राटर, शाळांचे सुपरिंटेंडेट; इ. डब्ल्यु. विल्सन, पूर्वीचे गव्हरनर; डब्ल्यु. ए. मॅक कारकल, पूर्वीचे गव्हरनर; जान क्यू. डिकिनसन, कनाव्हा व्हॅली बैंकचे प्रेसिडेंट; एल. प्रिचर्ड, चार्स्सन नॅशनल बँकचे प्रेसिडेंट जी. एस. काऊच, कनाव्हा नॅशनल बँकचे अध्यक्ष; इ. रीड, कन्हाचा नॅशनल बैंकचे कॅशियर; जी. एस. लेडली, सिटी स्कूल सुपरिटेंडंट,एल.व्ही. मॅकव्हार्टर

, बोर्ड आफ एज्युकेशनचे प्रेसिडेंट; सी. के. पेन, व्यापारी आणि इतर- "

मीं ज्या शहरांत माझें बाळपण घालविलें, आणि ज्या शहरांतून अज्ञानी, गरीब व अजाणता असा विद्यार्जनासाठीं बाहेर पडलों, त्या शहरचें सिटिकौंसिल, सरकारी कामदार आणि दोन्ही ज्ञातींमधील प्रमुख गृहस्थ, यांच्याकडून आलेलें हें आमंत्रण पाहून मला फार आश्चर्य वाटलें. एवढेच नव्हे, तर माझी मति अगदीं गुंग होऊन गेली. इतका मान मिळण्यासारखें मीं केलें आहे काय, हें मला समजेना !

मीं आमंत्रण स्वीकारिलें आणि नेमिलेल्या दिवशीं दोन्ही ज्ञातींतील लोक जिच्यामध्ये आहेत व डब्ल्यु.ए. मॅक कारकल, पूर्वीचे गव्हरनर हे जिचे मुख्य आहेत, अशा कमिटीनें चार्ल्सटन स्टेशनवर माझें स्वागत केलें. चार्ल्सटन येथील ऑपराहाऊसमध्यें माझें सार्वजनिक स्वागत झालें. संस्थानचे गव्हरनर, ऑनरेबल जार्ज डब्ल्यु. ॲटकिनसन हे या प्रसंगीं अध्यक्ष होते. या समयीं स्वागतपर भाषण गव्हरनर मॅक कारकल यांनीं केलें. काळ्या लोकांनींहि स्वागतांत बराच भाग घेतला होता. नाटकगृह दोन्ही ज्ञातींच्या लोकांनीं गच्च भरून गेलें होतें, आणि ज्यांच्या घरीं मीं लहानपणीं काम केले होते, असे बरेचजण गोऱ्या लोकांत होते. दुसऱ्या दिवशीं गव्हरनर आणि त्यांची पत्नी मिसेस ॲटकिनसन यांनीं सरकारी राजवाड्यांत माझें स्वागत केलें. या प्रसंगींहि सर्व जातीचे लोक हजर होते.

यानंतर कांहीं दिवसांनीं, जॉर्जिया संस्थानांतील ॲटलांटा येथील काळ्या लोकांनीं माझें स्वागत केलें, व यावेळीं त्या संस्थानचे गव्हरनर अध्यक्ष होते. त्याप्रमाणेंच न्यू आरलीन्स येथेहि माझें स्वागत झाले व त्यावेळीं तेथील मेयरनीं अध्यक्षस्थान स्वीकारिलें होतें. याच समयाला दुसऱ्या पुष्कळ ठिकाणांहून आमंत्रणें आलीं होतीं, पण तीं मला स्वीकारितां आलीं नाहींत.

प्रकरण सतरावें.

शेवटचे शब्द.

युरोपला जाण्याच्या पूर्वी माझ्या आयुष्यांत कांहीं आश्चर्यकारक गोष्टी घडून आल्या. खरोखर माझें सबंध आयुष्य ह्मणजे बहुतेक आश्चर्यकारक गोष्टींची खाणच होय. जो कोणी आपल्या आयुष्यांतील प्रत्येक दिवस उत्तम रीतीनें घालविण्याचा, ह्मणजे शुद्ध, निष्काम आणि उपयुक्त अशा परोपकारांत खर्च करण्याचा शक्य तितका प्रयत्न करितो, त्याचें आयुष्य नेहमीं अशा प्रकारच्या अकल्पित आणि उत्तेजक गोष्टींनी भरून जाईल, असें मला वाटतें. अन्य प्राण्याला अधिक सुखी किंवा अधिक उपयुक्त करण्याच्या प्रयत्नानें प्राप्त होणारा आनंद किंवा तृप्ति ज्यानें अनुभविली नाहीं, अशा काळ्या किंवा गोऱ्या मनुष्याची मी कीवच करितों.

मरणापूर्वी सहा महिने आणि पक्षघाताचा विकार जडण्यापूर्वी एक वर्ष, आपण इहलोक सोडून जाण्याच्या अगोदर, टस्केजी संस्था पुनः पहावी अशी इच्छा जनरल आर्मस्ट्रॉंग यांनीं प्रदर्शित केली. या समयाला, त्यांची सर्व इंद्रियें इतकी गलित झालीं होती, कीं, ते बहुतेक अंशी दुबळेच झाले होते, असें ह्मटल्यास हरकत नाहीं. तरीपण, त्यांच्या इच्छेला मान देण्यांत आला आणि त्यांनां टस्केजींत आणण्यांत आलें. यावेळी टस्केजी रेलवे कंपनीच्या, गांवांत रहाणाऱ्या गोऱ्या मालकांनी, चेहॉ नामक मुख्य स्टेशनापर्यंत एक स्पेशल ट्रेन मोफत सोडण्याचें कबूल केलें. रात्री सुमारें नऊ वाजतां ते संस्थेत आले. देवदार लांकडाच्या दिवट्यांनी जनरलचें स्वागत करावें, असें एकानें सुचविलें. ही सूचना मान्य करण्यांत आली, आणि त्यांची गाडी शाळेत आल्यावर हजारों विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनीं दोन्ही बाजूंला धरलेल्या देवदारूंच्या दिवट्यांच्या उजेडामधून त्यांनां जावें लागलें. हें सर्व कांहीं इतकें अपूर्व आणि आश्वर्यकारक झाले, कीं, जनरलला त्या योगानें अत्यानंद झाल्याचे दिसून आलें.

शेवटचे शब्द.

पुढें ते, पाहुणे या नात्यानें माझ्या घरी दोन महिने राहिले. यावेळीं ते जरी बहुतेक अंशीं दुबळे झाले होते व त्यांनां बोलतांहि येत नव्हतें, तरी दक्षिणेतील लोकांनां मदत करण्यासाठीं उपाय आणि मार्ग शोधण्यामध्ये त्यांनीं आपला सर्व वेळ खर्च केला. या भेटींत पुष्कळदां मला ते ह्मणाले, कीं, दक्षिणेंतील नीग्रोंचीच उन्नति करण्यास मदत करणें एवढेंच देशाचें कर्तव्य नसून, गौरवर्ण गरीब लोकांनांहि मदत करणें हें आपलें कर्तव्यकर्म होय. त्यांची भेट झाल्यानंतर त्यांनां सर्वस्वीं प्रिय असलेल्या कार्याला वाहून घेण्याचा मीं नवीन निश्चय केला. त्यांच्यासारख्या स्थितींत असलेल्या मनुष्याला जर विचार करितां येतो, काम करितां येतें आणि आपल्या मनाप्रमाणें वागतां येतें, तर त्यांच्या आवडत्या कामाला शक्य तितकी मदत करण्यास मीं मागें पुढे पाहूं नये, असा मीं माझ्या मनांत विचार केला.

कांहीं आठवड्यांनीं जनरल आर्मस्ट्रांग इहलोक सोडून गेले, तेव्हां आणखी एका उदार, परोपकारी व अत्युत्तम व्यक्तीची ओळख होण्याचा प्रसंग मला आला. ही व्यक्ति ह्मणजे जनरल ऑर्मस्ट्रांगच्या जाग्यावर आलेले हाम्पटन संस्थेचे प्रिन्सिपाल रेव्हरंड डॉक्टर हॉलीस बी. फ्रिसेल हे होत. डॉ. फ्रिसेल यांच्या बालबोध, जोरदार व दक्षतेच्या नेतृत्वाखालीं हॉम्पटन संस्थेची भरभराट आणि उपयुक्तता जनरल ऑर्मस्ट्रांगच्या इच्छेप्रमाणें एकसारखी अधिकाधिक वाढत चालली आहे. आपलें मोठें व्यक्तित्व जनरल आर्मस्ट्रांगच्या व्यक्तित्वामागें लपविण्याचा-संस्थेच्या कार्यार्थ आपलें नांव न होऊं देण्याचा-डॉ. फ्रिसेलचा एकसारखा प्रयत्न चाललेला असतो.

माझ्या आयुष्यांत अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट कोणती घडून आली, असें मला पुष्कळदां विचारण्यांत आलेलें आहे. याचें उत्तर देण्यास मला कांहीं आशंका वाटत नाहीं. ती गोष्ट ही, कीं, तीन मुलें आणि माझी पत्नी यांसहित मी माझ्या घराच्या कट्ट्यावर बसलों असतांना एका रविवारीं सकाळीं पुढें दिलेलें पत्र मला आलें.

"हारवर्ड युनिव्हर्सिटी, केंब्रिज,
ता. २८ मे, १८९६.

प्रेसिडेंट बुकर टी. वाशिंग्टन, यांसी-

प्रिय महाशय ! येत्या पदवीदानाच्या प्रसंगी आपणाला एक बहुमानाची पदवी यावी, अशी हारवर्ड युनिव्हर्सिटीची इच्छा आहे. पण हजर असलेल्या गृहस्थांनांच पदवी देण्याची आमची वहिवाट आहे. आमचा पदवीदानसमारंभ ता. २४ जून रोजी आहे. त्यादिवशी दुपारी बारा वाजल्यापासून सायंकाळीं पांच वाजेपर्यंत आपण हजर रहावें. ता. २४ रोजी आपण केंब्रिजमध्यें असाल काय?

आपला चार्ल्स. डब्यु. इलियट,
प्रेसिडेंट हारवर्ड युनिव्हर्सिटी."

असा मान मला कधींकाळीं मिळेल, असें माझ्या स्वप्नीहि नव्हते! आणि अमेरिकेंतील अत्यंत जुन्या व प्रख्यात विश्वविद्यालयाकडून मला बहुमानाची पदवी मिळणार, हें मला खरें वाटेना. हें पत्र हातांत घेऊन मी कट्ट्यावर बसलों असतां माझ्या डोळ्यांत अश्नु आले. माझे पूर्वीचे सर्व आयुष्य - मळ्यांतील गुलामाचें काम, कोळशाच्या खाणीतील काम, अन्नवस्त्रांशिवाय काढिलेले दिवस, रस्त्याखालीं निजून घालविलेली रात्र, शिक्षणाविषयीं केलेली धडपड, टस्केजी येथील प्रथमचे आणीबाणीचे प्रसंग, ती संस्था चालू ठेवण्यास एकादा डालर कोठून मिळेल या चिंतेंत काढलेले दिवस, माझ्या ज्ञातीचा बहिष्कार व छळ, हें सर्व चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें, आणि त्यानें मला व्याकुळ करून सोडिलें.

मीं कीर्तीची पर्वा केलेली नाहीं किंवा तिच्या मागें लागलों नाहीं. नांव किंवा कीर्ति ह्मणजे लोकांचें कल्याण करितां येण्याचें एक साधन आहे, असें मी नेहमीं समजत आलों आहे. मला जो कांहीं मान अगर मोठेपणा—---

–मिळाला असेल, त्यानें जर दुसऱ्यांचें हित मला साधितां येईल, तरच मला त्यांत संतोष आहे, असें मीं पुष्कळदां माझ्या मित्रांनां बोलून दाखविलें आहे. संपत्तीप्रमाणें मानाचा उपयोग दुसऱ्याच्या कल्याणाकरितांच होत असेल, तर तो मला हवा आहे. श्रीमंत लोकांशीं जसजसा माझा परिचय अधिक वाढत आहे, तसतसें पैसा ह्मणजे दुसऱ्यांचें हित करण्याकरितां आपल्या हातीं ईश्वरानें दिलेलें एक साधन आहे, अशी त्यांच्या मनाची प्रवृत्ति दिवसेंदिवस होत चालली आहे, असें मला अधिकाधिक वाटत आहे. टस्केजीसंस्थेला पुष्कळदां मदत केलेल्या मिस्टर जॉन डी. रॉकफेलर यांच्या ऑफिसांत मी गेलों कीं, मला माझ्या वरील विधानाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. आपला प्रत्येक डालर सत्कार्यी लावावा ह्मणून ते अतिशय बारकाईनें व काळजीनें तपासणी करीत असतात. जणू काय एकाद्या उद्योगधंद्यांत ते आपलें भांडवलच घालीत आहेत ! असा प्रकार पाहून श्रीमंतांची होत असलेली ही प्रवृत्ति फारच समाधानकारक आहे, असे वाटल्यावांचून राहवत नाहीं.


जूनच्या २४ तारखेला सकाळीं नऊ वाजतां मी प्रेसिडेंट इलियट, हारवर्ड युनिव्हर्सिटीच्या ओव्हरसिअरचें मंडळ आणि इतर पाहुणे यांनां युनिव्हर्सिटींत नेमलेल्या ठिकाणीं जाऊन भेटलों. येथून आम्ही सर्वजण पदवीदानाच्या समारंभासाठीं सांडर्स थिएटरांत जाणार होतों. जनरल नेलसन, ए. माईल्स, डॉक्टर बेल-बेल टेलिफोनचे शोधक' बिशप व्हिनसेंट आणि रेव्हरंड मिनॉट जे. सॅव्हेज यांनांहि यावेळी पदवीदानाकरितां बोलाविलेलें होतें. प्रेसिडेंट व ओव्हरसिअरचें मंडळ यांच्या पाठीमागें आम्हांला उभें केलें. लगेच मॅसॅच्युसेटसचे गव्हरनर, भालेकऱ्यांच्या लवाजम्यासहित आले, आणि प्रेसिडेंट इलियट यांच्या बाजूला उभे राहिले. दुसरे कामगार आणि प्रोफेसर, टोप्या व झगे घालून मागें चालू लागले. अशा थाटानें आम्ही सांडर्स थिएटरांत आलों. सुरुवातीचा - कांहीं कार्यक्रम आटोपल्यावर पदवीदानाचा समारंभ सुरू झाला. हारवर्ड-मध्ये हा एक मोठा उत्सव दिन मानितात. बहुमानाच्या पदव्या कोणाल—--

–देणार, हे, त्या त्या गृहस्थांचे आगमन होईपर्यंत कोणालाहि कळत नाहीं: आणि ज्या मानानें पदवी मिळणारा मनुष्य लोकप्रिय झालेला असेल, तितका अधिक त्याचा जयघोष विद्यार्थ्यांकडून आणि इतरांकडून होतो. पदव्या देतांना लोकांच्या उत्तेजनाला आणि उत्साहाला एकसारखा उत येत असतो.

जेव्हां माझें नांव पुकारण्यांत आलें, तेव्हां मी उठून प्रेसिडेंट इलियट यांच्याजवळ गेलो. त्यांनीं आपल्या सुंदर व जोरदार इंग्रजी शब्दांनी मला 'मास्टर ऑफ आर्टस'ची पदवी दिली. पदवीदानाचा समारंभझाल्यावर बहुमानाची पदवी मिळालेल्या गृहस्थांनां प्रेसिडेंटबरोबर उपहार करण्याचें आमत्रंण होतें. उपहारानंतर पुनः आम्ही ओळीनें उभे राहिलो. नंतर आह्मांला या वर्षाच्या समारंभाचे व्यवस्थापक (मार्शल) बिशप वुइल्यम लारेन्स यांनी युनिव्हर्सिटीच्या जाग्यांतून फिरविलें. वाटेत ठिकठिकाणीं पदव्या मिळालेल्या गृहस्थांचें नांव घेऊन हारवर्डच्या लोकांनीं जयघोष केला. आम्ही मेमोरियल हॉलमध्ये येऊन थांबलो. येथे सर्व विद्यार्थ्यांचा भोजनसमारंभ चालला होता. आपल्या कॉलेजबद्दलच्या अभिमानाच्या व प्रेमाच्या उत्साहानें व तेजानें प्रफुलित झालेले, राज्यखातें, धर्मखातें, व्यापारखातें व शिक्षणखातें या सर्व खात्यांमधील हजारों अत्युत्तमं लोक एकत्र पाहण्यास मिळण्याचा देखावा हारवर्ड येथेच दृष्टोत्पत्तीला येतो, व तो स्मृतिपटांतून लवकर नाहींसा होत नाहीं !

भोजनोत्तर प्रेसिडेंट इलियट, गव्हनर रोजर वोलकॉट, जनरल माइल्स, डॉक्टर मिनॉट जे. सॅव्हेज, ऑनरेबल हेनरी केबट लॉज यांची भाषणें होऊन माझेंहि भाषण झालें. माझ्या भाषणांतील कांहीं मुख्य भाग खालीं दिल्याप्रमाणें होताः -

"आपण आज जो माझा सन्मान केला आहे, त्याला मी थोड्याशा अंशानें कां होईना, पात्र आहें असें मला वाटल्यास, माझे मन कांहीं अंशीं हलकें होईल, असे मला वाटतें. दक्षिणेतील कृष्णकटिबंधांतून-माझ्या गरीब लोकांमधून याप्रसंगी पदवी स्वीकारण्यास आपण मला—-



टस्केजी येथील विद्यार्थिनी बगीच्यांत काम करीत आहेत.

शेवटचे शब्द-

—कां बोलाविले आहे, हें सांगत बसण्याचें मला प्रयोजन नाहीं; पण, याविषयीं एक गोष्ट मीं सुचविली असतां ती अप्रासंगिक व अयोग्य होणार नाहीं, असें मला वाटतें. 'विद्वान्, श्रीमंत व सशक्त लोकांनां आणि अतिशय गरीब, अशिक्षित व नीच लोकांनां एकत्र कसें आणावें, या दोन्ही लोकांमध्यें परस्पर दळणवळण वाढून एकाच्या उदाहरणानें दुसऱ्यानें आपली उन्नति कशी करून घ्यावी,' हा आज अमेरिकन लोकांपुढें मुख्य प्रश्न आहे. पलीकडील बीकन स्ट्रीटवरील मोठमोठ्या हवेल्यांतील श्रीमंतांनां, अलाबामा येथील कापसाच्या मळ्यांतील व लुसियाना येथील उसाच्या मळ्यांतील झोंपडीत राहणाऱ्या अत्यंत गरीब लोकांच्या गरजा कशा कळतील, हाच तो प्रश्न आहे. खालच्या लोकांनां वर आणून त्यांची उन्नति करून–आपण खालीं न जातां वरील प्रश्न आज हारवर्ड - युनिव्हर्सिटी सोडवीत आहे.

"माझ्या गत आयुष्यांत मी माझ्या ज्ञातिबांधवांनां वर आणण्याची कांहीं खटपट केली आहे, व आपल्या व माझ्या ज्ञातींतील लोकांचे परस्पर संबंध अधिक चांगले असावेत अशाविषयीं कांहीं यत्न माझ्या हातून झाला आहे असें आपणांला वाटत असेल, तर मी आपणांला अशी खात्री देतों, कीं, आजपासून मी या कामीं दुप्पट प्रयत्न करीन ! ईश्वराच्या राज्यांत कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा ज्ञातीच्या यशाचें एकच माप आहे. अमेरिकन मापानें-कसोटीनें प्रत्येक ज्ञातीनें आपली योग्यता मापून घ्यावी, अशी या देशाची स्थिति आहे. कोणतीहि ज्ञात खालावली आहे, कीं, वर गेली आहे, तिला यश आलें आहे, कीं, नाहीं, हें या कसोटीनेंच सिद्ध होणार. नुसती इच्छा किंवा आशय यांचे शेवटीं फारसे महत्त्व राहणार नाहीं. पुढील पन्नास आणि त्याहून थोड्याशा अधिक वर्षांत माझ्या ज्ञातीला या कठिण अशा अमेरिकन कसोटींतून गेलें पाहिजे सहिष्णुता, तितिक्षा, सततोद्योग, दुःखसहनशीलता, मोहपराङ्मुखत आणि मितव्यय, वगैरे सर्व गोष्टींत यश मिळविणें, वरपांगी भपक्याल मुलून न जातां खरें व अंतरंग यांचाच स्वीकार करणें, विद्वान् होऊन—

—साधेपणा आणि विनयशीलता संपादन करणे, श्रेष्ठता मिळवून सर्वांचा सेवक होणें, इत्यादि सर्व गोष्टींत आमची पारख अद्यापि व्हावयाची आहे.

अमेरिकन युनिव्हर्सिटीनें एकाद्या नीग्रोला बहुमानाची पदवी दिलेला हा पहिलाच प्रसंग असल्यामुळे, सर्व देशभर याविषयी वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा झाली. न्यूयॉर्कमधील एका वर्तमानपत्राच्या बातमीदाराने यासंबंधीं असें लिहिलें, कीं,

"ज्यावेळीं बुकर. टी. वाशिंग्टनचें नांव पुकारिलें आणि ते जेव्हां हा मान घ्यावयाला उभे राहिले, त्यासमयीं टाळ्यांचा मोठा गजर झाला. लोकप्रिय सोल्जर देशभक्त जनरल माइल्स खेरीजकरून अशी वाहवा यावेळपर्यंत दुसऱ्या कोणाचीहि झालेली नव्हती ! नुसती सहानुभूति दाखवावी ह्मणून, किंवा आधीं शिकवून ठेविलें होतें ह्मणून, लोकांनीं जुलुमानें टाळ्यांचा गजर केला नसून, मोठ्या सानंदाश्चर्यानें आणि उत्साहानेंच त्यांनीं तो केला. खालच्या मजल्यापासून तों तहत वरच्या ग्यालरीपर्यंत सर्व श्रोते या गजरांत सामील झाले, आणि त्यांच्या सभोंवार असलेल्या लोकांच्या तोंडावर आरक्त छटा दिसूं लागली. पूर्वी गुलाम असलेल्या एका व्यक्तीनें चालविलेले प्रयत्न आणि त्या व्यक्तीने आपल्या लोकांकरितां केलेली कामगिरी, यांचें खरेखुरें महत्त्व लोकांनी जाणिलें, असें यावरून सिद्ध होतें."

बोस्टन येथील एका वर्तमानपत्रांत खालील संपादकीय लेख आलाः -

"टस्केजी संस्थेचे प्रिन्सिपाल यांनां 'मास्टर ऑफ आर्ट्स' ही पदवी देण्यांत हारवर्ड युनिव्हर्सिटीनें त्यांचा व आपला असा दोघांचाहि मान करून घेतला आहे. दक्षिणेंत आपल्या ज्ञातीच्या लोकांनां शिक्षण देऊन त्यांनां चांगले नागरिक बनविण्याची आणि त्यांची उन्नति करण्याची जी कामगिरी प्रोफेसर बुकर टी. वाशिंग्टन यांनीं केलेली आहे, त्यावरून ते राष्ट्रहितकर्त्यांपैकी एकजण आहेत, असें ठरतें. योग्य रीतीनें शिक्षणक्रम पुरा करून पदवी मिळविलेल्या किंवा बहुमानाची पदवी मिळालेल्या सुपुत्रांत अशा व्यक्तीचें नांव दाखल करून घेण्यामध्यें हारवर्ड युनिव्हर्सिटीला अभिमान वाटला पाहिजे.

शेवटचे शब्द.

“मिस्टर वॉशिंग्टन हे अमेरिकन युनिव्हर्सिटीकडून बहुमानाची पदवी मिळालेले आपल्या जातींत पहिलेच गृहस्थ आहेत, असें सांगण्यांत आलेलें आहे. हाहि एक मानच आहे. मिस्टर वॉशिंग्टन हे काळ्या वर्णाचे आहेत, किंवा त्यांचा जन्म दास्यांत झालेला आहे, म्हणून त्यांनां ही पदवी दिलेली नसून, दक्षिणभागच्या कृष्ण कटिबंधांतील आपल्या लोकांची उन्नति करण्यांत त्यांनी जें कांहीं अचाट बुद्धिसामर्थ व दीनवात्सल्य दाखविलें, त्याबद्दलच त्यांनां हा बहुमान मिळालेला आहे. या दोन गोष्टी असल्या म्हणजे, कोणताहि मनुष्य-मग त्याची कातडी गोरी असो वा काळी असो-मोठा होतो."

बोस्टनयेथील दुसऱ्या एका वर्तमानपत्रानें पुढीलप्रमाणें लिहिलेंः -

"अमेरिकेमध्यें हारवर्डनेंच प्रथम एका काळ्या मनुष्याला बहुमानाची पदवी दिली. टस्केजी संस्थेची कामगिरी आणि इतिहास ज्यानें पाहिला आहे, त्याला बुकर टी. वॉशिंग्टन यांचें धैर्य, दृढोद्योग आणि उत्तम व्यावहारिक ज्ञान यांविषयीं कौतुक वाटल्यावांचून राहणार नाहीं. एके काळीं गुलाम असलेल्या या मनुष्याचा हारवर्डनें सन्मान केला हें ठीकच झाले; पण यांनीं आपल्या ज्ञातीकरितां व देशाकरितां केलेल्या कामगिरीचें महत्त्व भविष्यकालांत ठरणार आहे."

न्यूयॉर्क टाईम्सच्या बातमीदारानें असें लिहिलें:-

" सर्व भाषणें लोकांनां आवडलीं; पण त्या काळ्या मनुष्याला वक्तृवातहि बहुमान मिळाला. त्याचें भाषण संपल्यावर टाळ्यांचा गजर एकसारखा बराच वेळ आणि जोरानें चालला होता."

टस्केजी येथे काम सुरू केल्यावर मी माझ्या मनांत असा निश्चय केला होता, कीं, मी आमच्या शाळेची इतकी सुधारणा करणार, आणि देशाला तिची इतकी उपयुक्तता वाढविणार, कीं, युनायटेडस्टेट्स् चे प्रेसिडेंट हे एके दिवशीं आमची शाळा पाहण्यास येतील ! हा बराच धाडसी व अविचाराचा निश्चय होता, हे मी कबूल करितों. हा माझा निश्चय कित्येक वर्षेपर्यंत कोणालाहि न सांगतां मीं तो गुप्त ठेविला होता.

आत्मोद्धार.

१८९७ च्या नोवेंबर महिन्यांत या बाबतींत मीं प्रथम प्रयत्न केला, आणि प्रेसिडेंट मॅक् किनले यांच्या मंत्रिमंडळापैकी शेतकी खात्याचे सेक्रेटरी ऑनरेबल जेम्स वुइलसन यांनां मी शाळा पाहण्यास आणिलें. शेतकी आणि त्यासारखे दुसरे विषय यांचें शिक्षण देण्याकरितां बांधलेल्या 'स्लेटर आर्मस्ट्रांग' नांवाच्या इमारतीच्या अनावरणसमारंभाच्या वेळीं कांहीं प्रास्ताविक भाषण करावें, या हेतूनें त्यांनां येथें आणिलें होते.

स्पॅनिश-अमेरिकन युद्धाचा शेवट चांगल्या रीतीनें झाला आणि त्यानंतर झालेल्या तहासंबंधी देशांत जिकडेतिकडे उत्सव सुरू झाले. जॉर्जियांतील अटलांटा येथे होणाऱ्या उत्सवांतील कांहीं भागांत सामील होण्यासाठीं प्रेसिडेंट मॅक् किनले हे अटलांटा येथे येणार आहेत, असें मीं १८९८ सालच्या शरद्तूंत ऐकिलें होतें. यावेळी राष्ट्राला उपयुक्त होईल अशी संस्था निर्माण करण्यांत इतर शिक्षकांबरोबर मी एकसारखा अठरा वर्षे खपत होतों. मंत्रिमंळासहित प्रेसिडेंटला शाळा पाहण्यास आणण्यासाठीं प्रयत्न करण्याचा मीं निश्चय केला. मी वॉशिंग्टनला गेलों आणि प्रेसिडेंटच्या 'श्वेतमंदिरा'ची वाट' घरिली. तेथे जातांच पुष्कळ लोक दिवाणखान्यांत वाट पहात बसले आहेत असें मला आढळलें, आणि आज निदान प्रेसिडेंटची भेट होणार नाहीं, असें मला वाटूं लागलें; पण कसेंहि करून प्रेसिडेंटचे सेक्रेटरी मिस्टर जे.ॲडीसन पोर्टर यांची मीं गांठ घेतली, आणि माझें काम त्यांनां समजावून सांगितलें. तत्काळ मिस्टर पोर्टर यांनीं माझी चिठी मेहरबानीनें प्रेसिडेंटकडे थेट पाठविली, आणि माझी भेट घेणार असा लगेच त्यांच्या कडून निरोप आला.

सर्व तऱ्हेच्या इतक्या लोकांच्या भेटी घेणें, त्यांचीं कामें ऐकून घेणे, व स्वतः कसून काम करणें, इतकें सर्व करूनहि शांत, स्थिर व ताजेतवाने राहणें, हें सर्व प्रेसिडेंट मॅक् किनले यांनां कसें साधतें, याचा कांहीं मला उलगडा होईना ! माझी भेट झाल्यावर देशहितार्थ चालविलेल्या —

—टस्केजी येथील आमच्या कामगिरीबद्दल प्रेसिडेंटसाहेबांनीं माझे आभार मानिले. नंतर मी माझ्या भेटीचा उद्देश त्यांनां थोडक्यांत सांगितला. राष्ट्रांतील मुख्य अधिकाऱ्याच्या प्रेसिडेंटाच्या--आगमनानें आमचे विद्यार्थी व शिक्षक यांनांच नव्हे, तर सबंध ज्ञातीला उत्तेजन च मदत मिळेल, असें मी त्यांच्या मनावर बिंबविलें. त्यांनीं त्यासरशीं कांहींसें अगत्य दाखविलें, पण टस्केजीला येण्याचें वचन दिलें नाहीं. कारण, अटलांटा येथे जाण्याचा त्यांचा बेत अद्याप नक्की झाला नव्हता. कांहीं आठवड्यांनंतर ही गोष्ट पुनः आपल्या नजरेला आणावी, असें त्यांनीं मला सांगितलें.

पुढील महिन्याच्या मध्यभागीं, प्रेसिडेंटनीं अटलांटा येथील तहाच्या जुबिलीला येण्याचें नक्की ठरविलें. मी पुनः वॉशिंग्टन येथे गेलों आणि टस्केजीपर्यंत त्यांनीं यावें हमणून त्यांची भेट घेतली. या दुसऱ्या खेपेला टस्केजीचे एक प्रमुख गोरे गृहस्थ मिस्टर चार्ल्स डब्ल्यु. हेअर यानीं माझ्याबरोबर प्रेसिडेंटच्या भेटीला येण्याचें आणि टस्केजींतील रहिवाशांच्या आणि आसपासच्या गोऱ्या लोकांच्या तर्फेनें आमच्या आमंत्रणाला दुजोरा देण्याचें कबूल केलें.

दुसऱ्या खेपेला वॉशिंग्टन येथे मी जाण्यापूर्वी दक्षिणेंत कांहीं ठिकाणीं ज्ञातीज्ञातींचे दंगे झाले होते. त्यामुळे देशांत सर्वत्र गडबड उडाली होती, आणि काळे लोक फार उदासीन झाले होते. मीं प्रेसिडेंटची गांठ घेतल्याबरोबर त्यांचें अंतःकरण या ज्ञातिविषयक दंग्यांमुळे फार त्रस्त झालें आहे, असें मला दिसलें. दुसरे पुष्कळ लोक त्यांच्या भेटीची वाट पहात होते, तरी आमच्या ज्ञातीची स्थिति आणि भावी आशा याविषयीं बोलणें लावून त्यांनीं मला बराच वेळ ठेवून घेतलें. आमच्या ज्ञातीविषयी आपली आस्था व श्रद्धा नुसत्या शब्दांनी नव्हे, तर कृतीनें दाखविण्याचा आपण संकल्प केला आहे, असे त्यांनीं पुष्कळ वेळां बोलून दाखविलें. राष्ट्राचे प्रेसिडेंट हे नीग्रोसंस्था पाहण्यासाठीं आपला रस्ता सोडून १४० मैल दूर मुद्दाम येणार आहेत,

आत्मोद्धार.

या एका गोष्टींनंच या प्रसंगीं माझ्या ज्ञातीला जितकी आशा व उत्तेजन मिळेल, तितकें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीनें मिळणार नाहीं, असे मी जेव्हां त्यांनां सांगितलें, तेव्हां त्यांच्या मनावर माझ्या विधानाचा चांगला परिणाम झाला, असें मला दिसलें.

मी प्रेसिडेंटबरोबर बोलत असतांना अटलांटाचा एक गोरा नागरिक हा प्रजापक्षाचा आणि पूर्वी गुलामांचा धनी होता-खोलींत आम्ही बसल्या ठिकाणीं आला. आपण टस्केजीला जावें कीं नाहीं याबद्दल प्रेसिडेंटनीं त्याचें मत विचारिलें असतां " ही गोष्ट आपण अवश्य करावी !" असें त्या अटलांटाच्या गृहस्थानें तत्काळ उत्तर दिलें. आमच्या ज्ञातीचे मित्र, डॉक्टर जे. एल. एम. करी यांनीं या उत्तराला दुजोरा दिला. झालें. ता. १६ डिसेंबर रोजीं आमची शाळा पाहण्यास येण्याचें प्रेसिडेंटनीं वचन दिलें !

आमची शाळा पाहण्यास प्रेसिडेंट येणार आहेत असें जेव्हां जाहीर झालें, तेव्हां आमच्या शिक्षकांनां व विद्यार्थ्यांनां जितका आनंद झाला, तितकाच शाळेहून एक मैल लांब असलेल्या टस्केजी गांवांतील गोऱ्या लोकांनांहि झाला. गांवांतील गोरे स्त्रीपुरुष यांनीं शहर शृंगारण्यास व सुशोभित करण्यास सुरुवात केली, आणि या बड्या पाहुण्याचें स्वागत योग्य रीतीनें व्हावें, म्हणून शाळेच्या कामगारांबरोबर मिळून काम करण्याकरितां त्यांनीं कांहीं कमिट्याहि स्थापन केल्या. टस्केजीच्या आणि आसपासच्या गोऱ्या लोकांचें आमच्या संस्थेविषयीं काय मत आहे याची कल्पना मला यापूर्वी नव्हती. प्रेसिडेंटच्या स्वागताची तयारी चालली असतां हे डझन डझन लोक माझ्यापाशीं येत आणि म्हणत "आम्हांला पुढें पुढें येऊन नांव मिळविण्याची इच्छा नाहीं; पण आमच्या हातून जर कांहीं तुम्हाला मदत होणें शक्य असेल, किंवा तुमचें ओझें आम्हांकडून हलके होणें शक्य असेल, तर मात्र आम्ही कांहीं करूं इच्छितों." मी त्यांनां कांहींहि नुसतें सांगण्याचा अवकाश, कीं, मदत करण्यास आपण एका पायावर तयार आहों, असें ते म्हणत.

खरोखर, प्रेसिडेंटचें आगमन व अलाबामा येथील सर्व जातींच्या लोकांनीं आमच्या कामगिरीबद्दल दर्शविलेला अभिमान, या दोन्ही गोष्टींच्या योगानें माझें अंतःकरण सारखेंच कळवळलें.

ाछैउता. १६ डिसेंबर रोजी सकाळी टस्केजीच्या लहान गांवांत पूर्वी केव्हांहि झाली नव्हती अशी लोकांची गर्दी झाली. प्रेसिडेंटबरोबर मिसेस मॅक् किनले व एकाशिवाय बाकी सर्व मंत्रिमंडळांतील कामदार, ही मंडळी आली; आणि बहुतेकांनीं आपल्या कुटुंबांतील नातलगमंडळी व आपल्या बायका यांनांहि बरोबर आणिलें होतें. स्पॅनिश अमेरिकन युद्धाहून नुकतेच परत आलेले जनरल शॅप्टर व जनरल जोसेफ व्हीलर आदिकरून प्रमुख सेनापति या समारंभाला आले. वर्तमानपत्रकारांचे बातमीदारहि बरेच आले होते. या सुमाराला मांटगमरी येथे अलाबामा संस्थानच्या राज्यनियमकारी सभेची बैठक होणार होती; पण, टस्केजीला जातां यावें ह्मणून सभेची बैठक तहकुब ठेवावी, असा ठराव या सभेनें पास करून घेतला, आणि गव्हरनर व इतर कामगार यांसहित या सभेची सर्व मंडळी प्रेसिडेंट येण्यापूर्वी दाखल झाली.

टस्केजीच्या लोकांनीं स्टेशनापासून शाळेपर्यंत सर्व भाग उत्तम रीतीनें शृंगारिला होता. वेळ वांचविण्यासाठीं सर्व संस्थेचें निरीक्षण थोड्या अवकाशांत होण्याची आह्मीं व्यवस्था केली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातांत एकेक ऊंस धरावयाला दिला होता व उंसाच्या एका टोंकाला कापसाचीं बोंडें लाविली होतीं. विद्यार्थ्यांच्या मागें घोडे, खेंचरें आणि बैल असून त्यांच्यावर लादलेल्या ताफ्यांवर शाळेतील सर्व शाखांचें काम दाखविण्यांत आलें. हें ताफ्यावर दाखविण्यांत आलेलें काम, शाळेत सध्यां चालू असलेलें होतें, एवढेच नव्हे, तर पूर्वीची काम करण्याची पद्धत आणि नवीन काम करण्याची पद्धत यांतील विरोध यांत दाखविला होता. उदाहरणार्थ, लोणी काढण्याची जुनी पद्धत आणि सुधारलेली पद्धत, जमीन नांगरण्याच्या जुन्यानव्या पद्धतींतील भेद, स्वयंपाक व गृहव्यवस्था या विषयींच्या नव्याजुन्या पद्धतींतील भेद, स्पष्टपणें दाखविले होते. हे सर्व ताफे एकामागून एक याप्रमाणें जाण्यास दीड तास लागला.

आत्मोद्धार.

विद्यार्थ्यांनी नुकत्याच बांधलेल्या प्रार्थनामंदिरांत प्रेसिडेंट साहेबांनीभाषण केले. त्या भाषणाचा कांहीं भाग येणेप्रमाणें आहे:-

"अशा आनंददायक ठिकाणीं आपली सर्वांची भेट होणें आणि आपली कामगिरी प्रत्यक्ष पाहण्याची संधि मिळणें हें फारच समाधानकारक आहे, असें मी समजतों. टस्केजी नॉर्मल आणि इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूट या संस्थेची मूळ कल्पना फारच अनुकरणीय आहे, आणि या देशांतच नव्हे तर परदेशीहि तिची कीर्ति वाढत आहे.

"या विद्यार्थ्यांनां उत्तम शिक्षण देऊन पुढे त्यांनां आपल्या आयुष्यांतील दिवस इभ्रतीनें आणि उपयुक्ततेनें घालवितां यावे ह्मणून त्यांची तयारी करणारे, आणि ज्या ज्ञातीसाठीं ही शाळा स्थापन झाली त्या ज्ञातीची उन्नति करणारे, आणि या पवित्र कामी हातभार लावणारे या सर्वांचे मी अभिनंदन करितों.

" या अप्रतिम शिक्षणाच्या प्रयोगासाठीं इतकी नामी जागा दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं मिळाली असती किंवा नाहीं, याची मला शंका वाटते. या प्रयोगानें देशाच्या सर्व भागांतील पुराणप्रिय दात्यांचेंहि लक्ष्य वेधिलें असून त्यांची मदत मिळविण्यांत आली आहे.

"टस्केजीसंस्थेविषयीं भाषण करतांना बुकर टी. वॉशिंग्टन यांचें अचाट बुद्धिसामर्थ्य व त्यांचा दृढोद्योग यांविषयींचा उल्लेख न करणें अशक्यच आहे. या धाडसाच्या कामाला सुरुवात यांनींच केली, आणि या कारणास्तव यांनां श्रेय देणें योग्य आहे. यांच्या उत्साहामुळे आणि साहसामुळे शाळेची उन्नति एकसारखी होत गेली, आणि तिची योग्यता भराभर वाढत चालली. आपल्या ज्ञातीच्या पुढाऱ्यांपैकीं हे एक आहेत अशी यांची ख्याति झालेली आहे. हे उत्तम अध्यापक, उत्तम वक्ते आणि खरे परोपकारी आहेत, असा यांचा लौकिक या देशीं आणि परदेशींहि फैलावलेला आहे, व यामुळेच यांनां सर्व लोक मान देतात."

नंतर ऑनरेबल जॉन डी. लाँग आरमारावरील सेक्रेटरी, हे बोलले. त्यांच्या भाषणापैकीं कांहीं भाग पुढीलप्रमाणें आहेः
-

शेवटचे शब्द

"मला आज भाषण करितां येत नाहीं! दोन्ही ज्ञातींच्या आणि दोन्ही वर्णाच्या माझ्या देशबंधूंविषयीं वाटत असलेली आशा, मान आणि अभिमान यांनी माझें अंतःकरण अत्यंत भरून गेलेलें आहे. आपली कामगिरी पाहून मला फार कृतज्ञतापूर्वक सानंदाश्चर्य वाटत आहे, आणि यापुढे आपली एकसारखी प्रगति होत जाईल आणि हातीं घेतलेला प्रश्न आपण सोडवाल, असा मला पूर्ण भरंवसा आहे.

"मी ह्मणतों, कीं, प्रश्न सोडविला आहे! आज आमच्यासमोर जें चित्र दाखविण्यांत आले आहे, तें, वॉशिंग्टन (जॉर्ज) आणि लिंकन यांच्या चित्रांबरोबर ठेवण्याजोगें आहे, आणि पुढील पिढ्यांनीं भविष्यकाळीं तें मनन करण्याजोगेंहि आहे. या सुरेख चित्राची देशांतील सर्व वर्तमानपत्रकारांनीं सर्वत्र प्रसिद्धि करावी. तें चित्र याप्रमाणें आहेः -युनायटेइस्टेट्स् चे प्रेसिडेंट हे प्लॅटफार्मवर उभे आहेत; एका बाजूला अलाबामाचे गव्हरनर आहेत, दुसऱ्या बाजूला थोड्याच वर्षापूर्वी दास्यांत असलेल्या ज्ञातीचे प्रतिनिधि आणि टस्केजी संस्थेचे काळे प्रेसिडेंट हे आहेत. याप्रमाणें हें त्रिमूर्तीचें चित्र आहे.

"ज्याच्या आश्रयाखालीं असा हा देखावा अमेरिकन लोकांच्या दृष्टीला पडत आहे, त्या प्रेसिडेंटचें ईश्वर कल्याण करो ! हा प्रश्न आपण स्वतः सोडविण्याला समर्थ आहों अस दर्शविणाऱ्या अलाबामा संस्थानाचेंहि जगदीश कल्याण करो! वक्ता, परोपकारी आणि सद्गुरूचाप्रभूचा चेला बुकर टी. वॉशिंग्टन यांचेंहि ईश्वर कल्याण करो ! आज सद्गुरु पृथ्वीच्या पाठीवर असते तर त्यांनींहि हेंच काम चालू ठेविलें असतें."

शेवटी पोस्टमास्तर जनरल स्मिथ यांनीं आपलें भाषण खालील शब्दांनी पुरें केलें:-

"गेल्या थोड्या दिवसांत आम्हीं पुष्कळ देखावे पाहिले. दक्षिणेतील मोठ्या शहरांचें वैभव आणि शोभा आह्मीं पाहिली, लढाईतील योद्ध्यांची मिरवणूक जात असतांना पाहिली, आणि पुष्पांनीं भूषित अशी फौजेची कवायतहि आह्मीं पाहिली; पण, आज सकाळीं आह्मीं जो देखावा पाहिला,--

आत्मोद्धार.

–त्याहून अधिक परिणामकारक, अधिक उत्तेजक आणि आमच्या भविष्याविषयी अधिक स्फूर्तिदायक असा दुसरा कोणताहि देखावा आम्हीं पाहिला नाहीं, असें माझें आणि माझ्या मित्रांचेंहि मत आहे !"

प्रेसिडेंटची स्वारी वॉशिंग्टनला परत गेल्यावर, खालीं लिहिल्याप्रमाणें एक पत्र आलें:-

"सरकारी हवेली, वाशिंग्टन,
ता. २३ डिसेंबर, १८९९.

प्रिय महाशय !

आजच्या टपालानें प्रेसिडेंटसाहेबांनीं आपल्या संस्थेला दिलेल्या भेटीच्या समयाच्या, जाड अक्षरांनी लिहिलेल्या स्मारक कागदांच्या प्रति आपल्याकडे पाठविण्यास मला आनंद वाटतो. या कागदांवर प्रेसिडेंटसाहेब आणि त्यांच्याबरोबर असलेले मंत्री, यांच्या स्वदस्तूरच्या सहया आहेत. टस्केजी येथे आम्हीं आल्यावेळीं तुह्मीं आमचा जो पाहुणचार केला, व सर्व कार्यक्रम उत्तम रीतीनें पार पाडिला, याबद्दल मी तुमचें मनापासून अभिनंदन करितों. कार्यक्रमाचा प्रत्येक भाग चांगल्या तऱ्हेने पार पाडण्यांत आला, आणि प्रत्येक पाहुण्याला तो मनापासून आवडला. निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गढलेल्या विद्यार्थ्यांचें आपण जें प्रदर्शन दाखविलें, तें खुबीदार होतें; इतकेंच नव्हे, तर तें सुपरिणामकारकहि होतें. प्रेसिडेंटसाहेब आणि त्यांचें मंत्रिमंडळ यांनीं आपल्या कामगिरीला दिलेला मान योग्य असून तो आपल्या संस्थेच्या भावी भरभराटीचा सूचक होता. कार्यक्रमांत आपण दाखविलेला विनय आमच्या पार्टीतील सर्व लोकांनां आवडला, हें सरतेशेवटीं सांगितल्यावांचून मला राहवत नाहीं. आपल्या उपयुक्त आणि स्वदेशहितैषी संस्थेची एकसारखी भरभराट होवो, असें मी अभीष्टचिंतन करितों.

आपला, जॉन ॲडिसन पोर्टर,
प्रेसिडेंटचा सेक्रेटरी."

शेवटचे शब्द.

एक डालरचीसुद्धां मिळकत नसतांना, एक शिक्षक व तीस विद्यार्थी यांसहित एका जुन्या पडक्या खोपटांत आणि खुराड्यांत शाळेविषयीं मी पहिला प्रयत्न सुरू केलेल्या गोष्टीला आज वीस वर्षें झालीं. सध्यां २३०० एकर जमीन संस्थेच्या मालकीची आहे, आणि यांपैकीं ७०० एकरांपेक्षां अधिक जमीन दरवर्षी विद्यार्थ्यांच्या मदतीनें पेरिली जाते. सध्यां लहानमोठ्या सर्व मिळून संस्थेच्या चाळीस इमारती आहेत. यांपैकीं चार शिवायकरून इतर सर्व इमारती विद्यार्थ्यांनींच बांधविल्या आहेत. विद्यार्थी जमीनीची लागवड करीत असतांना व इमारती बांधीत असतांना त्यांनां योग्य शिक्षकांकडून शेतकीच्या उत्तम पद्धतीचें आणि बांधकामाविषयींच्या धंद्यांचें शिक्षण दिलें जातें.

हल्लीं संस्थेत विद्यार्थ्यांनां बौद्धिक व धार्मिक शिक्षण उत्तम मिळतें. त्याशिवाय उद्योगधंद्यांचीं अठ्ठावीस खातीं आहेत. या खात्यांत विद्यार्थ्यांनां अनेक कला व हुन्नर शिकवितात. यांत शिकून तयार झालेल्या विद्यार्थ्यांनां येथेंच काम मिळतें. दक्षिणेतील काळ्यागोऱ्या लोकांकडून आमच्या संस्थेत शिकून तयार झालेल्या ग्रॅज्युएटांची इतकी मागणी असते, कीं, त्या मागणीच्या निम्मे मागणीहि आह्मांला पुरवितां येत नाहीं. तसेंच, संस्थेत दाखल होण्यासाठीं ज्यांचे अर्ज येतात, त्या अर्जदारांपैकीं निम्म्याहून अधिक विद्यार्थी दाखल करून घेण्यास आमच्यापाशीं पुरेशा इमारती नाहींत आणि खर्चाला पुरेसा पैसा नाहीं.

औद्योगिक शिक्षण देतांना तीन गोष्टी आह्मी ध्यानांत ठेवितों. (१) विद्यार्थ्यांनां असें शिक्षण द्यावयाचें, कीं, सध्यां दक्षिणेतील परिस्थितींत त्यांनां काम करितां यावें; ह्मणजे तेथील लोकांनां हव्या असलेल्या वस्तु किंवा पदार्थ त्यांनां करितां येतील. (२) संस्थेतून तयार होणाऱ्या प्रत्येक ग्रॅज्युएटाच्या अंगीं इतकें कौशल्य, बुद्धिमत्ता व नैतिक शील असलें पाहिजे, कीं, त्याला आपला व दुसऱ्याचा उदरनिर्वाह चांगल्या रीतीनें करितां यावा. (३) श्रम टाळण्याऐवजीं श्रमावर प्रेम केलें पाहिजे; श्रम करण्यांत कमीपणा नसून श्रम करणें—-

–सर्वोत्तम व श्रेष्ठ आहे, असें प्रत्येक विद्यार्थ्याला मनापासून वाटू लागल्याशिवाय त्याला संस्थेतून बाहेर पाठवावयाचा नाहीं. विद्यार्थ्यांनां शेतकीचे शिक्षण आणि मुलींनां गृहकृत्यांसंबंधी शिक्षण आह्मी देतोच. त्याशिवाय दरवर्षी बऱ्याच मुली आह्मी शेतकीशिक्षणांत तयार कारतों. त्यांनां बगीच्याचे काम, उत्तम फळे तयार करण्याचे काम, दूधदुभते तयार करण्याचे काम, मधमाशांची जोपासना आणि वाढ करण्याचे काम,. चांगलीं बदकें पैदा करण्याचें काम, इत्यादि कामेंहि शिकविलीं जांतात.

आमची संस्था कोणत्याहि विशिष्ट धार्मिक पंथाची नाहीं, तरी ' फेल्प्स हॉल बायबल ट्रेनिंग स्कूल' नांवाची एक शाखा संस्थेत आहे. या शाखेंत विद्यार्थ्यांनां धर्मोपदेशकाचें काम आणि खेड्यापाड्यांत जाऊन करण्याचें इतर धार्मिक काम शिकविण्यांत येतें. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी आहे, कीं, या शाखेतील प्रत्येक विद्यार्थी रोज अर्धादिवस, कामांतील प्रावीण्य आणि उद्यमप्रीति संपादन करावी म्हणून कोणत्यातरी एका उद्योगधंद्यांत काम करितो. संस्थेतून हे विद्यार्थी बाहेर पडले म्हणजे हे ज्या लोकांत धार्मिक काम करावयाला जातात, त्या लोकांनां उद्योगधंद्याच्या कामांतहि योग्य उदाहरण घालून देतात.

संस्थेच्या मिळकतीचें मान हल्लीं ३,००,००० डॉलर आहे. या रकमेंत कायमच्या फंडांचें सध्यांचें २,१५,००० डॉलरचें उत्पन्न मिळविले असतां संस्थेचें उत्पन्न सुमारें पांच लाख डालर होतें. हल्ली आम्हांला अधिक इमारतींची जरी जरूर आहे, व खर्चाला पैसाहि जरी अधिक हवा आहे, तरी कायमच्या फंडाची रक्कम ५,००,००० डालर वाढविणे यावेळीं फार जरुरीचे आहे. सध्यां वार्षिक खर्च सुमारे ८०,००० डालर आहे. यांपैकी बरीच रक्कम मी घरोघर व दारोदार हिंडून जमा करितों. आमच्या संस्थेच्या मिळकतीवर कोणाचा गहाणहक्क नाहीं. संस्थेचे सर्व कागदपत्र पंचमंडळाच्या नांवें आहेत. या पंचमंडळांतः कोणत्याहि एका विशिष्ट धर्मसांप्रदायाचे लोक नाहींत. संस्थेचा सर्व ताबा या पंचांच्या हातीं आहे.

शेवटचे शब्द

विद्यार्थ्यांची संख्या तीसांपासून अकराशेंपर्यंत वाढलेली आहे. अमेरिकेतील २७ संस्थानें, आफ्रिका, क्युबा, पोर्टोरिको, जमेका आणि इतर परदेश इत्यादि ठिकाणांहून विद्यार्थी येतात. संस्थेत कामगार शिक्षक सुमारे ८६ आहेत, आणि शिक्षकांच्या कुटुंबांतील मंडळी जमेला धरिली तर सुमारे १४०० लोक संस्थेंत नेहमीं असतात.

कुचेष्टा, खोड्या व दंगाधोपा केल्याशिवाय इतके लोक एकत्र कसे राहतात, असा प्रश्न मला पुष्कळदां विचारण्यांत आलेला आहे. याचीं उत्तरें दोन आहेतः-- (१) शिक्षणासाठीं आमच्याकडे येणारे स्त्रीपुरुष आस्थेवाईक असतात, आणि (२) प्रत्येकजण आपापल्या कामांत गुंग असतो. खालीं दिलेल्या आमच्या नित्यक्रमावरून याची खात्री पटेल.

सकाळी ५ वाजतां उठण्याची घंटा. ५-३० न्याहारीच्या तयारीची घंटा. ६ न्याहारीची घंटा. ६-२० न्याहारी खलास. ६-२० ते ६-५० खोल्या झाडणें व लोटणें. ६-५० कामाची घंटा. ७-३० सकाळचा अभ्यास. ८-२० सकाळच्या शाळेची घंटा. ८-२५ सर्व विद्यार्थ्यांनां ओळीनें उभे करून त्यांचा पोषाख पाहणें. ८-४० प्रार्थनामंदिरांत उपासना. ८-५५ दैनिकपत्रे पांच मिनिटें वाचणें. ९ क्लास सुरू. १२ क्लास - बंद. १२-१५ जेवण. दुपारी १ वाजतां कामाची घंटा. १-३० क्लास सुरू. ३-३० क्लास बंद.५-३० सर्व काम खलास झाल्याची घंटा. ६ संध्याकाळचें जेवण. ७-१० सायंकाळची प्रार्थना. ७-३० संध्याकाळचा अभ्यास. ८-४५ अभ्यास बंद. ९-२० विश्रांतीची घंटा. ९-३० झोपेची घंटा.

संस्थेची योग्यता संस्थेतून तयार होणाऱ्या ग्रॅजुएटांवर अवलंबून - आहे, हें नेहमीं आह्मी ध्यानांत ठेवितों. शिक्षणक्रम ज्यांनीं पुरा केला आहे, आणि जे चांगलें काम करतां येण्यापर्यंत शिकले आहेत, अशा दोन्ही तऱ्हाच्या लोकांची संख्या पाहूं गेलें, तर दक्षिणेतील निरनिराळ्या भागांत टस्केजी संस्थेतील सुमारें तीन हजार स्त्रीपुरुष काम करीत आहेत, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हे सर्व स्त्रीपुरुष आमच्या ज्ञातीच्या लोकांनां, त्यांनीं आपली आधिभौतिक, नैतिक,--

आत्मोद्धार.

–धार्मिक आणि शिक्षणविषयक सुधारणा कशी करून घ्यावी, हे स्वतःच्या प्रयत्नांनीं व उदाहरणांनीं दाखवीत आहेत. याशिवाय दुसरी महत्त्वाची गोष्ट ही, कीं, हे सर्वजण इतकें व्यावहारिक ज्ञान व आत्मसंयमन दाखवीत आहेत, कीं, त्यायोगें दोन्ही ज्ञातींतील परस्परसंबंध चांगले होत चालले आहेत, आणि आमच्या ज्ञातींतील स्त्रीपुरुषांनां शिक्षण देणे फार महत्त्वाचें-फायद्याचें आहे, असें दक्षिणेतील गोऱ्या मनुष्याला वाटूं लागलें आहे. याशिवाय मिसेस वॉशिंग्टन इनें चालवि लेला आयांचा क्लब आणि लागवडीचें काम यांचाहि सुपरिणाम होत आहे.

आमचे ग्रॅजुएट जेथेंजेथें जातात, तेथेंतेथें जमिनी खरेदी करण्यांत, घरें सुधारण्यांत, काटकसर करण्यांत, शिक्षणांत, नीतिमत्तेंत फार विलक्षण सुधारणा होत आहेत. आमच्या स्त्रीपुरुष ग्रॅजुएटांमुळे साऱ्या समाजामध्यें क्रांत्या घडून येत आहेत.

दहा वर्षापूर्वी टस्केजी येथे पहिली नीग्रोपरिषद् भरविण्याची मी व्यवस्था केली. सांप्रत ही परिषद् दरवर्षी भरते, आणि ज्ञातीचे ८००।९०० प्रतिनिधि टस्केजी येथें परिषदेला येऊन लोकांची औद्योगिक, मानसिक आणि नैतिक (शिक्षणाची) स्थिति कशी आहे याचा नीट विचार करितात, व त्या स्थितीत सुधारणा कशी करावी याविषयीं उपाय योजितात. टस्केजीच्या या मुख्य परिषदेपासून दुसऱ्याहि बऱ्याच पोटपरिषदा निरनिराळ्या संस्थानांत निघाल्या आहेत, आणि त्याहि हेंच काम करीत आहेत. गेल्या वर्षाच्या बैठकींत एका प्रतिनिधीनें या सभांचा परिणाम असा सांगितला, कीं, त्याच्या समाजांतील दहा नीग्रो कुटुंबांनीं पैसा देऊन नवीन घरें विकत घेतलीं. नीग्रो परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं 'कामकऱ्यांची परिषद्' भरते. दक्षिणेतील मोठमोठ्या संस्थानांत काम करीत असलेले कामगार व शिक्षक या परिषदेत जमतात. सर्व लोकांची खरीखुरी स्थिति काय आहे, हें या लोकांनां नीग्रो पारीषदेंत चांगलें पहावयाला सांपडतें.

शेवटचे शब्द

प्रत्येक कामांत ज्यानें मला साहाय्य केलें आहे, अशा मिस्टर टी थॉमस फारच्यूनसारख्या कांहीं प्रमुख नीग्रो लोकांच्या मदतीनें १९०० तालच्या उन्हाळ्यांत मीं नॅशनल नीग्रो बिझिनेस लीग (राष्ट्रीय नीग्रो औद्योगिक संघ) स्थापन करण्याचा घाट घातला. या संस्थेची पहिली बैठक बोस्टन येथे झाली, आणि त्यावेळीं युनायटेड स्टेटस् मध्ये निरनिराळ्या भागांत व्यापारांत व उद्योगधंद्यांत काम करीत असलेले लोक हजर राहिले. पहिल्या बैठकीला तीस संस्थानांतून प्रतिनिधि आले होते. या राष्ट्रीय संस्थैंतून दुसऱ्या पोटसंस्था निरनिराळ्या संस्थानांत ठिकठिकाणीं स्थापन झाल्या.

टस्केजी संस्थेचें सर्व विधायक काम पाहणें, व संस्थेच्या खर्चाची बहुतेक रक्कम गोळा करणें, या कामांशिवाय, दक्षिणेंतील गोऱ्या व माझ्या ज्ञातीच्या श्रोतृसमुदायापुढें, तसेंच उत्तरेकडील कांहीं सभांपुढे व्याख्यानें देण्यासाठी अयाचित आलेलीं कांहीं आमंत्रणें मला नाकारितां येत नाहींत. या भाषणांत माझा किती वेळ जातो, हें न्यूयॉर्क बफालो येथील एका वर्तमानपत्राच्या खालीं दिलेल्या उताऱ्यावरून चांगलें कळून येईल. त्या शहरांतील नॅशनल एज्युकेशनल असोसिएशनपुढे झालेल्या माझ्या भाषणाचा तो उतारा आहे:-

" कालरात्रीं पश्चिमेकडच्या बाजूनें इरॉकिस येथे येऊन दाखल झालेले, जगांतील काळ्या लोकांतील सुप्रसिद्ध अध्यापक बुकर टी वाशिंटन हे या शहरांत आल्यापासून एकसारखे कामांत व्यग्र आहेत. त्यांचा प्रवासाचा शीण दूर होतो न होतो, तोंच त्यांनां सायंकाळच्या भोजनसमारंभाला जावें लागलें. नंतर इरॉकिसच्या दिवाणखान्यांत त्यांनी भेटीला आलेल्या लोकांची एक सभा (दरबार) आठ वाजेपर्यंत भरविली. त्यावेळीं युनायटेड स्टेट्समधील दोनशेंहून अधिक शिक्षक वअध्यापक यांनीं त्यांचे स्वागत केलें. आठ वाजल्यानंतर त्यांनां गाडीतून म्युझिक हॉल येथे नेण्यांत आलें, आणि तेथे दीड तासांत 'नीग्रो शिक्षण' या विषयावर त्यांनी सुमारें पांच हजार श्रोत्यांसमोर दोन—-

—जोरदार भाषणें केली. नंतर रेव्हरंड मिस्टर वाटकीन्स ज्यांत प्रमुख आहेत अशा एका नीग्रोप्रतिनिधिमंडळानें त्यांचें थोडेसें स्वागत करण्यासाठीं त्यांनां उचलून नेलें. "

या भाषणांच्या कामाशिवाय, दोन्ही ज्ञातींच्या हिताशी संबंध असलेल्या कांहीं गोष्टींकडे दक्षिणेंतील व साधारपणें सर्व देशांतील लोकांचे लक्ष्य वर्तमानपत्रद्वारें वेधण्याचें कर्तव्यकर्म केल्यावांचून मला राहवत नाहीं. उदाहरणार्थ, जबरदस्तीच्या तडकाफडकी 'लिंच' न्यायाच्या संबंधी मीं हें कर्तव्यकर्म पुष्कळ वेळां केलें आहे. लुशानिया स्टेट कॉनस्टीट्यूशनल कन्व्हेन्शनची बैठक जेव्हां चाललेली होती, तेव्हां आमच्या ज्ञातीला न्याय मिळावा म्हणून मी त्या संस्थेला एक जाहीरपत्र लिहिलें होतें. या माझ्या सर्व प्रयत्नांमध्यें दक्षिणेतील व देशांतील इतर सर्व भागांतील वर्तमानपत्रांची मदत व सहानुभूति मला मिळालेली आहे.

बाह्य व तात्पुरत्या अशा कांहीं चिन्हांमुळे कोणाचें मत जरी प्रतिकूल झालें, तरी मला आतां माझ्या ज्ञातीविषयीं पूर्वीपेक्षां अधिक आशा वाटू लागली आहे. गुणांची पारख आणि चहा करणारा श्रेष्ठ मानवी कायदा सनातन व सार्वत्रिक आहे. दक्षिणेंतील गोरे लोक आणि त्यांचे पूर्वीचे गुलाम, अशा दोघांच्या अंतःकरणामध्यें वर्णद्वेषापासून मुक्त होण्याची जी कांहीं खटपट चाललेली आहे, ती बाह्य जगाला बाहेरील लोकांनां माहीत नाहीं, किंवा त्यांनां त्या खटपटीचें मर्म समजणार नाही. आणि ज्याअर्थी दोन्ही ज्ञातींचे असे प्रयत्न चालले आहेत, त्याअर्थी यांनां सर्व लोकांची क्षमा, सहानुभूति व मदत मिळावी असें मी ह्मणतों.

या आत्मचरित्राचे शेवटचे शब्द लिहीत असतां, मी मुद्दाम नव्हे व्हर्जिनीयांतील रिचमंड शहरीं आलों आहे. हें रिचमंड शहर कांहीं वर्षांपूर्वी दक्षिणेंतील संस्थानांच्या राजधानीचें शहर होतें, आणि पंचवीस वर्षापूर्वी याच शहरांत रस्त्याच्या एका उंचवट्याखालीं दारिद्र्यावस्थेंत सांपडल्यामुळे मला निजावें लागले होतें.

शेवटचे शब्द.

यावेळी मी रिचमंड शहरांत काळ्या लोकांचा पाहुणा या नात्यानें आहें, आणि त्यांच्या विनंतीवरून शहरांतील अत्यंत प्रशस्त व भव्य अशा अकॅडेमी ऑफ म्युझिक' नामक दिवाणखान्यांत दोन्ही ज्ञातीसमोर भाषण करावयाला आलों आहे. हा दिवाणखाना या वेळी प्रथमच काळ्या लोकांनां वापरावयाला मिळाला. मी येथे येण्याच्या पूर्वदिवशी, माझे भाषण ऐकण्यास सर्वांनी मिळून जावें असा सिटीकौंसिलनें ठराव पास केला. राज्यनियमकारी समेनें, (यांत हाऊस ऑफ डेलिगेट्स् व सीनेट्स् या सभांचा अंतर्भाव होतो, माझ्या भाषणाच्या प्रसंगी सर्वांनीं हजर रहावें असा ठराव एकमतानें पास केला. शेंकडों काळे लोक, पुष्कळ नामांकित गोरे रहिवासी, सिटीकौंसिल, राज्यनियमकारी सभा आणि संस्थानचे सरकारी कामदार या सर्वांसमक्ष मी आशा व धैर्य यांनीं युक्त असा माझा संदेश सांगितला, आणि ज्या संस्थानांत माझा जन्म झाला तेथें असें माझें स्वागत केल्याबद्दल मी दोन्ही ज्ञातींचे मनापासून आभार मानिले.

परिशिष्ट.

आर्मस्ट्रांगच्या मृत्युपत्राचें टांचण. *

"आतां परिस्थिति अनुकूल व सुंदर आहे. कुटुंबाची-संस्थेची सर्व व्यवस्था लागली आहे. भिण्याजोगें कांहीं उरलें नाहीं. उलट ईश्वराचे आभार मानण्याची वेळ आली आहे. माझा अंतकाल समीप येऊन ठेपला आहे. मृत्यु केव्हां येईल याचा नेम नाहीं. यासाठी भावीकालाकडे नजर देऊन मला जें कांहीं सांगावेंसें वाटतें तें मी आतां सांगून ठेवितों.

एकादा विद्यार्थी वारला असतां त्याला ज्या ठिकाणी पुरण्यांत येईल, तेथे-शाळेच्या स्मशानभूमींत विद्यार्थ्यांमध्यें माझें प्रेत पुरावें, अशी माझी इच्छा आहे. माझ्या थडग्यावर छत्री, स्मारक किंवा दुसरें कसलेंहि अवडंबर उभारूं नये. फक्त एक साधा दगड उभारावा. त्यावर कोणताहि उतारा अगर विचार कोरूं नये. फक्त माझें नांव आणि जन्मनिधनकाल एवढेच लिहावें. माझ्या अंत्यविधीच्या वेळीं कोणींहि उपदेश किंवा वक्तृत्व-पूर्ण भाषण करण्याचा प्रयत्न करूं नये. लढाईत वारलेल्या शूर शिपायासारखी माझी उत्तरक्रिया व्हावी.

शाळेचें-संस्थेचें काम मित्रमंडळी चालू ठेवील, अशी मला आशा आहे. कांहीं जणांनी स्वार्थत्याग केल्याशिवाय शाळेचें काम चांगलें चालणार नाहीं.

स्वार्थत्यागाची जरुरी नाहीं अशा कार्याला ईश्वरीयोजनेंत फारसे महत्त्व नाहीं. परंतु लोक ज्याला स्वार्थत्याग असें ह्मणतात तो, ह्मणजे वस्तुतः आपल्या स्वतःचा आणि स्वतःच्या साधनांचा उत्तम आणि शुभ उपयोग–आपली वेळ, शक्ति आणि सामग्री यांचा सदुपयोग होय !

---

*हा कागद आर्मस्ट्रांगच्या इतर कांहीं कागदपत्रांसोबत त्यांच्या मृत्यूनंतर हाम्पटन येथे सांपडला, आर्मस्ट्रांगच्या ज्या ज्या मित्रांनीं, तो पाहिला त्यांनां तो आर्मस्ट्रांगच्या स्वभावाचा आणि अंतःस्वरूपाचा पूर्ण द्योतकसा वाटला. असा हा नमुनेदार कागद प्रसिद्ध करणे इष्ट वाटल्यावरून आह्मी तो प्रसिद्ध केला आहे.

एच्. बी. फ्रिसेल,
हाम्पटन संस्थेचे प्रिन्सिपाल

आर्मस्ट्रांगच्या मृत्युपत्राचे टांचण.

असा स्वार्थत्याग जो कोणी करीत नाहीं, तो अत्यंत केविलवाणा होय ! तो असद्धर्मी किंवा नास्तिक होय! कारण, ईश्वराविषयीं त्याला कांहीच माहिती नाहीं !

संस्थेविषयी अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे भांडण न करणे, सर्वांनी एकजुटीने काम करणें, उतावीळपणानें अद्वातद्वा बोळण्याचें आणि अद्वातद्वा वागण्याचे सोडून देणे, शहाणपणानें आणि उदारपणानें सर्वांचे कल्याण साधणें, कितीहि हुषार किंवा संस्कृत असले तरी ज्यांचे डोके शांत आणि समतोल नाही अशा लोकांनां संस्थेत न ठेवणे, या आहेत. पाखंडीपणापेक्षां भांडखोरपणा अधिक वाईट आहे !

माझे चरित्र लिहिण्याविषयीं कोणींहि प्रयत्न करूं नये, अशी माझी इच्छा आहे. चांगले मित्र सुंदर चरित्र रेखाटतील; पण त्यांत पूर्ण सत्य असणार नाहीं ! जीविताचें सत्य महत्त्व फार खोल असतें. तें आह्मां मानवांनां कचित् च कळतें. फक्त तें एका ईश्वरालाच ठाऊक ! ईश्वराच्या दयालुत्वावर माझा पूर्ण भरंवसा आहे. एकाद्याचा धर्म किंवा सांप्रदाय-Creed-जितका लहान असेल, तितकें अधिक चांगलें. 'ईश्वरा ! मी तुला अनन्यभावें शरण आलों आहें,' एवढाच सिद्धांत-वाक्य *मला पुरे आहे.

माझे आईबाप, हावै येथील माझें घर, युद्धांतील अनुभव, वुइल्यम्स येथे कॉलेजांत काढलेले दिवस, आणि हाम्पटन येथील माझ्या आयुष्यांतील कामगिरी, या सर्वांबद्दल मी परमेश्वराचे फार आभार मानितों. हाम्पटननें मला अनेक रीतीनें धन्य केलें आहे ! कारण, हाम्पटनच्या कामगिरीत या देशांतील सर्वोत्तम लोक माझे मित्र आणि मदतनीस झाले आहेत, व युद्धामुळे मुक्त झालेल्या लोकांचें नीग्रोंचें कांहींतरी कल्याण करण्याची अपरोक्ष संधि, आणि जित लोकांचें दक्षिणेतील गोऱ्या लोकांचें कल्याण करण्याची परोक्ष संधि-मला आयती मिळालेली आहे. ताम्रवर्णी इंडियन लोकांची सेवा करण्याचाहि मला सुयोग—

---

*'आह्मी जाणों हरीचे पाय। यम न जाणों, नियम न जाणों। न जाणों अन्य उपाय ॥'

आत्मोद्धार.

—प्राप्त झाला आहे. माझ्यासारखा योग फार थोड्यांच्या वांट्याला येत असेल. खरोखर, माझ्या आयुष्यांत मीं कांहीं त्याग केला नाहीं. प्रत्येक गोष्टींत, प्रत्येक कार्यात योग्य असा सल्ला मला मिळत गेला.

प्रार्थना-उपासना किंवा भक्ति ही या जगांत एक मोठी अजब चीज आहे. ती आह्मांला ईश्वरासमीप नेते. माझी स्वताची प्रार्थना अगदीं अशक्त, कमकुवत आणि अनिश्चित अशी असे; पण, जर मीं कांहीं सर्वात चांगलें असें कृत्य केलें असेल, तर तें माझी प्रार्थना होय ! हें सनातन तत्त्व आहे, असें मला वाटतें ! सनातन, अनंत अशा तत्त्वा-वांचून दुसऱ्या कोणत्या गोष्टींत आह्मांला आनंद मिळणार ?

परलोकची झुळुक (दर्शन) मिळण्याविषयीं मी अत्यंत उत्सुक झालों आहे. परलोक कसा असेल? मला वाटतें, तो फार सुंदर आणि स्वाभाविक असेल, यांत शंका नाहीं. आह्मीं मृत्यूला घाबरूं नये, तो आमचा मित्र आहे !

मृत्यूचा विचार मनांत येतांच मला जें कांहीं दुःख होतें तें माझी प्रिय, पतिव्रता पत्नी आणि बिचारी प्रिय मुलें, यांविषयीं होय! पण त्या सर्वांनींहि धैर्याचा आश्रय करून धीर धरून हा वियोग सोसावा आणि बळकट व्हावें. त्या सर्वांनीं मला फार सुख दिलें आहे.

हाम्पटनची अवनति होतां कामा नये! या देशच्या काळ्या व ताम्रवर्णी लेकरांशीं इमानीपणे वागणाऱ्या आणि शिक्षणाची खरी कल्पना असणाऱ्या तुह्मी माझ्या मित्रांनीं इकडे लक्ष्य द्यावें.

माझे जुने शिपाई-आणि विद्यार्थी यांच्यापासून मला अवर्णनीय सुख झालें आहे.

आपल्या अंतःस्फूर्तिनुरूप वागणें-स्वतःला मागें ठेवून-विसरून-देव आणि देश यांविषयी विचार करणें, देवाला आणि देशाला अधिक मान देणें, यांपासून आमचें फार कल्याण होतें !

अंतकालची घंटा नुकतीच वाजली !

हाम्पटन, व्हर्जीनिया,

(वर्षप्रतिपदा)
ता. १ जानेवारी,
१८९० इसवी.) .}.   एस्. सी. आर्मस्ट्रांग.